# श्री सद्गुरु योगानंद सरस्वति चरित्र



दत्त संस्थान गुंज ( जि. परभणी )

ॐ

॥ श्री गुरुदेव वासुदेवानंद सरस्वत्यै नमः ॥

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

# श्री सद्गुरु योगानंद सरस्वति

ऊर्फ

# गांडा महाराज

# यांचें चरित्र

[ दत्तसंस्थान, गुंज ]

लेखक

संतचरणरज दहिवेलकर, नंदुरबार.

प्रकाशनस्थळ :— गरुडेश्वर

श्रावण वद्य पंचमी शके १८८६

त दोन रुपये पन्नास पैसे

ॐ

॥ श्री गुरुदेव वासुदेवानंद सरस्वत्यै नमः ॥

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

# श्री सद्गुरु योगानंद सरस्वति

ऊर्फ

# गांडा महाराज

# यांचें चरित्र

[ दत्तसंस्थान, गुंज ]

लेखक

संतचरणरज दाहिवेलकर, नंदुरबार.

प्रकाशनस्थळ :— गरुडेश्वर

श्रावण वद्य पंचमी शके १८८६ = 1964

किंमत दोन रुपये पन्नास पैसे

त्तसंस्थान गुंज, पोष्ट गुंज,
. पाथरी, जिल्हा परभणी ]

**प्रकाशक** – सद्‌गुरु चिंतामणि महाराज
दत्तसंस्थान गुंज ( मराठवाडा )

**मुद्रक** – वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय ( प्रायव्हेट ) लि.
४०५ नारायण पेठ, पुणें २

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

पुस्तकें मिळण्याचे ठिकाण

**दत्तसंस्थान – गुंज**
[ जिल्हा :- परभणी, ( मराठावाडा ) ]

**किंमत दोन रुपये पन्नास पैसे**

## अर्पणपत्रिका

॥ श्रीसद्‌गुरु प्रसन्न ॥

जितेंद्रिय गणाग्रणीरभिरतः परेब्रम्हणी
कलौश्रुतिपथावनेऽत्रितनयोऽवतीर्णः स्वयम्
करात्तसुकमंडलु कुमतखण्डने दण्डभृत्
पदप्रणतिवत्सलो जयति वासुदेवो यतिः

अनंत कोटि, ब्रम्हांडनायक राजाधिराज श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य, अतुलत्यागी, परमदत्तनिष्ठ श्रीवासुदेवानंद सरस्वति टेंबेस्वामि यांचे परमभक्त सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज यांचे शिष्य चिंतामणि महाराज यांजकडून सद्‌गुरूंचे चरणीं अर्पण

गरुडेश्वर :-
श्री. प. प. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति
यांचा जन्मदिन श्रा. व. ५

चिंतामणि महाराज
दत्तसंस्थान गुंज
प्रकाशक

श्रीगुरुदेवदत्त



अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| नमन | पांच |
| प्रस्तावना | सात |
| लेखकाबद्दल दोन शब्द | नऊ |
| लेखकाची दृष्टि | बारा |
| प्रकाशकांचे दोन शब्द | पंधरा |
| आशीर्वाद | अठरा |
| किरण पहिला | ३ |
| किरण दुसरा | १४ |
| किरण तिसरा | ३० |
| किरण चौथा | ४६ |
| किरण पांचवा | ६१ |
| किरण सहावा | ८१ |
| किरण सातवा | ९७ |
| किरण आठवा | ११० |
| किरण नववा | १३० |
| किरण दहावा | १४६ |
| किरण अकरावा | १६८ |
| किरण बारावा | १८२ |
| किरण तेरावा | १९६ |
| किरण चौदावा | २०९ |
| किरण पंधरावा | २२५ |
| किरण सोळावा | २४० |
| किरण सतरावा | २५० |
| किरण अठरावा | २६३ |

ॐ

श्री नृसिंह सरस्वत्यैनमः। श्री एकवीनरायनमः। पवनसुत हनुमान की जय। गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति की जय. सद्गुरु योगानंद सरस्वति महाराज की जय.

सद्गुरु योगानंद सरस्वति महाराजांचें चरित्रगुणगान गाण्यापूर्वी विघ्नहारक विद्याप्रदायक लंबोदराचे स्तवनार्थ वृत्ति वळते. अग्रपूजेचा मान कोणत्याहि शुभ-कार्यांत गणराजाचाच असतो.

स्मरण यस्य विघ्नानां वारणं वारणं मुखे। तं वंदे सर्व सौंदर्य-भवनं भवनंदनम्

गुरुदेव!

आपल्याच कृपेनें मी दोन शब्द लिहूं शकेन. बिचारें प्रतिबिंब कोणतीहि गोष्ट समर्थपणें करूंच शकत नाहीं.

भगवन् सर्वशास्त्रज्ञ शरणागत वत्सल। संसार-ताप तप्तात्मा त्वामहं शरणागतः गुरुदेव योगीवर्या!

आपणावांचून माझा कैवारी दुसरा कोण असणार? महाराज! मी वाया जात आहें. आपल्या वरदहस्तानें मला सावरा.

संसारे बहुशः क्लेशाननुभूय मुहुर्मुहुः। विश्रांति नाऽधिगच्छामि श्रममाण इस्ततः कां गतिं बत गच्छामि न पश्यामि सुखं क्वचित्। इति व्याकुलचित्तोऽहं न कापि स्थिरमानसे। महाराज ततः प्रज्ञाहीने दीने कृपां कुरु। मह्यं शिष्याय विश्रांति स्थानं निर्देष्टुमर्हसि। गुरुदेवांनीं माझा आर्तभाव पाहून प्रसन्न चित्तानें हास्यमुख केलें. व गुरुमाऊली बोलूं लागली.

इति तस्य वचः श्रुत्वा करुणार्द्र मना गुरुः ज्ञात्वा तमुपदेशार्हं मुदितः सम्भाषत कथयिष्यामि ते वत्स सतां चरितमद्भुतम् संसारतापतप्तानां परं विश्रांतिकारकम्।

गुरुकृपेनें झालेल्या उत्स्फूर्त मनानें गुरुचरित्रगुणगान लेखणी लिहूं लागली.

ज्या गोदातटाकीं हें चरित्र घडलें ते गोदातट परम मांगलिक आहे. प्रभुराम-चंद्रांनीं गोदातटाकींच धूर्जटि शिव शंकरांची रत्नांनीं पूजा केली. भृगुऋषींनीं तपस्येला गोदातटाकच पसंत केला. शबरीला रामांनीं गोदातीरींच पावन केलें. गोदावरी महात्म्य हा गोदास्तुतिनें रसरसलेला ग्रंथ आहे. सद्गुरु योगानंदांनीं

आपल्या गुरुमूर्तिचरित्रांत ५१ व्या अध्यायांत माता गोदावरीचा पौराणिक सांगितलेला आहे. मी अल्पमतीनें माझ्या शब्दांनीं गोदामातेला खा श्लोकांत पुष्पांजली वाहत आहे.

गेला काशीस एक वेळ अथवा । केली गया वर्जिणे ।
नेल्या कावडी दोन कुंभ भरुनि रामेश्वरा कारणें ।
धेनुषष्टि सहस्त्रदान कपिला तें पुण्य एकीकडे ।
गोदेच्चें जरी एक मार्जन घडे, तें पुण्य एकीकडे ॥

दुसऱ्या शब्दांत हेंच लिहिता येईल.

गीति–त्वत्तीर मृत्तिकेचा ज्यानें तिळमात्र रेखिला टिकला ।
तो नर इंद्रादिकांच्या भाग्यासम समान तो टिकला ॥

माता गोदावरीचें नांदेड हें नाभिस्थान समजलें जातें तर मंजरथ हृदयस्थान समजतात. क्षेत्र मंजरथ येथें मांजरीची हत्या घडली तर त्या पा परिमार्जन होतें. भारतवर्षाचा प्रथितयश राजा विक्रमादित्य यांनीं गोदातटीं भव्य मंदीर बांधलें आहे. त्यावर तत्कालिक गोदावरीमातेचें महत्त्व करणारा शिलालेख खालीलप्रमाणें आहे.

## शिलालेख

शके त्रिशुर सेदेब्हि परमिते पक्षेका... । द्वादश्यांच विरुद्धकृच्छ्र शुभ मह बिडालाब्जिके । श्री निंबाल्करोपनाम विभुनो गोदातटे दक्षिणे । प्रासादस्तु विभु नृपवराना कालिंदे वार्षाकितः ॥

लिखाण सदोष असलें तरी सज्जन वाचक हंसक्षीर न्यायानें गोड व घेवो अशी लेखकाची प्रार्थना आहे. कारण,

दोषवर्गमपहाय पिबंतु साधवो गुरुकथामृतमिव ।
तीव्रकंटकवतीमपि भृङ्गः केतकीं त्यजति किं गंधः

सज्जन वाचकांना प्रार्थना हीच कीं, केतकी कंटकमय असते तरी र भृंग रानावनांतून केतकी शोधून काढून तिचा सुगंध, परिमल ग्रहण करावय विसरत नसतात. सद्गुरु योगानंद सरस्वति यांच्या चरित्रांतील ग्राह्य भ अवश्य स्वीकारावा.

ॐ तत्सत्

## श्री. गणेश दत्तगुरुभ्यो नमः

नौम्युदेति यदज्ञानाज्जगद्रज्ज्वहिवत्पुनः ।
यत्तत्वं मीलति ज्ञानां तं चिदानन्दसद्गुरुम् ॥१॥ श्री. सद्गुरु गुळवणी महाराज

श्रीगुरुवासुदेवानंद सरस्वति टेंबेस्वामिमहाराज यांचे सच्छिष्य श्रीयोगानंद-महाराज, यांचे चरित्राचें मुद्रणकार्य चालू आहे. त्यापैकीं कांहीं मुद्रित फॉर्म पाहाण्यास मिळाले. श्रीयोगानंद-महाराजांचे चरित्र मिळेल तेवढें संकलित करण्याचें महत्त्वाचें आवश्यक कार्य लेखकांनीं पार पडल्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.



श्री गुरु टेंबेस्वामिमहाराजांनीं द्विसाहस्री गुरुचरित्राचे आरंभीं, मानस पूजाप्रकरणांत शेवटीं श्रीदत्तात्रेयांचें स्वरूपवर्णन केलें आहे. ते असें— ' वज्रांकुशध्वजाब्जांक युग्रक्ताब्जाभपत्तलः॥ गूढगुल्फः कूर्मपृष्ठोल्लसप्रादोपरिस्थलः ॥१॥ जानुपूर्वकजंघश्च विशालजघनस्थलः ॥ पृथुश्रोणिश्च काकुत्स्थश्चारुनाभिर्दलोदरः ॥२॥ अररोरा मांसलांसो युगव्यायतबाहुकः ॥ मुचिन्हितकरः कंबुकंठः स्मिताननः ॥३॥ स्नैध्यधावल्ययुक्ताक्षश्चलालिंपगजटाधराः ॥ चन्दकांतिः प्रभुः कृष्णभूरः श्मश्रुकनीनिकः ॥ ४ ॥ भावशुद्धद्विजाकीर्ण—स्वास्याब्जोऽभीवरप्रदः ॥ दत्तात्रेयः सभगवान्सदा वसतु मे हृदि ॥ ५ ॥ ' इतकें सुस्पष्ट वर्णन केवल कविकल्पनेनें कसें होणार ? त्या दिव्यमूर्तीला प्रत्यक्ष पाहूनच हें वर्णन केलेलें आहे, यांत शंका नाहीं. "दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे रूपमैश्वरम्" या भगवदुक्तीप्रमाणें दिव्यचक्षू-शिवाय भगवंताचें दिव्यस्वरूप दिसणें शक्य नाहीं. हे दिव्यचक्षू म्हणजे सद्गुरुंच्या अनुग्रहानें प्राप्त झालेली ज्ञानदृष्टि होय. जिचें वर्णन; ' शास्त्रदृष्ट्यातूपदेशोवामदेव-वात् ' या ब्रह्मसूत्रामध्यें महर्षि बादरायणांनीं शास्त्रदृष्टिशब्दानें केलेलें आहे. ही दिव्यदृष्टिरूप सद्गुरुकृपा प्राप्त करून घेण्याकरितांच मनुष्य जन्म देवानें दिला

आहे. याचें नित्य स्मरण ठेवून मनुष्यजन्म सफल कसा करावा हें योगानंदमहाराजांच्या आदर्शचरित्रावरून समजून येणारें आहे.

पारमार्थिक संस्कार अनेक जन्मांचे साठलेले असावे लागतात. कन कामिनी यांच्या मोहपाशांतून सुटणारा एखादाच महात्मा असतो. श्रीयोगा महाराजांनीं आपल्या पूर्वसंस्कारबलानें सर्व मोहपाशांतून सुटून, वर वर्णि प्रमाणें प्रत्यक्ष सद्गुरु दत्तात्रेयांना नित्य पहाणाऱ्या महापुरुषांची कृपा संप केली हें त्यांचें असामान्य कार्य या चरित्रावरुन कळून येईल.

तसेंच या आत्मोन्नतीप्रमाणें सर्व जनतेचाही उद्धार व्हावा या तळम त्यांनीं सद्गुरु टेंबेमहाराजांचें चरित्रही पुष्कळसे संकलित करून ठेवलें हें त मोठे उपकार आहेत. संचारांत नित्य सद्गुरूंच्या समागमांत त्यांचें रा झाल्यामुळें त्यांनीं लिहिलेलें श्री गुरुचरित्र विशेष विश्वसनीय आहे. गुरुचरित्र हें सर्वांना उपकारक कसें आहे याबद्दल श्रीमहाराजांनींच द्विसाह गुरुचरित्रांत उल्लेख केला आहे. तो असा 'मुमुक्षुषभेजं मुक्तजीवनं विषयीष्ट श्रीगुरोश्चरितं वाग्दद्दूरत्वाद्वच्मितेऽल्पकम्'–मुमुक्षु, मुक्त व संसारी सर्व जीव श्रीगुरूंचें चरित्र मोठें उपकारी आहे.

संतांचें कार्य विश्वव्यापी आहे. त्याला प्रांतभेदादि अडचण केव्हांच नाहीं. कोठें गुजराथ प्रांतांतील तलंगपूर व कोठें महाराष्ट्राच्या मराठवाड्यांत गुंज! अधिकारी संतांच्या द्वारें विश्वोद्धार करण्याचें ईशकार्य अनादिकालपास सतत चालू आहे. श्रीनामदेवांनीं पंजाब प्रांतांत जाऊन भक्तीचा ध्वज फडकविल वाटेल तेवढा बाह्यविकास केल्याचे समाधान मानणाऱ्या राजशासनाला सुद्ध दुष्काळ नसतांना अन्नधान्यवितरण कसें करावें अशी चिंता पडते. पण श्रीदामाजीसारखे भगवद्भक्त, त्या सर्वांतर्यामीच्या प्रेरणेनें निर्भयपणानें एका क्षणां धान्य वितरणाचा निर्णय घेऊन तें कार्य करूनही टाकतात. आणि व्यावहारिक दृष्टिनें दिसणाऱ्या या अफरातफरीच्या दोषांतून सहीसलामत सुटूनही जातात. ही संतांची महनीय कामगिरी कोणत्याही व्यावहारिक लोकशाहीला किंवा हुकूमशाहीला करतां येणार नाहीं. याकरितां खरें राष्ट्रकार्य कसें करावे याची शिकवण मिळण्या-करितांही संतांचीं चरित्रें समाजापुढें येणें जरूर आहे. तें कार्य या चरित्रानें घडून येईल असा विश्वास वाटतो.

*श्रावण कृष्ण ५ शके १८८६ शुक्रवार* — *दत्तात्रय शास्त्री कवीश्वर*

## लेखका बद्दल दोन शब्द :—

**श्री दत्त प्रसन्न**

थोर चित्रांना चौकट बेताची असावी. चौकट बेताची असण्यांतच गोडी आहे, सौंदर्य आहे. अमूल्य हिऱ्यांना साधेंहि कोंदण शोभून दिसतें. तद्वतच या पावन ग्रन्थाला दोन शब्दांची साधी सेवारूपी चौकट, माझे मित्र व परम सुहृद श्री. दहिवेलकर यांच्या विनंतीवरून, जोडण्याचा मीं यथामति प्रयत्न केला आहे.

पूज्य श्री योगानंद सरस्वति समाधिस्थ होऊन आज ३६ वर्षें झालीं. थोर पुरुष व महान् विभूति ह्या प्रसिद्धिपराङ्मुख असतात. त्यांचें चरित्र लिहिणें हें एक कठिण काम असतें. पूज्यश्रींची वाङ्मयमूर्ति घडविली जावी अशी फार दिवसांची अनेकांची तळमळ होती. ही एक उणीव वाटत होती. ती या ग्रन्थानें भरून काढली.

समाधीपूर्वी सुमारें सात वर्षें पूज्य श्री योगानंद सरस्वति ह्याच भागांत होते; म्हणून तेवढीच माहिती ह्या मराठवाड्याच्या परिसरांतील लोकांना होती. पण श्रींचे बालपण, त्यांची गुरुसेवा वगैरे जाणून घेण्याची भक्तांची आंतरिक इच्छा होती. श्रींचें खडतर जीवन कसें व्यतीत झालें ? त्यांनीं भावसाधनांची चरमभूमि कशी गाठली ? संसारांतील रूपरसादि सर्व भोग्य विषयांचे विचार बाजूला कसे ठेवले ? कामकांचन त्यागरूप बळकट पायावर त्यांनीं आपल्या भावसाधनांची इमारत कशी उभारली ? वगैरे विषयीं भक्तगण अज्ञानांत होता. कायावाचामनें करुन सद्गुरूलाच सारासार परात्पर वस्तु असें ते कसें समजूं लागले ? सद्गुरूच्या प्रसन्नतेसाठीं कशी सेवा केली ? सेवेपुढें सुखदुःख कसें विसरलें ? सद्गुरूवर दृढ श्रद्धा कशी ठेवली, व सर्व भाषांमध्यें श्रेष्ठ जो दास्यभाव त्याची चरणसीमा त्यांनीं कशी गाठली ? हें जाणण्यासाठीं भक्तवृंद अत्यन्त उत्सुक होता. नावे श्वरच्या पूज्य श्री रंगावधूत महाराजांनीं ही सुवर्णसंधि मिळवून दिली.

लेखक श्री. दहिवेलकरांना नारेश्वरला पूज्य श्री रंगावधूत महाराजांकडे नर्मदा तटाकीं तीन वर्षांपूर्वी जाण्याचा योग आला होता. त्यांच्या प्रेमळ सहवासानें व प्रभावी विभूतिमत्वानें भारावून जाऊन, श्री. दहिवेलकरांनीं त्यांचें चरित्र लिहिण्याची परवानगी मागितली. सद्गुरु कृपाप्रसादानें श्री. दहिवेलकरांनीं पूज्य श्री रंगावधूत महाराजांचें चरित्र लिहून त्याचा एक खंड त्यांना अर्पण केला. महाराजांनीं प्रोत्साहनपर आशीर्वाद देऊन लेखकास सुचविलें कीं, त्यांनीं पूज्य श्री योगानंद महाराजांचें चरित्र गाढेंपरब्रह्म फळलेल्या मराठी भाषेंत लिहावें. ह्या चरित्रलिखाणासाठीं परमपूज्य श्री टेंबे स्वामी महाराजांचे अधिकारी शिष्य श्री गुळवणी महाराज पुणें यांचीहि प्रेरणा होतीच.

महाराजांच्या सुप्त तेजस्वी शक्तीनें व सर्वांच्या दुजोऱ्यानें श्री. दहिवेलकरांना पूज्य श्री योगानंद सरस्वतींचें चरित्र-लेखनाची स्फूर्ति मिळाली; व त्याचेंच फळ म्हणजे प्रस्तुत ग्रंथ होय.

श्री. दहिवेलकरांच्या घराण्यांत परंपरेनें श्री दत्तभक्ति आहे. त्यांच्या कुटुंबांतील व्यक्तींची गुरुचरित्राचीं पारायणें करण्याकडे ओढा आहे. ह्यांचें "दत्तगीत" हें श्री दत्त भजनाचें पुस्तक इ. स. १९२६ सालींच प्रसिद्ध झालें. शिवाय "दत्तकवन", "दत्तछंद", "दत्तसुधा", "प्रभुरंजन" हीं संगीत चालीच्या पदांचीं त्यांचीं पुस्तकें गुरुवारच्या भजनासाठीं उपयुक्त आहेत. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचा समुच्चय त्यांच्या ठायीं आहे.

श्री. दहिवेलकरांचा बराचसा काळ नौकरींत गेला. नारेश्वराला त्यांचें बरेच दिवस वास्तव्य होतें. ते पदवीधर आहेत, गुजराथी भाषेवर त्यांचें प्रभुत्व आहे. संतवाङ्मय श्रवणाचा त्यांना अति नाद आहे. निष्काम सेवा ही वृत्ति आहे. वैद्य-भूषण श्री. दहिवेलकर यांची वृत्ति दुःखी लोकांना आनंदित करून त्यांच्यांतच देव बघण्याची आहे. त्यांतच त्यांना आनंद वाटतो. कुठल्याहि प्रकारची अपेक्षा न बाळगतां, कांहीं इच्छाशक्तीनें, कांहीं वेळेस नसा दाबून व कांहीं औषधानें ते जनांची वैद्यकीय सेवा करतात. कुठूनहि पोस्ट खर्च आल्यावर ते कोणालाहि कुठूनहि उत्तरें देत असतात. अशा प्रकारें जनसेवेंत त्यांचें मन रंगलेलें असतें. जनसेवा हीच ईशसेवा असें ते मानतात. "आपण कांहीं तराया वाटे त्यांचें चरित्र तें गावे" या उक्तीप्रमाणें त्यानीं प्रस्तुत ग्रंथ लिखाणास प्रारंभ केला. बरेच ठिकाणचा प्रवास करून त्यांची माहिती संकलित

केली. ह्या पवित्र कार्यांत त्यांना पार्थपूरनिवासी चौधरी मंडळींनीं भरीव व सक्रिय साहाय्य केलें.

प्रस्तुत ग्रंथ श्री. दहिवेलकरांनीं सोप्या भाषेंत लिहिला आहे. त्यांतील उपमा नित्य व्यवहारांतील आहेत. वेन्दात विषय कथानकाच्या ओघांत आकाशांतील इंद्रधनुष्याप्रमाणें शोभायमान दिसतो. हा आधींच क्लिष्ट व अनुभवाचा विषय, पण तो सर्वसामान्यांना आकलन होईल, इतक्या सुगम व सुबोध भाषेंत, त्यांनीं कथानकांत गुंफण्याचा प्रयत्न केला आहे. भाषा मराठी मनाला आकलन होण्यास सुलभ आहे. लेखकाचा बाणाच पूज्य श्री रंगावधूत महाराजांच्या आज्ञेप्रमाणें "रडकी दुनिया हंसविण्याचा आहे" त्यामुळें लेखक श्रीं ना मधून अधून रंजवितात. प्रसंगीं त्यांच्याशीं हितगुज करतात. रसरशीत भावनापूर्ण अशी ही गद्य रचना आहे. ते प्रज्ञावान् लेखक आहेत.

पूज्य श्री योगानंद महाराजांचा जेथें जेथें मुक्काम होत असे, तेथें तेथें संप्रदायाप्रमाणें श्री दत्तभक्तीचा ते आपल्या रसाळ व अलौकिक पुण्यपावन वाणीनें प्रसार करीत. धर्माधर्म, नीति व सत्यासत्यांचें विवेचन करीत, व प्रत्यक्ष आचरणानें वरील सिद्धान्ताचा जनमनावर ठसा उमटवीत. आपण स्वतःच नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त स्वभाववान व अखंड सच्चिदानंद स्वरूप असल्यामुळें, ते जेथें जात तेथें जनसंमर्द त्यांचें मनःपूर्वक स्वागत करी. ह्या वरील गोष्टींचीं वर्णनें लेखकानें ग्रंथांत समाविष्ट केलीं आहेत.

संतांचें वाङमय म्हणजे "सारस्वताचा महासागर" व "अध्यात्म रत्नांच्या खाणीच" होत. त्याचें ओझरतें दर्शन घडविण्याचा श्री. दहिवेलकरांचा प्रयत्न स्तुत्य नाहीं असें कोण म्हणेल ? परमपूज्य श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या जयंतीच्या पुण्यपावन व शुभदिनीं हा ग्रंथ प्रकाशित होत आहे हा मणि-कांचन योग आहे. लेखकाची ही वाङमयीन सेवा जनताजनार्दन गोड करून घेवो अशी सदिच्छा मी व्यक्त करतों; व ह्या दोंन शब्दांची भावसुमनांजलि पूज्य श्री योगानंद सरस्वति महाराजांच्या चरणकमलीं प्रेमादरानें अर्पण करतों.

संतचरण रज

१-५-१९६४

**रा. सा. कुलकर्णी**

दारवाडीकर पाथरी.

## लेखकाची दृष्टि

सच्चिदानंद लुटण्यासाठीं व लुटविण्यासाठीं सत् चित् प्रेरणा, कोणाला तरी प्रेरणा करीत असते. कार्यप्रवीण करीत असते. संत-



चरित्र ऐकतांना, वाचतांना, लिहितांना आगळा आनंद उसळत असतो. संत आपल्या सारखेच सामान्य असतात पण तपस्येने त्यांच्यात वैशिष्ट्यपूर्ण अशी दिव्यशक्ति संचारत असते. संतांचा देह जनकल्याणा-साठींच असल्यामुळें त्यांत स्वार्थाचा पत्ता नसतो. 'उरलों उपकारापुरता' अशीच वाणी संत तुकारामा-प्रमाणें साऱ्या संतांची असते. विरक्त व संतसहवास हीच भवसागर तरावयाची गुरूकिल्ली एका वाक्यांत ते दर्शवितात. विरक्तीनें मनोजय, इंद्रियदमन, निस्पृहता साधून वासनांचा लोप होत असतो तर संत सहवासांत अमृत वर्षत असतें. तापदग्ध रोग्याला पायसाचें काय कौतुक ? संतवाणीनें चित्शांति लाभते व साधक आत्मानंदांत मग्न होतो. त्यामुळें क्षणभर त्याच्या साऱ्या चिंता लोपतात. संत हे परमानंदाचे नंदादीप असतात. महत्भाग्यानें ब्रह्मनिष्ठांशीं गांठ पडते. पूर्वपुण्य बलवत्तर असलें तरच संत सहवास घडत असतो. कैक जन्मांची पुण्याई असली तरच संतकृपा होत असते. हे सारे यदृच्छेचे खेळ असतात. बोलविता धनि वेगळाचि हें तत्त्व सहजासहजीं मानव मनास पटत नाहीं. मानव प्राणि यदृच्छेच्या हातांतील खेळणें आहे. या गोष्टींचाहि मानव मनास सोयीस्कर विसर पडलेला असतो. जीव हें शिवाचे प्रतिबिंब आहे. प्रतिबिंब स्वतंत्रपणें कांहींच करूं शकत नसतें हें हि ते विसरतात.

विंचवाच्या नांगीप्रमाणें आपली अहंची नांगी उभारून विंचवाप्रमाणें डुलत डुलत मजेनें कालक्षेप करीत असतात. विंचवाला जोड्याचा व अशांना यमाचा तडाखा बसतांच मग देव आठवतो. वेळ निघून गेलेली असते. मग काय उपयोग ? हीच संतांची शिकवण असते. रेवातटस्थ महान् योगी पूज्य श्री रंगावधूत एका वाक्यांत 'श्वासे श्वासे दत्तनाम स्मरातन्' वाक्यांत परमार्थ सोपान दाखवितात. संत दृष्टींत परेशाचा साक्षात्कार घडत असतो. संत वाङ्मयांत ब्रह्मानंद विखुरलेला असतो. तर संत चरित्र वाचनांत आनंदोर्मि उमलविणारी

सुप्त चित्‌शक्ती दडलेली असते. संत चरित्र लिहितांना आगळा आनंद भोगावयास मिळतो. परमतत्त्वाचा स्पर्श झालेलाच, संत चरित्र लिहूं शकतो. भाषा प्रासादिक, मधुरतर व चित्ताकर्षक होण्याला, लिहितांना परमानंदाचे उमाळ्यांवर उमाळे येतात तेच कारणीभूत होतात. वृत्ति तदाकार झाल्याशिवाय आनंदोर्मि उमळत नसतात. चैतन्यशक्तीच्या स्पर्शाशिवाय सुविचार प्रगटत नसतात, असें हें तंत्र आहे. **तोचि कर्ता, तोचि करविता। मानव नामापुरता ॥** अशी सुप्त भावना असते. संतपुरुषांचें चरित्र लेखन कां करतात ? कारण ते अनेक लोकांच्या जीवनाचा फार मोठा भाग अक्षरशः व्यापतात. त्यांचीं चरित्रें अलोक सामान्य, अचिंत्य हेतुक असतात; संत लौकिक व्यवहारांत शेवटपर्यंत राहून आपल्या मानवसुलभ अशा मनाच्या शक्तीचा उपयोग करुन, प्रथितयश होऊन सामान्यांनाहि धर्मपरायण करतात. ते मोठेपणा शोधीत नसतात तर मोठेपणाच त्यांना शोधीत येतो.

माझें पूर्वपुण्य बलवत्तर म्हणूनच रेवातीरस्थ ब्रह्मनिष्ठ, ब्रह्मचारी महान संत पूज्य श्री रंगावधूत महाराजांनीं नारेश्वरीं आपले गुरुबंधु सद्‌गुरु योगानंद सरस्वति सं. गुंज यांचे चरित्र मराठींत लिहिण्याची प्रेरणा दिली. सद्‌गुरु योगानंद सरस्वति यांचें चरित्र गुजराथींत लिहिणारे माननीय वकील जमियतराम यांनीं जोराची साथ दिली. वडिलांची पुण्याई व माझें भाग्य उफाळल्यामुळें सद्‌गुरूंनीं चरित्र लेखनाचे कार्य पुरें करून घेतलें. पुण्याचें संत गुळवणी महाराज, आज गुंज संस्थानचे संत चिंतामणि महाराज या साऱ्या संतांच्या सहाय्यानेंच हें छापलेलें संतचरित्र जनता जनार्दनास वाचावयास द्यावयास मला हिंमत आली. त्याचें तो करवून घेतो. तुझें काय ? ही माझ्या मनाची नित्याची घोकणी आजही चालू आहे. नित्यपाठांत वाचावयास सोयीस्कार व्हावे म्हणून ओवी-बद्ध—यांचीच पोथी सद्‌गुरु चिंतामणि महाराज यांच्या प्रेरणेनें वाचकांस लवकरच मिळेल. सद्‌गुरु योगानंद महाराजांनीं स्वानुभवानें गुरु हेंच परब्रह्म आहे, असें जनतेस पटविलें. महाराजांनीं दत्तसांप्रदायांची ज्योत दक्षिण भागांत, मराठवाडयांत उज्ज्वल केली यासाठी त्यांनीं ध्यानमार्गाचा उपदेश माध्यम म्हणून …वडला नाहीं तर शास्त्र प्रचीति, गुरुप्रचीति, आत्म प्रचीति यांच्या योगानें मानव …र्त्वाला पोहोचतो, मानवजन्माचें सार्थक कशांत आहे या गोष्टी पटविल्या. …द्गुरु योगानंदांना दत्तपदीं विलीन झाल्यास आज छत्तीस वर्षें लोटलीं तरी

फाल्गुन व. १२ ला त्यांच्या पुण्यतिथीला गुंज येथें लाखो भक्तगण जमतात हें कशाचें द्योतक आहे ? तरी त्यांचा सहवास मराठवाड्यास सात आठ वर्षेंच घडला. आभार कोणाकोणाचे मानूं ? सार्‍यांनीं मला मदत केली तरी आभार कोणाकोणाचे मानूं.

सार्‍यांनींच मला मदत केली. नारेश्वरचे पूज्य श्री रंगावधूत महाराज यांनीं प्रेरणा देतांच गुजराथी ग्रंथकार परमभक्त जमियतराव अध्वर्यु वकील यांनीं उचलून धरले. सद्‌गुरु गुळवणी महाराज पुणें यांनीं साथ दिली व दत्त-संस्थान गुंज येथीं प्रकाशनाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. त्या आनंद भरांत सद्‌गुरु गुळवणी महाराजांनीं प्रास्ताविक बोल लिहून शुभाशीष दिले. पाथरीचे कुळकर्णी, अमळनेरचे मित्र ठाकूर यांनीं सूचना करून ग्रंथ सर्वांगसुंदर बनविला. माझ्या गैरहजेरीत पुण्याचें दत्तभक्त माझे स्नेही श्री. गोविंद आत्माराम गोखले यांनीं प्रकाशनाच्या सहकार्याची जबाबदारी शिरावर घेतली होती व अतिपरिश्रमपूर्वक, अल्पावधींत यांनीं ग्रंथ छापून दिला. सार्‍या सह-कार्‍यांचा मी आभारी आहे. श्री गुरुदेवदत्त.

संतचरणरज

वैद्यभूषण नारायण दिनकर दहिवलेकर, नंदुरबार.

मु. पो. ता. नंदुरबार, जिल्हा धुळें.

॥ श्री योगानंद सरस्वति समर्थ ॥

## प्रकाशकाचे दोन शब्द

माझे गुरुदेवयोगीवर सद्गुरु योगानंद सरस्वति यांचे जीवनचरित्रावर दोन शब्द लिहितांना मी माझ्या भाग्याचे अत्यंत अमोलिक क्षण समजतों. गुरुमाऊलीचा जन्म तलंगपुरांत गुजराथेंत झाला. त्यांच्या आयुष्याचा बहुतेक काळ गुजराथेंतच गेला. ते अत्यंत शिवोपासक गुजराथी ब्राह्मण होते. त्यांची खडतर तपश्चर्या देव मिळावा म्हणून नसून ब्रह्मनिष्ट गुरु मिळावा म्हणून होती. नर्मदाकांठीं केवळ बेलाचीं पानें खाऊन तैल धारेप्रमाणें अविरत स्वस्वरूपानुसंधानांत राहून त्यागाची परिसीमा गांठून ते ध्येयरत बनले होते. त्यांचें तें खडतर जिणें आठवले तर डोळयांत पाणी येतें. मन कशांतही गुंतूं नये म्हणून तपाला बसण्यापूर्वी धोतरासह सारे कपडे नर्मदामातेंत वाहून दिले. फक्त दोन लंगोट्यांचे बादशहा बनले. असल्या विरक्त पुरुषाला लुटण्यासाठीं चोरांनीं कमी केलें नाहीं. दोन्ही लंगोट्या लांबविल्या, सद्गुरु कांहींच बोलले नाहींत. चोर जानवें काढूं लागले तेव्हां ते चोरांना म्हणाले जानवें ही ब्राह्मण्याची खूण आहे ती राहूं द्या. चोर म्हणाले, नाहीं. हा दोरा आम्हांस कपडे शिवावयास उपयोगी पडेल, असें म्हणून त्यांनीं त्या दोन लंगोट्यांसह जानवेंहि नेलें.

शब्दशः नग्न बनविले तरी हूं कां चूं केलें नाहीं. गुरुमाऊली, तूं योगीराज आहेस ? का त्यागराज आहेस ? गुरुराजा ! तुझ्या पदरजकणाचीहि सर आम्हांस येणार नाहीं रे ! गुरुसेवा कशी करावी या बाबतींत तर अगदीं उच्चांक गांठला आहेस. महाराजा ! तुमचे गुणानुवाद मी किती गाऊं ? योगाधीश गुरुदेव ! सद्गुरु वासुदेवानंद सरस्वति यांच्या समोर त्यांचा शांतिभंग होऊं नये म्हणून बऱ्याच दूर, मोठ्या अदबीनें, गुरुदेवा, आपण बसत असत तर सद्गुरूंनीं 'पा' अक्षर उच्चारतांच पाण्यासह आपण तत्क्षणींच गुरुसेवारत व्हावयाचे. किती ही दक्षता ! किती ही सावधानता ! किती ही जागृतता ! गुरुदेवाबरोबर किंवा समक्ष भिक्षा घेतली, खाल्ली, असें आपल्या उभ्या आयुष्यांत एकदांहि घडलें नाहीं. सर्व भक्तांनीं प्रसाद घेतला अशी खात्री करून घेतल्यानंतर आपण एकट्यानेंच कोठें प्रसाद ग्रहण करावयास बसावयाचें. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं गुरूशिवाय आपल्या मनांत अन्य विषय नसायचाच. किती अजब ही गुरुनिष्ठा !

इतरत्र तिला तोडच नाहीं. अशा एकनिष्ठ भक्ताला गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचेकडून आपल्या तोंडांतला घांस म्हणजे गुरुतत्त्व कां लाभणार नाहीं ? अधिकारी शिष्यावरच ब्रह्मनिष्ठ गुरूंची कृपा होत असते गुरु व शिष्य या दोन व्यक्ति दिसत असल्या तरी त्या एकजीव, एकरूप असतात.

सद्‌गुरु योगानंद सरस्वति गुरुसेवारत झाल्यापासून त्यांचे गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचे बरोबरच चित्राच्या शेडिंग प्रमाणें रहात असत. त्यामुळें त्यांनीं स्वतःचे अस्तित्व असें ठेविलेंच नाहीं. गुरुदेवांच्या छायेप्रमाणें त्यांची वृत्ति असे. त्यामुळे गुरुदेवाच्या सहवासांत गुरुदेवाचें चरित्र तेच त्यांचे चरित्र ठरत असे. गरुडेश्वरीं गुरुदेव समाधिस्थ झाल्यानंतर शके १८४४ त ते प्रथम मराठ-वाड्यांत आले. शके १८५० त त्यांनीं इहलोकीची यात्रा संपविली. या सहा सात वर्षांतच त्यांचें स्वतंत्र असें अस्तित्व होतें तरी इतक्या अल्पावधींत त्यांनीं सारा मराठवाडा दत्ताभक्तींत गुंगविला ही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं. या काळांत सहवासामुळें त्यांची माहिती मराठवाड्यांतील लोकांनाच आहे. आज सदगुरूंना स्वर्गवासी झाल्याला हां हां म्हणतां छत्तीस वर्षांचा काळ लोटला गेला. सद्‌गुरूंचें चरित्र कधीं वाचीन असें मला झालें होतें. जीव तळमळत होता. प्रयत्न अपुरे पडत होते. आपलें चरित्र बाहेर पडावें अशी सदगुरूंचीच इच्छा नसावी पण माझ्या मनाची उत्कंठा, तळमळ सद्‌गुरु योगा-नंदाना पटली असावी म्हणून सद्‌गुरु योगानंदाचे गुरुबंधु नर्मदातटनिवासी ब्रह्मनिष्ठ ब्रह्मचारी परमपूज्य श्री रंगावधूत महाराज नारेश्वर याजकडून परम-तत्त्वानें कळ फिरवीली म्हणूनच सद्‌गुरूंचें छापलेलें चरित्र पहाण्याचा आत्यंतिक आनंदाचा क्षण मला लाभला. नंदुरबार, जि. धुळें येथील रहिवासी पण प्रभुनामांत रंगलेल्या वृत्तीचे वैद्यभूषण नारायण दिनकर दहिवेलकर यांनीं नारेश्वरीं राहून पूज्यश्री रंगावधूत महाराज यांच्या चरित्राचा पहिला खंड नवागाम येथे रंगजयंतीला त्यांना अर्पण केला. दत्तसेवेंत, व आपल्या वैद्यकीय गुणांनीं गरीबांना मोफत उपचार करून रडक्या जीवांना हसविण्यांतच आपलें दत्तपूजन आहे अशा अंतरीच्या तयारीचे श्री. दहिवेलकर यांना नारेश्वरीं सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज सं. गुंज यांचे आपल्या प्रासादिक व श्रोत्यांच्या मनाची पकड सहजसुलभ सोप्या शब्दांत धरण्याच्या लेखन चातुर्यानें लिहा अशी प्रेरणा पुज्य श्रींनी दिली. सत्कार्यास आपली लेखणी वाहिलेल्या श्री.

दहिवेलकरांनीं फारच थोड्या अवधींत वेदान्तांतील जाडे शब्द न वापरतां हलक्या थरांतील लोकांनाही वेदान्त सहज पठविण्यांत फारच कौशल्य दाखविलें. चरित्र मला ऐकविलें तेव्हां माझेंच काय पण इतरांचेंहि हृदय गदगद हंसूं लागलें. भाषा फारच आकर्षणीय आहे. सद्गुरु कृपेशिवाय असलें लेखन जमणार नाहीं सद्गुरु योगानंद महाराजांचे चरित्र लिहून आम्हा सर्वांस भासणारी उणीव भरून काढली. मराठवाड्यावर त्यांचे अनंत उपकार आहेत. दुनियेला हंसवण्यात स्वतःचा आनंद समजणाऱ्या भक्तहृदयी लेखकास माझा शुभाशीर्वाद. अशीच संतवाङ्मय सेवा त्याजकडून घडो. दुसरे या कामीं पुणें येथील महान् विभूति सद्गुरु गुळवणी महाराज यांनीं प्रस्तावना आमच्या विनंतीला मान देऊन लिहून दिली. सद्गुरु योगानंदांचे ते गुरुबंधू असल्यामुळें दत्तप्रेरणा त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रगटते, बंधुभाव दाटतो व दत्तदीप्ति चक्षू पुढें. येते आमच्या सद्भाग्यानें नरसोबाच्या वाडीचे विद्वान शास्त्री श्री. दत्तात्रय धुंडिराज कविश्वर यांचा गोड सहवास या सद्ग्रंथास घडला. पुणें येथील दत्तभक्त श्री. गोविंद आत्माराम गोखले यांनीं आत्यंतिक आपुलकीनें प्रकाशनाची सारी जबाबदारी आपल्या शिरावर [ सद्गुरु गुळवणी महाराजांच्या आधारावर गुरुकृपेनें ] घेतली. प्रेरणा देणार तोच दत्तप्रभू अनोळखी असतां इतक्या अल्पावधींत, छपाईचें इतकें सुंदर काम करून देणारे ... मुद्रक श्री. वि. ग माटे विश्वकर्मा मुद्रणालय, पुणें.

यांच्यांत इतकी तडफ त्या दत्तप्रेरणेनेंच आली. साऱ्यांचें मनःपूर्वक आभार मानून हें दोन शब्द पुरे करतो.

दत्तसंस्थान गुंज.

श्रा. व. ५ शके १८८६

*चिंतामणि महाराज*

संचालक :– दत्तसंस्थान गुंज यांचा अभिप्राय व आशीर्वाद.

॥ श्री दत्त ॥

अवधूतचिंतन श्रीगुरुदेव दत्त, श्रीमद् सद्गुरु वासुदेवानंद सरस्वति स्वामी महाराजनी जय. श्री. सद्गुरु योगानंद सरस्वति स्वामी महाराजनी जय.

श्री. दहीवेल्कर शास्त्रीजी अेपणे, श्री योगानंद सरस्वति स्वामी महाराजनुं चरित्र मराठीमां लखीने मराठवाडामां मराठा भक्तजनोने मोटो लाभ आपेलो छे. आवां पुस्तको जीवनवृत्तांतनी जरूर हती. अेमांथी जनता सार ग्रहण करी. पोतानुं जीवन उन्नत बनावशे. श्रीमान् दहीवेल्कर महाशयनी लेखनशैली घणीज सुंदर छे. अने सामान्य माणस पण समजी शके अेवी छे.

ता. ७ मे १९६४

संवत २०२० ना चैत्र वदी १० ने गुरुवारे चरित्र वांची संभळाव्यु श्रीमान् दहीवेल्कर महाशयजी अे.

रघनाथजी डाह्याभाई देसाई

## ॥ श्रीदत्तः प्रसन्नोऽस्तु ॥

चरितं योवगिर्यस्य योगानंद यतेरिदम् ।
दृष्ट्वा भव्यं कस्यनोऽत्र । नृत्येश्चित्तंमुदाप्लुतम् ॥

कान्हदेशस्य विप्रेण दहि वेलकरेण तत् ।
रचितं बहुसंशोध्य भवभ्रांत सुमार्गदम् ॥

लोकभाषा निबद्धं च नानालङ्कार मण्डितम् ।
पद्यरत्नभूषणाढयं मधुरं मधुराक्षरम् ॥

गुर्वादर्शप्रदीपोयच् छिष्याचार सुसंहिता ।
पाथेयं सन्मुमुक्षूणां श्रेयः सोपानमुद्वहम् ॥

भक्ता अस्य रसास्वादाद् धन्यता माप्नुयुश्चते ।
सुवासः प्रसरत्वस्य चतुर्दिक्ष्वविलंबितम् ॥

— रंग अवधूत

# ब्र. सद्गुरु योगानंद सरस्वती स्वामी महाराज



योो वै भूमा तत्सुखं त्वेतिगीतं
गेयातीतं ध्यानगम्यं मुनींद्रम् ।
भक्तैकार्थं ह्यात्त मानुष्यमूर्तिं
योगानंदं तं यतींद्रं नतोऽस्मि ॥

जन्म शके : १७९० मार्गशीर्ष शुद्ध १५ श्री क्षेत्र तलंगपूर ( जिल्हा सुरत )

समाधि शके : १८५० वद्य १२ श्री क्षेत्र गुंज ( जिल्हा परभणी, मराठवाडा )



श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य स्वामी कृष्णानंद सरस्वति

[ प. पू. योगानन्द महाराजांचे दंडगुरु ]

ॐ

॥ श्री नरसिंहसरस्वत्यै नमः ॥ श्री त्रिपुरासुंदरी
एकवीरायै नमः । अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त ॥
श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य योगशिरोमणी
श्री वासुदेवानंद सरस्वति महाराज की जय ॥१ ॥

जय योगानंद सरस्वति महाराज की जय

— श्री गुरुदेवदत्त —

जैं धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।
तैं आम्हां येणें घडे । संसार स्थिति ॥

# किरण पहिला

## योगीराणा
## श्रीदत्तात्रेयांचा अवतार
### गुरु ही शक्ति. दत्त हा गुरुतत्त्वाचा अवतार व अवतार कार्य.

श्रीदत्तप्रभूच्या लीला अतर्क्य, अगोचर, अगम्य व अगाध असतात. निर्गुणांतून सगुणांत नटलेलें परमतत्त्वच तें. श्रीदत्त ही व्यक्ति नसून शक्ति आहे. गुरुतत्त्वाचा अवतार आहे. चैतन्य आहे. तेजदीप्ति आहे. आपल्या तेजःपुंज तेजानें अज्ञानतिमिराचा नाश करण्यासाठीं हें परमतत्त्व, निरनिराळ्या माध्यमांतून, व्यक्तींतून, आविष्कारांतून वारंवार प्रकटत असतें. आपला प्रभाव दाखवितें, जनतेला धर्माभिमुख बनवितें, पापी प्रवृत्तींना खोडा घालून ते जनतेंत सद्भावना फैलावतें. असा कार्यक्रम वेदादि कालापासून अविरतपणें आजतागायत चालविणारें परमतत्त्व श्रीदत्तप्रभू चालवीत आलेले आहेत. इतर अवतारांना कालमर्यादा असते. रावण मरतांच राम अवताराचें कार्य संपलें. कंस मेल्यावर कृष्ण अवतार समाप्त झाला. असें बंधन दत्तावतारांत नाहीं. दत्तावतार बंधनातीत आहे. कालातीत आहे. अज्ञानतम घालविणें हें या अवताराचें कार्य असून अज्ञान आहे तेथपावेतों श्रीदत्त अवताराचें कार्य चालणारच. परमतत्त्व इतकें तेजःपुंज असतें कीं, त्याकडे मानवचक्षु बघूं शकणार नाहीं. तें बुद्धीच्याहि पलिकडे असल्यामुळें बुद्धिगम्य नाहीं व मानव कल्याण करणें तर जरुर आहे म्हणूनच दत्ततेजाची परमदीप्ति, तपतेजोनिधि अशा संतव्यक्तींच्या माध्यमांतून ठायीं ठायीं, वेळोवेळीं प्रगटत असते. हें परमतत्त्व संतांच्या

माध्यमांतून प्रगटल्यामुळें सामान्यांना ज्ञान, बोध, ऊर्मि, तप मिळणें सहजसुलभ झालेलें असते. अशा तऱ्हेनें संतांच्या द्वारा ती परमशक्ति दत्तप्रभूचें दर्शन, त्यांचा परममंगल सहवास सामान्य जनांना घडवीत असते ? असा हा दत्तअवतार अगदीं अखंडितपणें चालूं रहाणारच. व पतितोद्धार, दीनोद्धार हीं कार्यें अविरतपणें घडतच रहाणार.

परम मांगलिक हें परमतत्त्व वाटेल त्या वंशांत प्रगटत नसते. तर कैक जन्मांचीं तपस्या ज्या वंशांत अव्याहत चालूं असते अशा पवित्रतम कुळांत परमतत्त्वाचा आविष्कार घडत असतो. त्या कुळांत योगभ्रष्ट पुण्यात्मा आपली उर्वरित तपश्चर्या पुरी करण्यासाठीं जन्माला येत असतो हें जगसत्य आहे. तेंच परमतत्त्व पीठापूर येथें योगाधीश श्रीपाद श्रीवल्लभ या रूपानें त्या कुळीं अवतरलें. अनेक अलौकिक चमत्कार घडवून सामान्य जनाना दत्तभक्तींत गुंगविलें. आत्मा अमर असतो. परमतत्त्व अजरामर असणारच. देहाचें कार्य संपलें कीं, तो जाऊन दुसरा येणारच. तेंच परमतत्त्व निराळ्या देहांत नटून कारंजें येथें प्रगटून नरसिंह सरस्वति या नांवानें गाजलें. सायंदेवासारख्या आत्मसिद्ध कवीला प्रेरणा देऊन अमोलिक, प्रासादिक व वेदतुल्य असा गुरुचरित्र हा ग्रंथ लिहविला. तो प्रासादिक व सिद्धग्रंथ सामान्यांना वेदाप्रमाणें फलदायी वाटूं लागला, तो ग्रंथ दीनांचा कल्पतरु बनल्यामुळें ठायीं ठायीं त्या ग्रंथाचीं आधिव्याधि. दुरित दोष घालविण्यास पारायणें होऊं लागलीं. इच्छित मनकामना पूर्ण करण्याची शक्ति त्या अमोल व सिद्ध ग्रंथांत आहे अशी साऱ्यांची खात्री झाली. योगिराज नरसिंह सरस्वति गाणगापुराचे महत्त्व वाढवून श्रीशैल-कर्दलीवनाच्या यात्रेस गेले. मावळले असें सामान्यांना वाटलें. सूर्य मावळला म्हणजे अज्ञजनांना वाटतें त्याप्रमाणें तो समुद्रांत बुडत नसतो. तर इतरत्र कोठेंतरी उदितच होत असतो. परमतत्त्व कधींच लोपत नसते. त्या परमतत्त्व रवीचा उदय कर्दळीवनांतून अक्कलकोट

येथें होऊन अक्कलकोटचे महाराज या नांवानें तें गाजूं लागले. दहाबारा वर्षांच्या कलावधींत ते दत्त म्हणून गाजले. त्या भागांत अलौकिक चमत्कार, सिद्धबोल, पतितोद्धार इ. गोष्टीमुळें शब्दशः सामान्य जनता गुरुभक्तींत वेडी बनली. सारें वातावरण दत्तभक्तीनें अगदीं दुमदुमलें. ठायीं ठायीं भक्तिकेंद्रें, ज्ञानकेंद्रें मोठ्या तेजानें चमकूं लागलीं. गुरुतत्त्वाची जाणीव हीं केंद्रें आजही देत आहेत. तीच चैतन्यशक्ति राजयोगी माणिकप्रभू या नांवानें माणिकनगर येथें प्रगटली. राजैश्वर्याच्या राजयोगांत त्यांची कारकीर्द गाजली. माणिकनगर डोलूं लागलें. अन्नपूर्णामातेनें अन्नदानाचा उच्चांक गांठला. इस्लामियांचेहि ते देव बनले. हें या अवताराचें वैशिष्ट्य आहे. परमतत्त्वाचा त्यांनीं ठायीं ठायीं साक्षात्कार दिला. नारायणस्वामी, मौनीस्वामी, गोविंदस्वामी यांच्या परममांगलिक तपश्चर्येंत तेंच तत्त्व दडलेलें होतें. महान् अधिकारी व्यक्ति म्हणून ते ओळखले जातात. दासोपंत या अधिकारी व्यक्तीकडून एक लाख ग्रंथरचना लिहविली. दासोपंतांची पासोडी हें तिचें ख्यातनाम आहे. बडोद्याचे कावडीबुवांना दत्तप्रबोध हा ग्रंथ दत्तप्रेरणेनें लिहावयास लाविला. सात्त्विक भावाच्या उच्चतर वातावरणांत विहरणाऱ्या पवित्र आत्म्यांना परमशक्तीचे संदेश येणें, त्यां करवीं एखादें कार्य करवून घेणें इत्यादि गोष्टींचा अनुभव साक्षात्कार परमशक्ति वारंवार देत असते. व त्यांना कार्यप्रवीण करीत असते. परमतत्त्वाचें हें परममांगलिक कार्य असते.

## श्रीदत्त

दत्त अवतार सर्वव्याप्त आहे. काशीला स्नान, माहुरला निद्रा, कोल्हापुरास भिक्षा, गाणगापुरांत वास्तव्य, या गोष्टोवरून वरील विधानाची सत्यता पटते. सर्वांगशीतल असा आदुबरवृक्ष त्यांच्या आवडीचा व रुद्राक्षमालांची गोडी श्रीदत्तप्रभूला. त्यागाचा मूर्तिमंत अवतार तो दत्तावतार. दिगंबर म्हणवून घेण्यांत त्यांना दूषण वाटत नसून भूषणच

वाटतें. सारे सारे पंथ त्यांच्यांत सामावलेले. **नाथपंथाचे** ते शिरोमणी आहेत. तर **मानभावांच्या** आद्य पुरुषाला व्याघ्ररूपांत दर्शन देऊन त्याजला विशिष्ट विद्या प्रदान केली. **वारकरी पंथहि** त्यांचाच. संत एकनाथांच्या दाराशीं दत्तचित्र असण्यांत आगळें महत्त्व व वैशिष्ट्य आहे. **दौलताबाद** हें दत्तप्रभूचें विहारस्थान. तेथील सिद्ध **जनार्दनस्वामि** व दत्तभगवान सोंगट्या खेळत बसत. त्यांच्या शिळोप्याच्या गप्पा चालत. तितकेच अधिकारी पुरुष नरसोबाच्या वाडीचे नारायणस्वामि, त्यांच्या वाणींतून निघालेलीं भजनें ऐकल्यावांचून श्रीदत्तांना चैनच पडत नसे. तपोनिधि नारायणस्वामींचीं भजनें ऐकावयास श्रीदत्त भगवान व कोल्हापूरची महालक्ष्मी माता नेहमीं आपापल्या ठराविक ओट्यावर बसून दोन दोन तास भजनें ऐकण्यांत रमत असत. स्वानंदांत डुलत असत. श्रीदत्तांची नारायणस्वामीवर इतकी बहाल मर्जी होती कीं, श्रीदत्त प्रथम त्यांची पूजा करवीत नंतर आपण भक्तांची पूजा घेत. आजही नरसोबाच्या वाडींत ही प्रथा चालू आहे. यावरून परमतत्त्व श्रीदत्त भगवान प्रभू यांच्या आवडी निवडीची कल्पना येईल. दगडांत देव नाहीं ! तो भावनेंत आहे ! हेंच तत्त्व आपल्या मनावर ते अशा रीतीनें बिंबवितात. मंगलप्रद व उच्च प्रतीच्या वातावरणांत श्रीदत्तप्रभू विहरत असतात हेंच वरील उदाहरणें दर्शवितात. कंठशोषानें मी पावत नसतों तर भक्तांच्या आर्त विमल हृदयांत मी प्रगटत असतो असें त्यांचें सूचन असतें. दत्तदीप्ति आतां **केडगांव, सुपें बेट** या भागाकडे वळली. गाणगापुरांत साक्षात्कार व प्रत्यक्ष दर्शन देऊन **श्री नारायण महाराज केडगांवकर** या रुपांत परमतत्त्व प्रगटलें. दत्त नामसंकीर्तन व अन्नदान यांची लयलूट तेथें करविली. तेंच तेज सातारा जिल्ह्यांत अष्टयाजवळील वठारगांवीं दत्तमहाराज म्हणून गाजलें. प्रणवोपासना, साधुसंतांचा देवयान मार्ग इ. ग्रंथ लिहवून तो भाग दत्तभक्तींत गुंगविला. शिर्डीच्या साईबाबांत तेंच

चैतन्य प्रगटलें. चिदानंद यति, हरिहर, त्रिविक्रमानंद, सिनोरचे सच्चिदानंद, रेवाकाठचे ब्रह्मचारी यति ( लंगडे महाराज ) इत्यादि श्रीदत्त प्रभूंचे आविष्कार ठायीं ठायीं धर्मदीप्तीचें कार्य करीत होते. एकतानता, भावभक्ति, अध्यात्मिक उन्नति यांचें मंगल वातावरण सर्वत्र दुमदुमूं लागलें. आळंदीला नरसिंह सरस्वति या नांवानें दत्तभगवान प्रगटलें. त्या दीप्तींतूनच महर्षि अण्णासाहेब पटवर्धन पुण्यास, संत पद्मनाथ स्वामि धुळ्यास, आळंदीला हल्लीं असलेले संत गोडबोले महाराज, नागपूरचे अप्रबुद्ध ( पाळेकर ) इत्यादि दत्तज्योति तेंच कार्य करीत आहेत. दत्तप्रभूंचा आविर्भाव अशा-रीतीनें सर्वत्र पसरत असतो. सांवतवाडी जिल्ह्यांत माणगांवीं तेंच दत्ततत्त्व अत्यंत प्रभावीपणें चमकलें. मोटारींचीं सारीं सूत्रें ड्रायव्हराच्या हातांत असतात. जड मोटार निमित्तमात्र असते.

## यतिवर वासुदेवानंद सरस्वति

माणगांवचे श्रेष्ठ यतिवर श्रीमंत परमहंसपरिव्राजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वति यांच्या माध्यमाचा उपयोग करून घेऊन सारीं सूत्रें श्रीदत्तभगवान स्वतः हलवीत असत. देह यतिवरांचा पण चैतन्य सारें दत्तप्रभूचें असें वैशिष्ट्य या अवताराचें होतें. श्री वासुदेवानंद सरस्वतीं[illegible] बालपणापासून सारेंच अघटित. सामान्यांना एक वेद शिकावयाला सा[illegible] आयुष्य पुरावयाचें नाहीं. पण चारी वेद मुखोद्गत होऊन बालपणींच[illegible] वेदसिद्धि, मंत्रसिद्धि त्यांना लाभली. दत्तभगवान यांच्या आज्ञेशिवाय घोटभर पाणीहि प्यावयास ते तयार नसत. दत्तभगवान आज्ञा देत. त्या प्रमाणें त्यांच्या शरिराच्या क्रिया घडत. चल माणगांवास. त्या सात वर्षांत माणगांव प्रति वैकुंठ बनविलें गेले. इतकें अन्नदान कोठेंच झालें नसेल. तुझा बाजार आतां बंद कर हीहि दत्तप्रभूचीच आज्ञा. कैक वर्षें खडतर तपश्चर्या करूनही योगी, महायोगी यांना दत्तप्रभूचें दर्शन घडण्याची मारामार पडते. त्याच दत्तप्रभूंनीं नरसोबाच्या वाडींत श्री

वासुदेवानंद जातांच दर्शन दिलें, इतकेंच नव्हे, तर अलभ्य असा गुरुमंत्र दत्तांनीं त्यांना स्वतः दिला. यावरून ते किती जबरदस्त तयारीचे अधिकारी पुरुष होते याची कल्पना येईल. थोडें कांहीं चुकलें कीं श्री दत्ताकडून आचारसंहिता पाळण्यास दक्ष रहाण्याची सूचना यावयाचीच. गुरुदेव वासुदेवनंद सरस्वति यांजकडून दत्तमहात्म्यावर इतकी प्रचंड ग्रंथरचना करवून घेतली कीं, तितकी आजवर कोणीच केली नाहीं. हे सारे वेदतुल्य ग्रंथ गुरुदेवांच्या लेखणींतून लिहवून घेणारी तीच दत्तप्रभूची चैतन्यशक्ति सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वति महाराजांचे परमशिष्य व शक्तिपातदीक्षेचे महाराष्ट्रांतील संचालक सद्‌गुरु गुळवणी महाराज पुण्यास दत्तदीप्तिजागृतीचें कार्य आजही करीत आहेत. नरसोबाच्या वाडींत श्री गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचा मुक्काम असतांना गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचे शिष्य दीक्षितस्वामी या रूपानें आमरापूर या ग्रामांत तें दत्ततत्त्व गाजले.

## पूज्यश्री रंगावधूत

त्याच्या दर्शनास मातुश्रीसह आठ वर्षांचे बालक आलें. पूर्वसंचित ोरदार असणाऱ्या बालकांकडे पाहिलें. संतोष वाटला व बाळाच्या नोभूमिकेवर खूष होऊन चाक्षुषी दीक्षेनें आपलें तपतेजसामर्थ्य प्रदान ले. त्याला आत्मरंगांत डुलविलें. व शक्तिकेंद्र बनविलें. उभ्या आयुष्यांत या गुरुशिष्यांची ही एकदांच भेट झाली. पण गुरुदेवांनीं ब्रह्मनिष्ठ अवधूत या उच्चभूमिकेवर आणून सोडले. तेच आजचे नारेश्वरचे संत रंगावधूत महाराज होत. यांतहि गुरुदेवांची कृपा व दत्तप्रभूंची अजब लीलाच बघावयास सांपडते.

## सद्‌गुरु गांडा महाराज

गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचा मुक्काम सिनोर येथे असतांना एक गुजराथी पोर आत्मकल्याणासाठीं येत आहे असें आत्मदृष्टीनें जाणलें.

प्रवचनांत विदीतही केलें. तोंच एक गुजराथी तरुण आत्यंतिक आर्त-भावानें गुरु करावा या भावनेनें गुरुदेवाकडे आला. आपली मनिषा कळविली. त्याचा शुद्ध भाव पाहून त्याला सेवेला ठेवून घेतलें. गुरुकृपा झाली. तेच आपले चरित्र नायक गांडा महाराज होत. ब्रह्मनिष्ठ बनविलें. संन्यासदीक्षेनंतर तेच योगानंद सरस्वति बनले. दत्तप्रेरणेनें या साऱ्या घटना घडल्या. गांडा महाराज या रूपानें परमतत्त्व दत्तप्रभू मराठवाड्यांत प्रगटलें. सद्गुरुंना शतशः प्रणाम.

## गुरु माऊलीचे खडे तात्त्विक बोल साधकासाठी

न जाने किदर नाव मेरी, नाव चली रे चली रे, चली रे, चली रे ॥

परमेश्वरप्राप्तीसाठीं, मानव-मन धडपड करीत असते. प्रत्येकाचे मार्ग निरनिराळे असतात. नद्या निरनिराळ्या दिशेनें वहातात पण शेवटीं मिळतात समुद्रालाच. व्यक्ति तितक्या प्रकृति. प्रत्येकाचे आचारविचार, गुण, धर्म निरनिराळ. अभिरुचि निरनिराळी.

## ईश्वरप्राप्तीच बहुविध मार्ग

कुणी तीर्थयात्रा करून देव भेटतो या विचाराचे तर कुणी यात्रेंत काय आहे ? जिकडे पहाल तिकडे माती, चुना, दगड, पाणी या शिवाय यात्रत काय दिसणार ? या विचाराचे. भस्माचे पट्टे, बुक्का, गुलाल, गोपीचंदनाचे टिळे लाविल्यानें देव भेटतोच या निश्चयाचे. तर कित्येकांना टाळ वाजवीत बसण्यांतच परमेश्वर प्राप्तीचा मार्ग दिसतो. कुणी भजनाच्या नादांत गुंग तर कुणी वारकरी पंथ हाच खरा तरणोपाय या विचाराचे. कुणी कर्मठ-पणानें ईश्वर भेटतोच असें ठासून सांगतात तर कुणी जप हेंच उत्कृष्ट साधन असें कंठरवानें सांगतात. आईबापांच्या सेवेनें पुंडलिकाला देव भेटला असा कित्येकांचा दावा तर व्रतवैकल्यानें देव भेटतो असें कित्येकांचें म्हणणें. अनुष्टान, सप्तशति, पारायण या शिवाय देव भेटणार नाहीं असा

कित्येकांचा हुकमी आवाज तर बेलाची लाखोली वहाणें हाच ईश्वरप्राप्तीचा सरळ, राजमार्ग कित्येकांना वाटतो. द्रव्यदानापेक्षां अन्नदानानें ईश त्वरित भेटतो हें कित्येकांना नापसंत तर विद्यादान हाच ईशप्राप्तीचा सहज सुलभ उपाय असें कित्येकांचें आग्रहाचें निवेदन असतें. जंगलांत जाऊन राहिल्याशिवाय ईश्वरप्राप्ती नलगे असा कित्येकांचा शेरा तर माघस्नान, वैशाखस्नान, सिंहस्थाच्या गुरूचें पर्वस्नान करण्यानें ईश्वर भेटणार म्हणून स्नानासाठीं कित्येकांची धडपड. अशा एक ना हजार तऱ्हा आहेत. अहो ! यांत काय आहे ? आपल्या हृदयांत देव आहे त्याला रोज मिष्टान्नांचा नैवेद्य दाखविला म्हणजे झालें. देव भेटणारच. मृदुंगाच्या तोंडावर थोडा कणिकेचा गोळा टाकिला तर तो उत्कृष्ट बोलूं लागतो. रोज मिष्टांन्नाचा नैवेद्य दाखविला तर तो अंतरींचा देव आपणाशीं बोलणारच अशा विचारांचा पगडा कित्येकांवर असतो. तर कित्येक आज ना उद्यां जीव शिव होणारच मग इतकी धडपड कशासाठीं ? अशा निश्चिंत स्वभावाचे.

अशा कैकांच्या कैक विचारांच्या लाटा परमार्थ मार्गांत उसळत असतात. चार आंधळ्यांनीं हत्तीचें वर्णन केलें तशांतली सारी गत. आज आपण ज्यांचें चरित्र वाचणार आहोंत त्या महात्म्याचें यावर असें उत्तर आहे कीं :

**उत्तर**— सज्जनांनो ! साऱ्यांचे सारे मार्ग उत्तम आहेत. सरकारी कायदे जनहिताच्या दृष्टीनें कितीतरी उत्तम असतात. पण त्यांची अम्मलबजावणी कितपत होते ? अमलबजावणी करणाऱ्याचा लहरी कारभार त्यामुळें कायद्याचें विडंबन होऊन तें विडंबन जनतेला रडावयास लाविते. तीच गोष्ट परमार्थ मार्गाची. वित्ताविना संसार, पित्ताविना शरीरप्रकृति तसेंच चित्ताविना परमार्थ म्हणजे नाहक सव्यापसव्य करण्यासारखें आहे. अवडंबरापेक्षां चित्ताच्या स्थिरतेला अधिक महत्त्व आहे. आंबा गोड आहे असें म्हणून आंबा गोड लागत नसतो. तर आंबा चाखूनच त्याची रुचि

घेतली पाहिजे. तीच गोष्ट परमार्थमार्गाची. मनाच्या एकाग्रतेशिवाय ही रुचि कशी समजणार? परमार्थ मार्गांत ध्येयाचें विडंबन झालें तर देव तर भेटत नाहींच नाहीं पण श्रमांचा शीण मात्र जाणवतो. बापाच्या गैरहजेरींत मुलें देवाची पूजा करीत असतात त्यांना देव भेटत नाहीं. देव प्रसाद ग्रहण करीत नाहीं. पण बापाच्या गैरहजेरींतच संत नामदेव यांनीं बालपणीं देवाची पूजा केली होती. देव दूध पीत नाहीं म्हणून तीन दिवस तें बालक उपाशीं राहिलें. तीव्रतर अनुसंधान साधल्यामुळें देवाला दूध पिणें भाग पडलें. बालबुद्धींत शुद्धभाव ओतप्रोत भरलेला होता. देव शुद्ध भावाचा भुकेला असतो. शुद्ध तुपाप्रमाणें शुद्ध भावहि दुर्मिळ होत चालला आहे. आपलीं सारींच धार्मिक कृत्यें उपराउपरी पाहुण्यांच्या आग्रहासारखीं असतात. त्यामुळें फळ हातीं येत नाहीं. देवाला जें आवडतें तें दिलें जात नाहीं. व देवाला जें आवडत नाहीं त्यावरच आमच्या साऱ्या धार्मिक कृत्यांचा भर. तेव्हां हें जमावें कसें? हें प्रश्नचिन्ह देव व भक्त या दोघांपुढेंहि तोंड वासून उभें असतें. कडू भोपळा घेऊन त्याला हिंदुस्तानांतील सर्व तीर्थांचें स्नान घडविलें. तो पूर्ववत् कडूच राहिला तर या साऱ्या तीर्थस्नानाच्या खटपटीचा काय उपयोग?

ज्यांचे चरित्र आपण वाचणार आहोंत. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, देव भेटावा अशी मनापासून इच्छा आहे ना? विषयतरंगांत रमविणारें मनच. प्रभुरंगांत रंगविणारें मनच. साऱ्या गोष्टी मनावर अवलंबून असतात. परमार्थांत मनालाच प्राधान्य आहे. देव भेटावा अशी इच्छा असल्यास आपल्या मनाला तीन प्रश्न विचारा.

**प्रश्न १ ला**— मन तुमच्या ताब्यांत आहे? का तुम्ही मनाच्या ताब्यांत आहांत?

**प्रश्न २ रा**— तुमचें मन स्थिरावलें आहे काय? मन स्थिरावण्यास उपाधिरहित व्हावें लागतें. याची तुम्हांस कल्पना आहे काय?

**प्रश्न ३ रा**– मन मेल्यांशिवाय मनांत उठवणारे तरंग कमी होत नसतात. मन मेल्याशिवाय प्रभुदर्शन घडत नसतें. याची तुम्हांला जाणीव आहे काय? मनावर परमार्थ उभारलेला असतो.

मन आवरा हा संतांचा आदेश असतो. बिघडलेलें मन संसार-कर्दमांत लोळावयास लावील. सुधारलेलें मन परमात्मदर्शन घडवील. परमार्थांत चिकाटी, धैर्य, दृढनिश्चय यांना फार महत्त्व आहे. नियम करूं नये. केलाच तर अट्टाहासानें तो पाळण्यासाठीं इंद्रियांच्या साऱ्या शक्तींनिशीं तुटून पडलें पाहिजे. लेचेंपेचें मन परमार्थांत अगदींच कुचकामाचें ठरतें. हालणारा दांत पडतही नाहीं व खाऊंही देत नाहीं. अशा लेच्यापेच्या मनाच्या दैना असतात. खंबीर मनच उपयुक्त ठरत असते. परमार्थांत दृढनिश्चय अमृत असतो. लोभ हितकर असते ही कल्पना चुकीची असून त्याग ही यशाची किल्ली ठरत असते. बहिर्मुख मन आवरणें म्हणजे परमार्थांत पदार्पण करणें होय. विषयभोग बहिर्मन भोगते तर अंतर्मन आत्मशांति भोगतें. वृत्ति विषय भोगाकडे वळविणारा तो संसार. वृत्ति आत्म्याकडे वळविणारा तो परमार्थ या दोन वृत्तींत दोन ध्रुवांइतकें अंतर पाडणारें मनच. जो मनाचा दास तो सर्वांचा दास. मन जिंकलें त्यानें सारेंच जिंकलें. मानवाचे सारें भवितव्य त्याच्या मनावर अवलंबून असतें. **मन स्थिर झाल्याशिवाय, मन ताब्यांत आल्याशिवाय परमार्थ घडूंच शकत नाहीं ही काळ्या दगडावरची रेघ आहे.** देव भेटण्यासाठीं जे पंधरावीस मार्ग अनेकांनीं ठरविले ते मार्ग रात्रंदिवस करीत सुटला व मन स्थिर नसेल तर कांहीं कांहीं वळणार नाहीं. मन स्थिर करणें, मन जिंकणें त्यासाठीं प्रयत्नवादी होणें हाच खरा परमार्थाचा राजमार्ग होय. **चंचल मन, बहुविध वृत्ति-विचार, तरंग, विकल्प, संकल्प, वासना हे परमार्थमार्गातील महान अडथळे होत.**

## सद्‌गुरु गांडा महाराज

ज्यांचें चरित्र वाचणार आहोंत ते पढीक नव्हते. विद्वान किंवा शास्त्री नव्हत. तर पोटापुरतें शिक्षण झालेले होते. तरी ते ब्रह्मनिष्ठाच्या भूमिकेवर आलेले होते. यावरून परमतत्त्व प्राप्त करावयास विद्वत्ता लागतेच असें नाहीं. परमेश्वर प्राप्तीचे अनेकांचें अनेक मार्ग पूर्वीं सांगितले आहेत त्यांचा यांनीं कधीं विचारहि केलेला नव्हता. त्यांची विचारसरणी साधी होती. पोळी भाजावयाची असेल तर तवा तापवावा लागतो. संसाराच्या उद्वेगाचा तवा तापलेला असला म्हणजे भाकरीवर परमार्थाचा फोड किंवा उंचवटा डोकावूं लागतो. परमार्थ या पोरासोरांच्या गप्पा नव्हत. **वैराग्याचा पाया भक्कम असला तरच परमार्थ टिकतो.** वैराग्याविना परमार्थ म्हणजे अळवावरचें पाणी. परमार्थाच्या प्रवेशद्वारांत प्रवेश मिळावयास मनोजय, पक्का दृढनिश्चय, व वीतरागी वृत्ती यांचा दृढ अभ्यास असणें अवश्य असतें. वाडवडिलांची पुण्याई, त्यांची तपश्चर्या, त्यांचा आशीर्वाद व स्वतःचें पूर्वसंचित इत्यादि दशम्या प्रवासांत असल्या म्हणजे अहं विशेष. दुधांत साखर पडल्यासारखें होतें! परमार्थ चालूं लागता. संकटें, अडचणी, पायीं प्रवास, उपासमार, बेघर होणें, दगदग इत्यादि कसोटीवर परमार्थ मार्ग घांसला जातो. कसोटी पाहिल्याशिवाय आपण सोनें घेत नसतो तर कसोटी पाहिल्याशिवाय देव तरी कसें आपणास जवळ करणार? **परमार्थाच्या कष्टतर प्रवासांत सद्‌गुरु कृपेच्या घनदाट छायेखालींच विसांवा मिळत असतो.** सद्‌गुरूवरील अढळनिष्ठा व निस्सीम गुरुभक्ति या एकमेव साधनांनीं परमतत्त्वाचें दर्शन होऊं शकतें हें त्यांनीं स्वानुभावानें जगताला दाखवून दिलें आहे. निःसीम गुरुभक्ति असली तर इतर साधनांची जरुरी नसते असा त्यांचा आत्मविश्वासाचा संदेश आहे. केवळ गुरुसेवेनें त्यांचा भव आटला. जिंकलेलें मन, दृढ वैराग्य व गुरूवरील अढळ श्रद्धा या साधनत्रयीवर तीनमुखी दत्त आपलासा करून घेतला. परमतत्त्वाचा साक्षात्कार घडून ते ब्रह्मनिष्ठाच्या भूमिकेवर आले.

* * *

# किरण दुसरा

## जन्म, कुलवृत्तांत, बालपण

तो गुजराथ. ज्याला नर्मदामाता हंसविते. तापी माता रिझवते. महानदी कृपादृष्टि ठेविते. सोन्याचा तुकडा असणारा तो गुजराथ प्रांत. कापसाचीं शेतें मजेनें डुलतात. आम्रादि फलवृक्ष फलभारानें नम्र झालेले असतात. व्यापारी दृष्टि असणाऱ्या आपल्या गुजराथी बालकांना हंसविण्यांत लक्ष्मीमातेला मोठा आनंद दाटतो. मनांत दया पाझरत असते, धार्मिक कार्यांत हाताची मूठ मोकळी असते. अशा गुजराथेंत सुरत जिल्ह्यांतील सचीन तालुक्यांत एका रमणीय तलावाकांठीं फार मोठें नसलेलें असें तलंगपूर गांव आहे. तेथें चरित्रनायक श्री. गांडा महाराज यांचा जन्म झाला. तलंगपूर सुरतेपासून दहा मैलांवर असून अनाविल ब्राह्मणांच्या वस्तीनें तें गजबजलेलें गांव आहे. तेथील एका शुचिर्भूत कुळांत परमतत्त्वानें सगुणरूप धारण करावयाचें ठरविलें. शिव उपासना कुळपरंपरेनें चालू होती. शिवोपासना फळाला आली. योगभ्रष्ट पवित्र आत्मा आपली गतजन्म तपस्या पुरी करावयास या कुळांत जन्मास आला. कारण— निराकार निर्गुण परब्रह्म निर्गुणांतून सगुणांत येतांना, सुसंस्कृत कुळ, प्रज्ञावानांचीं निवासस्थानें, कर्मनिष्ठ, शास्त्रोक्त आचारांचें, तपवान, आत्यंतिक धार्मिक सुसंस्कारांचें, गोब्राह्मणसेवक वेदाधिकारी, चिन्मय प्रभूंत रमणारें, अति शुद्ध आचार विचाराचें, साक्षात्कारी, व्रतवैकल्यांत रमणारें, परोपकारी अशा सात्त्विक कुळांत जन्मास येऊन आपली अपुरी तपश्चर्या पुरी करण्यासाठीं अवतरत असतात. कुळाचें गोत्र कौलश असून ते त्रिप्रवरी होते. विश्वामित्र, भारद्वाज, कौलश हे तीन प्रवर; माध्यायनी शुक्ल यजुर्वेदीय शाखा. इष्ट देवता निळकंठेश्वर असून कुळदेवता शुक्लेश्वर महादेव क्षेत्र अनावल ही होती.

## वंशावळी




[ डाह्याभाईंना जमनाबेन, देवीबेन, अंबाबेन या तीन मुली. चरित्र नायक कल्याणजी यांच्या चिरपरिचयांत येणाऱ्या भडोच हें सासर असणाऱ्या भगिनी सौ. यमुनाबेन होत. ]

## अनाविल ब्राह्मणांची दंतकथा—

प्रभु रामचंद्र यांनीं यज्ञ केला. यज्ञ करतांना ब्राह्मणांची संख्या कमी पडूं लागली. तेंव्हा असलेल्या द्रविडांवर प्रभू रामचंद्रांनीं तीर्थ शिंपडून त्यांना पावन करून, अनावल मुक्कामीं यज्ञस्थळीं त्यांना यज्ञोपवित धारण करविलें. व यज्ञांत कमी पडणाऱ्या ब्राह्मणांची पूर्तता करवून घेतली. यांत वैशिष्टय हें आहे कीं, अनाविल दक्षणा घेणार नाहीं पण दक्षणा देईल मात्र. म्हणून अयाचक अनाविल म्हणतात. यांचा विस्तार वापी ते सुरत असल्यामुळें ती त्यांची मातृभूमि समजली जाते. तलंगपूर हे मिंढोळा नदीच्या कांठीं असून तेथें जावयास सचीन स्टेशनावर उतरावे लागते. तलंगपूर तालुका चौऱ्यांशी जिल्हा सुरत. तलंगपूर ही चरित्रनायकाची जन्मभूमि आहे.

## तलंगपूर

सुरतेपासून दहाबारा मैलांवर असणारे तें तलंगपूर. श्रमजीवि छोटेसें शेतकरी गांव. त्यांत अठरापगड वस्ती. जवळच तलाव. त्याकांठीं गांवाचें आराध्यदैवत **नीलकंठेश्वर.** हें जागृत दैवत कैकांना पावलेलें. नवसास पावणारा जागृत देव, असा लौकिक नीळकंठेश्वराबद्दल त्या भागांत पसरलेला होता. श्रद्धा तसें फळ. श्रद्धेनुरूप मिळते तलंगपुरांत ब्राह्मण वस्तीहि बरीच होती. "**श्रद्धा फलति सर्वत्र**" संकट, आजारीपण आलें कीं, आशुतोष शंकराला नवस व्हावयाचा. जनता आधिव्याधिमुक्त व्हावयाची अशा विश्वासामुळें नीलकंठेश्वर या स्थानाला बरेंच महत्त्व आलेलें होतें. आजूबाजूची जनताहि नवस करण्यास व फेडण्यास येत असे.

तलंगपुरांत चरित्र नायकाचे आजोबा श्री. शंकरभाई लालजी हे रहात असत. अत्यंत कर्मठ, कट्टर शिवोपासक सुखवस्तू गृहस्थ, अनाविल ब्राह्मण शंकरभाई असत. घरीं शेतीचा पसाराहि होता. समाधान वृत्ति व सतत शिवाराधना हें त्यांच्यांतील वैशिष्टय होतें. अत्यंत सात्त्विकता, दीन

दुबळ्यांची सेवा, गोब्राह्मणाबद्दल आत्यंतिक आदर. यांचा प्रभाव त्यांच्या चर्येवर स्पष्ट दिसत होता. संस्कार उत्तम, परदुःखशीतल वृत्ति, हृदयाचे हळवे, व परोपकार, गोसेवा, सत्कृत्य यांत सदा गढलेले असा त्यांचा लौकिक होता. धर्माळू, श्रद्धाळू, पण अत्यंत व्यवहार चतुर असे हे जोडपें होते. परम शिव उपासक, कट्टे सनातनी, व कर्मकांडांत निपुण अशा शिव-भक्ताचे कल्याणदायी शिवकल्याण करणारच. त्यांना मुलगा झाला. त्याचें नांव डाह्याभाई ठेविलें. शिव भक्तींत वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवणारेच श्री. डाह्याभाई होते.

## श्री. डाह्याभाई

हे चरित्र नायकांचे वडील. काळ बसत नसतो. निसर्ग जुन्याला लोपवून नव्याला उत्स्फूर्त करीत असतो. डाह्याभाई मोठे झाले. कामधंद्याचा उरक त्यांना चांगला होता. त्यांच्या कर्तबगारीनें जनतेवर त्यांची छाप चांगलीच बसलेली होती. अंगच्या सद्गुणामुळें व दयाशील वृत्तीनें ते साऱ्यांना हवेहवेसे वाटत. पूर्वसंस्कार व वडिलांची दांडगी शिवोपासना यामुळें श्री. डाह्याभाई शिवोपासनेंत सदा रंगलेले असत. श्री. सौ. काशीबाई या त्यांच्या धर्मपत्नी गृहकार्यदक्ष व धार्मिक वृत्तीच्या होत्या. टापटिपीचा संसार करावा त्यांनींच असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. जनसेवेंत त्यांचा आत्मा होता. चित्त पतिसेवेंत गढलेलें व मन शिवोपासनेस वाहिलेलें अशा वृत्तीच्या त्या होत्या. वसिष्ठाची अरुंधती ही त्यांची भूमिका होती. वर्तनांत श्री. डाह्याभाईंची प्रतिछायाच. एक सूर, एक नाद, एक छंद, एक आवड, एक मन असा श्री. डाह्याभाई व श्री. सौ. काशीबाई यांचा संसार होता. द्वैतांत दुःख असते. अद्वैतांत शांति असते अशी त्यांची उदात्त विचारसरणी होती. तत्त्वप्रणालीचे, धर्मनिष्ठ, सांस्कृतिक व कर्मकुशल असें हें दांपत्य सदा शिवाराधनेंत मग्न असे. अनाविलांच्या कुळांत शिव उपासना वंशपरंपरागत चालू असते. भोळाशंकर म्हणजे शुद्ध

सात्त्विक भावाची भूक असलेला देव. भक्तांच्या आर्त वाणीस परेशाची आर्षवाणी साथ देत असते. वरील दांपत्यांचा संसार सुखासमाधानानें भरलेला होता. जमुनाबाई, देवीबाई व अंबाबाई या तीन कन्या झालेल्या होत्या. सारें सारें अनुकूल होतें. पण? संसारांत पण आला कीं, घाण व्हावयाचीच. **पण** हा शब्द अपूर्तता दाखवीत असतो. बहिर्णींना खेळावावयास भाऊ पाहिजे होता. सौ. काशीबाईंचें मन पुत्रदर्शनासाठीं हपापलेलें होतें. 'पुन्नाम नरकात् त्रायते इति पुत्रः' पुन्नाम नरकांतून सोडवावयास पाणी देणारा भाग्यवान पुत्र व्हावा अशी त्यांची भूक होती. आपणास मुलगा नाहीं ही भावना त्यांचें काळीज जाळीत होती. आर्तभावानें देवापाशीं पुत्राची मागणी चालू होती. देवा! तुझ्या भक्तांना कुढत ठेवण्यांत तुला आनंद वाटतो कां रे? आमच्या वंशांत दिवा कोण लावणार? भक्तकामकल्पद्रुमा! शंकरा! या साध्वीची हांक अजून तुझ्या कानावर आली नाहीं काय? हा धांवा शंकरांनीं ऐकला. आराध्यदैवत दांपत्यास पावलें. योगमायेच्या प्रेरणेनें योगभ्रष्ट परमात्मा उदरीं आला. दत्तजयंतीच्या संधिकालांत संवत १९२५ शके १७९० त तळंगपूर येथें योगभ्रष्ट आपली उर्वरित तपस्या पुरी करावयास या कुळांत मार्गशीर्ष शुद्ध पोर्णिमा संधिकालांत अवनीवर प्रगटला.

**आर्या--**

दत्तजयंति होती, प्रदोषकाळीं विभू जगीं आले।
टेंभेस्वामी यांच्या, कृपाकटाक्षें स्वयें प्रभू बनले॥

पुत्ररत्न झालें. घरांत, गांवांत आनंदीआनंद झाला. तो भाग्यदिन ठरला. महान साध्वी सौ. काशीबाई यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. भगिनी यमुनाबाईंना भाऊ झाला म्हणून आनंदानें स्वर्ग दोनच बोटें उरला. छोट्या बहिणीचा आनंद गगनांत मावेना. श्री. डाह्याभाईनीं पुत्राचें

मुखावलोकन करतांच शंकरा! तुझी लीला अगाध आहे असें सहजोद्गार त्यांच्याकडून निघाले. भूवरीं स्वर्ग आला असें साऱ्यांना झालें.

**साकी—**

महान् साध्वी काशीबाई, पोटीं प्रभू अवतरले!
पुत्ररत्न देखतां पिताजी, डाह्याभाई वदले।
दैवत कुळीं आलें। पूर्वज अजरामर झाले॥ धृ०॥

**कल्याण—**

तान्हुल्याचें नांव कल्याण ठेविलें गेलें. बालेंदुवत् कल्याण वाढूं लागला, प्रभा फाकूं लागली. कृष्णकन्हैयाप्रमाणें घरांत दुडदुड तो धांवूं लागला. 'पोराचे पाय पाळण्यांत दिसतात या न्यायानें बाळाला शिवपूजनांत गोडी वाटूं लागली. योगभ्रष्ट आत्माच तो. एकांगी रहाणें व ध्यानमग्न स्थितींत असणें यांत तो रमलेला दिसायचा. मौंजीबंधनानंतर स्नानसंध्यादि कर्में, रुद्र, अभिषेक, शिवपूजा नित्यनियमित करी. शिवपूजनासाठींच त्याचा पिंड होता. नांव कल्याण. नांवाप्रमाणें करणी होती. कल्याण जगाच्या कल्याणासाठींच अवतरलेला होता. शिव-उपासनेचें वेडच श्री. कल्याण यांना लागलेले होतें. शिवांत रमणारा तो शिव व वासनेंत, संसारांत रमणारा तो जीव. प्राथमिक शिक्षणाची शेवटची परीक्षा दिली. आंग्ल. विद्येपासून तें घराणें दोन हात दूरच होतें. वयांत आल्यावर तत्कालीन समाजरूढीप्रमाणें बालविवाहाची प्रथा होती. म्हणून बालपणींच श्री. कल्याण यांचा विवाह श्री. सौ. केसरबाई यांच्याशी झाला. लक्ष्मीनारायणाप्रमाणें हा जोडा शोभत होता. सौ. केसरबाई शांत, गंभीर व गृहकार्यदक्ष होत्या. सून चांगली मिळाली म्हणून सारे कौतुक करीत होते. बालविवाह करावयाचें कौतुक पूर्वींच्या साऱ्या वृद्धांना व प्रौढ व वयस्क विवाह करावयाचें कौतुक आजच्या तरुणतरुणींना.

**काळ बदलतो—**

आज कालमान बदललेलें आहे. त्या मानानें लोकाभिरुचि, आवड-निवड, इच्छा साऱ्याच बदलल्या. आज छत्तीस वर्षांची कुमारी मजेनें फिरते. तिची लहर येईल तेव्हां लग्न करील. पूर्वी आईबाप ठरवितील ती कन्या. तरुणांना आवाज नसे. आज तरुणतरुणींची पसंती याला प्राधान्य आलें आहे. वधूवरपरीक्षेचें बंड फारच बोकाळलें आहे. वधू पसंत पडली तरी हुंडा लग्न मोडतो इतका तो शेफारला आहे. कालाय तस्मै नमः ।

## श्री. कल्याणजींची जीवन नौका

या भवसागरांत श्री. कल्याण यांची जीवन नौका चालूं लागली. वडिलांच्या संसाराला कांहीं तरी हातभार लावावा असें श्री. कल्याण यांच्या तरुण रक्तास वाटूं लागलें. ऐतखाऊपणा त्यांना परवडेना. कांहीं तरी केलें पाहिजे हें निश्चित ठरविलें. म्हणून श्री. कल्याण यांनीं गांवठी शाळेंत शिक्षकाची नोकरी धरिली. कांहीं दिवस ती केली. गांवठी शाळाच ती. पगार कितीसा मिळणार? घरीं शेतीचा पसारा बराच होता. शिक्षकपणांत या तरुण रक्ताची शक्ति फुकट घालविण्यापेक्षां तरुण मुलगा घरच्या शेतीचें कामकाज पाहूं लागला तर काय वाईट? मलाहि शेतीच्या कामांत मदत होईल व घरचा मनुष्य देखरेख करणारा असला तर शेतीचें उत्पन्न वाढण्याची शक्यता जास्त आहे असे पोक्त विचार श्री. डाह्याभाई यांचे होते. म्हणून श्री. कल्याणजी यांनीं शाळेला रामराम ठोकला व ते घरची शेती पाहूं लागले. श्री. कल्याणजी यांनाहि वडिलांचे विचार पटले. घरच्या शेतीच्या कामांत श्री. कल्याणजी रंगले. शेतीचें काम अवजड, कष्टाचें व बरेंच जिकीरीचें असे. ब्राह्मणाचे पोरास कष्टाचीं कामें करा-वयाची संवय कशी असणार? मेहनतीचीं कामें याजकडून होईनात. त्यामुळें बेचैन होत. असली कठीण कामें करायची मला संवय नाहीं

म्हणून तीं बरोबर होत नाहींत अशी पुत्राची तक्रार पिताजी श्री. डाह्याभाई यांना पटली. त्यामुळें श्री. कल्याणजी यापुढें शेतीचीं कामें करीत नसत. आतां यापुढें काय करावें? असें प्रश्न चिन्ह पितापुत्रांपुढें उभें राहिलें.

## आत्मोपलब्धींत रमणारे कल्याणजी

श्री. कल्याणजी संसारीं सारीं गृहकृत्यें करीत पण पूर्वजन्म संस्कारामुळें त्यांच्या मनाचें अनुसंधान आत्मोपलब्धींत असे. अंतःप्रेरणा निराळी, पण परिस्थिति अनुरूप कार्यप्रणाली निराळी अशी रस्सीखेंच श्री. कल्याणजी यांच्या मनांत सतत चालू असे. लग्न झालें. संसारी बनले. ते संसार करीत पण त्यांना संसाराचें आकर्षण नव्हतें. नाव पाण्यांत असते पण पाणी नावेंत नसते. ते संसारांत होते पण संसार त्यांच्यांत नव्हता. ते संसाराचे गुलाम नव्हते तर संसार त्यांच्या गुलाम होता. घरीं मन लागेना. बाहेर कोणी जाऊं देईना. बाहेर जाऊनही आपल्या आयुष्याचा वाटाड्या आपणास कोण व कोठें भेटणार? कसा भेटणार? इत्यादि विचार त्यांच्या मनांत घर करून होते. 'येतां प्राप्त घडी, सर्व घडे' या उक्तीकडे त्यांचें लक्ष नव्हतें. नव्हे तें त्यांच्या स्मरणांत नव्हतें. मन घुसळूं लागलें. बेचैनी वाढली. अंतर्मन बहिर्मन यांचा मेळ बसेना. जगावें कसें? जमावें कसें? महाकठीण आहे असें वाटूं लागले. अशा रीतीनें त्यांची आयुष्य नौका भवसागराच्या भोंवऱ्यांत सांपडली.

## पिपलधरा येथें भाच्याच्या लग्नास प्रयाण

तलंगपुरापासून वीसपंचवीस मैल दूर असणाऱ्या पिपळधरा येथें भाच्याच्या लग्नासाठीं श्री. कल्याण यांना वडील श्री. डाह्याभाई यांनीं पाठविलें. लग्नसमारंभ मजेंत पार पडला. दुसऱ्या दिवशीं शिवरात्र होती. श्रावणांत शंकराला सव्वालाख बेल वहात. शिवरात्रीला उपवास करून रात्रीं बारा वाजतां शंकरार्चन करण्याचा नियम त्यांचा अव्याहत चालू

होता. वृत्तीचे कडक असल्यामुळें एकदां केलेला नियम ते सहसा मोडीत नसत.

## नियम पाळावयाचा कटाक्ष नियमसिद्धि

भाच्याचें लग्न लावून शिवरात्रीसाठीं तांतडीनें घराकडे परतले. पण रेल्वे चुकली. वीस पंचवीस मैल जावयास तपास करूनही अन्य साधन मिळेना. रात्रीं बारा वाजतां शिवार्चन शिवरात्रीला घडलेंच पाहिजे, त्यांत खंड पडूं नये म्हणून तसेच पायीं निघाले. दुपारची वेळ, ऊन मी म्हणत होतें. प्रवास सुरू झाला. भर उन्हांत चालून जीवाकडे न बघतां वीस-पंचवीस मैल जमीन तुडवीत रात्रीं घरीं आले. रात्रीं बाराला यथासांग शिवार्चन केलें. तेव्हां त्यांचा जीव भांड्यांत पडला. **नियम करण्यापेक्षां नियम पाळण्यांत बुद्धीची खरी करामत असते.** ती नियमनिष्ठा कां कर्मनिष्ठा ? हें देहाचें कौतुक कां देहाध्यास ? असले प्रश्न मनांत सहज येतात. नियम कांटेतोल पाळण्यांत मनोधैर्य व चिकाटी हवीच हवी. निश्चयी मनुष्याचें मन त्यांच्या ताब्यांत का तें मनाच्या ताब्यांत ? असें प्रश्नचिन्ह डोकावतें ? कर्तव्यतत्पर पुरुष कर्तव्य बजावीत असतां सुख-दुःखाकडे बघत नसतात. शूर, वीर, भक्त, हे बेडर असतात. भित्रेपणा त्यांना ठाऊक नसतो. एकानें म्हटलें आहे,

"मनस्वी कार्यार्थी गणयति न दुःखं न च सुखम्"

अभय हें दैवी संपत्तीचें आगळें वैशिष्ट्य असतें. भगवन्नामांत रंगलेल्यांना भीति कसली ? उलट असल्या व्यक्तींना पाहून भीतीला भय वाटतें. म्हणून ती यांच्यापासून दूर असते. धैर्यशाली जीवांना भीति हा शब्द अपरिचित असतो. एकतर नियम करूं नये, केलेच तर ते नियम कटाक्षानें पाळले गेलेच पाहिजेत असा दृढ निश्चयी बाणा अंगीं असावा. **कोणताहि नियम अगदीं कटाक्षानें पाळला गेला तर त्या नियमाची सिद्धि लाभते.** संत तुळशीदास यांचा एका ठराविक

जागेवरच शौचास बसावयाचा नियम होता. बारा वर्षांनंतर भूत प्रसन्न झालें त्यानेंच युक्तीनें रामचंद्र प्रभूचें दर्शन संत तुळशीदासास घडविलें ही गोष्ट महशूर आहेच.

## नंदुरबारेस जाण्यासाठीं बैलगाडीचा प्रवास

एकदां श्री. कल्याणजी कांहीं कामानिमित्त आपल्या दोन-तीन सोबत्यांसह नंदुरबार येथें बैलगाडीनें जावयास निघाले. दाट जंगल, अवघड रस्ते, डोंगराळ प्रदेश, वाटेंत चोरा-चिलटांची भीती, वाटेंतील नद्यांचा दलदलीचा प्रदेश ओलांडणें अशा एक ना दोन अनेक अडचणी होत्या. त्या काळीं जंगलांतून प्रवास करणें फारच धोक्याचें होतें. सुमारें दीडशें मैलांचा हा कष्टतर प्रवास होता. प्रवास चालू होता. वाटेंत कोठें तरी बैलाच्या अंगावरील झूल पडली हें श्री. कल्याणांच्या ध्यानांत येतांच ते खालीं उतरले. आलेल्या रस्त्यानें झुलीच्या शोधार्थ जाऊं लागले. इतरांना वाटलें श्री. कल्याणजी लघवीसाठीं उतरले असतील. बराच काळ गेला तरी कल्याणजी येण्याचीं चिन्हें दिसेनात. म्हणून गाडी थांबविली. बऱ्याच वेळानंतर श्री. कल्याणजी झुलीसह गाडीजवळ आले तेंव्हां इतरांच्या जीवांत जीव आला. तुला झुलीच्या शोधार्थ जावयाचेंच होतें तर एखाद्यास बरोबर दिले असते. कल्याणजी अरण्यांतून एकटे फिरणें धोक्याचें असतें असा स्पष्ट इशारा देण्यास साथीदार विसरलें नाहींत. ठपकाहि दिला. श्री. कल्याणजी किती बेडर होतें यावरून कल्पना येईल. जो भीति-रहित झाला त्यालाच धर्माचा खरा अर्थ समजला. **भीति, प्रेम, राग, द्वेष, मत्सर, आनंद, दुःख हे सारे खेळ मनाचे असतात.** मन कल्पनेनें या भावनांचें भेसूर चित्र डोळ्यापुढें उभे करीत असते व त्या खोट्या भुताला मानवमन बळी पडत असते त्यामुळें मानव हंसतो, रडतो. असा अंतर्मनाचा आवाज श्री.

कल्याण यांना ऐकूं आला. म्हणून कांहींच उत्तर न देतां ते चूप बसले. नंदुरबार येथील काम करून ही सारी मंडळी तलंगपूर येथें परत आलीं.

## नोकरीच्या शोधांत

आतां पुढें काय करावयाचे? हा प्रश्न भेडसावूं लागला. आफ्रिकेंत पेढीवर नोकरी मिळत होती पण परमुलुखांत न जातां आपल्या देशांत कोठें तरी नोकरी बघावी असा साऱ्यांचा सल्ला पडला. नोकरीच्या शोधांत सारे होतेच.

## मद्रासेंत नोकरी

मद्रासेंत इब्राहिमभाई यांच्या पेढीवर श्री. कल्याण यांना नोकरी मिळाली. तेथें काम करूं लागले पण तेथें दैव आडवें आलें. तलंगपुराहून पत्र आलें कीं, बहिणीचे पति निवर्तले आहेत तरी ताबडतोब निघून ये. तेथील अन्नोदक संपलें. श्री. कल्याण परत तलंगपूर येथें आले. दुःखाचा वेग ओसरला. कांहीं तरी केले पाहिजे. बेकार किती दिवस राहणार? कोणी म्हणतात.

मुलगी आवडतें कामानें, मुलगा आवडतो पैशानें।

हें काय खोटें आहे? कमवता मुलगा केव्हांहि बापाला प्रियकर होणारच. ऐतखाऊपणा श्री. कल्याणजी यांना पटेना. वडिलांनीं श्री. कल्याणजी यांना कापडाचें दुकान काढून दिलें. श्री. कल्याणजी यांना काम मिळालें.

## कापड दुकान

नोकरीपेक्षां स्वतंत्र कापड दुकान बरें असें वाटूं लागलें. दुकान चांगलें चाललें होतें. माल उधार फार जाई. त्यामुळें विक्री कागदावर पुष्कळ दिसे. पण हातांत रोकड नाहीं. उधारी फुगत चालली. पैसे वसूल करण्याचें कसब नव्हतें. थकलेली बाकी वसूल करणें ही एक कला आहे,

ती साधली पाहिजे. व्यापारांत उधारी हवी पण प्रमाणांत. उधारीवर एक कवि लिहितो—

उधारीचा पैसा, धोका देण्यांत बांका ।
दोन दिवसांत, मारवितो फांका ॥

अगदीं तसेंच झालें. दुकान बसलें. म्हणून दुकानाचा नाद सोडला. आतां कुठें काय ? हें प्रश्नचिन्ह आलेंच. धंद्याचे असे तीन तेरा वाजल्यावर नैराश्य येणारच. **नैराश्यांतूनच वैराग्य डोकावत असतें.** सारे मार्ग खुंटल्यावर माणूस देवदेव करूं लागतो. श्री. कल्याण यांची मनोभूमिका तयारच होती. योगभ्रष्ट कल्याणजी यांचा सात्त्विकतेचा पिंड होता.

## नैराश्य

देहाची क्षणभंगुरता, आत्म्याची अमरता, संसाराची नश्वरता पिंडांतून जागृत झाली. पिंजऱ्यांतील पक्षी फडफड करून उडण्याचा प्रयत्न करूं लागला. घर कसें सोडावे ? आत्मरत होण्यासाठीं कसे प्रयत्न करावे ? इ. विचारांची जोराची पकड श्री. कल्याणजी यांच्या मनावर बसली. विचारमग्न बनले. आपल्या आयुष्याचें भलें कसें करतां येईल या एकाच विचारानें त्यांच्या साऱ्या वृत्ती भरून गेल्या. आयुष्य फुकट जात आहे ही तळमळ जागृत झाली.

## नोकरीच्या शोधांत जातो या बहाण्यानें घर सोडलें,

घर सोडावयाचेंच असा निश्चय निश्चयात्मिका बुद्धीनें घेतला. ऐन तारुण्य, ओठावर मिशा नुकत्याच डोकावूं लागल्या होत्या. भरलेला संसार, तरुण पत्नी, वृद्ध आईबाप हे मायेचे पाश तडातड तोडून नोकरीच्या शोधास जातों असा बहाणा करून श्री. कल्याणजी यांनीं घर सोडलें. माया व वैराग्य यांच्या झगड्यांत वैराग्यानें मात केली. नोकरीच्या शोधांत हें कारण साऱ्यांना खरें वाटलें.

## निघाला गोपीचंद जसा

गौनमानेंहि नश्वरता पटल्यामुळें ऐन तारुण्यांत आपला राजवाडा असाच सोडला होता. वैराग्य म्हणजे धगधगता निखारा. मायाजाल दग्ध होतें, उत्स्फूर्त मन घराबाहेर पडतें; देहाचे कांहींहि होवो अशा ठिणग्या वैराग्याच्या नेत्रांतून उडत असतात. वाटेल तें होवो तें सोसावयास मनाच्या साऱ्या शक्ति एकवटलेल्या असतात. देहाचे सार्थक कसें होईल ? या एकाच विचारानें सारें शरीर व्यापून गेलेलें असतें. घराला रामराम ठोकला.

## निरंतर सोवळ्यांत राहणारी जगन्माऊली

श्री. कल्याण यांनीं घर सोडलें. घर सोडतांना अंगावर सोन्याचें कडें व पांचपंचवीस रुपये खर्चासाठीं श्री. कल्याणजी यांजजवळ होते. घर सोडून बैराग्याच्या मांडवाखालीं आल्यावर सोनें, रुपये जवळ घेतलेले जगन्माऊलीला खपलें नाहीं. सोन्यारूप्यांनीं बरबरटलेल्या हातांना वैराग्याचा खरा अर्थ समजलाच नाहीं असें जगन्माऊलीला वाटलें. माझं बाळ, माझा कल्याण अजून सोन्यारूप्याच्या लोभांत ? जगन्मायाच ती ! कधींहि जुगार न खेळणाऱ्या कल्याणाला जुगार खेळायचा मोह झाला. श्री. कल्याणजी सारे पैसे जुगारींत हरले. सोन्याचें कडें तेंहि चोरांनीं लुबाडून घेतलें. आतां कल्याणाजवळ फुटकी कवडीहि राहिली नाहीं. पूर्ण कफल्लक बनला तेव्हां जगन्माऊलीचें समाधान झाले. **जड वस्तूंच्या साहाय्यानें सुख शोधणाऱ्याला परमेश्वर कधींच भेटत नसतो.** जड वस्तूपासून मिळणारें सुख निराळें व आत्म्याच्या ऊर्मीपासून उसळणारा आत्मानंद निराळा. आनंदाची लज्जत सुखांत कशी येणार ? त्यागी महात्मे आनंदावर जगत असतात. त्यामुळें त्यांना लौकिकी जड वस्तूंची, त्यांतून निघणाऱ्या सुखाची मुळींच पर्वा नसते; जीवनानंद हें अमृत

असतें. तें शांति देतें. पूर्ण कफल्लक, पूर्ण निराश्रित, निराधार, घरास पारखा झालेला कल्याण मार्ग क्रमूं लागला. पाय चालतील तितके चालावें, जागा मिळेल तेथें निजावें, खावयास कोणी कांहीं दिलें नाहीं तर हसतां हसतां केवळ पाणी पिऊन आपली गुजराण करावी. ऊन, वारा, पाऊस याजकडे लक्ष देण्याचें कारणच नव्हते. अशा थाटांत श्री. कल्याणजी यांचा जीवन प्रवास चालू होता. देवा! तुझी मर्जी त्यांत मी राजी असें श्री. कल्याणजी यांचें जीवनसूत्र ठरलें गेलें. प्रत्येक गोष्टींत आनंद मानण्याची कला त्यांना अवगत झाली, नव्हे हाडीं मासीं रुळली गेली. **समाधानी जीवनांत अमृत वर्षत असते** असा त्यांना साक्षात्कार घडूं लागला. पूर्ण बेफिकीर बनले, आपला वाली फक्त परमेश्वर या भूमिकेवर आले. श्री. कल्याणजी यांचा रोजचा प्रवास चालूंच होता.

ठेविले अनंते तैसेचि रहावें। चित्तीं असूं द्यावें समाधान॥

या भूमिकेवर त्यांची अढळ श्रद्धा होती. देह-सुखाभिलाषा या खडत प्रवासानें मावळत चालली त्यामुळें मन उन्मार्गगामी बनलें. श्री. कल्याणजी विश्रांति घेत तेव्हां त्यांच्या मनांत खालील विचार तरंग येत.

## वेदान्ती विचार-तरंग

आसक्ति, वासना, भावना या संसारासक्तांना पोषक असतात. पण परमार्थांत आड येणाऱ्या या खोल दऱ्या ओलांडून साधकच यशस्वी ठरत असतो. ही मायिक घाण असणारा भक्त देवास आवडत नसतो. तर वैराग्यवृत्तींत रमून वासना, आसक्ति, संसार यांची राख करून ती विभूति अंगास चर्चून बनलेला जीवच शीवाकडे जाणाऱ्या रस्त्यावर असतो. देव जें जें करतो तें तें भल्यासाठींच अशी अढळ श्रद्धा असावी. त्यांत देवाचा सुप्त हेतू असतो. तो मानवमनास आकलन होत नाहीं. म्हणूनच मानव-मन सुखदुःखाचे हेलकावे खात असते.

## It is all for the best

ईश्वर करतो तें आपल्या भल्यासाठींच करतो, या तत्त्वावर श्रद्धा डळमळीत असते म्हणून मानव मनाला सुख, दुःख, आपत्ति यांच्या खाईतून जावें लागतें. तुझ्या मर्जींत माझी मर्जी अशा ठाम निश्चयाचें मन बनलें कीं, विकार होण्याचें कारणच उरत नाहीं. श्रद्धा लेचीपेची असली कीं, देवावर अविश्वास दाखविला म्हणून दुःखाचे फटके बसलेच म्हणून समजा. **निर्मळ व शांत मन ठेवण्यांतच खरा पुरुषार्थ आहे. तेंच जीवनध्येय आहे.** पाण्याच्या प्रवाहांत पडलेल्या लांकडाप्रमाणें आपलें जीवन असावें. पाण्याचा प्रवाह नेईल तिकडे लांकूड जाणार. ना कुरकुर, ना आनंद, ना दुःख. सदा शांत व समाधानी. असलें जीवन जगण्यानें भावनांचा आपल्यावर कांहीं परिणामच होत नाहीं. मन अविकारी असलें कीं, अखंडीत शांति तेथें असणारच. त्यांत स्वतःचें मन घालावयाचें नाहीं. सारे जगदीशावर सोपवावयाचें असला मार्ग विरक्तांचा असतो. या मार्गावर श्री. कल्याणजी तेव्हां आलेले होते. देवा ! तूंच मला आधार हें त्यांचें घोषवाक्य बनलें. देहाचे हाल होतांना दिसत होते पण अंतर्मन जागृत होऊन तें अधिकाधिक आत्म्याशीं संपर्क ठेवण्यांत गढलेलें होतें. मन प्रगतीवर होतें.

## ईश्वर केव्हां व कोणास भेटतो ?

ईश्वर माऊली निरंतर सोवळ्यांत असते. तिला अमंगल थोडेसेंहि खपत नाहीं. साऱ्या विश्वाचीं सूत्रें चालविणारी ईश माऊली जेव्हां कामांत गर्क असते तेव्हां आपल्या तान्हुल्यापुढें मायारूपी खेळावयाचीं नानाविध खेळणीं टाकून तान्हुल्यांना त्यांत रमविते, गुंगविते, आईचा विसर पाडतें. तान्हुलें खेळण्यांत गर्क झालें कीं, त्या नादांत त्याला खरेंच आईचा विसर पडतो. गाडी, घोडे, संपत्ति, सुंदर पत्नी, मुलें-बाळें, शेतीवाडी, बाग-

बगीचे, ऐश्वर्याचीं साधनें, सोनें-नाणें, हिरे-माणकें इत्यादि खेळणीं—आपल्या तान्हुल्याचें मन त्यांत रमण्यास अशी अनेक खेळणीं—ती बाळापुढें ठेवितें. पण ईश-माऊलीला आपल्या बाळाची आठवण झाली, बाळाला जवळ घ्यावेसें वाटलें, तिला पान्हा आला तर ती त्या खेळांतून बाळाला उठविते. कोणाकडून तरी त्याला जवळ आणितें. इतरांकडून बाळाच्या अंगावरील कामक्रोधांचे अंगडें, वासनांचें टोपडें काढवून त्याला अगदीं उघडानागडा बनविते. बाळाच्या अंगावरील साऱ्या अमंगल वस्तू दूर झाल्या अशी तिची खात्री होतांच ती त्या उघड्यानागड्या बाळाला जवळ घेऊन अंगावर मायेचा हात फिरवीत फिरवीत स्तनपान घडविते. शब्दशः श्री. कल्याणजी यांच्या बाबतींत असेंच घडलें. पूर्ण निराधार, पूर्ण निष्कांचन बनविल्यावरच ईशमाऊलीनें श्री. कल्याणजी यांना जवळ केलें. योग्य तें मार्गदर्शन घडविलें व बाळाला आत्मीयतेनें पूर्ण आत्मवत् बनविलें.

* * *

# किरण तिसरा

नमन प्रथम माझें सद्गुरु साधुसंता ।
करुनि भजन पूजा दाविती नीतिपंथा ।
तरुनि भवनिधि हा, तारिती आणिकांते ।
बुडति विषयपंकीं, ऐशियाहि दिनांते ॥

## श्री कल्याणजीं यांचें नाशिकांत आगमन

वेदान्ताच पोपटपंची करणारा खरा वेदान्ती नसतो तर अध्यात्म आचरणांत आणणारा खरा वेदान्ती, अध्यात्मिक असतो. ही गोष्ट चरित्र नायकाच्या खडतर जीवनांत ठायींठायीं दिसून येईल. वेदान्त हा आचरण्याचा विषय आहे. **तितिक्षेला अध्यात्मांत आगळें महत्त्व असतें** हें विसरून चालणार नाहीं. **सहनं सर्व दुःखानां तितिक्षा सा शुभा मता** ॥ ( अपरोक्ष अनुभूति ) तितिक्षेचें हेंच प्रतिपादन विवेक चूडामणि या ग्रंथांत थोड्या निराळ्या रीतीनें सांगितलें आहे. **सहनं सर्व दुःखानाम् प्रतीकारपूर्वकम् । चिंता, विलापरहितं सा तितिक्षां निगद्यते** ॥ नर्मदा परिक्रमेंत शूलपाणेश्वराच्या झाडींत परिक्रमवासी सर्वस्वीं लुटला जातो. यांत नर्मदा-मातेचा गुप्त हेतू हा असतो कीं, साधक अभिमान-गलित व्हावा, नागवला जावा, त्याचा देहात्मभाव लोपावा म्हणजे देहावरील आसक्ति कमी व्हावी. तेंच कार्य तितिक्षा करितें. **देहाध्यासाला वारंवार खडे चारून देहावरील आसक्तीचा लोप करविणारी ती तितिक्षा. देहभाव लोपल्याशिवाय आत्मभाव जागृत होऊन वाढत नसतो.** श्री. कल्याणजी खडतर प्रवास करतां

करतां नाशिक क्षेत्रांत येऊन पोहोचलें. तळेगपूरचें घर सोडलें त्या दिवसापासून प्रवास चालू होता.

## नाशिक

गौतममुनींचें तपस्थान, ते गौतम ज्यांनीं खडतर तपानें धुर्जटीच्या शिरावरील गंगा अवनीवर आणिली; पवित्रक्षेत्र बघून संत देव मामलेदार जेथें विसावले; ती पवित्र-पावन गोदावरी, मंदिरांनीं गजबजलेला तो गौतमी घाट, रामाची ती पंचवटी, तें तपोवन, गोराराम, काळाराम यांचीं विशाल मंदिरें बघतांच हृदय फुलतें, मनांत मोद दाटतो व मानस मंदिर निर्मळ भावभक्तीनें भरून जातें. अशा त्या नाशिकांत श्री. कल्याणजी आले. पवित्रस्थान बघून त्यांचा थकवा गेला. आत्मस्फुल्लिंग जागलें. रडक्या बाळाला आई जवळ घेऊन आपला प्रेम पान्हा पाजतें तसेच उपवासी, थकलेल्या श्री. कल्याणास एक संत भेटले. त्यांच्या सहवासांत कल्याणजी आले. श्रांत, क्लांत जीवाला आम्रतरुच्या घनदाट शीतल छायेंत बसल्यासारखे श्री. कल्याण यास वाटलें. **पूर्वभाग्य उदित झाल्याशिवाय खऱ्या संताचा सहवास लाभत नसतो.**

## श्री गांडा महाराज

वाचकांची जरा क्षमा मागून थोडेसें विषयांतर करतों. किरण पहिलें व दुसरे यांत श्री. कल्याण याच नांवानें चरित्र नायकाच ठायीं ठायीं उल्लेख आला आहे. श्री. डाह्याभाई आपल्या मुलास कल्याण या नांवानें हांक न मारतां त्यांच्या लाडक्या गांडा ( वेडसर ) या नांवानें हाक मारीत. हेतू हा कीं, मुलास दृष्ट लागूं नये. मुलें जगावी इत्यादि खेडवळ विचारसरणीनें त्यांनीं गांडा हेंच नांव रूढ केलें. पण मराठींत तो शब्द कसासाच वाटतो. म्हणून हा शब्द टाळला होता. यापुढें कल्याण शब्दाऐवजीं सद्‌गुरु गांडा महाराज शब्द येईल.

तलंगपूर सुटलें. गांव सुटलें. संसार सुटला. देवध्यानीं लागले. पूर्वसंस्कार व मनाची तयारी यामुळें ते अधिकारी व्यक्तींत मोडूं लागले. त्यामुळें त्यांचें कल्याण नांवहि सुटलें; ते महाराज बनले. सर्वत्र गांडा महाराज या नांवानेंच ते ओळखले जातात. हेंच नांव त्यांचें मराठवाडा या कर्मभूमींत महशूर आहे. संन्यास घेतल्यानंतर कल्याण नांव लोपलें. गांडा महाराज हें नांव मागें पडलें व सद्गुरु योगानंद सरस्वति महाराज सं. गुंज या नांवानें ते चिरपरिचित झाले.

## संतांचा सहवास व संतांचें कार्य

सद्गुरु गांडा महाराज ( पूर्वींचें कल्याण ) यांना नाशिकांत संत भेटले त्यांच्या सहवासांत ते असत. सुबोधवचनें मनात बिंबवीत. संत सहवासांत आत्मानंद वाटूं लागला. मन स्थिरावलें.

( १ ) संतांचा सहवास मानवमनांतील, शरिरांतील, परमाणू बदलवून त्यांना विशिष्ट वळण देत असतो. ( २ ) संतांच्या पवित्र श्वासोच्छ्वासानें सारेंच वातावरण पवित्र होत असतें. ( ३ ) संतांच्या रोमरध्रांतून निघालेली शक्ती, चैतन्य जीवांना आकर्षिते. म्हणूनच संतांजवळून लवकर उठावेसें वाटत नाहीं. ( ४ ) सत्कार्यप्रवीण करतें इतकेंच नव्हे तर दुरितक्षयार्थ संतांचा सहवास, संतदृष्टि, संतांची अमृतवाणी, उपकारक व दिग्दर्शक ठरत असते. ( ५ ) संत म्हणजे मांगल्य, पावित्र्य, सात्त्विकत यांचें मूर्तिमंत धामच. संत सहवासही पूर्वभाग्य उफाळल्याशिवाय लाभत नसतो.

## संतकृपा

गाय पासवल्याशिवाय पान्हा सोडीत नसते. थंडगार हवेशिवाय मेघ वर्षत नसतात. विद्वत्ता जोख याशिवाय विद्वान सर्वत्र पूजयेत् असें ठरत नसतें. साधकांत काहीं तरी दिसल्याशिवाय संत साधकावर कृपा करीत

नसतात. क्षेत्रें, नद्या पवित्र खऱ्या पण संतपदरजकणानें पवित्र नद्या पवित्रतर बनत असतात. संत तुळशीदास म्हणतात, हत्ती रस्त्यानें जातांना सोंडेंत माती घेऊन डोक्यावर टाकीत असतो. असें कां? यावर संत तुळशीदास उत्तर देतात. या रस्त्यानें संत गेले असतील, त्यामुळें पायधूळ डोक्यावर पडावी या आत्यंतिक पवित्र भावनेनें तो त्या धुळींतून संत चरणरज धुंडाळींत असतो. जड हत्तीला संतचरणरजाचें इतकें महत्त्व वाटतें. पण मानवाला? गंगास्नान, शिवपूजा व संतसहवास या त्रिवेणीनें सद्गुरु गांडा महाराज आनंद लुटीत होते. संताला सद्गुरु गांडा महाराजांची योग्यता समजली. त्यांचें पाणी जोखलें. साधनेच्या मार्गावर असणाऱ्या या मुमुक्षुला योग्य ती उत्स्फूर्त प्रेरणा देण्याची सहज प्रेरणा संतांच्या मनांत आली. हा प्रेमळभक्त आपलें पारमार्थिक ध्येय गाठूं शकेल अशी त्यांची मनोमन खात्री झाली. सोन्याची परीक्षा १ कसोटी २ अग्निदिव्य (तापविणें) ३ पिटणें व ४ कापणें या चार क्रिया केल्या-नंतर ठरविली जाते. शिष्याच्या परीक्षेलाहि चार कसोट्या असतात. १ खानदान, २ ब्रह्मतत्त्व जाणण्याची गोडी असणारा, ३ कुशाग्रबुद्धीचा व ४ जागरूक इत्यादि गुण त्या संतांना सद्गुरू गांडा महाराज यांच्यांत दिसलें. कोल्ह्याप्रमाणें धुर्तता व चतुराई, तसेंच सर्वतोपरी जागृतता, सर्पा-प्रमाणें जागृत निद्रा. ध्येय साधनांत तत्परता. इत्यादि गुणांमुळें त्या संताचें मन सद्गुरुला गांडा महाराजाकडे आकर्षिलें गेलें. सत्पात्र शिष्य आहे अशी खात्री झाली व त्या संतानें स्वयंप्रेरणेनें सद्गुरु गांडा महाराजावर आपली कृपा केली. योग्य तें प्रबोधन केलें. त्यामुळें सद्गुरु गांडा महाराज यांना आत्मशांति लाभली. योग आल्याशिवाय अशा गोष्टी साधत नसतात.

## संत महात्म्यांचा सहवास

परमार्थ साधनांत संत सहवासाला आगळें महत्त्व असतें. संतवाणींतून संत दृष्टिक्षेपांतून अमृत स्रवत असते. आधीं संत भेटणें दुर्लभ गोष्ट

त्यावर श्रद्धा बसणें कठीण, संत सहवास घडणें त्याहूनही कठीण. तो सतत टिकणें त्याहूनही कठीण. संतानुकरण आचरणांत आणून दृढ करणें हें आत्यंतिक कठीण असते. या साऱ्या घटना पूर्व सुकृत घडवीत असतें.

संतांची ओळख पटण्यास आपल्या अंगीं पात्रता हवी. खालील निष्कर्ष संतांना लावून बघावे नंतर सत्पुरुष समजावा.

( १ ) ज्याच्या दर्शनानें मनाची तळमळ शांत होते व जीवाला खरी विश्रांति मिळते.

( २ ) ज्याच्या सान्निध्यानें वासना थोडीतरी शांत होते. वासना तृप्त करण्याची ज्यांत शक्ति असते. आपल्या मनाविरुद्ध त्यांचें भाषण, वर्तन असलें तरी त्यांचा सहांवास सोडावासा वाटत नाहीं.

( ३ ) आपण त्यांजपासून काय शिकायचें? याचें आपलें आपणालाच कोडें पडतें.

( ४ ) स्वतःचे देहावर त्यांचे जितकें प्रेम असते तितकेंच आत्म्यावर असते.

( ५ ) आपण केलेल्या कर्मांच्या फळामध्यें आपलें मन गुंतूं नये म्हणून जे आपलें मन आत्म्याच्या आनंदांत सदा गुंतून ठेवीत असतात ते.

निर्मळ दृष्टि असणाराच या संतांच्या कसोट्या लावूं शकतो. हे विचारी मनाचें काम आहे, विकारी मनाचें नव्हे. संताकडून तीन गोष्टी शिकावयाच्या असतात. १ कर्तव्यरूप सदाचरण. २ प्राप्त परिस्थितींत समाधान ३ आत्म्याचें अखंड अनुसंधान. याच गोष्टी संत आपल्या भाषेंत समजावितात तेव्हां भाषाशैली खालीलप्रमाणें असतें.

जगांतील प्रत्येक गोष्ट भगवंताच्या इच्छेनें घडून येत असते. म्हणून तो खरा कर्ता आहे, तोच कल्याणनिधान आहे. अर्थात तो जें जें घडवून

आणतो तें तें आपल्या कल्याणाचें असतें. म्हणून प्राप्त स्थितींत प्रत्येकानें समाधान ठेवावें. तो कर्ता आहे ही जाणीव सामान्य जनता विसरते. म्हणून मन अखंड नामस्मरणांत गुंतविलेलें बरें. **संत ओळखण्याची मुख्य खूण म्हणजे भगवंत कर्ता आहे ही जाणीव व भगवंताचें अखंड अनुसंधान या दोन गोष्टीमुळें सत्पुरुषांचा प्राण सांठविलेला असतो.** संतांच्या तोंडून मी केलें असें नजरचुकीनेंहि निघणार नाहीं. गुरुरांयाची मर्जी. गुरुमाऊलीनें तें काम करवून घेतलें, अशी त्यांची नित्याची भाषा असते. अत्यंत अकर्तेपणानें वागून अनुसंधनात निरंतर रमणाऱ्या सत्पुरुषाच्या ठिकाणीं भव्यता, दिव्यता, पवित्रता यांचें आकर्षक दर्शन घडतें. त्यांचें मन सर्वव्याप्त आत्म्याला चिकटलेलें असल्यामुळें सच्चिदानंदस्वरूप आत्म्याचे गुण त्यांच्या ठायीं प्रगट होऊं लागतात. **दिक्कालाच्या मर्यादेत वावरणाऱ्या मर्यादित वस्तूंत अनंत आत्म्याची भव्यता व दिव्यता पहावयास शिकणें हा संतसंगतीचा खरा फायदा आहे.** संतांत परमतत्त्व जागृत असते. सुप्तावस्था धारण केलेली वर वर दिसते. निसर्गांतहि तेंच परमतत्त्व दडलेलें असते. संत तपसाधना घोर अरण्यांत, निर्जन प्रदेशांत करितात कारण निसर्गातील सुप्त परमतत्त्वास शोधून काढावयासाठीं, सलगी वाढविण्यासाठीं. निसर्गांतहि परमेश्वर दडलेला असतो. त्याला शोधून काढण्यास दृष्टि निर्मल, सर्वव्यापि हवीच पण अंतर्दृष्टीनेंच तो निसर्ग जाणतां येतो. अनंत आकाशांतील त्या हंसऱ्या तारका, त्यांचे मधुर व स्मित हास्याप्रमाणें लुकलुकणें, अनंत लाटांनीं तांडवनृत्य करणारा तो सागर, आपल्या मस्तीनें किनाऱ्यावर फेसाचें मोतीं फेकत असतो. अनंत वेलींनीं व फुलांनीं नटलेलीं ती निसर्गसुंदरी नाचतांना पाहून वृक्षावर आनंदातिशयानें आपापलीं मस्तकें डुलवीत असतात. मंदशीतल वारा, व चंदनाचा सुगंध त्यांच्या साथीला असतो. अनंतकाळ स्वर्गाला डोकें टेकून असलेला

पांढरा शुभ्र हिमालय पाहून मानवाचे आकुंचित मन कांहीं काळ तरी भव्य व विशाल भूमिकेवर जाते व जगन्नियंत्याची आठवण येऊन त्याजपुढें नतमस्तक व्हावें लागतें. अशा रीतीनें निसर्गांतहि परमतत्त्वाचा साक्षात्कार घडतो. केव्हां ? जेव्हां वृत्ति अंतर्मुख होते तेव्हां संतांची वृत्ति सदाच अंतर्मुख असते.

सद्गुरु गांडा महाराज यांचा काळ संत सहवासांत आनंदानें जाऊं लागला. संताचे ते कृपापात्र बनले. त्यांचें वर्तन व नैष्ठिक कार्यक्रम इतका सुंदर व रेखीव होता कीं, संताचें मन त्यावर जडलें. संताना सद्गुरु गांडा महाराजाबद्दल आत्मीयता, आपुलकी वाटूं लागली. एकदा संत लहरींत होते. आत्मानंदांत डुलत होते. आपल्या तोंडांतील तपस्येचा घांस या सिद्ध साधकास द्यावा अशा भावनेंत असतांना संत म्हणाले, गांडा ! माझें एक तुजकडे मागणें आहे. तें तूं मला देशील काय ? तुझ्या अकिंचनत्वाची लाज तुला नको. मी पैसे मागत नाहीं, रामेश्वराची पद-यात्रा केलीस तर तुझें सारें आयुष्य बदलून जाईल. हें माझें मागणें आहे. त्यावर सद्गुरु गांडा महाराज म्हणाले, गुरुदेव ! मी रामेश्वराची यात्रा अवश्य करीन. पण पदयात्रा... ? लगेच त्यावर गुरुदेव म्हणाले. हो हो पदयात्राच. कारण पदयात्रा देहाध्यास घालविते. वासनांचें पाणी-पाणी करते. कैक अडचणी आनंदानें सोसावयाचें मनास वळण लागतें. आत्मानंद दिवसें दिवस वाढूं लागतो. निरनिराळीं देवस्थानें, तीर्थें, संतांच्या समाधि, त्यांचें अवतार कार्य, समाज, जातिरिवाज, विद्वानांचा परिचय, लोकांच्या आवडी निवडी, धर्मभावना, संकल्पविकल्प. सिद्ध दर्शन, तीर्थस्थानें त्यांचा इतिहास त्यांचें महत्त्व इत्यादी गोष्टींचें पदयात्रेनें जवळून दर्शन घडतें तसें रेल्वेनें, झोनटिकिटानें घडत नाहीं. जा. तुझें भलें होईल, असा आशीर्वाद देत देत संतांनीं, गुरुदेवांनी श्री. सद्गुरु गांडा महाराज यांच्या मस्तकावर हात ठेवून सर्वांगावरून हात

फिरविला. संतांचा आशीर्वाद संतांची आर्षवाणी कधींहि फुकट जात नसते. श्री. सद्गुरु गांडा महाराजांचा थकवा गेला, तकवा आला. शरिरांत नवचैतन्य जागृत झालें. आपल्या पाठीशी सत्ता, ईश्वरी कृपा आहे ही जाणीव झाली. मोद, प्रमोद हृदयाकाशांत धिंगाणा घालूं लागले. त्या आनंदाच्या भरांत सद्गुरु गांडा महाराजांनीं गुरुदेवाला एक शंका विचारली.

प्रश्न-संसारांत रमलेलें मन परमार्थाकडे कसें वळवावें? चंचल मन स्थिर कसें होईल? गुरु माऊली बोलूं लागली. आपण सारे मायेच्या हातांतील खेळणीं आहोंत. अविद्या माया जीवांना संसारांत खेळविते, हंसविते रडविते, चंचल मन स्वैर बनतें व वासनांना बळीं पडून इंद्रिय लोलुप बनवितें. मी व अहंचें राज्य अविद्या मायेचें असतें. माया जीवांना संसार कर्दमांत लोळविते तीच **अविद्या माया विद्यामाया बनली कीं परमार्थांत रमविते.** अविद्या मायेची विद्यामाया व्हावी कशी? हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. चंचल मन स्थिर कसें होईल? सारा परमार्थ मनावर अवलंबून असतो. चंचल मन स्थिर करण्यासाठीं निरंतर जागृत व दक्ष असावें लागतें. मनाला स्थिर करण्यासाठीं समर्थ रामदासांच्या मनाच्या श्लोकांची वारंवार पारायणें करून त्याप्रमाणें सर्व आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला गेला तर व श्लोकांचे वारंवार मनन केलें तर मनाची चंचलता कमी होण्यास मदतच होते. सुविचारांच्या अकुंशाला मन दचकतें, भितें. व चंचलत्व कमी कमी करूं लागतें. मन स्थिर होण्यास परमार्थांत विशेष महत्त्व आहे. विनोदांत गुरुदेव बोलले. अहो या पेट्रोमॅक्स बत्तीची कळ सोडून तिच्यांतील हवा बाहेर सोडा कीं क्षणांत बत्तीची सारी मिजास नाहींशी होईल. बत्तीचा सारा तोरा, प्रकाश हवेच्या जीवावर तसा मनाचा प्रभाव, मनाचे चाळे, मनाचें चंचलत्व मायेच्या आवरण व विक्षेप या शक्तींच्या जीवावर असते.

तर मूळावर घांव घालून या दोन शक्ति जीर्ग शीर्ग करण्यांत साधकानें प्रथम झटलें पाहिजे. हे कसें शक्य आहे ?

यावर गुरुदेव बोलले. संसार चांगला आहे. संत एकनाथ उत्तम संसारी होते. **आसक्तिविना संसार तो खरा संसार**. संसारांतील आसक्ति हें दूःखमूळ आहे. या संसारासक्तीनेंच संसार अंगावर उलटतो, रडावयास लावतो; काळीज जाळतो; चिंतेंत डुबवितो. आसक्तिविना असलेला संसारच परमार्थ बनतो. ताकांतून काढलेला लोण्याचा गोळा ताकांत कित्येक महिने ठेविला तरी तो परत ताकांत कधींच आसक्त होणार नाहीं. वर वर पहाणाऱ्यास लोण्याचा गोळा कोठें आहे? तर ताकांतच दिसेल. संसार ताकांत पडलेल्या लोण्याच्या गोळ्यासारखा असावा म्हणजे चिंता भय, आनंद दुःख यांचा तितकासा परिणाम होणार नाहीं. थोडक्यांत म्हणजे विकारी मन विचारी करा. म्हणजे चिंतेच्या माशा तुमच्या भोंवतीं घुगघुण करणार नाहींत. पाण्यांत मगर उलटल्याशिवाय तो आपले सावज पकडूं शकत नाहीं तसेंच संसार, नाच, तमाशे, ऐषआराम यांच्यांत रमलेले विकारी मन जेव्हां देवमार्गाकडे उलटतें तेव्हां तें विचारी मन त्यांत इतकें रंगतें कीं, गुळाच्या ढेपीला लागलेला मुंगळा तुटेल पण गुळ सोडणार नाहीं. प्रयत्न करावयाचाच असेल तर विकारी मन विचारी कसें होईल याचा करा. म्हणजे देव दर्शनाची **पहिली पायरी** गांठतां येईल.

## आवरण व विक्षेप

मनाला भडकविणाऱ्या मायेच्या आवरण व विक्षेप या दोन शक्ति सांगितल्या. या शक्ती म्हणजेच मी ( अभिमान ), माझें ( ममतामाया ). मी व माझे यांच्या मुळावर घाव घातल्याविना परमार्थ सुचणार नाहीं. अनासक्त योग आचरणांत आणणें. मी केलें, मी असा इत्यादि अहंचें अगदींज कंबरडें मोडणें, आसक्ति वाढविणारी ममता घालविणें म्हणजेच

स्वत:ला विसरणें. या गोष्टी प्रत्यक्ष आचरणांत आणून दृढाभ्यास झाल्याशिवाय परमात्म दर्शन तर राहोच पण परमार्थ दर्शनहि घडणार नाहीं. ज्याचे मी व माझे गेले त्याचाच संसार सुधारतो व परमार्थहि त्यास साधतो. अनासक्त योगासारखे परमार्थांत अचूक गुणकारी दुसरें औषध नाहीं. अनासक्ति खूप वाढली कीं, त्याग प्रगटतो. त्यागांत सिद्धी असते हें मानवमनास आकलन होत नाहीं. म्हणून तो लोभाच्या नादीं लागतो. व मी व माझे यांना बळी पडत असतो. त्यागाची लाडकी लेक तीच विरक्तता; ती मोठी झाली कीं, वैराग्य बनतें. वैराग्य सुंदरीला भाळून संत, थोर महात्मे तिच्या नादीं लागतात. वैराग्यशांति ही विष्णूची कन्या असल्यामुळें ही वैराग्याशांति कन्या संत महात्म्यांना आपल्या पतिराजांना श्रीविष्णूचे म्हणजे आपल्या पिताजीचें दर्शन घडवितें. तेंच परमतत्त्वाचें दर्शन होय. परमार्थांत परमतत्त्वाचें दर्शन हेंच साध्य असतें. परमार्थांत अन्य भानगडी नाहींत सरळ आग्रारोड रस्ता.

अनासक्तयोग—मनावर पकड—त्याग विरक्ति—एकतानता—दर्शन इतक्या टप्प्यांतून जावें लागतें. कच्चा पारा व चंचल मन एकाच जातीचे. पारा जसा चंचल तसेंच मनहि. कच्चा पारा पोटांत गेला कीं, नाना व्याधि, रोग, जडवितो. कच्चा पारा वापरणें जसें धोक्याचें, तसें, चंचल मन परमार्थाकडे वळविणेंहि धोक्याचें ठरतें. भडकलेला हत्ती अंकुशानें वठणीवर येतो. भडकलेलें मन सुविचार, संतसहवास, कृतनिश्चय या अंकुशांनीं आकळलें जातें; पारा वनस्पतींच्या रसानें प्रथम शुद्ध करावा लागतो. मनाला शुद्ध करावयास सत्ग्रंथ, संतसहवास, सुविचार या वनस्पतींचा उपयोग करणें जरूर असते. पारा वनस्पतींनीं स्थिर होतो. मनहि सुविचारांचें सतत मनन केलें गेलें तर स्थिर होतें. मनांत वारंवार येणाऱ्या ऊर्मींची छाटाछाट लगेच दृढनिश्चयानें केली तर मन स्थिरावतें.

वैद्यकांत पारा स्थिर करण्यांत महत्त्व नसतें. तर तो पारा चंचल होऊं

नये म्हणून वैद्यक क्रियेनें बांधावा लागतो. स्थिर केलेलें मन केव्हां भडकेल याचा नियम नसतो. म्हणून मनाला देवध्यानांत, पुरश्चरणांत, इतकें जखडून टाकावें कीं, मनाला दमछाट करावयासहि वेळ मिळूं नये. योगी मनाला क्षणभरहि रिकामें राहूं देत नसतात. मनाला नेहमीं कामांत गुंतवून ठेवितात. त्यामुळें लाचार झालेल्या मनाला आपलें विक्षिप्त चाळे करावयास अवधीच मिळत नाहीं. संसारी लोकांना हें चंचल मन अगदीं रडकुंडीस आणते. पण योगी त्याच मनाला त्राहि भगवान् करून सोडतात.

चंचल पारा स्थिर करून, बांधून भागत नाहीं तर त्या पाऱ्याला भट्टींत घालून वैद्यक क्रियेनें जाळतात. तेव्हांच तो पारा उत्तम रसायन बनून व्याधिहारक बनतो. तसेंच मनालाहि जाळावयाचें असतें, त्याशिवाय मनोलय साधणार नाहीं, मनोलय पक्का होणें म्हणजेच समाधि—उपाधि-कारक मन उपायकारक बनविण्यांत पुरुषार्थ असतो. दृढ संकल्पाच्या भट्टींत दृढ निश्चय हें सरपण घालून त्यांत विकारी मन दडपून, गुरुसेवेची तीव्रतर आंच लागण्यासाठीं गुरुमंत्र, तीव्र तपस्या या पंख्यांनीं वारंवार हवा घालून त्यागाच्या दंड्यानें मनास भट्टींत दडपून त्याला जाळण्यांत, मारण्यांत सतत दक्ष असलें पाहिजे. म्हणजे या मनाकडून परमतत्त्वाचें रसायन सहज सुलभ मिळते. अशा रीतीनें अट्टाहासानें, बऱ्याच प्रयत्नानें मन स्थिर होतें, मनोलय साधतो. स्थिरावलेलें मन परमार्थांत फार मोठ्या घडामोडी करूं शकतें.

स्थिरावलेलें मन आत्मदर्शन घडवितें. आपण समजतों तितकी आत्मदर्शन ही कठीण गोष्ट नाहीं. **आत्यंतिक शुद्धीविना आत्मदर्शन घडत नसतें.** देहाच्या शुद्धीपेक्षां मनाच्या शुद्धीला फार महत्त्व आहे. साबणानें देह शुद्ध होतो तसें वारंवार अष्टभाव दाटून येण्यानें मन शुद्ध होतें. अष्टभाव दाटून येण्यास पवित्र वातावरण, संतसमागम, वृत्ति धर्मग्रंथांत रमलेली, निष्पाप मन, सदाचार, सद्विचार व दया या सप्तपदींतून मनास

निरंतर वावरावें लागतें. तळ्यांत आपलें प्रतिबिंब पाहाणें व हृदयाकाशांत आत्मदर्शन पहाणे सारखेंच. पाण्यावर लाटा नसतील, पाणी निर्मल असेल तरच आपलें प्रतिबिंब पाण्यांत स्वच्छ दिसेल. तीच गोष्ट चित्तशुद्धीच्या निर्मल हृदयाकाशाची. पाणी गढूळ असेल, त्यावर लाटा येत असतील तर आपलें प्रतिबिंब पाण्यांत कसें दिसणार? मन निर्मळ नसेल, विकारी मनाच्या विकारी लाटा धागडधिंगा घालीत. असतील तर आत्मदर्शन कसें घडणार? विकारी मन हें परमार्थांतील महान विघ्न आहे. त्याचथावर कटाक्षानें पहारा ठेवून, कैक वेळां चुचकारून, नित्यनियमांत गुंतवून, सदा कामांत अडकवृन तें पक्कें स्थिर करावयास, मी, माझे, अभिमान, वासना, आशा इत्यादि घाण पार हाकलली पाहिजे. मन अभिमानरहित होणें म्हणजेच स्थिरावणें होय. निरुपाधिक मन परमार्थांत असावें लागतें. चित्त शुद्ध होऊन हृदयाकाश निर्मळ होतांच दत्तभगवान तेथें वास्तव्यास येत असतात.

सद्गुरु गांडा महाराजांच्या शंकेचें निरसन होऊन मन शांत झालें. गुरुदेव यांना साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना केली व गुरुदेवाच्या आज्ञेप्रमाणें पायीं रामेश्वराची यात्रा करावयास निघाले. गुरुदेवांनीं आशीर्वाद देऊन तुझें भलें होईल अशी अमृतवाणी काढिली. पाय रामेश्वराच्या पद यात्रेसाठीं चालू लागले. गुरुदेवांचा निरोप घेतला.

सद्गुरु गांडा महाराज निरंतर गुरुदेवाच्या सहवासांत असत. पण दुपारची वेळ साजरी करण्यासाठीं नाशिकांत एका वृद्ध भिक्षुकाकडे जात. त्याचा निरोप घेण्यासाठीं त्या भिक्षुकाकडे गेले. फुल नाहीं. फुलाची पाकळी या नात्यानें आपला कोट, चाकू त्या भिक्षुकास दिला. त्यांत चिठ्ठी लिहून ठेविली. यांनीं मजसाठीं जे कष्ट सोसले त्याबद्दल माझा कोट, कपडे देत आहे. आता ते त्यांचे झाले. पदयात्रेस निघून गेले.

## रामेश्वराची पदयात्रा

रामेश्वराच्या पदयात्रेसाठीं नाशिक सोडिलें. नाशिक सोडतांना मी आतां यात्रेस जात आहें, असें वडिलांना तलंगपुरास पत्र लिहिलें व चालूं लागले. वडिलाकडून कांहीं मदत मिळण्याची आशा नव्हतीच. खडतर पदयात्रा मैलांवर मैल तुडवूं लागली.

## तलंगपुरास

नोकरीच्या शोधास गेलेला मुलगा कित्येक महिने झाले तरी त्याचे ना पत्र, ना ठावठिकाणा. साऱ्या आप्तांनीं त्यांच्या शोधासाठीं अगदीं आकाशपाताळ एक केलें होतें. कोठेंच पत्ता लागेना. सारे सारे निराशेच्या खाईंत लोटले गेले होते. गांडा ! तुला कोठें शोधूं ? हा आर्तनाद टाहो फोडून निघत होता. ती तरुण पत्नी, ते वृद्ध मातापिता किती रडणार ? किती दिवस रडणार ? सद्‌गुरु गांडा महाराज यांचें नाशिकाहून सुटलेलें पत्र तलंगपुरास जातांच साऱ्यांना सखेदाश्चर्य वाटलें. मुलगा जिवंत आहे अशी खात्री झाली. तितकेंच हायसें वाटलें. क्षणाचाहि विलंब न लावितां पुतण्या जीवनभाई यांना श्री. गांडा यांच्या शोधार्थ त्वरित नाशिकास पाठविलें. **आशा ही एक अजब चीज आहे**. श्री. जीवनजीभाई नाशिकास आले. तीन दिवस सारखा तपास केला. कांहीं पत्ता लागेना. नाशिक हे काय लहान गांव आहे ? पत्ता कसा लागणार ?

निराशेच्या पोटीं, आशा जन्म घेते ॥

अशांतली गत झाली. पत्ता लागत नाहीं म्हणून श्री. जीवनभाई घरीं परतणार होते तों त्यांनीं एका वृद्ध ब्राह्मणास आपली रडकथा व नाशिकास येण्याचें कारण सांगितलें. योगायोग विचित्र असतात. ज्यांच्या घरीं श्री सद्‌गुरु गांडा महाराज जेवावयास जात होते तोच तो वृद्ध भिक्षुक होता.

मजकडे ते जेवावयास येत असत ऐकतांच श्री. जीवनभाई यांना आनंद झाला. त्या वृद्धानें जीवनभाईंना घरीं नेलें. सारी हकिकत सांगितली. श्री. सद्‌गुरु गांडा महाराजांचा तो कोट दाखविला. चिठ्ठी वाचली. शोध लागला पण गांडा कोठें आहे? हें प्रश्नचिन्ह कायम राहिलें. येथून ते कोठें गेले याची त्या भिक्षुकाला कल्पना नव्हती. कोठें गेले याबद्दल त्या भिक्षुकालाहि सांगतां येईना. श्री. जीवनभाई निराश झाले. आतां नाशिकास राहून काय उपयोग? म्हणून ते तलंगपुरास गेले. नाशिकाची सर्व हकिकत सांगितली. सारेच दुःखी कष्टी झाले. शोध लागला पण गांडा कोठें आहे, हा शोध लागला नाहीं. बिचारे काय करणार? फार फार हळहळले. तिकडे श्री. सद्‌गुरु गांडा महाराज अति कष्टतर हाल सोशीत प्रवास करीत होते. पाण्यावर दिवस काढीत. जवळ कांहींचनव्हतें. अति खंगले. पहिला नूर पालटला. ओळखूं येईना इतक्या दैना झाल्या. शरीर रोडावलें. दाढी केस वाढलेले. चालण्याची ताकद नुरली. अशा स्थितींत वलवनुर या गांवी ३ महिन्यांनीं आले. तेथील पूर्वींच्या मुनिमांनीं त्यांना ओळखलें. घरीं नेलें.

**परमेश्वर आपल्या भक्तांचे इतके हाल कां करतो?** अशी वाचकांना शंका येणें शक्य आहे. त्यावर असें उत्तर आहे कीं, काल्यांची भाजी करण्यापूर्वीं मीठ लावून ते कडवट पाणी वारंवार पिळून काढलें गेलें तरच कार्ल्याची भाजी रुचकर बनते. सुरणाची भाजी घशांत खवखवूं नये म्हणून त्या भाजीला आंबट ताक वगैरे लावून साफ करावयाची असते. भक्ताचा अहंपणा, मीपणा, देहासक्ति दूषित भाग कष्टतर हालांनीं काढवून भक्त हृदय निर्मळ व्हावें अशी ईशमाऊलीची सात्त्विक इच्छा असते म्हणूनच भक्तांना संकटें, हाल, त्रास सोसावा लागतो.

मद्रासच्या दुकानाची वलवनूर येथें शाखा होती; पूर्वीं श्री. सद्‌गुरु गांडा महाराज मद्रास येथें नोकरीला होते. त्या पूर्व परिचयामुळें

कारकुनानें सद्गुरूंना घरीं नेलें, बडदास्त नीट टेविली. रामेश्वरयात्रेचा बेत रहित करविला. पायीं पात्रा करून जीवाचे अधिक हाल करून घेऊं नये. प्रथम आतां येथें नोकरी करा. दोन पैसे जमल्यावर मग रामेश्वर यात्रेला जा. थकवा फार आलेला होता. म्हणून कारकुनाचे हे पोक्त विचार श्री. गांडा महाराज यांना पटले. शेटजीकडे शिफारस करून त्यांना नोकरीला लावून घेतलें. अशा तऱ्हेनें श्रमाच्या काळ्याकुट्ट अंधारानंतर जरा शांतीची प्रभा फांकली. नोकरीवर पेढीवर काम करूं लागले. कारकूनानें तलंगपूर येथें वडिलांना पत्र पाठविलें कीं श्री. गांडा यांना वलवनूर पेढीवर कामावर लावून घेतलें आहे.

वलवनूरच्या पेढीचें पत्र तलंगपूर येथे येतांच साऱ्यांना आनंद झाला. आतां गांडाची भेट होणार अशी आशा डोकावूं लागली. उलट तारेनें तलंगपुराहून तार गेली कीं, आम्ही येत आहोंत. त्याला इतरत्र जाऊं देऊं नका, रोखून ठेवा. तार पाठवून लगेच श्री. डाह्याभाई, कल्याणजी, जीवनजी हे सारे वलवनूर येथें मिळाली त्या गाडीनें येऊन थडकले. म्हातारपणीं होणाऱ्या पुत्राच्या विरह वेदना म्हातारेच जाणूं शकतील! इतरांना त्याची काय कल्पना? जेवणखाण झालें. श्री. गांडा महाराज बाहेरून येतांच पितापुत्रांची भेट झाली. शरीराचीं नुसतीं हाडें राहिलीं होतीं. शरीर फारच काळवंडलेलें होतें. पितापुत्र एकमेकांना पहात होते, कोणाच्याहि तोंडांतून शब्द निघेना. वाचा मंदावली, बोल फुटेना. मनांतील असह्य वेदनांना कढ येत होता. काय बोलावें हें कोणास कांहीं सुचेना. शेवटीं मनप्राण एकवटून श्री. डाह्याभाई बोलले. बाळा? कल्याण? काय रे तूं हें केलेस? या शब्दाबरोबरच डोळ्यांतून वेगानें गंगायमुना वाहूं लागल्या. कल्याण स्फुंदत रडूं लागले. श्री. डाह्याभाईंनीं कल्याणाचें डोकें हुंगलें. मुलास कडकडून भेटले. हृदयांत सांठलेला दुःखातिवेग खळखळ खळखळ बाहेर पडला. मन स्थिरावलें. अकल्पितपणें

परस्परांच्या भेटी झाल्या. वडिलांच्या प्रेमळ हातानें, वात्सल्यपूर्ण भाषेनें, तसेच आश्वासनानें श्री. कल्याणजी यांना अंगावर मूठभर मांस आल्यासारखें वाटलें. मायेचे बोल किती प्रभावी असतात याचें प्रत्यंतर पटलें. पेढीचे शेटजी मुसलमान होते तरी हें सारें दृश्य पाहून मनांत विरघळले. त्यांनीं श्री. डाह्याभाईंना आश्वासन दिलें कीं, बाबा! यापुढें तुम्ही तुमच्या मुलाची किंचितही काळजी करूं नका. तो आतां माझा आहे. मी त्याला आपल्या मुलाप्रमाणें वागवीन, ही खात्री बाळगा. बाबा! आपण लांबून आला आहांत. दोन दिवस थांबा, मद्रासच्या आजूबाजूचीं तीर्थें पहा. आपल्या अल्पसहवासांत श्री. कल्याण यासहि बरें वाटेल. शेटजींचे हे मायापूर्ण बोल ऐकून डाह्याभाईंचें मन विरघळलें. त्यांची सूचना मान्य केली. सात आठ दिवस राहिले. श्री. कल्याण गुण्या-गोविंदानें नोकरी करतो आहे हें पाहून त्याला सोडून पाय निघेना तरी ते परत तलंगपुरास आले. विस्कटलेली घडी परत नीट बसल्याचें समाधान वाटलें. श्री. कल्याणजी मद्रास येथें नोकरी करूं लागले.

# किरण चौथा

दैव हें बळिवंत । हें सर्व विख्यात ।
ब्रह्मादिकां वागवीत । स्वहस्तगत करोनि ।
कोणा न सोडी दैव । हें सुखदु:ख दे सदैव ।
दैवें न सोडिले देव । न सोडी जीवन्मुक्ताहि ॥

[ दत्तमाहात्म्य अ. २० ]

## प्रारब्ध व संशयपिशाच्च यांच्या लीला

प्रारब्धाचे फांसे उलटसुलट पडत असतात. मानव प्रारब्धाधीन असतो. देवही प्रारब्धाधीन असतात. श्रीकृष्ण भगवान अर्जुनाचीं घोडीं धुतो व यज्ञांतील उष्ट्या पत्रावळी काढतो. नारदाची नारदी होते. शंकराला मुसळ होते. धर्मात्मा हरिश्चंद्र डोंबाघरीं पाणी भरतो. धनंजयासारख्या धनुर्धाऱ्याला स्त्रीवेषांत दिवस काढावे लागतात. कर्माची गति टळत नसते. कर्मभोग भोगावेच लागतात. ते अटळ असतात.

दैवानें सद्गुरु गांडा महाराज यांचा कर्मभोग–मासा नोकरीच्या जाळ्यांत कसा तरी अडकविला. कोळ्याच्या जाळ्यांतून निसटण्यास कधीं कधीं कोळ्याचा गाफीलपणा कारणीभूत होऊन अडकलेल्या माशास सहज निसटण्यास भाग्यवशात् संधि लाभत असते. हें सारें नियतीनें पूर्वीच ठरवून ठेवलेलें असतें. पण तें मानवमनास आकलन होत नसतें. सद्गुरु गांडा महाराज यांचा पिंड नोकरीचा नव्हता. अध्यात्माचा होता. पेढीवर नोकरी करण्यांत सद्गुरूचें मन रमलें. साऱ्या गोष्टी ठीक व्यवस्थित होत होत्या. हें दैवाला बघवलें नाहीं. आपल्या वडिलांनीं आपल्यासाठीं

किती तसदी घेतली. आपणासाठीं किती तरी खर्च झाला असेल. ते म्हातारे आहेत. अल्पस्वल्प मदत करून त्यांना कांहींसा हातभार लावणें हें तरुणाचें क्रमप्राप्त कर्तव्य असतें, असे सुविचार मनांत येतांच वडिलांना तीनशें रुपये पाठविण्याची सुंदर कल्पना आली. पेढीवर नोकरी तीन चार महिने केलेली होती तरी पात्र आण्याचाहि उठाव केलेला नव्हता. पेढीचे कारकून व श्री. गांडा महाराज यांचे सहकारी श्री. मोतीलाल शहा यांना वडिलांना मदत म्हणून कांहींतरी रक्कम पाठविली पाहिजे असें सुचविलें. श्री. मोतीलाल शहा यांजकडून तीनशें रुपये उसनवार घेऊन त्या तीनशें रुपयांची मनिऑर्डर वडिलांच्या पत्त्यावर तलंगपुरास पाठविली. गोष्ट अगदीं साधीं पण तिला दैवानें विकृत स्वरूप आणिलें. व पुढें ही नोकरी सोडणेंभाग पडलें, नव्हे नियतीनें भावी योजनेसाठीं नोकरी सोडणें भाग पाडलें. वडिलांची माया पहा कशी असते. त्यांनीं वलवनूर सोडतांना श्री. गांडा महाराज यांना रामेश्वरची यात्रा पुरी करावयास पन्नास रुपये देऊन ठेविले होते.

## मद्रासेंत नोकरी व घातक ३०० रु. ची मनिऑर्डर

वास्तविक तीनशें रुपये उसने घेण्याचा व वडिलांना त्या तीनशें रुपयांची मनिऑर्डर करण्याचा व्यवहार सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ, चोख होता. त्यांत संशय येण्यासारखें कांहींच नव्हतें. पण संशयपिशाच्च ऊन पाण्यानें घरें जाळीत असतें. याची प्रचीति श्री. गांडा महाराज यांना आली. श्री. गांडा महाराज यांची बदली मद्रासेहून दुसऱ्या पेढीवर झालेली होती. तलंगपुरास वडिलांना तीनशें रुपयांची मनिऑर्डर केली होती तिची पावती मद्रासच्या पत्त्यावर आली. ती पावती मुख्य शेटजींनीं पहातांच शेटजींना संशयपिशाच्चानें घेरलें.

## शेटजींचें संशयपिशाच्च व ती पावती

दोन चार महिने नोकरी करणारा मनुष्य घरीं इतक्या अवधींत तीनशें

रुपयांची मनिऑर्डर करूं शकतो. यांत दुकानांतील व्यवहारांत कांहीं तरी घालमेल उलाढाल असलीच पाहिजे अशी दांडगी शंका शेटजींना आली. लगेच फोन करून श्री. गांडा महाराज यांना मुख्य पेढीवर बोलविलें. पावती दाखवून ही काय भानगड आहे असें श्री. गांडा महाराज यांना विचारलें. खोचक प्रश्न शेटजींनीं केला. श्री गांडा महाराज यांनीं आपलीं आंतडीं गोळा करून सारी सारी सत्य हकिकत जीव तोडून सांगितली. मित्र श्री. मोतीलाल शहा याजकडून तीनशें रुपये उसने घेऊन ते पैसे वडिलास पाठविले. मोतीलाल शहा यांना बोलाविलें. गेले त्यांनींहि मीं यांच्या विनंतीवरून वडिलांना पाठविण्यास तीनशें रुपये उसने दिले असें स्पष्ट सांगितलें पण त्याचा उपयोग झाला नाहीं. शेटजीचें संशय-पिशाच्च हटेना. यांत कांहीं तरी काळेंबरें आहे ही शंका त्यांच्या मनांतून जाईना. प्रकरण तेथेंच मिटलें. संशय कायम राहिला. निर्दोषी असतांना अपहाराचा ठपका ? ही गोष्ट श्री. गांडा महाराज यांचे काळीज जाळीत होती. नोकरी करीत होते इतकेंच. नोकरींत मन लागेना. दैवा ! तुझ्या अगाध लीला किती वर्णाव्या ? सारे जग भावनेवर चालते. मी लबाडी केलेली आहे. ही भावना शेटजींची दृढ झालेली, मी पूर्ण निर्दोषी असा माझा दावा; अशा परिस्थितीत येथें नोकरी करून आयुष्य फुकट घालविण्यांत काय अर्थ ? स्वारस्य नुरलें, हा व्यर्थ कालक्षेप कां ? नोकरी सोडली. पेढीला रामराम ठोकला. उभयतां परत तलंगपुरास आले. पुनश्च हरि ॐ.

## निकोरा येथील अन्नोदक

भरलेल्या आपल्या घरांत सद्गुरु गांडा महाराज तलंगपूर येथें राहूं लागले. आनंदाचें साम्राज्य होतें तें. पण बेकार तरुण मुलगा हें गालबोट त्या आनंदास लागलेलें होतें. एका साथीदारासह निकोरा येथें तंबाखू, गूळ यांच्या विक्रीचें दुकान वडिलांनीं थाटून दिलें. दुकान चांगलें चालूं

लागलें. स्वतंत्र धंदा मिळाला. सद्गुरु गांडा महाराज व सौ. केसरबाई स्वतंत्रपणें निकोरा येथें राहूं लागले. संसार थाटांत चाललेला होता. व्यापारांत व्यापारी व्याकरण तयार असणें अत्यावश्यक असतें. भाजलेलें बीं उगवत नसतें. विरक्त मन संसारांत रमत नसतें. वैराग्याला मायेचें वावडें असतें. धन-पैसा हीं मायेचीं खेळणीं असतात. व्यापाऱ्याला पैशांचा हव्यास असतो. त्यासाठींच व्यापार करावयाचा असतो. पण विरागी मनास पैसा नको असतो. असा आसक्ति व वैराग्य यांचा झगडा सद्गुरु गांडा महाराज यांच्या मनांत चालू होता. संग्रह वृत्ति संसारिकांत असणें अत्यावश्यक असतें. तर वीतरागी मन संपत्ति गोठवण्यापेक्षां संपत्ति लुटविण्यांत मग्न असतें. धंदा उत्तम चालला होता. खूप पैसे मिळत. विक्रीहि चांगली होई. उधारी खूप थकत चालली. सद्गुरु गांडा महाराजांचा दीन, दुबळे, अनाथ यांना पैसे देण्यास हात मोकळा असे. आधींच रोकडविक्री कमी यावयाची. त्यांतून दानधर्मांत बरीच रक्कम जावयाची त्यामुळें साहजिकच संसारांत पैशाची चणचण पडायची. पैशांची अडचण पडली कीं बायांची कुरकुर चालायची असें रहाटगाडगें सुरू झालें. बिचारी माय माऊली किती कुरकुर करणार? पतिराजांच्या धर्मादाय सुटणाऱ्या मुठीला ती कसा निर्बंध घालणार? पतिराजांपुढें अबलांचें काय चालणार? ब्रह्मापुढें माया कितपत टिकाव धरणार? सौ. केसरबाईंनीं यथाशक्ति पतिराजांना समजाविण्याचे अनेकदां अयशस्वी प्रयत्न केले. पण सारें मुसळ केरांत जाई. पैसे गरिबांना वाटले जातात, लुटले जातात ही गोष्ट सौ. केसरबाईंना पटेना. तरुण वय, ऐन पंचविशी लोटलेली. तारुण्यांतच पैसे कमवावयाचे असतात हें ब्रह्मज्ञान तिला पक्कें ठाऊक होतें. पण पतिराजापुढें तिची डाळ शिजेना. निराश झाली. आपल्या संसाराचें शब्दचित्र शब्दशः, सासरे श्री. डाह्याभाई यांनीं आपला संसार सुधारावा या सात्विक आशेनें, तलंगपुरास पत्रांत लिहिलें. श्री.

डाह्याभाई निकोऱ्यास आले. सारे निरीक्षण केलें. सूनबाईंनीं लिहिलेली हकिकत शब्दशः रुपयांत सोळा आणे खरी आहे अशी त्यांची खात्री झाली. विचारी सूनबाई काय करणार ? निर्दोष जीव होता बिचारा ? डाह्याभाई यांनीं सद्‌गुरु गांडा महाराज यांना चांगल्याच कानपिचक्या दिल्या. चांगलाच ठपका दिला. अशानें संसार होतो काय ? व्यापारांत सदा दक्ष रहावयाचें असतें. रुपयाचे नेकीनें दहा रुपये करावयाचे असतात. तेंच भांडवल व्यापारांत फिरवून व्यापार वाढवावयाचा असतो इत्यादि कल्याणाच्या गोष्टी सांगून पिताजी श्री. डाह्याभाई तलंगपुरास निघून गेले. मात्र इकडे श्री गांडा महाराज यांच्या मनांत मायेंत गोवणारा तो संसार, माया तोडणारा तो परमार्थ असें वादळ उठलें. वडिलांकडून जहाल बोलणीं ऐकावीं लागलीं याचें कारण ही पत्नी. पत्नीनें सासऱ्यास लिहिलेलें पत्रच कारणीभूत आहे असें ठाम वाटल्यामुळें पत्नीबद्दल पराकोटीचा तिटकारा वाटूं लागला. संसार डोळ्यांतून उतरला. वैराग्य उफाळलें. मन अशांत बनलें. सद्‌गुरु गांडा महाराज यांच्या संसाराची जागा वैराग्यानें घेतली. स्त्री तर डोळ्यापुढें नको असें वाटूं लागलें. तिच्याकडे रागावलेल्या म्हशीप्रमाणें फूं फूं करीत ते पहात. हे जरी सारें सारें असलें तरी पत्नीला पतिराज देवच भासणार. स्त्रियांचा देव पति. पतिसेवा हा स्त्रियांचा धर्म. चंद्राजवळ रोहिणी हवी. आपल्या संसाराच्या भल्यासाठींच मी मामंजींना पत्र लिहिलें होतें ना ? त्यांनीं काय वाईट सांगितलें ? परक्या स्थळीं दोन पैसे जवळ असलेलें बरें हीच माझी मनिषा इत्यादि गोष्टी खूप खूप समजावून सांगितल्या. पण पालथ्या घड्यावर पाणी. या समजावण्याचा परिणाम न होतां विपरित परिणाम झाला. सद्‌गुरु गांडा महाराज यांच्या डोळ्यांत वैराग्य तरारलें. मन घर सोडण्यास उतावीळ बनलें, नकोच तो संसार असा मनानें निर्णय घेतला. ही स्त्री नव्हे, वैरीण, मायाच ही भूमिका मनानें घेतली. घर कसें सुटणार ?

अशीं चाकें मनांत जोराजोरानें सुरू झाली. बिचारा संसार चालू होता. पत्नी केसरबाई गळ्यांतल्या लोढण्याप्रमाणें वाटूं लागली. संसार मनांतून पुरा पुरा उतरला. पति मन उगाळून बोलत नाहीं हें कोणत्या आर्यस्त्रीला पटेल? वैतागानें सोडव रे देवा या जंजाळांतून असें सहजोद्‌गार निघत. त्यापेक्षां मरण बरें असेंहि त्यांना क्षणभर वाटे. विराग, अनुराग यांचा तो झगडा होता. आतां घर सोडलेंच पाहिजे असा ठाम निश्चय मनानें घेतला. हालणारा दांत उपटलेलाच बरा असें मनांत येतांच मी उधारी वसूल करावयास आज जाणार आहे तरी लवकर स्वयंपाक कर. माऊलीनें स्वयंपाक लवकर केला. सद्‌गुरु गांडा महाराज जेवले. घराबाहेर पडले ते कायमचेच. साध्वीच्या हातचें हें शेवटचेंच जेवण ठरलें. बिचाऱ्या मायमाऊलीला काय कल्पना कीं आपले पतिराज आपल्या संसारास कायमचे अंतरणार? पंधरावीस दिवसांत परत न आल्यामुळें सासऱ्यास पत्र लिहिलें. निकोरा कायमचें सुटलें.

## पिंजऱ्यांतून पक्षी उडाला [ नर्मदा परिक्रमा ]

पिंजऱ्यांतून पक्षी उडाला. संसार सुटला. संसाराची बेडी निखळली. पत्नी डोळ्यांतून कायमची उतरली. निकोऱ्याला रामराम ठोकला तेव्हां पंचवीस रुपये वाटचालीसाठीं घेतले होते. निकोरा सोडून अविधा येथें आले. श्री. रामचंद्रभाई यांच्या घरीं थांबले. जवळचे पंचवीस रुपये त्यांच्याकडे अनामत खातीं जमा केले. नकोच ही घाण. ते रुपये अजनही तेथें जमा आहेत. तेथें न जेवतां चालूं लागले. घर सोडलें, स्त्री सोडली, पैसा सोडला. कारण जवळ असलेला एक रुपायाही परमार्थांत बाधकच ठरणार. वाट चालूं लागले. सद्‌गुरूच्या शोधाचा ध्यास लागला. वाटाड्या कोण भेटणार? कोठें भेटणार? कसा भेटणार? असे विचार मनांत घोळत. फिरतां फिरतां नर्मदाकांठीं आले. नर्मदा परिक्रमा करावी असेंहि मनांत

आलें. जय नर्मदे ! जय नर्मदा माता ! हा निराधार बालक तुला सर्वस्वीं शरण आहे. माते नर्मदे ! तूंच आतां माझा वाटाड्या. अंगावरील कपड्यांचा लोभ तरी कां असावा ? असें ठरवून अंगावरील सारे कपडे नर्मदेंत वाहून दिले. अर्पण केले. एकेक वस्त्र नर्मदेंत सोडत व त्याजकडे मजेनें बघत. दोन छाट्या, दोन लंगोट्यांशिवाय जवळ कांहीं ठेविलें नाहीं. आत्मतृप्त झाले. नर्मदा मातेला प्रार्थना केली कीं, आई नर्मदे ! या तुझ्या पोरक्या बाळास आतां तूंच सांभाळ. गुरुशोधार्थ नर्मदा परिक्रमा सुरू केली. मनांत खालील वाक्यांचा घोष असे.

देह ममता टाकुनि, करा आत्मोद्धार ।
स्त्री ममता टाकुनि सोडावा संसार ।
धन काकविष्टेपरी सोडा हो घरदार ।
वैराग्य भिनवा अंतरीं, वेदांचें हें सार ॥

अशा विचारांनीं त्यांचें मन भारलें गेलें. पाय चालत होते पण मन निश्चिंत होतें. आत्मोद्धारांत देह अहंता व देहाध्यास हीं दोन महान् विघ्नें असतात. तपश्चर्या व तितिक्षा या दोन साधनांनींच वरील विघ्नें टळतात हें वाक्य आतां त्यांचें ब्रीदवाक्य ठरलें. आतां त्यांनीं आपलें जीवनसर्वस्व धर्मकार्यीं अर्पिलें होतें. संसारावर पाणी सोडून त्यांच्या विरागी मनास साऱ्यांची विस्मृति झालेली होती.

## नर्मदाकांठची तपश्चर्या

नर्मदाप्रदक्षिणा करतां करतां शूलपाणेश्वराच्या दाट झाडींत सद्गुरु गांडा महाराज आले. झाडी किर्रर बोलत होती. दाट झाडी. कित्येक मैलांपर्यंत विसाव्यास जागा नाहीं. या भयाण जंगलांतील प्रवास अति धोक्याचा असतो. परिक्रमावासी या जंगलांत लुटला जातोच. चोर, डाकू यांचें या जंगलांत कायमचें वास्तव्य असतें. सद्गुरु गांडा महाराज यांनीं

अंगावरील कपडे नर्मदामातेंत पूर्वींच वाहून दिलेले होते, दोन छाट्या व दोन लंगोट्या यांवर त्यांचा सारा प्रवास चालू होता. फक्त लाज व अब्रू झाकण्यापुरतींच वस्त्रें त्यांच्या अंगावर होतीं. तरी चोरांनीं त्यांना लुटलें. चोरांनीं लंगोट्या, छाट्या लुबाडून शब्दशः नागवें बनविलें. त्या वेळीं अगदीं शांत असे चूपचाप उभे होते. चोर जानवें काढूं लागले. ही ब्राह्मण्याची खूण राहूं द्या. वा! हा दोरा आम्हांस कपडे शिवायला उपयोगी पडेल. जानवेंहि नेलें. अशा दिगंबर स्थितींत शूलपाणेश्वराच्या झाडीचा प्रवास पुरा केला. देव ठेवील त्या स्थितींत रहावें हें सूत्र त्यांच्या अंगवळणीं पडलेलें होतें. नंतर नेमाड झाल्यावर ॐकारेश्वराच्या दाट झाडीस सुरवात झाली. तेथें चोरांचा त्रास झाला नाहीं. या भागांतच तपश्चर्येस बसावें असें त्यांना वाटलें. ॐकारेश्वराच्या निबिड झाडींत किटिघाटाजवळ मनघाट भैरवाच्या स्थानाजवळ जागा पसंत करून त्या एकांत स्थळीं एक पर्णकुटी स्वतःच बांधून घेतली.

## तपश्चर्येसाठीं पर्णकुटी

नित्यनियमांप्रमाणें महादेवाचें पूजन, दर्शन करून अनुष्ठानास आरंभ केला. सूर्योदयापूर्वीं नर्मदास्नान करून शंकराची पूजाअर्चा झाल्यावर संध्याकाळपर्यंत त्या छोट्या पर्णकुटींत अनुष्ठान चाले. बेलाचीं पानें खाऊन दुपारची वेळ धकवीत. एखाद्या परिक्रमा करणाऱ्या पुण्यप्राण्यानें कांहीं दाणे साहित्य ठेविलें तर भील्ल तें खुशाल घेऊन जात. पण या गोष्टी-बद्दल त्यांना हर्षशोक वाटत नव्हता. ध्येयासाठीं ज्याला देहाची पर्वा नाहीं त्याला खाण्याची काय पर्वा वाटणार? अन्न नसल्यामुळें अशक्तता वाढली. शरीर अन्नमय कोशावर तरणार. अन्नच नाहीं तर पोटांतील वैश्वानर शरीरच जाळूं लागतो. पण सद्गुरु गांडा महाराज यांच्या अनुष्ठानांत कधीं खंड पडला नाहीं. गुरुप्राप्तीसाठीं ही तपस्या होती. नर्मदामातेस सर्वस्वीं शरण गेलेल्या श्री. गांडा महाराजांची नर्मदा मातेला दया आली.

## नर्मदामाता प्रसन्न झाली

बाळ किती कडक अनुष्ठान करतो आहेस? शरीर किती कृश झालें? केवळ गुरुप्राप्तीसाठीं हें त्याचें अनुष्ठान आहे. नर्मदा मातेचें हृदय द्रवलें. सद्गुरु गांडा महाराजांवर नर्मदा प्रसन्न झाली. भक्ताच्या अडचणी दूर होऊन पोटांत कांहीं तरी जावें म्हणून नर्मदामातेनें अघटित घटना केली. सर्वस्वावर तिलांजली देणाऱ्या भक्तावर भगवती प्रसन्न असतेच. निष्ठुर पाषाणहृदयी कठोर भिल्लांच्या मनाचें नर्मदा मातेनें परिवर्तन करविलें. देव इतरांना प्रेरणा देऊन भक्तांच्या अडचणी दूर करवीत असतो. भिल्ल व त्यांचे पुढारी महाराजांना ज्या दृष्टीनें रोज पहात असत ती तामसी दृष्टि पार बदलून आतां तेच दयार्द्र व भाविक दृष्टीनें सदगुरु गांडा महाराजांकडे पाहूं लागले. त्यांच्या वागण्यांत विलक्षण तफावत पडली. महाराजांकडे ते आतां अत्यंत भाविक व प्रेमळ दृष्टीनें पाहूं लागले. एके दिवशीं भिल्लांचा पुढारी सदगुरु गांडा महाराजांकडे आला व त्यांना म्हणूं लागला, महाराज! आपण काय खातां? काय पितां? खातां पितांना तुम्ही कधीं दिसत नाहीं? त्यावर महाराज म्हणाले, नर्मदामाता देते तें मी खातोंपितों. माता देईल त्यांत माझें समाधान असतें. त्यावर पुढारी म्हणाला, तुम्ही कांहींच खात नाहीं. उगीच आम्हांस बनवितां. महाराज! माझे गरिबाचे ऐका (नर्मदामाता त्याच्या तोंडून वदवूं लागली) रोज दहा शेर दूध देईल अशी गाय आम्ही आपणास देतों. त्या दुधावर आपण आपला चरितार्थ चालवा. त्यावर महाराज म्हणाले ही नाहक उपाधि मला कशाला? मला कांहीं नको असें स्पष्ट सांगितलें. तरी तो भिल्ल ऐकेना. गाईची सर्व व्यवस्था आम्ही करूं तुम्ही फक्त दूध घ्याच असें विनवणीनें सांगूं लागला. देवाची इच्छा असावी असें समजून जें दूध येई त्याचा नर्मदा मातेला अभिषेक करून दूध उरलेंच तर प्रसाद म्हणून स्वीकारीत. असा त्यांचा आतां क्रम सुरू झाला. त्यागी जीवास

देव सहस्र हातांनीं देत असतो हें प्रत्ययास आलें व नर्मदामातेचें कृपा-दर्शन घडलें. नर्मदामातेच्या परोक्ष अनुभवाचा अशा रीतीनें पडताळा सद्‌गुरु गांडा महाराज यांना आला. जे भिल्ल पूर्वी छळीत असत तेच भिल्ल आतां शिष्यवत् बनले. मतपरिवर्तन करण्याची अजबशक्ति देवांत असते. जे भक्षक होते ते रक्षक बनले. आतां सारे लोक सद्‌गुरु गांडा महाराज यांना थोर महात्मा मानूं लागले. एकाला ताप आला. महाराज ! कृपा करा. बेलाच्या पानांचा रस घ्यावयास सांगितला. पूर्ण बरा झाला. तपसी सत्पुरुषांच्या शब्दब्रह्मांत वैशिष्टयपूर्ण अशी शक्ति असते. आतां सद्‌गुरु गांडा महाराज साऱ्यांचे देव बनले. आपली दुखणीं, अडचणी महाराजांच्या सल्ल्यानुसार अगदीं आपुलकीनें दूर करून घेत. संत हे नेहमीं परदुःखभंजन असतात. महाराजांची वैद्यकीय सल्लागार म्हणून भिल्लांवर चांगलीच छाप पडली. महाराज हे कोणीतरी अवतारी पुरुष आहेत. अशी साऱ्यांची खात्री झाली. रोजच्या नियमाप्रमाणें महाराज यांचा सप्तशतीचा पाठ चालू होता. त्या वेळीं ते कोणाशींच बोलत नसत. तितक्यांत एक आजारी भिल्ल आपलें दुःख निरसनार्थ त्यांच्याकडे सल्ला घेण्यास आला. तो जाईना. यांना बोलावयाचें नव्हतें. म्हणून खुणेनें औषध सांगितलें. आश्चर्य ! नित्यनियम कटाक्षानें पाळला गेला नाहीं म्हणून सद्‌गुरु गांडा महाराज यांना ताप आला. तापांत परमेश्वराकडून त्यांना आदेश आला कीं, हें स्थान सोडा. आतां पुढें चालूं लागा. असा आदेश मिळतांच नर्मदा परिक्रमेचा पुढील मार्ग ते चालूं लागले. नर्मदेचे नाभिस्थान मानले जाते तेथून चार मैलांवर बागदी संगम येथें आले.

## पांडुरंगबाबा

[ सिद्धनाथच्या अलिकडे सुमारें चार मैलांवर असणारे ]

पांडुरंग बाबा ही महान व्यक्ति, सिद्ध पुरुष बागदीसंगम येथें रहात असतात असें ऐकण्यांत आलें होतें. गुरु भेटावा म्हणून अनुष्ठानास आरंभ

केला होता. अनुष्ठान संपलें तरी अजून गुरु भेटत नाहीं हीहि तळमळ पांडुरंगबाबा यांना भेटण्यांत होती. पांडुरंगबाबा नर्मदा मातेचे परम व अनन्य भक्त होते. ते परिक्रमावासियांची अनन्यभावें सेवा करीत. हा त्यांचा क्रम कैक वर्षांपासून चालू होता. नर्मदा माता त्यांच्यावर प्रसन्न होती. आजूबाजूच्या खेड्यांतून दाणे आणून ते स्वतः दळींत. दहावीस मण दाणे दळण्यास प्रत्यक्ष नर्मदामाता येऊन बसे; अशा निरलस व निस्सीम, निरपेक्ष सेवेनें कैक वर्षांपासून ते सदावर्त चालवीत. त्यांच्या निष्काम सेवेनें नर्मदा त्यांना सदा सहकार देई. एकदां चोरांनीं धान्य चोरण्याचा प्रयत्न केला होता. माल चोरून नेला. पण तिकडे ते पोटदुःखीनें अति पीडित झाले. निरुपायास्तव श्री पांडुरंगबाबास शरण आले. चोरलेला माल आणून ठेविला. पुन्हां तुमच्या भानगडींत पडणार नाहीं अशी चोरांनीं प्रार्थना करतांच त्यांची पोटदुखी थांबली. नर्मदामातेनें भक्ताचा प्रभाव दाखवून चोरांना चांगलीच प्रचीति दाखविली. असली थोर व्यक्ति महात्मा पांडुरंगबाबा होते. अशांची भेट घेण्याची सद्गुरु गांडा महाराज यांना तळमळ लागली. योगायोगानें श्री पांडुरंग महाराज यांची भेट झाली. सहवास घडला. ते महान् अधिकारी पुरुष होते, सिद्ध होते. त्यांनीं श्री गांडा महाराज यांची मानसिक व्यथा जाणिली. आत्मसिद्ध महात्म्यांना व्यक्तिदर्शन घडतांच व्यक्तीच्या मनांत चाललेले विचार, घडामोडी सहज ओळखतां येतात, इतकेंच नाहीं तर त्या व्यक्तीची कैक जन्मांची रूपरेखा व्यक्ति दिसतांच त्यांच्या अंतर्चक्षूपुढें क्षणांत उभी रहाते त्यामुळें ही व्यक्ति काय योग्यतेची आहे याची कल्पना त्यांना न बोलतां सहज येते. ते अंतर्ज्ञानी असतात. सद्गुरु गांडा महाराज समोर जातांच ते बोलूं लागले. कल्याणा! प्रत्येकाचे गुरु हे पूर्वसुकृताप्रमाणें, ब्रह्मसूत्र योगायोगाप्रमाणें नियतीनें पूर्वींच ठरविलेले असतात. तुझे गुरु होण्याचें कार्य मजकडे नाहीं. तुझ्या

इच्छेप्रमाणें श्रोत्रीय व ब्रह्मनिष्ठ गुरु तुला आतांच नर्मदाकांठाला भेटतील. तुझे गुरु दक्षिणी ब्राह्मण असून तुझी इच्छा पुरी होईल. असा आशीर्वादही दिला. तुझे गुरु दोन तीन दिवसांत गुजराथ प्रांतांत नर्मदामातेच्या किनाराकिनाऱ्यानें येतील. त्यांचेजवळ आंगठ्याएवढी एक चांदीची मूर्ति आहे. दत्तभगवानांची ती मूर्ति त्या परमहंस परिव्राजकाचार्यांना रोज दर्शन देते. प्रत्यक्ष दत्तभगवान प्रगटतात असें ऐकिवांत आहे, अशी खूणही सांगितली व योग्य तें मार्गदर्शनही केल. इच्छित ध्येयप्राप्ति होणार, दोन तीन दिवसांत गुरु भेटणार या पुण्यपुरुषाच्या गोडवाणीनें श्री सद्‌गुरु गांडा महाराज यांचा आनंद गगनांत मावेना. आणखी कांहीं इतर गोष्टी झाल्या. सद्‌गुरु गांडा महाराज यांनीं संत पांडुरंग बाबांना एक शंका विचारून शंका निरसन करून घेतलें.

## शंका

श्रोत्रीय व ब्रह्मनिष्ठ गुरु असावा अशी शास्त्राज्ञा आहे. श्रोत्रीय म्हणजे शास्त्रज्ञ व ब्रह्मनिष्ठ म्हणजे ब्रह्माचा साक्षात्कार झालेला आहे, अनुभविला आहे तो. शंका अशी आहे कीं मोक्षप्राप्तीसाठीं ब्रह्माच्या अनुभवाची जरूरी आहे. पण एखाद्याला ब्रह्माचा अनुभव झाला आहे पण तो श्रोत्रीय म्हणजे शास्त्रज्ञ नसेल तर? तो स्वतः तरेल पण शास्त्रज्ञ नसल्यामुळें तो मुमुक्षुंचा उद्धार करूं शकत नाहीं, समाधान करूं शकत नाहीं, शिष्यांना शास्त्राभावीं निःशंक बनवूं शकत नाहीं. म्हणून तो गुरुपदाला योग्य नाहीं असें सांगण्यांत येतें. श्रोत्रीय व ब्रह्मनिष्ठ ही गुरूचीं मुख्य दोन लक्षणें आहेत. दोन्ही लक्षणांनीं युक्त तो गुरुपदाला योग्य यांत शंकाच नाहीं. ब्रह्मनिष्ठ असून श्रोत्रीय नसेल तर? या शंकेचें गुरुदेवांनीं निरसन करावें अशी प्रार्थना सद्‌गुरु गांडा महाराजांनीं केली. या उत्तम शंकेनें सद्‌गुरु गांडा महाराज यांच्या मनाच्या तयारीची कल्पना आली. श्री पांडुरंगबाबा बोलूं लागले.

कल्याण! नदीपार व्हावयाचें आहे. नदीस अथांग पाणी आहे नदींतील पायवाट ठाऊक नाहीं म्हणून वाटाड्या सोबत पाहिजे. आंधळा पण धडधाकड वाटाड्या म्हणाला, मी तुम्हांला नदीपार सहज नेईन. त्याच्या बोलण्यावर कितपत विश्वास बसेल? इतक्यांत डोळस, शरिरानें धडधाकड पण लंगडा वाटाड्या मी सहज त्या पार नेईन म्हणाला हा लंगडा आपणांस त्या पार नेणार? विश्वास बसेल काय? इतक्यांत डोळस धड-धाकट पायानें मजबूत वाटाड्या बघतांच त्यावर न बोलतां श्रद्धा बसून आपण मजेनें नदीपार होऊं शकाल. शास्त्ररहित आंधळा, ब्रह्माचा अनु-भवरहित लंगडा नदीपार कसें करूं शकणार? पायमजबूत असलेला, ब्रह्मनिष्ठ दृष्टि शाबूत असलेला, श्रोत्रीय यांची नीट सांगड असेल तर नदीच काय पण भवसागर पार व्हावयास विलंब लागणार नाहीं. सद्गुरु पांडुरंग माऊली पुढें बोलूं लागली. कल्याण! खैराच्या लांकडाचा धगधगीत निखारा आहे. त्यांत अज्ञानी, काळा कोळसा टाकिला, तर तो तसाच राहील काय? त्याचें अज्ञान तें काळेपण त्या संपर्कानंतर कितपत राहील? कांहींच रहाणार नाहीं. कोळसा श्रोत्रीय नव्हता, अज्ञानी काळा होता पण ब्रह्म-निष्ठाच्या सहवासानें त्याचें अज्ञान, काळेपण पार नाहींसें होऊन तो श्रोत्रीय होण्याइतक्या लायकीला येतो. संत नामदेवाची दासी जनाबाई हिच्याबरोबर श्रीकृष्णभगवान दळण-कांडण करीत असत. ती ब्रह्मनिष्ठ होतीच. पण शास्त्रें शिकलेली नव्हती. पण तिच्या अभंगांत श्रोत्रियांना लाजवील अशी भाषा असे. चोखा मेळा, गोरा कुंभार, सजन कसाई ब्रह्मनिष्ठ खरे. पण श्रोत्रीय नव्हते असें त्यांच्या भाषेवरून म्हणतांच येणार नाहीं. अडाणी, निरक्षर गोपींना श्रीकृष्णाविना कांहींच सुचेना. त्या शोकविव्हल झाल्या. म्हणून उद्धवाचा श्रोत्रीयपणाचा अभिमान घालविण्यास पढीक विद्वान, शास्त्रसंपन्न श्री. उद्धवास त्यांची समजूत करा-वयास पाठविलें. त्याला ज्ञानाची घमेंड होती पण अडाणी निरक्षर गोपींनीं

त्याला ज्ञानीपणांत लाजविलें. इतकेंच नव्हे तर त्याचा श्रोत्रीयपणा पार रसातळाला गेला. त्या अडाणी गोपी उद्धवाला गुरुवत् वाटूं लागल्या. विद्वत्तेपेक्षां श्रोत्रीयपणा आचरणांत यावयास हवा. गुरूंच्या घनदाट संपर्कांत व गुरूवरील आत्यंतिक निष्ठेंत गुरुकृपेनें श्रोत्रीयपण जडत असतें. एकलव्याला त्याच्या भिल्ल जातीमुळें गुरूचा संपर्क घडला नाहीं पण गुरूवरील-अढळ निष्ठा ओतप्रोत होती तरी तो अर्जुन धनुर्धरापेक्षांहि धनुर्विद्येंत अग्रगण्य ठरला. केवळ अढळ निष्ठेनें तो धनुर्विद्येंत श्रोत्रीय ठरला. आत्मज्ञानाचें परोक्ष ज्ञान झाल्यानंतरच अपरोक्षज्ञान होऊं शकतें. याला अशा उलट सुलट बाजू आहेत. किरकोळ गोष्टींना महत्त्व न देतां ओतप्रोत भावानें गुरूसेवा केली कीं, ब्रह्मनिष्ठ, श्रोत्रीय केवळ गुरुकृपाच बनवूं शकते. ( १ ) ब्रह्मनिष्ठ व श्रोत्रीय गुरु उत्तम दर्जाचा. ( २ ) ब्रह्मनिष्ठ पण श्रोत्रीय नसलेला मध्यम दर्जाचा. ( ३ ) ब्रह्मनिष्ठ नसतां केवळ श्रोत्रीय असलेला गुरु कनिष्ठ दर्जाचा अशी वर्गवारी साहजिकच पडते. **गुरू-वरील अढळनिष्ठा हेंच जीवन सार्थक करावयाचें एकमेव साधन आहे. हेंच सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान आहे.** वरीलप्रमाणें शंकेचें निरसन करून घेतल्यावर पांडुरंग महात्म्यांना साष्टांग नमस्कार घातला. आशीर्वाद घेतले. तपस्या फळली. आतां गुरुदर्शन होणार म्हणून चित्तास समाधान वाटलें. गुरुदर्शन हा एकच विषय डोक्यांत घोळत होता. गुरूच्या शोधार्थ पाय वेगानें चालूं लागले.

## सद्गुरूंच्या तपासांत

तीव्र अनुसंधान, निदिध्यास, एखाद्या गोष्टीचें वेड, प्रेमभक्ति यांना परमार्थांत आगळें महत्त्व आहे. हे शब्द निरनिराळे दिसतात पण साऱ्यांचा भाव किंवा आशय एकच. सद्गुरु गांडा महाराज यांच्या डोक्यांत सद्गुरु भेटीशिवाय अन्य विचारच नव्हते. एखाद्या गोष्टीचें इतकें वेड लागल्या-शिवाय यश मिळत नसतें, देव पावत नसतो. श्रीकृष्णदर्शनासाठीं गोपी

अशाच वेड्या होत असत, प्रेमाभक्ति ती हीच. प्रेमाभक्तींत भावावेश श्रेष्ठ असतो. प्रेमाभक्तींत देहाची शुद्धबुद्ध हरपते. मन इतकें एकाग्र झालेलें असतें कीं, तेथें देहाचें भान नुरतें.

गुरूचा तपास कोठे लागेल यासाठीं प्रवास वेगांत सुरू होता. गुजराथ कां लहान देश आहे? कोठें? याचा पत्ता नाहीं. तपास चालूंच होता. तीन दिवसांत दीडशें मैलांचा प्रवास करून चिखलदा येथें आले. पाय चालत होते, त्यांना खंड नव्हता. मन ठिकाणावर नव्हतें. एकच ध्यास. गुरुभेट केव्हां होईल? पायाचें काय होते हें बघावयास मन ठिकाणावर आहे कोठें? सद्‌गुरूंची येण्याची वाट चिखलदा येथें बघत होते. आपल्या गुरूचें नांव संत वासुदेवानंद सरस्वति आहे. त्यांनीं गुजराथेंत नुक्ताच प्रवेश केला आहे इत्यादि माहिती श्री. गांडा महाराज यांना चिखलदा येथें समजली. ऐकून समाधान वाटलें. आतां गुरुभेट होणार याबद्दल निश्चिति वाटूं लागली. चिखलाद्याहून निघाले. भूक तहान मी म्हणत होती. भूकतहान विसरले. गुरुचरणीं साष्टांग नमस्कार घालावयास मन फारच उतावीळ झालेलें होतें. प्रवास करतां करतां गरुडेश्वराहून तिलकवाडा येथें गेले. पण निराशा झाली. तिलकवाड्याहून संत वासुदेवानंद सरस्वति चांदोद येथें गेल्याचें समजलें. व्यास, शुकदेव, अनसूया इत्यादि स्थळांच्या दर्शनानंतर स्वामीजी सिनोर येथें कांहीं काळ थांबतील अशी निश्चित माहिती समजली. म्हणून प्रवास पुढें करण्यापेक्षां चांदोद येथेंच वाट पहात थांबण्याचें श्री. गांडा महाराज यांनीं मनाशीं ठरवलें. मारुतीच्या देवळांत मुक्काम केला. रस्त्यांत समजलें कीं, गुरुदेव सिनोर येथें आले असून त्यांचा मार्कंडेश्वराच्या शिवालयांत मुक्काम आहे. चालण्याचा वेग वाढवून ईप्सित साधण्यासाठीं श्री. गांडा महाराज सिनोर येथें येऊन पोहोंचलें.

* * *

# ब्र. श्रीमत् प. प. वासुदेवानंद सरस्वती टेंब्येस्वामी महाराज




जितेंद्रिय गणाग्रणीरभिमतः परे ब्रह्मणि।

कलौ श्रुतिपथावनेऽत्रिननयोऽवतीर्णं स्वयं ॥

कराप्त सुकमंडलुः कुमतखण्डने दंडभृत्

पद प्रणतवत्सलो जयति वासुदेवो यतिः ॥

जन्म शके : १७७६ श्रावण वद्य ५ आनंद नामसंवत्सरे (माणगाव, सावंतवाडी)

समाधी शके : १८३६ आषाढ शु॥ १ आनंद नामसंवत्सरे (श्री क्षेत्र गरुडेश्वर)



ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्म्
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम्
भावातीतं त्रिगुरहितं सद्‌गुरूं तं नमामि.

# किरण पांचवा

## श्रीमत् सद्गुरु परमहंस योगीवर परिव्राजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वति महाराज

रत्नागिरी जिल्ह्यांत सांवतवाडी तालुक्यांत माणगांव येथें जन्म. अत्यंत कर्मठ. तपोनिष्ठ व कैक जन्मांचें तपबल पाठीशीं त्यामुळें श्रीदत्तभगवान त्यांच्या माध्यमांतून आपल्या साऱ्या लीला करीत. सदा अनवाणी असत. शुद्ध व संस्कारी अन्नावर त्यांचा मोठा कटाक्ष. ते गुजराथी ब्राह्मणाकडून अगर स्नानसंध्या न करणाऱ्या ब्राह्मणाकडील भिक्षा घेत नसत. दांडगी प्रज्ञा, खोल शास्त्राध्ययन, वेद व मंत्रसिद्ध असलेले अत्यंत श्रेष्ठ असे हे योगीवर होते. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति सिनोर येथें मार्कंडेश्वर महादेवाच्या शिवालयांत मनाची एकाग्रता व गीता यावरील प्रवचन श्रोतृवृंदांना ऐकवीत होते. विषय चांगलाच रंगलेला होता. योग्यांची आर्षवाणीच ती. परावाणींतून निघालेले बोल असतात ते. मग प्रवचन कां रंगणार नाहीं? प्रवचन चालूं असतांना स्वामी, मध्येंच बोलूं लागले. आतां या पांच दहा मिनिटांत एक गुजराथी ब्राह्मण तरुण, गांडा नांवाचा शिष्य येथें येईल. तो गुरूच्या शोधांत आहे, आजपर्यंत कोणीहि शिष्य मजकडे टिकला नाहीं. पण हा आतां येणारा शिष्य टिकेल असें वाटतें. असें विषयांतर केलें. योग्यांच्या दिव्यदृष्टीला भूत-भविष्य सारें दिसत असतें. म्हणूनच आगामी घटना त्यांनीं आगाऊच विदित केली. योग्यांचे ज्ञान-चक्षूंना काय दिसूं शकणार नाहीं?

## गुरुदर्शन

स्वामींचें प्रवचन चालूं होतें. वरील बोलणें संपतें न संपतें तोंच श्री. गांडा महाराज शिवालयांत आले. ओजस्वी तेजस्वी मूर्ति लंबून पाहिली. वेगानें पुढें आले. साष्टांग नमस्कार घालून भावावेशांत निश्चेष्ट पडले. अत्यानंद दाटला म्हणून बेभान स्थिति आली. साऱ्या अंगाला दरदरून घाम आला. वाचा निघेना. गुरूवर अढळ दृष्टि बरीच स्थिरावली. अष्टभाव दाटले. आनंदाचा अतिरेक झाला. नेत्रांतून आनंदाश्रू घळघळ वाहूं लागले. हर्षोन्माद झाला. कंठ दाटून आला. गुरुदर्शनांत मन सर्वस्वीं स्थिरावलें. भावावेश ओसरल्यावर स्वामींनीं श्री. गांडा महाराज यांना जवळ बोलाविलें. श्री. गांडा महाराज यांची वृत्तीची स्थिरता व अंतर्मनाची दांडगी तयारी पाहून स्वामींना फारच संतोष वाटला. सेवातत्परता दांडगी यावर ते खूष झाले. गुरुदेवांना आनंद व संतोष वाटला. शिष्याबद्दल अनुकंपा व दया उत्पन्न झाली. हा अधिकारी शिष्य आहे अशी प्रथमदर्शनींच खात्री झाली. सहजसमाधींत रमण्याचा त्याचा अधिकार आहे हें बघून संतोष वाटला. श्री. गांडा महाराज गुरुदेवाची प्रार्थना करूं लागले.

गुरुर्देवो गुरुर्धर्मो गुरुनिष्ठा परं तपः ।
गुरोः परतरं नास्ति नास्ति तत्त्वं गुरोः परम् ॥
न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः ।
तत्त्वज्ञानात्परं नाऽस्ति तस्मै श्रीगुरवे नमः ॥ (गुरुगीता)
श्रीगुरोः परमं रूपं विवेकचक्षुषोऽमृतं ।
मंदभाग्या नपश्यंति अंधाः सूर्योदयं यथा ॥

सद्गुरु गांडा महाराज गुरुदेवाची प्रार्थना करूं लागले. गुरुदेव! या जीवाचा तूंच फक्त आधार आहेस. असार संसारावर पाणी सोडलें.

गृहलक्ष्मी व लक्ष्मी सोडून याच चरणासाठीं हा दास कैक दिवसांपासून शोधांत आहे. आतां मला गुरुचरण लाभले. ते मी आतां सोडणार नाहीं. गुरुदेव ! या अनाथ लेंकराला लाथाडूं नका. दूर करूं नका. पाण्यांवाचून मासा, आईविना लेकरूं तशी माझी गत आहे. आपणच सर्वस्वीं माझे जीवनाधार आहांत. देवा ! गुरुदेवा ! आपण जर माझा त्याग केला तर मला कोणी कोणीहि विचारणार नाहीं. आपणच माझें सर्वस्व आहांत. गुरुदेव ! या आर्त जीवाला आसरा मिळावा म्हणूनच मी हा पुकार करीत आहे. माझा हंबरडा ऐकाच. दत्तअवतारा गुरुदेवा! **गुरुदेवाची आर्षवाणी, सज्जनांच्या आश्वासनाचा संतांचा कृपाप्रसाद महात्म्यांचा वरदहस्त, सिद्धांकडून मिळालेला मार व परमहंसाची प्रेमळ दृष्टि, मजसारख्या पामराला, पतिताला पावन करण्यास पूर्ण समर्थ आहे** असा माझा विश्वास आहे. निर्मळ मनाच्या सेवातुर श्री. गांडा महाराजांची अनन्यगतिक भाषा ऐकून गुरुदेवांच्या मनांत आनंदाच्या उर्मींवर उर्मी उसळत होत्या. शिष्याच्या सात्त्विक हृदयाचा त्यांना साक्षात्कार झाला. म्हणून गुरुदेव म्हणाले, गांडा! तुझा मी स्वीकार केला आहे. तूं आतां मजजवळ निरंतर सेवेला रहात जा. सेवा कर. माधुकरी आण. त्यांतून आपण दुपारची वेळ साजरी करूं. नरजन्माचें सार्थक होण्याची तुझी अभिलाषा अशानें पुरी होईल.

## गुरुसेवा

सेवाधर्मः परम गहनो योगिनामप्यगम्यः

गुरुसेवा हें एक असिधाराव्रत आहे. गाय पासवली तरच दूध मिळण्याची आशा, नाहीं तर लाथा. तसेंच गुरुकृपा लाधणें हें मगरमिठींतून आंबा काढून आणण्याइतकें कठीण आहे. गतजन्म पुण्यसाठा व तोहि कैक जन्मांचा असेल तरच गुरुकृपा लाधण्याची शक्यता असते. गुरु प्रसन्न

करण्याचें कार्य चतुर शिष्याच्या चतुराईवर अवलंबून असतें. स्वतःला विसरलेला शिष्यच वाजवी गुरुसेवा करूं शकेल. देहाला तर विसरतोच विसरतो पण देह अभिमानाचें पाणी पाणी करणारा शिष्यच गुरुकृपा संपादण्याच्या उंबरठ्यावर असतो. कठीणांत कठीण अशा हिऱ्याचें पाणी होऊं शकेल पण शिष्याच्या मनांतील संत-सेवेचें पाणी जोखल्याशिवाय संत हृदय द्रवणार नाहीं, संतकृपा होणार नाहीं. संत अत्यंत मायाळू असतात. मनाची पूर्ण तयारी झाल्याशिवाय संतकृपेचा, आपल्या तोंडांतील मायेचा घांस, कोणता संत एखाद्या अडबंगनाथाला आपली कृपा देऊं शकेल ? शेतीचा मगदूर पाहूनच शेतकरी धान्य पेरीत असतो. गुरुसेवा ही सेवाधर्माची परमावधि आहे. संसाराची निरवानिरव झाल्याशिवाय सारवस्तूंची प्राप्ति होत नसते. अहम्‌चें व प्रभूचें अति वांकडें असतें. **अहम् जाळावयास सेवाधर्म हाच उत्कृष्ट उपाय आहे.** स्वतः विसरलेल्या शिष्याला इतकी संवय होते कीं, इंद्रियें ठराविक वेळेला ठराविक कामें सहजगत्या करूं लागतात. इंद्रियांना तें वळणच पडलेलें असतें. अशा अडग निश्चयानें सद्गुरु गांडा महाराज गुरुदेवांच्या सेवेला अहर्निश सेवारत झाले.

## दिनचर्या

सद्गुरु गांडा महाराज यांची दिनचर्या रेखीव होती. सर्वस्व अर्पून सेवा करणें हा त्यांचा अढळ निश्चय होता. पहाटेस गुरुदेव उठण्यापूर्वीच उठावें. जागेची स्वच्छता ठेवावी. रात्रीं गुरुदेव निजल्यानंतर त्यांची चरणसेवा पाय दाबून करावी. त्यांना गाढ झोंप लागल्यावर गुरुचरणा-जवळ पायाशीं पडून झोंप घ्यावी. अशा रीतीनें रात्रंदिवस गुरुसेवेंत रत असत. गुरुदेव सदा आनंदी कसे रहातील तसें वागण्यांचा ते सतत प्रयत्न करीत.

## गुरुदेव प्रसन्न रहाण्यासाठीं कसें वागावें ?
## सद्गुरु गांडा महाराज यांचा स्वानुभव

उत्तम शिष्य तोच जो रात्रंदिवस गुरुसेवारत व जागृत आहे. तत्त्वज्ञान व योग हे परस्परांस साहाय्यक असून पोषक आहेत. शिष्य सदा जागरूक व दत्ताप्रमाणें मिळेल तेथून उत्तम गुणांचा गुणग्राहक असावा.

For him there were books in running brooks, sermons in stones and good in every thing.

१. गुरुसेवा करतांना गुरूला काय लागणार? कोणत्या वेळेला कशाची जरुरी आहे? गुरूला काय आवडतें? इत्यादि गोष्टींची इतकी दक्षता घ्यावी कीं, गुरूची आज्ञा होऊंच नये. मनकवडेपणाप्रमाणें गुरूच्या मनांतील विचार, भावना, धोरणानें व धूर्तपणानें जाणून ते बोलण्यापूर्वीच ती सेवा केली जावी.

२. आज्ञेविना सर्व व्यवस्था बिनचुक ठेविली जाते असा आत्मविश्वास आपल्या सेवेबद्दल गुरूच्या मनांत उत्पन्न झाला पाहिजे. तो खरा शिष्य. हेंच उत्तम शिष्याचें लक्षण.

३. पड्या बैलाप्रमाणें अगर सांगकाम्या ऐदी इसमाप्रमाणें शिष्याची वृत्ति नसावी.

४. एकता किती असावी. आपल्या भूक तहानेपेक्षां गुरूच्या भूक तहानेची किंमत अधिक वाटावी

५. झोंप श्वानवत्, वृत्ति शृगालवत् असावी.

६. माधुकरी मागून शरीर टिकविण्याइतकेंच अन्न ग्रहण करावें. भोजन पोटभर झालें तर प्रमाद, निद्रा, आळस हे त्रयदोष माथीं बसतात. अजीर्णानें प्रकृति बिघडते तें निराळेंच म्हणून अल्पाहारच योग्य.

७. गुरूच्या सेवेंत, एकतेंत वृत्तीचें परावर्तन एकदम होत नसतें. सर्वस्व काय ते गुरु ही भावना दृढ झाल्यावर वृत्तींना धांगडधिंगा घालावयास अवसरच मिळत नाहीं. मन-वृत्ति स्थिर ठेवण्यांत खराखरा पुरुषार्थ आहे. मूले कुठारः या न्यायानें वृत्ति उठतांच ती ठायींच छेदावी.

८. मन प्रसन्न असलें तरच चित्ताची अखंड प्रसन्नता असते हाच प्रसाद समजावा.

९. पारमार्थिक प्रवृत्तीच्या अभावीं प्रभूचा प्रसाद मिळूं शकत नाहीं. चित्ताची अखंड प्रसन्नता लाभत नाहीं. प्रसन्नतेविना चित्‌शांति मिळत नाहीं. चित्ताला शांति नाहीं तेथपावेतों खऱ्या सुखाची आशा कसली ?

**अशांतस्य कुतो सुखम् ?**

सद्‌गुरु गांडा महाराजांना गुरुसेवेमुळें चित्‌शांति लाभून वृत्ति सदा प्रसन्न राहूं लागली. गुरुमुखांतून कल्याणप्रद प्रासादिक उपदेशाचें अखंड पान घडूं लागलें. त्यामुळें वृत्ति सदा अंतर्मुख राही. आत्मबोध जागृत झाला. अंतर्बोधाच्या साक्षात्कारासाठीं ऋतंभरा प्रज्ञा जागृत असणें अत्यावश्यक असते. म्हणून श्री. गांडा महाराज यांना गुरुदेवांनीं योगाभ्यासाचेंहि वळण लाविलें.

अशा रीतीनें गुरुमाऊलीच्या सहवासांत अमृततुल्य स्वर्गसुख वाटूं लागले.

## तलंगापुरांत

आईच्या मांडीवर पहुडलेल्या लहान तान्ह्याप्रमाणे सद्गुरु गांडा महाराज सद्गुरु माऊलीच्या सहवासांत आनंद लुटीत होते. इकडे शांति व समाधान होते. पण तिकडे तलंगपुरांत सारें घर विव्हलतेनें पेटलें होतें. घरांतील शांति पार पळाली. उद्वेग, दुःख, यातना यांचें साम्राज्य त्या भरल्या घरांत धागडधिंगा घालीत होतें. उधारी वसूल करावयास

जातो असा बहाणा करून श्री. गांडा महाराज घराबाहेर पडले. महिने गेले, वर्षें लोटलीं. त्यांच्या शोधार्थ पाण्यासारखा पैसा खर्च केला पण व्यर्थ. ती तरुणपत्नी पतीचा पत्ता लागत नाहीं म्हणून बिचारी रात्रंदिवस धाय धाय रडत आहे. तिला कसलें अन्न गोड लागणार? ती अन्नाला खात होती. अन्न तिला खात होते. त्या वृद्ध आईबापांच्या दैना तर विचारूंच नका. तोंडाशीं आलेला घांस जावा अशी त्यांची अवस्था झाली. तरुण छोकरा कोठें भटकत असेल? काय खात पीत असेल? अशा आठवणींनेंच ते पुरे कोरडे बनले. कसलें जेवणखाण! सारें लक्ष हरविलेल्या गेलेल्या मुलाकडे. सारी पृथ्वी पालथी घातली पण पत्ता लागेना. हताश झाले! काय करितील बिचारे! प्रारब्धभोग दुसरें काय? प्रारब्ध देवास चुकलें नाहीं, मानवास कसें चुकणार! रात्रंदिवस विव्हळणें फक्त त्यांच्या हातीं होतें.

## आनंद हेंच आत्म्याचें शुद्ध स्वरुप

स्वामीजींच्या प्रवचनास अफाट मानव मेदिनी जमत असे. गुरुदेव वासुदेवानदं सरस्वति प्रवचन करीत होते.

गुरुदेवांच्या मुखांतून अमृतवाणी निघूं लागली. आनंदरूपांतूनच ही सर्व पृथ्वी उत्पन्न झाली. विश्व आत्म्याच्या आनंदाचा विलास आहे. त्यामध्यें आनंद भरून ओसंडत आहे. सत्य तेथें आनंद असतो. सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म। असें समजतात. आनंद व सद्वस्तू एकच आहे. तैत्तिरीय उपानिषदामध्यें आनंदाची मीमांसा करतांना इंद्रीयाद्वारें मिळणारा मानुषी आनंद, मनुष्य गंधर्वाचा आनंद, देव गंधर्वाचा आनंद, चिरलोक पितरांचा आनंद, देवाचा आनंद, कर्मदेवाचा आनंद, इंद्राचा आनंद, बृहस्पती व प्रजापतीचा आनंद या सर्वांपेक्षां श्रेष्ठ असा ब्रह्माचा आनंद असतो. ब्रह्माचा आनंद ज्याला मिळाला त्याला कसलेंहि भय रहात नाहीं. त्याच उपनिषदाच्या भृगुवल्लीमध्यें पंच-कोशांचें मूल्याच्या दृष्टीनें वर्णन केलें

आहे. जड शरीर ( अन्नं ब्रह्मेति व्यजानात् ), प्राण ( प्राणो ब्रह्मेति व्यजानात् ), मन ( मनो ब्रह्मेति व्यजानात् ), बुद्धि ( विज्ञानं ब्रह्मेति व्यजानात् ) हीं चारही आत्म्याचींच रुप होत. आनंद हेंच आत्म्याचें शुद्ध स्वरूप आहे. आनंदांतच सर्व प्राणी जन्मतात, जगतात, व शेवटीं आनंदांत लय पावतात. असे अनुभविक बोल तैत्तिरीय उपनिषदांत सांगितलेले आहेत. ब्रह्मानंदाचा अनुभव म्हणजेच मोक्ष प्राप्त करून देण्याचा मार्ग दाखविणें; हेंच अध्यात्मविद्येचें मुख्य काम आहे. ज्याला या विद्येचा अनुभव आला तो अध्यात्माविषयीं जें बोलेल तें शास्त्र बनतें असा उपनिषदांत उल्लेख आहे. सहज बोलणें हाचि उपदेश ! अध्यात्माचें नुसते ग्रंथ वाचून जो अध्यात्म सांगतो, त्याला खरें अध्यात्म समजलेलें नसतें. आध्यात्माचें शास्त्र अध्यात्मविद्येवरच आधारलेलें असलें पाहिजे. सुख व आनंद यांत फार फरक असतो. हें सामान्यांना समजत नाहीं. यास्तेषां स्वैरकथा सा एव भवन्ति शास्त्राणि ।

## सुख व आनंद यांतील तफावत

सुख इंद्रीयांनी भोगावयाचें असते तर आनंद अतींद्रिय असतो. सुख भोगावयाला मिळण्यास बाहेरच्या वस्तूवर अवलंबून रहावें लागतें. तर आनंद भोगण्यास स्वतःच्या अंतर्यामीं आत्म्यापर्यंत खोल जावें लागतें. सुख भोगतांना भोगणारा भोक्तेपणानें अर्थात् मीपणानें वेगळा असतो. तर आनंद भोगणारा मी त्यामध्यें विलीन होऊन जातो. सुख भोगल्यावर देहावर त्याची प्रतिक्रिया होऊन देह थकतो तर आनंद भोगून संपतच नाहीं व आनंदांतून खालीं उतरल्यावर देहाला व मनाला नवजीवन प्राप्त होतें. सुख भोगण्यांत देहबुध्दींतून प्रगट होणारा आकुंचितपणा असतो तर आनंद भोगतांना आत्मबुद्धींतून प्रगट होणारा विशालपणा असतो.

**छांदोग्य उपनिषदाच्या सातव्या अध्यायामध्यें** सुखं भगवो विजिज्ञात. सुख काय आहे हें जाणण्याची नारदानें इच्छा केली. तेव्हां

सनत्कुमार म्हणाले, आनंद आत्म्याच्या दर्शनानें जें सुख होतें तेंच खरें सुख होय; बाकीचीं सुखें केवळ नांवाचीं आहेत. अनंताच्या सुखाशीं तुलना केली असतां तीं अगदींच क्षुद्र वाटतात.

यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति भूमैव सुखम्।

सुख व आनंद यांत कितीतरी फरक आहे.

## सुख व आनंद

सुख क्षुद्र असतें तर आनंद भव्य असतो. सुख दैन्यवाणें असतें तर आनंद दिव्य असतो. सुख परतंत्र असतें तर आनंद स्वतंत्र असतो. सुख तात्पुरतिक असतें तर आनंद आत्यंतिक असतो. सुख इंद्रियांनीं घ्यावयाचें असतें तर आनंद स्वच्छ बुद्धीनेंच भोगावयाच असतो. सुख कितीहि भोगलें तरी हवेपण पुन्हां डोकें वर काढीत असते तर आनंद एकदां भोगिला कीं, जीव सर्व बाजूनें तृप्त होत असतो.

**छांदोग्य उपनिषदांतच** पुढें असें म्हटलें आहे कीं, जेव्हां मनुष्य आत्म्याशिवाय दुसरें कांहीं पहात नाहीं, ऐकत नाहीं, जाणत नाहीं, त्या वेळीं त्यालाच महासुख म्हणजे आनंद म्हणतात.

यत्र नान्यत्पश्यति नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति स भूमा ॥

आपल्या सर्व वासना साधक, ईश्वराच्या सेवेला जुंपतो. आनंदमय आत्म्याचा साक्षात् अनुभव घेणें हा परमार्थाचा प्राण आहे. परमार्थ अत्यंत कृतिप्रधान आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधया न बहुना श्रुतेन ।

(कठोपनिषद्)

परमार्थांत देहाच्या हालचालींपेक्षां मनाच्या हालचालींना फार महत्त्व असतें. आत्म्याविषयीं पूर्ण श्रद्धायुक्त बुद्धि तयार करणें हेंच परमार्थांतील

सर्व साधनांचें रहस्य आहे. बुद्धि आत्म्याच्या शोधार्थ रमली कीं सूक्ष्म सूक्ष्म होत जाते.

दृश्यते त्वग्र्यया बुध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ।

(कठोपनिषद् ३-१२)

आत्म्याच्या ठिकाणीं पूर्ण निष्ठा असणें हें परमार्थाचें सौभाग्य-चिन्ह आहे असें संत सांगतात.

## हें असें कां होतें ?

संतांकडे लोक इतके कां आकर्षिले जातात ? कित्येकांना हा एक मोठा प्रश्न वाटतो कीं रात्रीं तेजस्वी दिव्याकडे कीटक कां इतके आकर्षिले जातात ? दिव्याच्या प्रकाशांत कीटक मजेनें बलिदान कां करितात ? लोह-चुंबकाकडे लोखंड कां आकर्षिलें जातें ? एखादा ब्रह्मनिष्ठ संत एखाद्या गांवीं येतांच त्यांच्या दर्शनार्थ भाविकांची सदा रीघ लागलेली असते, असें कां होतें ? संत येण्याची किंवा आल्याची जाहिरात करीत नाहीं तरी लोकांना समजतें कसें ? हिरव्या चाफ्याचें फूल जंगलांत फुलतें पण त्याचा वास दोन चार मैलांत सारखा दरवळत असतो. रातराणीचीं फुलें सुवास दूरवर सारखा पसरवीत असतात. कळीचें रुपांतर फुलांत झालें तरच सुवास दरवळतो. संतांचा कीर्तिसुगंध असाच ते जातील तेथें पसरत असतो. लोक इतके कां आकर्षिलें जातात ? वारंवार दर्शनास कां येतात ? संतांना बघतांच मन स्थिरावतें तें कां ? काळज्या मिटतात, एक प्रकारचा मूक आनंद हृदयास वाटत असतो, हें असें कां होतें ? यांचें शास्त्रीय उत्तर कैक संतांच्या चरित्रांत आढळतें. कोणाचीहि चित्तशुद्धि झाली कीं हृदयाकाशांत परमतत्त्व प्रगटत असतें. तीव्र तपस्या, स्वरूपानुसंधान, संतपरिग्रह याचा परिणाम असा होतो कीं, कालांतरानें संतांच्या रोमरोमांतून तपस्येचे एक प्रकारचे तेज-किरण सारखे बाहेर येत

असतात. त्या परमतत्त्व तेजांत जीवाचा संपर्क येतांच जीव त्या तेजाकडे – त्या परमतत्त्वाकडे – आपोआपच [ तेजस्वी दिव्याकडे कीटक ओढले जातात तसे ] आकर्षिले जातात. त्या आकर्षणांत मनांची स्थिरता लाभते. क्षणभर जीव जगाला विसरतो. हा संतांच्या दिव्य तपतेजाचा परिणाम आहे. मन इतकें आकर्षिलें जातें कीं, संत सहवास सोडतांना पाय उठावयास तयार नसतात. आईच्या पदराआड स्तन्य पिणाऱ्या बालकाइतकी नितांत शांतता मनाला क्षणभर मिळाल्यासारखें वाटतें. चंद्रकांत मणि चंद्रकिरणें पडतांच आपोआप स्रवूं लागतो. सागरास भरती ओहोटी येतें. यांतही हीच शास्त्रीय उत्तरें आहेत. सिनोर येथील शिवालयाच्या पटांगणांत आज गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति अध्यात्मसाधनेचा प्रारंभ या विषयावर बोलणार असल्यामुळें अलोट गर्दी लोटली होती. पण साऱ्यांचेच कान शब्द अन् शब्द ऐकण्यास आतुर असल्यामुळें टांचणी जमिनीवर पडली तर आवाज ऐकूं येईल इतकी नितांत शांतता पसरलेली होती. दूरदूरचे लोक आलेले होते. गुरुदेवांच्या प्रखर तपस्येचें तेज चर्येवर चमकत होतें. तेजःपुंज शरीर, मधुर रसवंति व लोकोपकारार्थ तनु झिजवण्याचा संकल्प यामुळें त्यांच्या मोहिनीला आगळें वैशिष्ट्य आलेलें होतें. लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या दर्शनासाठीं येत होत्या.

## अध्यात्मसाधनेचा प्रारंभ

एका साधकानें प्रश्न विचारला होता. साधकानें साधनेसाठीं साधावयाच्या साधनशुचितेचा साधा राजमार्ग सांगा ?

गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांची अमोघ वाणी निघूं लागली. महान् तितिक्षेनें अध्यात्म साधावयाचा असतो. वाचाळ पंडिताचें हें काम नसून दृढनिश्चयी, अनुतापदग्धाचें हें काम आहे. **आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल पूर्ण निःसंदेह बनणें हें परमार्थाचें प्रधान लक्षण आहे.** सामान्य मनुष्यांत त्याच्या आत्म्यावर झांकण पडलेलें असतें. वासना

क्षीण झाल्याशिवाय आत्म्यावर आलेला पडदा दूर होत नाहीं व त्याचा प्रकाश अनुभवास येऊं शकत नाहीं. मनाची किंवा चित्ताची शुद्धि झाल्याविना वासना क्षीण होत नाहींत. दृश्याची आसक्ति कमी झाल्याविना चित्तशुद्धि होत नाहीं. इंद्रियांच्या मदतीनें सुखी होण्याची कल्पना गेल्याशिवाय दृश्याची आसक्ति कमी होत नाहीं. आत्म्याच्या प्राप्तीची तळमळ निर्माण झाल्याशिवाय इंद्रियांतून सुख घेण्याची प्रवृत्ति कमी होत नाहीं.

या वरील विधानांवरून सहज लक्षांत येईल कीं, **परमार्थ साधनेचा प्रारंभ आत्मदर्शनाच्या तळमळींत होतो व शेवट वासना नाहींशीं होऊन आत्मदर्शनांत–आत्मसाक्षात्कारांत–होत असतो.** गीतेंत स्थितप्रज्ञाचीं लक्षणें सांगतांना हेंच सांगितलें आहे. जेव्हां मनामध्यें असलेल्या सर्व इच्छा मनुष्य सर्वथा टाकून देतो व स्वतः स्वस्वरूपाचे ठिकाणीं संतुष्ट होतो, तेव्हां त्या पुरुषाला स्थितप्रज्ञ म्हणतात. थोडक्यांत म्हणजे जडाच्या खरेपणाबद्दल असणारी श्रद्धा हळूं हळूं कमी होत जाऊन सूक्ष्म आत्म्याच्या खरेपणाबद्दल श्रद्धा वाढत जाणें हेंच सर्व परमार्थसाधनाचें मर्म आहे. परमार्थाच्या दृष्टीनें माणसाचे बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध असे चार वर्ग पडतात. पैकीं बद्धाचा प्रश्नच नाहीं. कारण त्यांचें जीवनसर्वस्व श्री. दासबोधांत सांगितल्याप्रमाणें

काया वाचा आणि मन । चित्तवित्त जीव प्राण ।
द्रव्य दारेचें करी भजन । या नांव बद्ध ॥

असलेल्यांना परमार्थाचें वावडें असणारच कारण त्यांना संसार कांहींच सुचूं देत नाहीं. **बृहदारण्यक उपनिषदांत याज्ञवल्क्य मैत्रेयीला सांगतात,** श्रवण, मनन, निदिध्यास आणि साक्षात्कार अशा परमार्थसाधनेच्या चार पायऱ्या आहेत. **पतंजली मुनींनीं योगशास्त्रांत** यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि अशा **आठ पायऱ्या** सांगितल्या आहेत. पैकीं पहिल्या पांच पायऱ्या बहिरंग साधनाच्या आहेत.

ध्यान, धारणा, समाधि तयारी झाली म्हणजे अंतरंग साधनेच्या बनतात. **योगवाशिष्ठांत** ज्ञानाच्या शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभाविनी आणि तुर्यगा अशा **सात भूमिका** सांगितल्या आहेत.

**ज्ञानेश्वर माऊलींनीं** सोळाव्या अध्यायांत **पांच पायऱ्या** दाखविल्या आहेत. प्रथम काम, क्रोध, लोभ नाहींसे होतात. नंतर सज्जनांचा संगा मिळतो. पुढें प्रबल साधुसंगतीच्या योगानें आणि सच्छास्त्राच्या साहाय्यानें जन्ममृत्यूरूपी माळरान मागें रहातें. त्यानंतर गुरूकृपा होते. शेवटीं आत्मलाभ घडून मन आत्मरंगीं पहुडतें. **जडामध्यें अडकलेलें मन अभ्यासानें, विवेकानें, प्रेमानें, रिकामें करणें हें चित्तशुद्धीचें मर्म आहे;** परंतु मन नुसतें रिकामें करून चालत नाहीं, मन रिकामें करण्याच्या अभ्यासाबरोबरच **वृत्ति अंतर्मुख करण्याचा म्हणजे अनुसंधान साधण्याचा अभ्यास करावा लागतो.** इंद्रियांची गडबड शांत होऊन अनुसंधान स्थिर झालें म्हणजे त्यांतून आत्मदर्शन उदय पावतें. अथा तो ब्रह्मजिज्ञासा। जिज्ञासेची **पहिली पायरी** ओलांडली कीं आत्मचिंतन या **दुसऱ्या** पायरीवर येण्यासाठीं, वैराग्याचा अभ्यास व वृत्ति अंतर्मुख करणें, यासाठीं प्रयत्न करणें जरूर असतें. चित्तशुद्धि करणें हा वैराग्याचा अभ्यास आहे, तर इंद्रियांनां उलटें वळवून मन अंतर्मुख करणें हा आत्मचिंतनाचा अभ्यास आहे. वैराग्याच्या बळानें इंद्रियांची मस्ती कमी झाल्यामुळें आत्मचिंतनाची युक्ति साधते. आत्मचिंतन पक्कें झालें कीं, साधक **तिसऱ्या पायरीवर** येतो. आत्म्यामध्यें मिसळून जाण्याची तळमळ लागणें ही **चौथी पायरी**. या तळमळीचें पर्यवसान अनन्यता किंवा पूर्णशरणागति यामध्यें होऊन आत्मसाक्षात्कार होतो. या अवस्थेंत साधक सिद्धपणाला पोहोंचून परमार्थसाधनेचा शेवट गांठतो. ही **पांचवी पायरी** होय. आत्मा अत्यंत पवित्र आहे. त्याच्या ठिकाणीं रहाण्याची

शक्ति येण्यासाठीं मन देखील अत्यंत पवित्र झालें पाहिजे. अनुतापानें मन पवित्र होतें म्हणून **अनुताप हें परमार्थांत मोठें तीर्थ आहे.**

हृदयीं नाहीं अनुतापवृत्ति । वरिवरि गा शास्त्रोक्ति ।
लावूं जातां शेणमाती । नव्हे निवृत्ति पापांची ॥
उद्धवा जेथें अनुताप नाहीं । तेथें माझी कृपा नव्हे कांहीं ।
कृपेचें वर्म हेंचि पाही । जैं अनुताप देहीं अनिवार ॥

नाथ भागवत, अ. २०-३०८-३५८

अंतरंगाच्या पावित्र्याला दोन बाजू असतात. विकार रहित होणें ही एक बाजू व सद्गुण संपन्न बनणें ही दुसरी बाजू. दया, क्षमा, शांति, संतोष, अहिंसा इ. सद्गुण वाढविणारी ती नैतिक तळमळ. नैतिक तळमळ उत्पन्न झाली कीं, आपलें लक्ष आपोआप अंतरंगाकडे वळतें. आत्म्यासारखी दुसरी पवित्र वस्तू नाहीं. त्याचा स्वच्छ प्रकाश पडण्यास तितक्याच पवित्र अंतरंगाची गरज आहे. शुद्ध झालेलें अंतरंगच पवित्र बनूं शकते. अंतरंग पवित्र करण्याच्या कामांत भयंकर विघ्न आणण्यास टपलेला असतो तो स्वार्थ. स्वार्थ हें परमार्थांतील महान् विघ्न आहे.

## स्वार्थ

**स्वार्थ म्हणजे देहांतून सुख घेण्याची वासना. हिचेंच गोंडस नांव देहबुद्धि.** देहबुद्धि ही एखाद्या खारटपाण्याच्या झऱ्यासारखी आहे. जोंपर्यंत मूळ झऱ्यांतून खारट पाणी वहात आहे तोपर्यंत विहिरींतील पाणी गोड करण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी यशस्वी होणें अशक्यच ठरेल. स्वार्थ कमी झाल्याशिवाय चांगला हेतू ठेवण्याचा स्वभाव बनत नाहीं आणि फलाचा आग्रह पण सुटत नाहीं. कसा सुटणार? आत्म्याचा विसर पडल्यामुळें वासना उत्पन्न झाली. वासनेमुळें वृत्ति बहिर्मुख झाली. वृत्ति बहिर्मुख झाल्यामुळें स्वार्थाचें प्राबल्य झालें. अर्थात् हें पापाचें मूळकारण आहे. स्वार्थ कमी व्हावयास भक्ति हें उत्कृष्ट साधन आहे.

## भक्ति

कर्मयोगाला भक्तीची जोड हवी. भगवंताच्या इच्छेंत आपली इच्छा मिसळून त्याच्या नांवानें आपलें जीवन जगणें हें भक्तीचें खरें रहस्य आहे. भक्तीमध्यें अनुराग असल्यामुळें अत्यंत आदर व मार्दव आहे. या अनुरागाच्या पोटीं भक्ताला भगवंताची सेवा केल्याशिवाय चैन पडत नाहीं. परंतु सेवेपेक्षां तिच्या मुळाशीं असलेल्या प्रेमामुळें भक्ताला तत्काळ तृप्ति मिळतें. जीवाची तृप्ति व समाधान इतर कोणत्याच योगामध्यें इतक्या लवकर प्राप्त होत नाहीं. भगवंतावर नितांत प्रेम केलें असतां इंद्रियांना भगवंताचें वळण लागतें. त्यामुळें देहकष्ट न होतां वैराग्य साधतें. वैराग्य साधलें कीं, भगवंताचें अखंड अनुसंधान आपोआप टिकतें. अशा अनुसंधानांतूनच आत्मज्ञान उदय पावतें. हें सारें साधणें तितकेंसें सोपें नाहीं. हें साधण्यास **पतंजली मुनीनें** सांगितल्याप्रमाणें,

" स तु दीर्घकालनैरन्तर्यसत्कारा ऽऽ सेवितो दृढभूमिः ( १-१४ ) पुष्कळ काळ निरंतर अभ्यास करावा लागतो. ( इत्यलम् )

राजपिंपळयाचे न्यायाधीश श्री. खंडूभाई देसाई यांनीं तलंगपुरास **लिहिलेलें पत्र.**

त्या अथांग जनसागरांत राजपिंपळयाचे न्यायाधीश व राजपिंपळ राज्यांतील उंटणी गांवचे रहिवासी श्री. खंडूभाई देसाई हे प्रवचनांस आलेले होते. त्यांनी श्री. गांडा महाराज यांना पाहिले. हे न्यायाधीश श्री. डाह्याभाईचें मित्र होते. आपल्या मित्राचा मुलगा येथें कसा? त्यांना आश्चर्य वाटलें. ते बेचैन झाले. आपल्या सुखवस्तू मित्राचा मुलगा अशा पोशाखांत बघून त्यांना कसेसेंच वाटलें. नांदतें घर सोडून हा येथें आलाच कसा? याचें आश्चर्य वाटलें. गुजराथी पोर व्यापार सोडून येथें?

प्रिय मित्र डाह्याभाई यास—श्री. गुरुदेवदत्त सिनोर येथें श्री. वासुदेवानंद सरस्वति नांवाचे महान सिद्ध योगी मार्कंडेश्वराच्या शिवालयांत

आलेलें आहेत. त्यांच्या दर्शनार्थ अलोट जनसमुदाय येत असतो. प्रवचन फारच उत्तम करतात. ऐकून मी बेहद्द खूष झालों. येथें गांडा नांवाचा गुजराथी तरुण त्यांच्या सेवेला आहे. बहुधा तो आपला मुलगा असावा. तपास करा. मुद्दाम हे पत्र लिहित आहे.

आपला

खंडूभाई देसाई, उटणीवाला.

तें पत्र कसचें? श्री. गांडा महाराज यांना परत संसारांत खेचणारी ती काढणीच होती. आपल्याबद्दल तलंगपुरांत पत्र गेलें याची श्री. गांडा महाराज यांना कल्पना नव्हती. नियती आपलीं चक्रें फिरवीत असते याची सामान्यांना कल्पना नसतें. सुखदु:खाच्या उभ्या आडव्या तंतूंनीं संसारवस्त्र विणलेलें असते. 'जगाच्या पाठीवर' या नामवंत बोलपटांत कांहीं वाक्यें साधीं आहेत पण त्यांत गहन वेदान्त गुंफिला आहे. त्यांतील एकच वाक्य जग सत्य व वेदान्त प्रगट करते.

एक धागा सुखाचा शंभर धागे दु:खाचे।

## शब्दब्रह्मांत अजब सामर्थ्य असतें

न्यायाधीश खंडूभाई यांचें पत्र तलंगपुरास पोहोंचतांच घरांतील सारेंच वातावरण बदललें. अवकळा जाऊन आनंद नाचूं लागला. श्री. गांडा महाराज यांचा शोध लागला. रडकीं वदनें हंसरीं झालीं, दु:खाश्रूंची जागा आनंदाश्रूंनीं घेतली. दु:खातिवेगानें वेडावलेले वृद्ध श्री. डाह्याभाई व माता सौ. काशीबाई यांना या पत्रानें स्वर्ग आतां दोन बोटें राहिला असें वाटलें. साधें दीड दमडीचें पत्र पण शब्दब्रह्मांत किती अजब सामर्थ्य असतें याचा प्रत्यय आला. आपला हरवलेला पति गवसला म्हणून आर्य स्त्रीला समाधान वाटलें. माझें दृष्टिआड झालेलें लेकरूं केव्हां पाहीन असें वृद्ध मातापितरांना झालें. लगेच तांतडीनें वृद्ध पिताजी डाह्याभाई यांनीं

जामात श्री. कल्याणजी व पुतण्या यांना श्री. गांडा महाराजांच्या तपासासाठीं तांतडीनें सिनोर येथें पाठविलें.

## श्री. कल्याणजी सिनोरकडे रवाना

वायुवेगानें ते सिनोर येथें येतांच मार्कंडेश्वराच्या शिवालयांत आले. संतांना नमस्कार केला. श्री. गांडा महाराज यांना न्याहाळिलें. तोच तो अशी खात्री झाली. श्री. गांडा महाराज यांनीं त्यांना पाहूनही पूर्ण तटस्थपणाचें धोरण स्वीकारलें. जणूं कांहीं ते आपल्या गांवचेच नाहींत संतांच्या अमृततुल्य सहवासांत श्री. गांडा महाराज घराला विसरले होते. पण घर त्यांना विसरलें नव्हतें. दुसऱ्या दिवशीं गुरुशिष्य नदीवर स्नानास गेले. पण शिवालयांत गुरूदेव एकटेच परतले. श्री. गांडा महाराज कपडे धुवावयास नदीवर थांबले. ही संधि बरी आहे असें वाटून तपासास आलेल्या पाहुण्यांनीं श्री गुरुदेवांची एकांतांत भेट घेतली. आपण कोण व कां आलों याची ओळख पटविली. सारी हकीकत सांगून आमच्या गांडा महाराजास घरीं पाठविण्याबद्दल विनंति केली. मी कोठें त्याला बांधून ठेविलें आहे असें गुरुदेवांनीं उत्तर दिलें. तितक्यांत श्री. गांडा महाराज नदीवरून परत आले. ते येतांच गुरुदेवांनीं श्री. गांडा महाराज यांना विचारलें.

तूं या आलेल्या पाहुण्यांना ओळखतोस काय? श्री. गांडा महाराज यांनीं सत्य तेंच सांगितलें. हे कल्याणजी माझे मेव्हणे आहेत व दुसरे माझे पुतणे जीवनजी आहेत. खोटें बोलायचें नाहीं हा मनाचा निर्धार असल्यामुळें ते पुढें बोलूं लागले. माझ्या घरीं वृद्ध आईबाप, एक भाऊ व तीन बहिणी आहेत. धर्मपत्नी पण आहे पण मी जेव्हां घर सोडलें तेव्हां ती गर्भार होती. तिला संतति झाली कीं नाहीं याची मला कल्पना नाहीं. असें ऐकतांच कल्याणजी मध्येंच बोललें. तिला एक कन्यारत्न झालें आहे. हें सर्व ऐकून गुरुदेव बोलले, ' गांडा! आईबापांची सेवा हीच गुरुसेवा आहे. त्यांचा एकच आशीर्वाद आयुष्याचें भलें करावयास

समर्थ आहे. **आईबापांचा तळतळाट तुला तुझ्या या अध्यात्म-मार्गांत प्रगति करूं देणार नाहीं.** तुझ्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं प्रथम तूं तुझ्या आईबापांना प्रसन्न कर. तुझ्या मातापित्यांच्या अंतःकरणाचें समाधान कर.त्यांची आज्ञा घेऊनच तीर्थाटनाला निघणें हेंच तुजसाठीं श्रेयस्कर आहे. **मातृदेवोभव । पितृदेवोभव ।** ही वेदांची शिकवण मनांत बिंबव.'

गुरुमंत्राइतक्याच पवित्र भावनेनें सद्गुरु गांडा महाराज यांनीं हें सारें श्रवण केलें. मनोमनीं गुरुदेवांना नमन केलें. सारें मंजूर या तटस्थ भावनेनें शांत उभे राहिले. नंतर गुरुदेव आलेल्या पाहुण्यांकडे वळून म्हणाले, 'तुम्ही आतां तुमच्या गांवीं परत जा. श्री. गांडाची काळजी करूं नका. त्याच्या मातापित्यांना गांडा लवकरच परत येईल असें पक्कें आश्वासन द्या.' असें गुरुदेवांनीं सांगितल्यामुळें श्री. कल्याणजी यांना बरें वाटलें. श्री. गांडा महाराज घरीं अवश्य येतील अशी खात्री वाटली. पाहुणे तलंगपुरास जावयास निघाले. निघण्यापूर्वीं नर्मदेचें स्नान केलें. प्रसाद घेतला. श्री. गांडा महाराजाबरोबर सुखासमाधानाच्या दोन गोष्टी केल्या. माझें सारें जीवन गुरुदेवाच्या स्वाधीन, हें देहपुष्प मी त्यांना वाहिलें आहे. हे सद्गुरु गांडा महाराज यांचे शब्द ऐकून ते निघाले. श्री. कल्याणजी आपल्या घरीं भडोचला उतरले व पुतणे जीवनजी सचीन स्टेशनावर उतरून ते तलंगपूर येथें गेले. काय झालें हें ऐकण्यास सारेच अधीर बनले होते. सिनोर येथें घडलेली सारीच हकिकत सांगितली. शांतीचा श्वास सोडिला.

## गुरुदेवांचें सिनोरहून प्रयाण

गुरुदेवांनीं सिनोर सोडलें. पडछायेप्रमाणें सद्गुरु गांडा महाराज त्यांचेबरोबर होते. नर्मदा तटाकीं फिरतां फिरतां निकोऱ्यास आले.

## तें निकोरा

या निकोऱ्याहूनच श्री. गांडा महाराज थकबाकी वसूल करावयास जातों असा पत्नीला बहाणा दाखवून घराच्या बाहेर पडले होते.

श्री. गांडा महाराजांच्या संसाराला पत्नीच्या कारवाईनें आग लागली तेंच हें निकोरा. सद्गुरु गांडा महाराजांच्या अंतर्वैराग्याला ( आग भडकून ) त्यांना अध्यात्माच्या ओसरीवर नेले तेंच हें निकोरा. निकोरा येथें व्यापारासाठीं रहात असतांना सांसारिक भावनांचें चित्र क्षणभर डोळ्यांपुढें येतें न येतें तोंच चलत् चित्रपटाप्रमाणें दृष्टिआड झालें. श्री. गांडा महाराज यांना प्रपंचाचा मोह किंवा आकर्षण कांहींच उरलें नव्हतें. श्री. गांडा महाराज निकोऱ्यास येतांच मागील स्मृति डोळ्यांसमोर आल्या तशा गेल्या; या निकोरा स्थळाला सद्गुरु गांडा महाराज यांच्या जीवनांत आगळें महत्त्व आहे. नर्मदा परिक्रमा निकोरा सोडल्यानेंच झाली. म्हणून नर्मदा तटाकीं अधिकारी पुरुष पांडुरंगबाबा यांनीं गुरुदेव तुझे गुरु असा ठामपणें अंगुली निर्देश केला. गुरुदेवाच्या सहवासानें कायापालट झाला. याच निकोऱ्यांत श्री गुरुदेवाकडून मोक्षप्राप्तीची गुरुकिल्ली मिळाली. याच निकोऱ्याहून कारकुनाचें पत्र गेल्यामुळें आईबाप भेटावयास आले. डोळ्यांतून संसार उतरविणारें हेंच निकोरा. अस्तु.

निकोऱ्यांत चावडीजवळ असणाऱ्या शिवालयांत गुरुदेवांनीं मुक्काम केला होता. गांडा महाराज परत संसाररत होऊं नयेत म्हणून गुरुदेवांनीं आत्मसाक्षात्काराच्या अंतिम ध्येयसिद्धीसाठीं योगाभ्यासांत त्यांचेकडून प्रगति करविली ती याच शिवालयांत. योग्य त्या प्रणाली दाखवून उत्तम असें मार्गदर्शन केलें. पूर्वजन्माची अपुरी तपश्चर्या या जन्मांत पुरी होण्याची पायवाट दाखविली. थोडक्यांत म्हणजे कृपापात्र गांडा महाराजांच्या ताब्यांत नको मोक्षाची गुरुकिल्ली दिली. समर्थ बनविलें.

## निकोऱ्याहून शुक्लतीर्थ

ही गुरुशिष्य जोडी फिरतां फिरतां शुक्लतीर्थांत आली. अमावास्येपर्यंत तेथें राहिले. नंतर झाडेश्वर येथें जाऊन गुरुदेव व सद्गुरु गांडा महाराज यांनीं समुद्रस्नान केलें. जीव हा अणू आहे तर शिव

हा विराट आहे. संसारी जीवांची दृष्टि अणूप्रमाणें संकुचित असते तर संत सज्जनांची दृष्टि व्यापक असते. पण आत्मतत्त्व जाणणाऱ्यांची सम्यक दृष्टि जग स्वत:मध्यें पाहत व साऱ्या जगांत आपणच आहोंत, दुसरें नाहींच इतकी विशाल बनत सागरांत अणू परमाणूचें विशाल दर्शन घडत असतें. संतहृदय सागरासारखें विशाल, आत्मसंतुष्ट व निर्विकारी असते, व्यापक असते, निर्भर असतें. सागरावर अनंत विशाल लाटा वायुलहरींनें वहात असतात. पण सागराला त्याची कल्पना नसते. संतहृदय सागराप्रमाणे तुडुंब व अथांग दयेनें भरलेलें असतें. पण लाटांप्रमाणें मनांतील उर्मींची त्यांना कल्पना नसते. भरती-ओहोटी आल्या काय अन् गेल्या काय ? त्यांत सागराचें चित्र नसतें. आत्ममग्न संतांकडे प्रचंड जनसमुदाय आला काय अन् गेला काय ? इकडे त्यांचें लक्ष नसते. ते इतरांशीं बोलतील चालतील पण आंत त्यांची आत्ममग्न स्थिति कायम असतें. हेंच संसारी व संत यांतील वैशिष्ट्य असतें. त्यांचें मन ब्रह्मरंध्रीं जडलेलें असतें त्यामुळें संतांच्या मनांत विकार, विचार नसतात. जीवांच्या मनांत विकार व विचार यांचा धांगड-धिंगा चालू असतो. दयेचे अथांग सागर श्रीगुरुदेवांत सद्गुरु गांडा महाराजांचा अणू वरील विचारांनीं सामावला गेला. गुरुतत्त्वाची प्रचीति आली. म्हणजेच गुरुदेवांत ते पूर्ण समरस झाले.

**सूचना :** या ग्रंथांत **गुरुदेव** हा शब्द योगीश्रेष्ठ वासुदेवानंद सरस्वति यांना वापरलेला आहे. शिष्य गांडा महाराज यांच्यासाठीं **सद्‌गुरु** हा शब्द योजलेला आहे.

* * *

प. प. श्री. वासुदेवानंदसरस्वती टेंब्ये स्वामी महाराज यांचे शिष्य.

# श्रीसद्गुरु योगानंद सरस्वती (गांडामहाराज)

(ऐन तारुण्यांत)



श्रीसीतारामहाराज यांचे हे गुरुबंधु योगाभ्यासी होते. हे खेचरी मुद्रा लावीत असत. गुरुभक्तिबळानें यांनीं मृत जीव जिवंत केलें. वासुदेवानंदांबरोबर यांनीं पायीं तीर्थयात्रा केली व त्यांचें चरित्र लिहिलें. यांच्यावर गुरूंचें प्रेम होतें. यांचा शिष्यगण मोठा आहे.

[ अरुण छापखाना सांगली ]

## किरण सहावा

### सद्गुरु गांडा महाराज यांना घरीं जाण्याची आज्ञा

सद्गुरु गांडा महाराजांची योगशास्त्रांतील प्रगति पाहून समाधान वाटलें. त्यांची तयारी अजमावून पाहिली. गुरुदेवानें हें भाजलेलें बीज संसारांत रुजणार नाहीं अशी खात्री करून घेतली. गुरुदेव श्री. गांडा महाराजास म्हणाले "तूं आतां घरीं जा. आईबापांची सेवा कर. त्यांना संतुष्ट ठेवून त्यांची परत मजकडे येण्याची संमति मिळव." गुरुदेवांची आज्ञा शिरसावंद्य मानून इ. स. १८९८ शके १८२० च्या चैत्रांत मातापित्यांचें दर्शन घेण्यासाठीं सद्गुरुं गांडा महाराजांनीं तयारी केली. श्री गुरुदेवांची ताटातूट होतांना सद्गुरुंचें हृदय भरून आलें. माय-लेकरांची ताटातूट होती ती. डोळ्यांत आंसू तरारूं लागले. पाय निघण्यास तयार होईना – भवपाश तोडणाऱ्या गुरुदेवांचे चरण कसे सोडावे? तत्त्वमसि याचा बोध देऊन कोऽहं या प्रश्नाचें उत्तर देणारी गुरुमाऊलीच. मातापिता फक्त जन्मदाते. गुरुमाऊलीच माझें जीवनसर्वस्व. गुरुदेव निरोप देतांना सद्गुरूंना म्हणाले, तूं आतां जा. मन शांत ठेव. आपण जरी एकमेकांपासून दूर असलों तरी मी तुझ्याजवळ आहे अशी धारणा नित्य धरीत जा. **अचल, अढळ श्रद्धा हें महान अस्त्र आहे.** निदिध्यासानें इष्ट दैवत भक्तांच्या हृदयाकाशांत असतेंच. माझा येता चातुर्मास बहुतेक द्वारकेला किंवा सिद्धपूराला होईल. तेव्हां भेटण्याचा प्रयत्न कर. जास्तींत जास्ती वेळ नेहमीं अनुसंधानांत घालवीत जा.

### संयोग वियोग

संयोग वियोग यांत दोन ध्रुवांइतकें अंतर असतें. **संयोग** हसवितो,

हवाहवासा वाटतो, संतुष्टित करतो व आनंदांत डुलवितो. पण **वियोग** कष्टतर, कष्टतम असतो, हृदय विदारितो, मनाला बोचतो, हळहळ वाढवितो; इतकेंच नव्हे बेचैन करण्यांत अट्टल असतो. पण गुरुदेवांच्या वियोगांत द्वारकाभेटीचें आश्वासन होतें. तितकाच मनाला विरंगुळा पडला. सद्गुरु गांडा महाराज म्हणाले, "गुरुदेव आपल्या छायेंत आलों. मला पावन केलें. आत्मबोधाचे घुटके वारंवार पाजले. माझें जीवन पालटविलें, जागृत बनविलें. परमतत्त्वाची प्रभा दाखविली; निजानंदाची गोडी चाखविली; आत्मानंदांत डुलविलें, असें चरणकमल कसें सोडूं?" अशी प्रार्थना करूं लागले. तोंच दत्तप्रभूचा आदेश गुरुदेवांना आला. दत्त-प्रभूंच्या आज्ञेंत राहणाऱ्या गुरुदेवांना दत्तांनीं आदेश दिला, 'हूं चलो.' असा इशारा मिळतांच सर्वस्वीं दत्ताधीन गुरुदेव चालूं लागले. त्यांना सद्गुरु गांडा महाराजांनीं नमस्कार घातला.

सांभाळा निजबाळ सद्गुरु सदा, संसारिं रमवूं नका ॥

असा आर्तवाणीनें पुकार केला. गुरुदेव दृष्टिआड होईपर्यंत तिकडे सद्गुरु गांडा महाराज वेड्यासारखे कितीतरी वेळपर्यंत पहातच राहिले गुरुदेव!

काढूं केविं आयु तुम्हाविण गुरो ।
हा जन्म वाटे फुका ।
मातेवीण कसें जगेल शिशु हें ।
गुरुमाऊली साऊली ।
गांडाला विसरूं नका प्रभू कधीं ।
कैकासि तूं पावली ।

## सद्गुरु गांडा महाराजांचें तलंगपुराकडे प्रयाण

संसारवृक्षमारूढाः पतंतो नरकार्णवे ।
येनचैतोद्धृताः सर्वे तस्मै श्री गुरवे नमः ॥

(गुरुगीता अ. ३१)

गुरुदेवांचे आज्ञेप्रमाणें सद्‌गुरु गांडा महाराज घराकडे तलंगपुरास जावयास निघाले. प्रथम भडोच येथें आले पण प्रातःस्मरणीय त्यांची बहीण श्री. सौ. यमुनाबाई व मेहुणे श्री. कल्याणजी तेथें नव्हते. म्हणून सद्‌गुरु गांडा महाराज तडक तलंगपुरास गेले. घरीं येतांच साऱ्यासाऱ्यांना अत्यानंद वाटला. त्यांना बघतांच हरवलेलें माणिक गवसलें. साऱ्यांनीं सद्‌गुरुंना डोळे भरून पाहिलें. माझा हरपलेला हिरा सांपडला असें मातृहृदयाचे सहजोद्‌गार निघाले. धर्मपत्नी श्री. सौ. केसरबाईच्या हृदयाची कळी फुलली. छोटी बालिका घुळघुळ करूं लागली, हंसत होती. बंधुराजांना आनंदाचें भरतें आलें. सारें वातावरण बदललें. नमस्कार चमत्कार झाले. साऱ्यांचा जीव भांड्यांत पडला. पण सद्‌गुरु गांडा महाराजांना चुकल्या चुकल्यासारखें झालें, त्यांचें सारेंच वातावरण बदललें गेलें. मातुःश्री सौ. काशीबाई व पिताजी श्री. डाह्याभाई यांच्या तीव्रतर तपानें व शिवरात्री व्रताच्या अनुष्ठानानें शंकराचा मिळालेला वरदप्रसाद म्हणजेच सद्‌गुरु गांडा महाराज होत. शंकराच्या वरद कृपेनें सद्‌गुरु गांडा महाराज यांचा पिंड मूळचाच सत्वगुणप्रधान होता. सद्‌गुरूची शिस्त कडक खरी, स्वभाव करडा खरा, पण त्यांच्या उभ्या आयुष्यांत कोठेंहि रजोतमोगुणाचे प्राबल्य आढळणार नाहीं. कैक जन्मांच्या पुण्याईनेंच ब्रह्मनिष्ठ कुळांत कैक जन्मास येत असतात.

घरीं आल्यावर सद्‌गुरु गांडा महाराज सांसारिक कामें पाहूं लागले. त्यामुळें साऱ्यांना संतोष वाटला. संत अंतर्ध्यानी असले तरी साऱ्यांच्या आनंदांत त्यांचा आनंद असतो.

भगिनी सौ. पार्वतीबाई हिच्या मुलीच्या सोयरी संबंधासाठीं श्री. कल्याणजी व भगिनी सौ. यमुनाबाई हे भडोचहून गेले होते. संबंध जुळला. तिथी निश्चित झाली. पिताजी डाह्याभाई यांना सौ. पार्वतीबाई यांच्या सासऱ्याकडून खरसाडहून पत्र आलें होतें. कन्यादानासाठीं एक

हजार रुपये पाठवा. श्री. डाह्याभाईसारख्या सामान्यांना हे हजार रुपये हिमालय वाटूं लागले. संतांच्या दृष्टींत तेज असतें. सद्‌गुरु गांडा महाराज तेथें गेले. किरकोळ गोष्टी वगैरे झाल्या. सद्‌गुरूंच्या सान्निध्यांत त्यांचे विचार पालटले. हेंच संतांचें सामर्थ्य असतें. खरसाडहून त्यांनीं श्री. डाह्याभाईंना उलट पत्र लिहिलें कीं, माझ्या मागील पत्राप्रमाणें एक हजार रुपये पाठविण्याची जरुरी नाहीं. मामा म्हणून श्री. रघुजींना पाठवा. सद्‌गुरु येथें आहेतच. या पत्रानें सद्‌गुरुंत काय सामर्थ्य आहे याची वडिलांना कल्पना आली. हजार रुपये देण्याचे टळलें म्हणून संतोष वाटला. भाचीचें लग्न आनंदानें पार पडलें. मामा म्हणून सद्‌गुरु गांडा महाराज भाचीच्या पाठीशीं लग्नसमयीं होते. तांब्याच्या पात्रांत सव्वापांच रुपये व गहूं भाचीला आंदण दिले.

एका भिक्षुकानें सद्गुरूजवळ त्यांची पांघरावयाची धाबळी मागतांच सर्व परब्रह्म बघणाऱ्या सद्‌गुरूंनीं त्यास देऊन टाकिली. खरसाडहून तंलगा-पूरला गेले. भीमभाई, परसुभाई इत्यादि पाहुणे घरीं होते. तेव्हां सात आठ लोकांना आपलें दैवत निळकंठेश्वरीं जाण्याची प्रेरणा श्री. दाजीभाईंनीं दिली. कल्याणजी सद्‌गुरु हे सारे निळकंठेश्वरीं दर्शनार्थ निघाले. रात्रीची अकराची वेळ. शिवालयांत सर्वत्र अंधार होता. आगपेटी कोणाजवळ नव्हती. आतां निळकंठेश्वराचें दर्शन घडावें कसें असे विचार येतात न येतात **तों दर्शन होईपर्यंत लख्ख प्रकाश होता.** साऱ्यांचें समाधानानें दर्शन झालें. पुन्हा बघतात तों पूर्ववत अंधार. हें घडलें कसें? याचें साऱ्यांनाच आश्चर्य वाटलें. सद्‌गुरूंना विचारूं लागले हें कसें घडलें? सद्‌गुरु उत्तरले सगळ्यांच्या आर्ष भावना एकत्रित होऊन केंद्रीत झाल्या तर असे दैवी चमत्कार घडत असतात. हीच भगवंताची लीला. **जेव्हां तर्क व बुद्धि कुंठित होते तेव्हां श्रद्धा, निष्ठा यांचीं दालनें शुद्ध हृदयाच्या भक्तासाठीं मोकळीं होत असतात?** संतांच्या सत्त्वाचा

प्रभाव कोठें व केव्हां चमकेल हें सांगतां येत नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं रात्रीं घडलेल्या चमत्काराची हकिकत साऱ्यांना सांगितली गेली तेव्हां सारेच आश्चर्यचकित झाले. **सद्गुरूच्या सात्त्विक भावनांचा साऱ्या घरावर चांगलाच पगडा बसला.** ते पिताजी डाह्याभाईंना सांगूं लागले तुमचे **चिरंजीव गांडा महाराज योगभ्रष्ट आत्मा आहे यांत शंकाच नाहीं.** त्यांच्यात दैवी सामर्थ्य असून ते महान् तपस्वी आहेत. अशा सत्पुरुषाला परत संसारपाशांत जखडूं नका. त्यांना आत्मकल्याण व जनकल्याणांत संकुचित करूं नका. ही महान् व्यक्ति तुमच्या कुळाचें नांव सर्वत्र गाजवील. अशा प्रकारें पुष्कळांच्या तोंडून पिताजी डाह्याभाई यांनीं मुक्तकंठानें केलेली प्रशंसा ऐकिली. हें ऐकून वडिलांच्या संसारी मनावर शांति-समाधानाच्या गुदगुल्या होऊं लागल्या. आपल्या मुलाचें तपतेज व कर्तबगारी मनावर बिंबली. **आपला पुत्र कुलदीप असल्या-बद्दल धन्यता वाटली.**

## सद्गुरूंच्या अंतर्वेदना

सद्गुरु संसारांत रमतांना दिसत. पण त्यांच्या मनाची आंतील ओढ फक्त देवालाच ठाऊक! ती इतरांना कशी दिसणार? पण येथें आतां अधिक न राहिलेलें बरें असें त्यांना वाटूं लागलें. पण एक मोठी अडचण होती. गुरुदेवांची आज्ञा होती कीं, आईबापांच्या संमतीनें, त्यांच्या भावना न दुखवितां सुखासमाधानानें बाहेर पड. या दृष्टीनें आतां त्यांचीं पावलें पडूं लागलीं. वडिलांना एकटे गांठून आपली मनिषा त्यांना कळविली. माझ्या आत्मलाभांत अडसर करूं नका. आत्मोद्धाराच्या मार्गांत प्रपंच हा महान् धोंडा असतो. **जेथपावेतों अंतरीचा सूक्ष्म त्याग स्थिर होत नाहीं तेथपावेतों बाहेरील स्थूल त्याग करणें आवश्यक असतें.** सद्गुरु गांडा महाराजांची विनंति पिता श्री. डाह्याभाईंनीं शांत चित्तानें ऐकिली. त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीला रोखण्याचा त्यांचा मानस

नव्हता. पण प्रपंचांत रमणाऱ्या श्री. डाह्याभाईंना साधकाच्या साधने-बाबत असणाऱ्या तळमळीची कशी कल्पना असणार ?

## प्रापंचिक डाह्याभाई

प्रापंचिक डाह्याभाई बोलूं लागले, गांडा, आम्ही आतां थकलेलों आहोंत. आयुष्याचे दिवस कसेतरी पुरे करीत आहोंत. तूं आमचा तरुण वडील मुलगा ! तुझ्याकडे आम्ही आशेनें पहात आहोंत. वृद्धपणीं आम्ही आतां कसें जगावें ? माया बोलविते. तुझा लहान भाऊ अजून अजाण आहे. आमची सेवाहि करावयास तो अजून समर्थ नाहीं. आपल्या कुटुंबाची आर्थिक स्थिती तूं जाणतोच आहे. असा पितापुत्रांचा संवाद चालू असतांनाच मातुश्री सौ. काशिबाई तेथें आल्या. त्यांनीं संवादांत भाग घेतला. त्या म्हणाल्या, तुझ्या वडिलांनीं सांगितलें तें आलें ना तुझ्या ध्यानांत ? आमच्या दोघांची सद्गति तुझ्या हातानेंच झाली पाहिजे. तुझा लहान भाऊ रघु, तुझी कन्या यांचे पालनपोषण तूंच केलें पाहिजे. गांडा ! तूं चांगला समजुतदार आहेस. ह्या साऱ्या गोष्टी कां आम्ही तुला सांगावयास पाहिजे ? तितक्यांत धर्मपत्नी संकोचत संकोचत तेथें येऊन बोलूं लागली, नाथ, मला व तुमच्या मुलीला अनाथ बनवून आतां तुम्ही गृहत्याग कराल तर मी या मुलीसह स्वतःला जाळून घेईन. असें बोलून त्या माऊलीनें आपलें हृदय मोकळें केलें. धर्मपत्नीचें भाषण ऐकून शांतचित्तानें सद्गुरु गांडा महाराजांनीं उत्तर दिलें, तुझ्या आनंदांत माझा आनंद आहे. पण असल्या गोष्टी माझ्या समक्ष झालेल्या बऱ्या. आतां तुझ्या या मायिक बोलण्याचा काय उपयोग ? निकोरा गांवीं घडलेल्या गोष्टींचें तुला कदाचित् विस्मरण झालें असेल पण मला तर त्या गोष्टींचें अजून स्मरण आहे. तुझें तें वागणें माझ्या पथ्यावरच पडलें. या प्रसंगानेंच माझें वैराग्य भडकलें व संसाराची शिसारी बसली. त्याचा परिणाम हाच. आपला आतां कांहीं संबंध नाहीं, असें मला आतां पूर्ण समजलें आहे. तुम्हां

दोघांचें माझा धाकटा भाऊ रघुजी उत्तमप्रकारें पालनपोषण करील **अशी** माझी खात्री आहे. त्याची काळजी तूं मुळींच करूं नकोस. त्यावर आईबाप बोलले, असा वेड्यासारखा कां बकतोस ! वंश विस्तारासाठीं तुला अजून मुलगा झालेला नाहीं. मुलीचें कन्यादानहि अजून तुझ्य हातानेंच व्हावयाचें आहे. त्यावर सद्गुरु गांडा महाराज बोलूं लागले. पिताजी ! तुम्ही थोडीहि चिंता करूं नका. गुरुदेवांच्या कृपेनें आपल्या व मातुश्रींच्या साऱ्या इच्छा यथाकालीं पूर्ण होतील. मी दूर तीर्थाटनास जात नाहीं तर भडोचच्या जवळपासच असेन. धर्मपत्नीचें पालन व मुलीचें पोषण माझा धाकटा भाऊ रघु आपली सेवा करतांना करील. माझा त्यावर पूर्ण विश्वास आहे. पिताजी ! **या साऱ्या ऋणानुबंधाच्या गोष्टी आहेत. झाडावर पक्षी रात्रभर विसाव्यास येतात. सकाळीं उडून जात असतात असा हा संसार आहे. धर्मशाळेंतहि वाटसरू येतात, कांहीं काळ विसावतात व जातात. पिताजी! या संसारांत कोण कोणाचें ? हें मायाजाल मिथ्या आहे.** केवळ आत्मकल्याणासाठीं परमात्म्यानें दिलेल्या ह्या दुर्लभ नरदेहाचा सदुपयोग करून परमतत्त्व मिळवावें हा नरदेहाचा अढळ ध्रुवबिंदू आहे. पिताजी ! मला माझ्या गुरुदेवांकडे जावयाची आनंदानें परवानगी द्या.

सद्गुरूंनीं धाकटा भाऊ रघूजी यालाहि दोन समजुतीच्या गोष्टी समजावून सांगितल्या. अशा रीतीनें संसाराचा सारा बोजा श्री. रघुजीवर टाकिला. मी येतांजातां लक्ष ठेवीत जाईन, तुला कोणत्याहि प्रकारची चिंता करावयाचें कारण नाहीं. प्रारब्धानुसार सगळ्यांना सर्व कांहीं मिळत असतें, असें कनिष्ठ बंधू श्री. रघुजी यांचें सांत्वन केलें. वडिलाकडे पाहून ते म्हणाले, पिताजी, या बालकावर जर तुमची कृपादृष्टि असेल तर सर्व कांहीं यथास्थित होईल. सद्गुरूकडे जाण्याच्या निश्चयापासून ढळविण्यासारखें कांहीं नव्हतेंच. मनोबळाचा आत्मधीराचा वीर वाटेल तितकी बिकट

परिस्थिती आली तरी त्यांतून मार्ग काढतोच काढतो. नदीचा प्रवाहहि आड येणाऱ्या प्रचंड खडकाला टक्कर देण्यांत शक्ति खर्ची न करतां प्रचंड दगडाला वळसा देऊन नदी आपला प्रवाह पुढें ढकलीत असते. सद्गुरु गांडा महाराजांसारख्यांना संसारलोलुप होण्यासारखें कांहीं राहिलेंच नाहीं. **ज्यानें ब्रह्मानंदाची चव चाखली त्याला क्षणिक विषयानंदांत कसली गोडी लागणार?** अमृतापुढें मद्याची काय कदर? गुरुदेवाची आज्ञा नसती तर ते घरीं आलेहि नसते. सद्गुरूंच्या मातापित्यांनीं सर्व गोष्टींचा साऱ्या बाजूंनीं विचार केला. आपला गांडा आतां पहिला गांडा राहिला नाहीं. प्रपंचांत त्याचें लेशमात्रहि लक्ष नाहीं. संसारांतील कोणत्याहि प्रलोभनाला बळी पडेल असा तो राहिला नाहीं. त्याचें अंतर्मुख झालेलें मन बहिर्मुख कसें होणार? बहिर्मुख असलेलें मन विषयांनीं विकारी होत असतें. तसें तें मुळीं राहिलें नाहीं. म्हणून तो संसाराकडे वळणें हें अशक्यच आहे वगैरे समग्र गोष्टींचा पूर्ण विचार करून सद्गुरु गांडा महाराजांना त्याच्या आवडीप्रमाणें अनुकूल गोष्टी करण्यासाठीं वृद्ध आईबापांनीं मोहाला बळी न पडतां आपल्या गुरू-देवाकडे सेवेसाठीं जावयास आज्ञा दिली. त्यामुळें सद्गुरुंचा मार्ग मोकळा झाला. गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें त्यांची संमति मिळाली. तलंगपूर सोडण्याचा सद्गुरूचा निश्चय कायम झाला. मुलाला गुरूदेवाकडे जावयाची परवानगी दिली. साऱ्यांच्याच अंतर्वेदना भडकल्या. विरहाग्नि जाळूं लागला. पतिदेव पुन्हां अंतरणार? दुर्दैवा! किती रे या सतीचा अंत पहातोस? पति-देवावाचून कसे रे मी जीवन व्यतीत करूं? माणूस अन्नावर जगत नसतो तर आनंदावर. पतिदेवा! या गाईचा हंबरडा आतां कोण ऐकणार? प्रारब्धा! तूं मला रडविण्यासाठींच जन्म दिलास काय? हाय रे दैवा! असा सतीचा अंतर्दाहो चालला होता तर जन्मादत्री माऊलीचें मातृहृदय शब्दशः होरपळून निघालें! गांडा!

तुझी ताटातूट ! आणि तीहि वृद्धपणीं ! पुत्रापासोनि काय भव्य इच्छावें ! माझा हिरा मला सोडून जाणार ! ही कल्पनाच सोसवत नाहीं ! शंकरा ! तुझ्या शिवरात्रीव्रताचें उद्यापन अजून मजकडून झालें नाहीं म्हणून ही ताटातूट केलीस काय ? काय करूं ? कांहीं सुचत नाहीं. गांडा ! तूं मातृभक्त गांडा ! इतका निष्ठुर कसा बनतोस रे ! नशिबीं आलेले भोग भोगलेच पाहिजे हेंच खरें. गुरुदेवा ! माझ्या गांडाला आतां आपल्या खोळांत टाकिला आहे हो ! आपण आतां त्याचे तारकमारक ! गांडा नर-देहाचें सार्थक करावयास जात आहे यांतच मी समाधान मानलें पाहिजे. हे खेळाडू माये ! तूं तुझे आतां पाश आवर. असें मातृहृदय कळवळत होतें तर गांडा जाणार या कल्पनेनें पिताजींची कंबर खचली. आनंद मावळला, हृदय मूकरूदन करूं लागलें. तो काय वाईट करतो. पण माझी माया तुटत नाहीं. आतां त्याची पुन्हां केव्हां भेट होईल देव जाणे. हा त्याला पांघरावयास कांबळा. हे खर्चाला पैसे. असे विचार करतां करतांच विरही वृद्ध पित्याला झोपेनें घेरलें.

## विस्मृति व झोप

**विस्मृति हा दुःखावर उत्तम उपाय आहे तर झोप हा दुःखाचा रामबाण उपाय आहे.** जगांत विस्मृति नसली तर दुःखाचे डोंगर जीवापुढें सतत राहिले असते. अति विरहाचें पर्यवसान झोपेंत होतें. मातृहृदय झोपलें. पत्नीलाहि झोंप लागली. अश्विनीकुमाराचे कीर्तनकारांनीं आपले पाय आमच्या झोंपडीला लागूं द्या अशी प्रार्थना सद्गुरूंना केली होती. त्यावर पाहूं उद्याचें उद्यां ! उद्यां आपण मरतों कां जगतों याची शाश्वति मानवमन कशी देऊं शकणार ? कारण प्रारब्धाच्या हातांतील खेळणें मानव असतो. जरी उपराउपरीं असें सांगितलें होतें तरी अश्विनी-कुमार येथें जावयाचें सद्गरूंनीं नक्की ठरविलें. सद्गुरु गांडा महाराज मनांत विचार करूं लागले. **आपण सारे मायेच्या हातांतील खेळणीं**

**आहोंत ती नाचवील तसें आपण नाचत असतों.** साऱ्यांच्या समक्ष आपण गेलों तर ते दुःखावेग, तो विरह, ते अश्रू यांनीं होरपळून जाऊन मुक्काम लांबण्याचा संभव आहे त्यापेक्षां घरांतून चुपचाप निघून गेलेलें बरें. सारे झोपी गेलेले आहेत. आपणहि झोंपावें व रात्रीं दोन-वाजेनंतर हीं दोन वस्त्रें, पोथी यांसह अश्विनीकुमार येथें प्रयाण केलेलें बरें असा सद्‌गुरूंनीं पोक्त विचार केला. **रात्रीं दोनच्या सुमारास घर सोडलें.** काळाकुट्ट अंधार मी म्हणत होता. रात्र किर्रर बोलत होती. मनोमनीं आईबापांना नमन केलें. पाय चालूं लागले. आठ दहा मैल चाललें तरी पहाट होईना म्हणून एका ठिकाणीं जरा विसांवा घेतला. श्रमानें डोळा लागला. तांबडें फुटलें. शुक्रचांदणी सद्‌गुरूकडे पाहून हसूं लागली. तापी-स्नान केलें. अश्विनीकुमार तीर्थांत गुप्तेश्वर महादेवाचें दर्शन घेतलें. गुप्तेश्वर शिवालयांत मुक्काम केला व आमंत्रण दिलेले श्री. रामशंकर हरिदास यांच्या घरीं प्रभातीं दत्त म्हणून उभे राहिले. सानंदाश्चर्य वाटलें. योग्य तो सत्कार केला गेला. घरीं अंथरुणावर गांडा नाहीं. पूसतपास सुरू झाला. पत्ता लागेना. **गांडा महाराज गुप्त झाल्याची वावटळ गांवांत पसरली.** श्री. जीवनजींना सद्‌-गुरूंच्या तपासासाठीं पाठविलें. अश्विनीकुमार येथें गुप्तेश्वराच्या शिवा-लयात सद्‌गुरु वामकुक्षी करीत असतांना दिसले. झोंप उघडल्यावर भेट झाली. घरची स्थिति निवेदन केली. काकांनींच तुमच्या शोधासाठीं मला पाठविलें. विचारल्यावांचून निघून आलांत म्हणून घरची मंडळी बेचैन झाली इत्यादि हकिकत सांगितली. सद्‌गुरु म्हणाले, मला तसें करावें लागलें. वडील मातुश्रींना सांगा काळजी करूं नका. आपलें पत्र आलें कीं मी येईन. भेटायची इच्छा असेल तर भडोचला या. सर्वांना शांतीनें रहावयास सांगा. नसती चिंता करूं नका असें सांगून श्री. जीवनजींना निरोप दिला. दुसरे दिवशीं जीवनजीबरोबरच सद्‌गुरु भडोच येथें

जावयास निघाले. ईशप्रेरणेनें बुद्धि होऊन पारशी स्टेशनमास्तरांनीं न सांगतां सद्गुरुजवळ दोन टिकिटें आणून दिलीं. जीवनजी तलंगपूरास गेले. सद्गुरु भडोचला गेले. सद्गुरूंनीं गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें आई-बापांची संमति घेतली. सुखासमाधानानें गुरुदेवाच्या सेवेसाठीं आतुरलेलें सद्गुरुंचें मन वाट चालूं लागले. गृहत्याग वैराग्याशिवाय होत नसतो. **केवळ वैराग्यानें काम भागत नाहीं. त्याला सहकारी विवेक असावा लागतो. विवेक वैराग्यानें आत्मोपलब्धीचें फल पदरांत पडतें.** सद्गुरु ब्रह्म मुहूर्तावर उठत. अध्यात्मांत पहाटेस उठून ध्यान-धारणा करण्यांत विशेष महत्त्व असतें. ब्राह्मीमुहूर्त उत्थानास उत्तम असतो. गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें योग समाधि बारा वाजेपर्यंत करीत. नंतर भिक्षा. तदनंतर अभ्यास; जप, ग्रंथवाचन, परत समाधि अशी त्यांची दिनचर्या असे.

## भडोच येथें

भडोच येथें नर्मदा कांठीं असलेल्या भागलकोटांत अविमुक्तेश्वराच्या शिवालयांत ते रहात. भडोचहून द्वारकेला पत्र लिहिलें त्यांत मी द्वारकेला येतों. घरची हकिकत कळविली. गुरुदेवाकडून द्वारकेहून पत्र आलें. त्यांत दिलेल्या सूचनेप्रमाणें कार्यक्रम ठेवावा. तूर्त येथें येऊं नये. यंदाचें चातुर्मास्य भडोच येथें करावें नंतर यावें. याप्रमाणें तलंगपुरास वडिलांस कळविलें. चातुर्मास्य भडोच येथें केला. चातुर्मास्य संपताच गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें द्वारकेस गेले. गुरुशिष्यांची भेट झाली. बाळाला माऊली भेटली. आईबापांची सुखासमाधानानें संमति मिळविली म्हणून गुरुदेवांना संतोष वाटला.

## एकच खोचक शब्द

एकच खोचक शब्द मानवमनांत क्रांति करावयास समर्थ असतो. सद्गुरु गांडा महाराज यांनीं पत्नीवरील रोषानें निकोरा सोडलें. त्यांच्या

मनांतील भडकलेल्या वैराग्नीची इतरांना कल्पना नव्हती. वडिलांनीं निकोरा येथें येऊन जी कानउघडणी केली त्याला बायकोच कारण अशी त्यांची खात्री झालेली होती. पूर्वसंचित दृढ असणाऱ्या विभूतींना एकच शब्द संसारांतून उठावावयास पुरेसा होतो. इतकेंच प्रेम देवावर केलें असतें तर परमेश्वर भेटला असता, हे प्रियपत्नीचे शब्द संत तुलसीदासास झोंबले. कामासक्त तुलसीदासांचें वैराग्य भडकलें. संसार पेटला गेला. स्वत: राममय बनले व इतरांनाही रामरसाची गोडी लाविली. देव अशा विभूतींना संसार करूं देत नसतो तर कोणत्या तरी निमित्तानें भवकर्दमांतून सोडवून जनहित कल्याणास्तव अशांना कार्यप्रवीण करतो. जुनागडचे संत नरसी मेहता यांचीहि गोष्ट अशीच आहे. बहिणीपाशीं बाळ नरसिंह यांनीं प्यावयास पाणी मागितलें. इतका मिजास करावयाचा असेल तर विहिरींतून पाणी काढून घ्यावयास हात मोडलेले आहेत? बाळपणीं एवढी ऐट कशाला? हेच शब्द मर्मीं झोंबले. घर सोडलें. पूर्वपुण्याई जबर होती म्हणूनच घोर वनांतील शिवालयांत वैराग्यानें अन्नपाण्यावाचून सात दिवस काढले. तीव्रतर अनुसंधानानें सारा चित्तमल झडला गेला. जीवाचे शीव झालें म्हणूनच भोळा शंकर प्रसन्न झाला. त्यांच्या मध्यस्थीनें श्रीकृष्णभगवानाची रासलीला बघावयास मिळाली. सारा सौराष्ट्र संत नरसी मेहेत्यांनीं कृष्ण भक्तिमय बनविला. **परमात्मशक्तीशीं एकरूप झालेल्यांना या जगांत अशक्य असें काय आहे?** कंचनरहित अशा आपल्या भक्तांसाठीं राजराजेश्वर्यालाहि लाजवील असा थाटमाट भक्तकल्पद्रुम मुकुंदानें नरसी मेहेत्यांच्या मुलीच्या लग्नाच्या वेळीं करून दाखविला. तीव्रतर वैराग्यांतूनच श्रीहरी दर्शन घडत असतें. चिंतामणीचा एकच शब्द संत बिल्वदासास झोंबला. आत्मज्योत जागृत झाली. संसाराला काडी लागली म्हणूनच ते महान विभूति—देवाचे लाडके—ठरले. सद्गुरु गांडा महाराजांचे बाबतींतहि असेंच घडलें. बायकोच्या कारवाईनें त्यांचें प्रापंचिक जीवन

आटलें. त्याचा परिणाम आध्यात्मिक प्रवृत्ति वाढण्याकडे झाला. सद्गुरुच्या दर्शनाची तळमळ वाढली. ती इतकी कीं, मनाच्या साऱ्या वृत्ती त्या तळ्ळींमत रमल्या. महान् संत रामकृष्ण परमहंस रात्रंदिवस कालिकामातेच्या टाहोंत रमलेले असत. आई ! दर्शन कधीं देशील ? या आर्तनादाशिवाय त्यांना आणिक छंद नसायचा. **परमार्थांत तळमळीला फार महत्त्व असतें.** तीव्रतर तळमळीशिवाय जगदीश भेटूंच शकत नाहीं. **त्याग व वैराग्याशिवाय जिवंत तळमळ पेटूंच शकत नाहीं.**

सद्गुरु गांडा महाराजानीं आत्मज्योत जागृत करून ती तेवत ठेवण्यासाठीं तपश्चर्या केली नव्हती तर सद्गुरुदर्शन होऊन सद्गुरु कृपा कशी लाभेल यासाठींच त्यांनीं आपलें तनमन वेंचिलें होतें. गुरुकृपेविना आत्मसाक्षात्कार कसा घडणार ? अशी तळमळ त्यांना बेचैन करीत होती. श्री सद्गुरु प्रसन्न झाले तरच ब्रह्मविद् अशा गुरुमाऊलीकडून ब्रह्मविद्या मिळणार हें सूर्यप्रकाशाइतकें सत्य होतें. परमार्थांत जिवंत तळमळ हें अप्रतिम साधन आहे. गुरुकृपा होतांच गुरुशिष्य एकरूप होत असतात. तें इतकें कीं व्यक्ती दोन दिसतील पण त्यांचा आत्मा एकच असतो. निखाऱ्यांत पडलेला कोळसा रहातच नाहीं. कोळसाच निखारा होतो इत्यादि सुबोध विचारसरणी सद्गुरु गांडा महाराजांची होती. ओहोळ नदीला मिळाला म्हणजे हें ओहोळाचें पाणी व हें नदीचें पाणी असा भेद रहातच नाहीं. ओहोळच नदी बनतो. तद्वत् गुरुकृपेच्या प्रसादानें शिष्यच गुरुवत् होत असतो. हें जग सत्य आहे.

गुरूदेव वासुदेवानंद सरस्वति या गुरूदेवाचे बोल आठवूं लागले.

## आत्मस्वरूपाची ओळख

सद्गुरु माऊली कोऽहं याबद्दल बोलूं लागली होती. आपल्या देहांत रहाणारी जी जाणीव जिच्या शुद्ध स्वरूपाला उदय व अस्त नाहीं. मी

रूपानें जिला आपण अनुभवतों, तिला अध्यात्मांत आत्मा म्हणतात. तिचें खरें स्वरूप जाणून घेण्यासाठींच मानव जन्म आहे. त्या जाणिवेला जाणण्याचें जें ज्ञान तेंच आत्मज्ञान. इंद्रियें सारीं सारीं कर्मे करतात. तीं त्याच्याच प्रेरणेनें. आत्माच साऱ्या कर्मांची पार्श्वभूमि आहे.

[ यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् , यच्चक्षुषा न पश्यति
येन चक्षूंषि पश्यति, यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते ]

**केन उपनिषद् १-६, ५-४**

जें वाणीनें व्यक्त करतां येत नाहीं, पण ज्याच्यामुळें वाणी बोलते; जें डोळ्यांनीं पहातां येत नाहीं, पण डोळे ज्याच्यानें पहातात; जें मनानें आकलन करतां येत नाहीं, पण मन ज्याच्यानें विचार करतें, **तो आत्मा होय**. आत्मा व्यक्त झाला असतां एक नवीन ज्ञान प्राप्त होतें. तिला कित्येक **प्रतिभा** म्हणतात. **संतांना आत्मज्ञानी म्हणतात, कारण त्यांच्यांत प्रतिभा पूर्ण विकसित झालेली असते.** म्हणून संतांचें जीवन म्हणजे दिव्य ईश्वरी जीवन समजतात. आत्म्याचें सर्व सामर्थ्य देहाचे द्वारेंच प्रगट होतें. देह नसेल तर आत्मा आहे हें कळणारच नाहीं. थोडक्यांत देहात्मयोगेंच अध्यात्म चालतें. बुद्धि ही देणगी इतर प्राण्यांपेक्षां मानवास ईश्वरानें दिलेली आहे. तिच्या योगानें आत्म्याचें ज्ञान साधकास होऊं शकतें. परमात्मा जगताच्या आरंभीं दिसूं लागण्यानें आरंभीं " एकोऽहं बहुस्याम प्रजायेय " असा संकल्प झाला. सत्त्वगुणाचा पूर्ण प्रभाव पडून बुद्धि अत्यंत स्वच्छ झाली असतां आत्म्याशीं तद्रूप होऊन आनंदाचा अनुभव तिला येतो. बुद्धीच्या ठिकाणीं आत्म्याशीं तद्रूप होण्याचें सामर्थ्य आणण्याचा जो मार्ग त्याला अध्यात्मविद्या म्हणतात. आपल्या मनाच्या सर्व वृत्ति ईश्वराच्या ध्यानांत समरस करणें हेंच अध्यात्मविद्येचें मर्म आहे. गोपींनीं प्रेमाच्या जोरावर हें सारें साधलें यांत शंकाच नाहीं. कबीराच्या नांवाचा सारे जयजयकार करीत तेव्हां

त्यांना थांबवून कबीर महाराज म्हणतात, लोकहो, तुम्ही कबीर कबीर असा जयघोष कां करतां ? जमुनातीरावर जा, गोपींनीं मनाच्या साऱ्या वृत्ति कृष्णाकडे वळविल्या त्यामुळें सर्वत्र त्यांना कृष्णच दिसतो.

क्या कहते हो कबीर कबीर।
जावे यमुना तीर।
एकेक गोपीके प्रेममें बहगये
कोट कबीर ॥

कोटी कबीरांची महति एका गोपीच्या प्रेमाइतकी आहे. गोपी अडाणी खऱ्या पण महान् अधिकारी व्यक्ति होत्या. महान् योगी **बाबू अरविंद म्हणत, नुसता नीतिमान मनुष्य हा चांगला खरा; पण आत्मदर्शनाशिवाय तो उत्तम पुरुष होऊं शकत नाहीं.**

अध्यात्मविद्येचीं प्रमुख चार लक्षणें आहेत. ( १ ) आत्म्याचा साक्षात् अनुभव येणें हें परमार्थाचें प्रथम, प्रधान व सर्वंकष लक्षण आहे. ( २ ) आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल पूर्ण संशयरहित बनणें हें दुसरें लक्षण. ( ३ ) आत्म्याच्या ठिकाणीं बुद्धि निश्चलपणें स्थिर झाल्यामुळें जीव आनंदमय बनणें हें अध्यात्माचें तिसरें लक्षण होय. ( ४ ) कर्तृत्वाचा अभिमान सोडून निःस्वार्थीपणानें म्हणजे निष्काम बुद्धीनें जगांतील दुःखी व दीन जनांची सेवा करणें हें परमार्थाचें चवथें लक्षण आहे. कर्तृत्वाचा अभिमान सोडणें पण कर्म बरोबर घडणें ही मोठी कला आहे. विश्वाच्या मागें परमात्मशक्ति असून जगामध्यें घडणाऱ्या गोष्टी तिच्या सत्तेनें घडून येतात हें श्रीकृष्णांनीं अर्जुनाला विराटरूप दर्शनानें दाखवून दिलें. जीवाच्या अंगीं कर्म करण्याची शक्ति मूळ परमात्मशक्तीपासून येत असते. म्हणून जीव दिसायला कर्ता दिसला तरी तो केवळ निमित्तमात्र असतो. तात्पर्य कर्तेपणाचा अभिमान सोडून, अगदीं निष्कामबुद्धीनें

जगाच्या कल्याणासाठीं, जन्मभर निष्काम कर्म करणें, परमात्म्यावर जीवापलीकडे प्रेम केल्यानें त्याचें अखंड अनुसंधान रहाणें, अनुसंधानानें बुद्धि तद्रूप होऊन परमात्म्याच्या अस्तित्वाबद्दल पूर्ण संशयरहित बनणें आणि या सर्वांचें पर्यवसान म्हणून परमात्मस्वरूपाचें साक्षात् दर्शन घडणें हें परमार्थाचें खरें स्वरूप आहे.

* * *

# किरण सातवा

## सद्गुरु गांडा महाराज यांचें द्वारकेकडे प्रयाण

मी तो कः पदार्थ । तुम्ही भगवान् समर्थ ।
पूर्ण केले मनोरथ । झालों कृतार्थ कुळासह ॥

(दत्तमहात्म्य अ. ९ ओवी १०२)

भडोच येथील चातुर्मास करून श्री. सद्गुरु गांडा महाराज गुरुदेवांच्या आदेशाप्रमाणें द्वारकेस आले. आपादमस्तक गुरुदेवांना साष्टांग नमस्कार घातला. बरेच दिवस अंतरलेली श्री गुरुमूर्ति डोळ्यांत सांठविली. सात्विक अष्टभाव दाटून आले. डोळे ओलावले व तोंडावाटें शब्दब्रह्म बोलूं लागले. गुरुदेवा !

निराधार आधार गुरुदेव फक्त ।
चरणांबुजीं दास असे आसक्त ।
तूं माऊली, बाळ उदास आहे ।
धरी हातिं बाळास, ही आस पाहे ॥ १ ॥
नसे लालसा, लक्ष्मीची नाहिं हांव ।
लोकेषणाला मनीं नाहिं ठाव ।
आत्मोपलब्धींत मन गुंगवावें ।
गुरुदेव सर्वस्व, नच अन्य ठावें ॥ २ ॥

अशी प्रार्थना करून सद्गुरु गांडा महाराज श्री. गुरुदेवांच्या सेवेंत रत झाले. आंत बाहेर त्यांना गुरुदेव दिसावयाचें. गुरूवरील अढळ निष्ठेचें ते प्रतीक होते. जेथें तेजस्वी दीप तेथें कीटक न बोलावितां जमावयाचेच

तसेंच श्रीगुरुदेव तेथें मानवमेदिनी जमावयाचीच अशी सारणी होऊन बसली होती. एके दिवशीं सायंकाळीं चारचा सुमार होता. स्वामींचे इतरांबरोबर वार्तालाप चालू होते. विषय रंगांत आलेला होता. तों सद्गुरु गांडा महाराजांची कर्तबगारी व सत्त्वपरीक्षा पहाण्याची ऊर्मी गुरुदेवांच्या मनांत आली. मध्येंच सद्गुरु गांडा महाराजांना गुरुदेवांनीं बोलाविलें. सहजासहजीं व ठराविक वेळांत न होणारें काम तांतडीनें करण्याची आज्ञा दिली. श्री. गांडा महाराजांची कार्यतत्परतेची कसोटी बघावयाची होती. कार्य सांगून तांतडीनें कर असें बजावलें. कसोटींत पास होणाराच पुढें पुढें विश्वासपात्र बनत असतो. मौलिक धातू सोनें यालाहि तीन कसोट्या लावितात. कस पाहिल्यावर तोडणें व अग्निदिव्य इतक्या कसोटींतून सोन्याला जावें लागतें.

**व्यवहारापेक्षां परमार्थांत कसोटीला फार महत्त्व असतें.** राजा हरिश्चंद्राचें सत्त्वहरण, श्रियाळ चांगुणाबाळाची सत्त्वपरीक्षा, दीपकाची गुरुभक्ति, यांत तर कसोटीनें परिसीमा गांठलेली दिसेल. कसोटी, व्यक्तित्त्वांत, तर–तम भाव ठरवते. गुरुदेव श्री. गांडा महाराजास म्हणाले, मी आतां येथून इतरत्र जाईन. तूं आजच शुक्रवारीं द्वारका बेटांत जा. तेथें श्रीकृष्ण दर्शन करून रविवारीं प्रभासपाटण येथें जा. तेथें बाळभट नांवाचा पुरुष आहे. त्याची द्वारका नांवाची नऊ वर्षांची मुलगी आहे. तिला मजबद्दल अनन्य प्रेम आहे. ती मजसाठीं, माझ्या दर्शनासाठीं सारखी टाहो फोडून रडत आहे. तिला दर्शनाचा निदिध्यास लागला आहे. म्हणून ती सारखी रडते आहे. तिची समजूत घाल. दोन शब्द सांत्वनपर तिच्याशीं बोल. नंतर तेथून गिरनारला जा. गिरनारची यात्रा कर व दिवाळीच्या सुमारास मला राजकोट येथें भेट, अशी आज्ञा दिली. गुरूच्या आज्ञेंत किंचितूही कानामात्रेचा बदल न करतां शब्दशः गुर्वाज्ञा पाळणाराच सच्चा शिष्य गणला जातो, ही भूमिका श्री. गांडा

महाराज यांची होती. गुरु-आज्ञा म्हणजे वेदवाक्य. सबबी सांगणारा परमार्थांत काय किंवा व्यवहारांत काय हीणकस समजला जातो. शुक्रवारीं आज्ञा झाली. गांवीं जाण्याच्या तयारीस लागले. स्वामीजवळ बरेच शिष्य बसलेले होते. त्यांतील एक म्हणाला, महाराज ! आतां या वेळेला द्वारका बेटांत जावयाला नाव कशी मिळेल ? रोज एकदांच नाव जाते. दुपारीं येऊन चार वाजतां द्वारकाबेटाकडे नाव जात असते. उद्यां म्हणजे शनिवारीं दुपारीं दोन वाजेपर्यंत समुद्रकिनारीं पोहोचावयास पाहिजे. मग घाई कां ? येथून श्री गांडा महाराज पहांटेस निघतील तर बरें. दुष्काळाचे दिवस रात्रीं निघणार. लुटमारीचा संभव इ. धोका टाळतां येईल. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं हें सारें बोलणें ऐकिले. पण मूग गिळून ते चुपचाप बसले. दिलेल्या आज्ञेंत बदल करण्यासारखें त्यांना कांहीं वाटलें नाहीं. शिष्य कल्याण पूर्ण निर्भय, त्याला भीति कसली ? श्री गुरु पाठीशीं असतांना अशक्य काय आहे ? इतका दांडगा आत्मविश्वास श्री. गांडा महाराज यांना होता. हा क्षणभंगूर देह केव्हांतरी जाणारच मग तो गुरुकार्यीं गेला तर काय वाईट ? कर्त्यापुढें सुखदु:खाची काय पर्वा ?

ते गांगरले नाहींत. लोकांनीं दाखविलेल्या भीतीला डरले नाहींत. श्री. गुरुदेवदत्त म्हणून गुरुदेवांना साष्टांग नमस्कार घातला. आज्ञा घेतली व लगेच तडक निघाले. रात्र त्यांना काय करणार ? भीतीला ज्यांची भीति वाटत होती असे सद्गुरु गांडा महाराज यांनीं सारा प्रवास रात्रींच करून समुद्रकिनारा गांठला. पण पुढें जावयास नावेचा पत्ता नव्हता. निराशेंत नावेची वाट पहात बसले. नाव येण्याचा संभव नव्हता. गुरूंच्या साऱ्या आज्ञा कशा पाळतां येणार म्हणून त्यांचा जीव वरखालीं होत होता. ईश्वरकरणी नारळांत पाणी अशांतली गत. पहातां पहातां एक नाव आली, व जेथें सद्गुरु गांडा महाराज बसले होते तेथें ती थांबली. नाव आली.

आशा उत्पन्न झाली. भक्तकामकल्पद्रुम भगवान भक्तांच्या इच्छा पुरवीत असतो असें क्षणभर वाटलें.

गुरूच्या आज्ञेच्या पालनार्थंच ही नाव तुजसाठीं आली बघ, असा मनांत आभास (साक्षात्कार) झाला. नावेंतील तीन उतारू उतरले. श्री. गांडा महाराज नावेंत बसणार तोंच नावाड्यानें बसूं देण्यास मज्जाव केला. ही उतारूंची नाव नाहीं, ही स्पेशल नाव आहे. तिच्यांत इतर बसूं शकत नाहीं. असे नावाड्याचे उद्गार ऐकतांच तोंडांतील घांस कोणीतरी हिसकाबून घ्यावा असें श्री. गांडा महाराज यांना झालें. त्यावर सद्‌गुरु म्हणाले, नाव येण्याचा संभव नव्हता आली. तींत बसावयास नकार मिळावा हीच का देवा! तुझी अगाध लीला. पोहून जावयाची आज्ञा गुरुदेवांनीं केली असती तर मी पोहूनही गेलों असतों. पण गुरु आज्ञेच्या बाहेर जावयाचें नाहीं. नाव उभी आहे, परत जावयाची आहे पण तींत बसावयास मनाई आहे. भगवान दत्ता! तुमची काय इच्छा आहे? नाव आली एवढेंच मधाचें बोट तोंडास लावणार काय? देवा! तूंच साऱ्यांचा जगताधार आहेस. जगसूत्रधारही तूंच आहेस. अशी मनापासून देवाची प्रार्थना केली. प्रार्थना ऐकून कीं काय, निराशेचीं चाकें फिरवून आशेवर आणलीं. देवाच्या अगम्य लीला अतर्क्य असतात हेंच खरें. सद्‌गुरु गांडा महाराजांनीं नावाड्यास विचारलें. मला नावेंत बसायचें असेल तर कोणाची परवानगी पाहिजे? त्यावर नावाडी म्हणाले, महालकरी नारायणराव साहेबांची परवानगी हवी. त्यावर सद्‌गुरु म्हणाले, अरे, मला त्यांच्याच घरीं जावयाचें आहे. तुम्ही जर नेणार नाहीं तर ते तुम्हांला रागावतील. असें ऐकतांच नावाड्यांनीं श्री. गांडा महाराज यांना नावेंत बसविलें व द्वारका-बेटांत उतरविलें. तेथेंहि शिपायांनीं पास मागितला नाहीं. ईश्वराची भुरळ.

कारण श्री. गांडा महाराजांना परवानगी ईश्वराचीच होती. देव सहायक असल्यावर कोणाला कशाची कमतरता असणार ?

नावाड्यांनीं हे महालकरी साहेबांचे पाहुणे आहेत असें सांगतांच पहारेकरी चुप राहिले. नावाड्यांनीं सद्गुरूंना महालकरी साहेब नारायणराव यांच्या घरीं पोहोंचविलें. ते सारे स्वामि वासुदेवानंदांची वाट पाहातच होते. शुद्ध संकल्पाची सिद्धि करण्याची सर्व जबाबदारी परमेश्वर स्वतः आपलेच शिरावर घेत असतो. **सद्गुरूंच्या तपश्चर्येचें बळ सत् शिष्याच्या पाठीशीं असते. पण केव्हां ? साधक, साऱ्या गोष्टी सर्वस्वीं ईश्वरावर, गुरूवर सोपवितो तेव्हां ?** साधकास आपला अहं मध्येंच वापरण्याची खराब संवय असते. त्यामुळें परमेश्वर दुरावतो. ज्या शिष्याचा अहंचा पडदा फाटलेला आहे तो शिष्य देवाचा लाडका असतोच असतो.

गुरुदेवांच्या कृपेनें शुक्रवारींच श्री. गांडा महाराज बेटांत पोहोंचले. आपल्या घरीं अकस्मात् श्री. गांडा महाराज आल्यामुळें आनंद तर वाटलाच पण आश्चर्यही वाटलें. गुरुदेव केव्हां येतील ? या महालकरी साहेबांच्या प्रश्नावर आज ते राजकोटाला येतील असें सद्गुरु उत्तरले. गुरुदेव न आल्यामुळें झालेली निराशा त्यांचे सत्शिष्य त्यांनीं पाठविल्या-मुळें जाणवली नाहीं; समाधान वाटलें. येथील देवदेवांचें दर्शन करून नंतर मला तातडीनें प्रभास पाटण येथें जावयाचें आहे असें सद्गुरूंनीं नारायणरावास सांगितलें. अशी गुरु आज्ञा आहे. तेथें रविवारीं पोहोंचून गिरनार, गिरनारजी यात्रा करून दिवाळीच्या सुमारास राजकोट येथें गुरुदेवांच्या चरणापाशीं जावयाचें आहे. गुरु आज्ञा वेदप्रमाण. त्या आज्ञे-बाहेर मी दुसरे कांहींच करूं शकत नाहीं असेंहि निक्षून सांगितलें. मुदतींत हें सारें घडणें कठीण होतें. पण सारें करायचें असा त्यांचा ठाम निश्चय होता. महालकरी साहेबांनीं एक ब्राह्मण वाटाड्या सोबत दिला. त्यानें सर्व देवादिकांचीं मंदिरें दाखविलीं. भोजनानंतर द्वारकेस जावयास

निघाले. द्वारकेंत गेल्यावर प्रथम गोपीतलावाचें दर्शन घेतलें. नंतर श्री नागनाथाचें दर्शन घेतलें. नंतर बाळंभटाचे घरीं जाऊन बालिका द्वारका हिला गुरुदेवांचा निरोप सांगितला व तिचें सांत्वन करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. श्रीकृष्णांनीं शोकविव्हल गोपींची समजूत घालण्यासाठीं श्री उद्धव यांना असेंच पाठविलें होतें. बिचारा उद्धव! भावावेशाचा आविष्कार पुस्तक-पंडितांना कसा समजणार? भावावेशांत चूर असणाऱ्या व्यक्तीपुढें कोणाचीच मात्रा चालत नाहीं. तो शोकाग्नी, विरहाग्नी इतका ज्वाज्वल्य असतो कीं तो आवरणें हें काम महाकठीण असतें.

नऊ वर्षांच्या द्वारकेची समजूत सद्गुरु घालूं शकले नाहींत. त्यांनीं शिकस्तीचा प्रयत्न केला पण ती शांत न होतां उलट अधिक ओक्साबोक्शीं रडूं लागली. ही सारी हकिकत श्री. गांडा महाराजांनीं गुरुदेवांना कळविली. तेंव्हां असें आहे तर चिरंजीविनी द्वारका हीस राजकोटांत दर्शन होईल असें कळवा असें गुरुदेवाकडून उत्तर आलें होतें. भावनांचा आविष्कार म्हणजे खवळलेला दर्याच! प्रेमाच्या साम्राज्यांत पांडित्याची कदर नसते. तिचा तो आवेग इतका जोरांत होता कीं, गुरुदेवांच्या दर्शनावाचून तिचा प्राण निघून जातो कीं काय असें वाटे.

तेथून श्री. गांडा महाराज पुढें जावयास निघाले. पुढें आपल्या वडिलासह कुमारी द्वारका राजकोट येथें सद्गुरु वासुदेवानंद सरस्वति महाराज यांना भेटली.

सद्गुरु गांडा महाराज गुर्वाज्ञेप्रमाणें गिरनार, गिरनारची यात्रा इत्यादि प्रवासास गेले. मनांत गुरुभक्ति पूर्ण सळसळत होती. गुरु प्रसन्न झाले तरच जन्माचें सार्थक होण्याची शक्यता असा आंतला आवाज निघत होता. गुरुकृपा कशी लाधेल हा एकच ध्यास मनांत रात्रंदिवस घोळत होता.

गुरुभक्तींत स्वतःला विसरावयाचें असतें. सेवा करतांना खऱ्या सेवकाचें

स्वतःचें व्यक्तित्व उरत नसतें. शिष्याचें व्यक्तित्व गुरुसेवेंतच सामावलेलें असतें, अंग राखून केलेली सेवा खरी सेवा नव्हेच नव्हे, तें सेवेचें केवळ विडंबन असतें, अशी उदात्त विचारसरणी सद्‌गुरु गांडा महाराजांची होती. आईचें बालकावर निर्भर प्रेम असतें. पण वृद्धपणीं हेंच तान्हुलें आपल्या उपयोगी पडेल अशी सुप्त आशा त्या मातृहृदयांत दडलेली असते. प्रेमांत विलक्षण सामर्थ्य व अचाट शक्ति सुप्त असते. या प्रेमाचेंच रूपांतर प्रेमाभक्तींत होत असतें. गोप, गोपी व बालकृष्ण कन्हैया इतके वेडावले होते कीं, त्यांचा द्वैताचा पडदा फाटून ते अद्वैतमय बनले गेले. श्री उद्धवाला आपल्या ज्ञानाची घमेंड होती. पण तो अद्वैत प्रेमाला पारखा होता. गोपींची कृष्णावरील प्रेमाभक्ति पाहून त्याचा ज्ञानाचा पारा इतका खालीं उतरला कीं, धन्य या गोपी, त्यांच्यापुढे मी ज्ञानी असूनही कःपदार्थ आहे. परमात्मा-साधनांत या अडाणी गोपीच माझ्या गुरु ठरल्या असे सहजोद्‌गार श्री. उद्धवाच्या तोंडून बाहेर पडले. परमात्म-दर्शनांत ज्ञान हें अडसर ठरतें. **पराभक्ति हाच परमात्मदर्शनाचा सहजसुलभ असा राजमार्ग असतो.** गुरुवरील निस्सीम प्रेमाशिवाय सद्‌गुरु गांडा महाराज दुसरे कांहीं जाणतच नव्हते. **मातृहृदयासारखी त्यांच्या शिष्यहृदयांत कोणतीच सुप्त आशा नव्हती.** आई आपल्या तान्हुल्याची जोपासना जितकी करीत असेल त्यापेक्षांहि कांकणभर अधिकच ते आपल्या गुरु-सेवेंत दक्ष होते.

**ततो याति परां गतिम** । ही भगवानोक्ति सद्‌गुरु गांडा महाराजांनीं आचरणांत आणली होती. वेदान्त हा विषय बोलावयाचा नसून आचरण्यांत आणण्याचा आहे असा त्यांचा ठाम निश्चय होता. वाचा व वृत्ति, शद्ब व आचारण यांचा मेळ घालणाराच आपल्या जीवनाचें सार्थक करूं शकतो असा त्यांचा दृढविश्वास होता.

## राजकोटची दीपावली

योग शिरोमणी परिव्राजकाचार्य दत्तावतार श्री. वासुदेवानंद सरस्वति यांची या वर्षीं दीपावली राजकोट येथें झाली. बरोबर सद्‌गुरु गांडा महाराज होते. गाय तेथें वासरूं असणारच. योगशिरोमणी वासुदेवानंद सरस्वति यांनीं सद्गुरु गांडा महाराजांना गिरनारची यात्रा करावयास पाठविलें व परत येथेंच येऊन भेटण्याची आज्ञा दिली. गिरनारहून आल्यानंतरच उभयतांनीं राजकोट सोडलें. नंतर सरस्वति नदीच्या कांठीं असलेल्या सिद्धपूराला हाटकेश्वराच्या शिवालयांत त्यांनीं मुक्काम केला. सिद्धपुरालाच मातृगया म्हणतात. आईच्या मुक्तीसाठीं श्रद्धाळू लोक तेथें आईचें श्राद्ध करण्यासाठीं दुरदुरून येत असतात.

## कर्नाटकीय तेजस्वी ब्रह्मचारी

मातृगयेला हाटकेश्वराच्या देवळांत एक तेजस्वी, बालब्रह्मचारी कर्नाटकीय युवकाचा मुक्काम त्याच शिवालयाजवळ होता. त्याला बघतांच योगसिद्ध वासुदेवानंद सरस्वति यांचे डोळे भारले गेलें. अनंत जन्मींचा पुण्यात्मा हा योगभ्रष्ट आहे, तेजःपुंज आहे अशी त्यांची परीक्षा झाली व आनंद वाटला. जवाहिऱ्याशिवाय रत्नाची पारख कोण करणार? कोंबड्याला रत्नाचें महत्त्व कसें समजणार? नाना तऱ्हेच्या अफवा, अपवाद ठेवून या योगभ्रष्टाला गांवकऱ्यांकडून त्रास होत असावा असेंहि त्यांच्या कुशाग्र बुद्धीनें ताडिलें. त्याच्या नेत्राच्या तेजावरून त्याची योगाची तयारी चांगली आहे अशी त्यांची खात्री झाली. कोंबड्याला रत्नापेक्षां ज्वारीचा दाणाच रुचणार अशी दैना गांवकऱ्यांची होती. ब्रह्मचाऱ्याच्या अध्यात्मिक उन्नतीची गांवकऱ्यांना कसची कल्पना येणार? पण ब्रह्मचाऱ्याच्या आत्मानंदाबद्दल योगशिरोमणि स्वामींना फारच आस्था वाटली.

## वयाचा ब्रह्मज्ञानाशीं संबंध नसतो

बालवय व अध्यात्मिक उन्नति यांचा व्यावहारिक दृष्ट्या संबंध इतका नसतो. तसें असतें तर **बाल ध्रुव**–पांच वर्षांचा बालक–याला श्रीहरी कां पावला असता ? **ज्ञानशिरोमणि श्री ज्ञानोबा माऊली** यांनी वयाच्या तेराव्या वर्षी ज्ञानेश्वरीसारखा अध्यात्मपर ग्रंथ लिहिला. आपल्या पूर्वजन्माची अपुरी तपस्या या ब्रह्मचाऱ्यानें बालवयांतच सिद्ध केली असावी असें गुरुदेव श्री. वासुदेवानंद यांना वाटलें. **आत्मा आत्म्याची ओळख आपोआपच करून घेत असतो.** उभय व्यक्तींनीं मनोमनीं परस्परास अभिवादन केलें. या बालब्रह्मचाऱ्यानें चारीधाम यात्रा केलेली होती इतकेंच नव्हे तर त्यानें नारायणीय गंगोत्रीसारखी अति बिकट यात्राही केलेली होती. महानयोगी श्री वासुदेवानंद सरस्वति जे बोधपर दोन शब्द इतरांना नियमानें ऐकवीत त्या वेळीं हा बालब्रह्मचारी हजर असायचाच व नित्यानंदांत तन्मय व्हावयाचा. गुरुदेव तेथें अलोट जनसमुदाय लोटावयाचाच. बालब्रह्मचाऱ्याचें जनतेकडून हाल होतात ही जाणीव मनांत ठेवून एकदां आपल्या ज्ञानपूर्ण उपदेशामृतांत खऱ्या संतांचीं लक्षणें कोणतीं ? व तो ओळखावा कसा ? याचें गुरुदेवांनी सुंदर विवरण केलें होतें. तें मननीय आहे म्हणून थोडक्यांत त्याचा भावार्थ देतों.

## खऱ्या संतांची ओळख

कठोर कर्मकांडाचा त्याग करणें जसें जरूर आहे, तितकाच स्वच्छंदी कर्महीनतेचा त्याग करणें अत्यावश्यक आहे. ज्या कर्मांनीं प्रभूशीं अनुसंधान साधत नाहीं अशा कर्मांचा त्याग केलेला बरा. पण ज्या कर्मानें स्वतःचें मन कर्मनिष्ठ बनतें, तसेंच ज्या कर्मानें आत्मानुसंधान अखंडित चालू रहातें व मन स्वरूपनिष्ठ होतें अशीं कर्में अवश्य केलीं जावींत. अशीं कर्में करावीं कीं ज्यायोगे आत्मानुसंधान स्थिर राहील. अशा कर्मांनींच

साधकांनीं शांति समाधान प्राप्त करून घ्यावी. संतांचें वर्तन याच तत्त्व-प्रणालीनुसार होत असतें. अनाचार व अत्याचार यांच्यामधील सदाचाराचा विहित मार्ग संतांचा असतो व त्यानुसार ते वागत असतात. वर्णसंकर होणें हें जसें वाईट तसेंच वर्णाभिमानी बनणें हेंही वाईट हे दोन्ही मार्ग साधकाच्या अधःपतनास कारणीभूत होत असतात. म्हणूनच शास्त्रानें दिनप्रतिदिन प्रगति होण्यासाठीं व मार्ग आक्रमण्यासाठीं सदाचाराचा मधला मार्ग सुचविला आहे. सदाचार मार्गानेंच मानवांत मानवता येते. मानवतेचा खरा साक्षात्कार झाल्यावर व तो आचरणांत ठामपणें आल्यावरच मानव देव बनत असतो.

## संत

या प्रकारें आचार व विचार यांचा मेळ घालून ज्याला समाधानानें जीवन जगतां येतें तोच खरा संत! संत उभयपक्षीं मनाचा तोल सांभाळीत असतात. कर्म, ज्ञान, तप, योग, जप, वेदाध्ययन आदि शास्त्रविहित कर्में आत्मोन्नतीसाठींच असतात. पण यांतील मूळ हेतूचा विपर्यास होऊन वृथाभिमान वाढत असतो. व अभिमान, ताठा, गर्व, वृन्यूनगंड यांनीं भारलेले शब्दपंडित वादविवाद करून जेव्हां हमरीतुमरीवर येतात तेव्हां झगडतात व तत्त्व न समजल्यामुळें नाश पावतात. संत असल्या वाद-विवादाच्या भानगडींत पडत नसतात. खरा संत वादविवाद टाळतो पण तत्त्वप्रणालीनुसार वर्तत असतो. **मितभाषी संत, सदासर्वकाळ हित-भाषीच असतात.** वेदादि शास्त्रें व त्या अनुसार वर्तन यांतच त्यांचें सारें लक्ष केंद्रित झालेलें असतें म्हणूनच ते वादविवादांत पडत नसतात. शास्त्राज्ञा व कृति, आचरण यांचा मेळ ठेवण्यांत ते सदा दक्ष असतात. संत सत्य वस्तूला धरूनच आत्मानुसंधानपूर्वक शरिराकडून कर्में करून घेत असतात. त्यांचा दृष्टिकोन सामान्यापेक्षां निराळा असतो.

तो समजून घेण्यासारखा आहे. तो नीट न समजल्यामुळेंच मानव ते मानव रहातात. मानवतेचा ध्येयबिंदू ते गाठूं शकत नाहींत.

## मानव कायेचें महत्त्व व ध्येयबिंदु

संत समदृष्टि असतात. समदृष्टि म्हणजे एकच परमात्म तत्व बहुविध-रूपानें नटलेलें आहे हें जाणणारी जी दृष्टि ती सम्यक दृष्टि. प्रभूवांचून दुसरें नाहींच. सर्वत्र प्रभू बघणारी ती सम्यक दृष्टि, मुंगी, कीटक, हत्ती, साप, सिंह, यांच्या रूपांतही त्यांना परमेश्वर दिसत असतो. हरी हेच सर्वसाधन किंवा आराधनेचा मध्यबिंदू संत समजत असतात. सर्वत्र परमेश्वर बघणें हाच जीव-नाचा मध्यबिंदू समजून आपला जीवन-प्रवाह एखाद्या नदीप्रमाणें प्रभूसा-गरास मिळवावयाचा हा संतांचा इष्ट संकेत असतो. प्राणिमात्राचा रंगरूप, आकार, गूण, अवगूण याकडे न पहाता प्रत्येकाला हरिरूप मानण्याची संवय संतांना झालेली असते. प्राणिमात्रांच्या हितासाठी मान, अपमान समान लेखून प्रसंगोपात आत्यंतिक कष्ट सोसावे लागले तरी आनंदानें, शांतीनें समाधानानें देहाध्यासाकडे न बघतां प्राणिमात्रांचे हितार्थच देह झिज-विण्यांत संतांना धन्यता वाटत असते. अनासक्तभावानेंच संतांकडून कर्में होत असतात. अशा प्रकारें परमात्मभावानें जीवन जगण्यांत मानव कायेचें महत्त्व आहे. हाच ध्येयबिंदू मानवाला गांठावा लागणार आहे. ईशभावें सर्वत्रांना बघण्यांतच मानव जन्माचें सार्थक आहे. अशा रीतीनें प्राणिमात्रांत प्रभूला पहाणाऱ्या व प्रभूंत प्राणीमात्र बघणाऱ्या साधकालाच समदृष्टि लाभत असतें. अशा समदृष्टि असलेल्यांना शत्रू, ना मित्र. सारेच परमेश्वर वाटतात. जें जें कांहीं दिसतें तें सारें ब्रह्मच. जिकडे पहाल तिकडे श्रीहरीच बहुविधरूपें नटलेला दिसत असतो.

## खरें हरिभजन

वर सुचविलेल्या ब्रह्मयुक्तभावाचे बनून, निरपेक्षपणें, निरहंकारानें, कर्तव्यनिष्ठा या ध्येयानें प्रेरित होऊन अनासक्त भावानें जीं जीं कांहीं

कार्यें घडतात तें खरें हरीभजन होय. आपल्या अशा कार्यानें दुसऱ्यांना जें सुख होतें तें कार्य म्हणजेच परोपकार. पण परोपकाराच्या हेतूनें केलेलें कर्म प्रभूला मान्य नाहीं व तो परोपकारही नाहीं. प्रत्येक प्राणिमात्रांत प्रभूचें रूप बघून, अहंचा त्याग करूनच नव्हे तर अहंचें पूर्ण विस्मरण करून, काया, वाचा, मनानें परहितासाठीं जीं कर्मे केलीं जातात, तीं कर्मेच हरीचें खरें भजन होय. अशा परहितकर्मांतच संत सदा रमलेले असतात. परपीडनाच्या दृष्टीनें संताकडून कोणतेंच कार्य घडत नसतें. प्राणिमात्रांची सेवा हीच खरी प्रभुसेवा होय. हेंच खरें प्रभूचें भजन, हेंच परमात्म्याचें खरें पूजन होय. हेंच मोक्षप्राप्तीचें खरें साधन होय. यामुळेंच मनाला अखंड शांतीचा लाभ मिळतो. श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य यांच्या ओघवती वाणींतून निघालेल्या शब्दांनीं वेदशास्त्र-श्रुति यांची शिकवण अगदीं सहजसुलभ भाषेंत पटवून दिली गेली. या गोष्टी साऱ्यांनाच कशा पटणार? जे अनुसंधानी असतील त्यांना हे अमृतबोल वाटले. मायाबद्धांना यांतील मर्म व तत्त्व कसें उमजणार? माया, विक्षेप, आवरण हीं पटलें दूर झाल्याशिवाय खरा अर्थबोध होणेंच कठीण आहे.

## खरा भाग्यवान तो ब्रह्मचारी

मानव जन्मांत येऊन भाग्यमरण भाग्यवानांनाच कसें लाभतें याची रूपरेखा या प्रकरणांत बघावयास मिळेल. पूर्वसंचितानुसार असल्या साऱ्या घटना घडत असतात. गांवांत तो बाल ब्रह्मचारी संग्रहणी रोगानें इतका अत्यवस्थ झाला कीं, केवळ हाडांचा पिंजरा झाला. चलन-वलन थांबले. गांवांत त्याजकडे कोणी ढुंकूनही पाहिना. त्याचा सारा भार ईश्वरावर होता. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वतींना ही बातमी सजतांच सद्गुरु गांडा महाराजांना त्यांच्या शुश्रूषेस पाठविलें. येत्या पोर्णिमेस तो देह सोडील तेथपावेतों त्याची अति काळजी घ्यावयाची आज्ञा केली. संत हृदय लोण्यासारखें असतें. ब्रह्मचाऱ्याच्या

शुश्रूषेची गुरुदेव वारंवार विचारपूस करीत. पोर्णिमेचा दिवस उजाडला. ब्रह्मचाऱ्याचें देहभान सुटलें, तो निश्चेष्ट स्थितींत पडलेला होता. त्याचा अंतिम समय आलेला होता. त्यास होणाऱ्या क्लेशांचें किती वर्णन करणार? भाग्यवानांचे योगायोग पूर्वपुण्य संचितानें अंतसमयीं फलोन्मुख होतात. भीष्म पितामहांना अंतसमयीं श्रीकृष्णांनीं परमात्मदर्शन दिलें व त्यांना भाग्यमरण लाभलें. त्या ब्रह्मचाऱ्याच्या अगदीं अंतसमयीं दत्त म्हणून योगश्रेष्ठ परममांगलिक श्री वासुदेवानंद सरस्वति गुरुदेव तेथें आले. त्यांनीं स्वहस्तानें ब्रह्मचाऱ्याच्या अंगावर कमंडलूंतील तीर्थ अभिमंत्रित करून टाकलें. या रूपें अनायासेंच गंगास्नान त्यास घडलें. थोडेसें तीर्थ पाजलें. तें तीर्थ कसलें? गुरुदेवाच्या हस्तें त्या ब्रह्मचाऱ्याला अमृतपान घडलें त्यायोगे तो ब्रह्मचारी शुद्धीवर आला. त्यानें डोळे उघडले. गुरुदेवाकडे डोळे भरून पाहिले. गुरुदेवचरणीं प्रणिपात केला. कृतार्थ व पावन झाल्याचें समाधान त्याच्या हास्यरूपानें प्रगटलें. गुरुमाऊलीनें आत्मानुसंधानांत निमग्न रहाण्याची आज्ञा दिली. तो स्वरूपमग्न असतांनाच त्या ब्रह्मचाऱ्याला भाग्य मरण आलें. प्रति दत्तभगवान असणाऱ्या गुरुदेवाकडून तीर्थसिंचन, तीर्थरुपानें घडविलेलें अमृतपान, अंतसमयीं सद्गुरूच्या कृपादृष्टीचा लाभ, आत्मानुसंधानांत देहत्याग व गुरुमाऊली दत्त भगवान समक्ष असतांना मरण यासारखें भाग्यमरण कोणतें? बाल ब्रह्माचाऱ्याची अविरत सेवा जशी सद्गुरु गांडा महाराजांनीं केली, तशीच गुर्वाज्ञेनें त्या बालब्रह्मचाऱ्याची सद्गति इत्यादि क्रिया सद्गुरु गांडा महाराजांनींच केल्या. पूर्वपुण्य संचिताच्या योगभ्रष्टाची शुश्रूषा व सद्गति सद्गुरु गांडा महाराजासारख्या योगभ्रष्ट पुण्यात्म्याकडूनच घडावी असें नियतीनें ठरविलेलें असल्यामुळेंच अनपेक्षित असा अमृतसिद्धि योग त्यांना गुरुकृपेनें लाभला.

* * *

# किरण आठवा

## तें सिनोर

सद्गुरु गांडा महाराजांच्या अंतःकरणांतील ज्वलंत तळमळीला श्रीमत् परिव्राजकाचार्य योगप्रवर्तक वासुदेवानंद सरस्वतीसारख्या महान तेजस्वी अशा सत्पुरुषाचें प्रथमच ज्या गांवीं दर्शन घडलें तें गांव सिनोर. अचळ अढळ श्रद्धा पाहून अविरत सेवेनें गुरुदेवांनीं सद्गुरु गांडा महाराजांना आपला म्हटलें व नितांत शांतता ज्यांना बहाल केली तें स्थळ हें सिनोर गुरुदेव वासुदेवनंद व सद्गुरु गांडा महाराज यांचें नातें पुरुष, व पड-छाया यांसारखे अभिन्न घडविणारें तें सिनोर. सद्गुरु गांडा महाराजांना या सिनोर गांवाचें आगळें महत्त्व वाटल्यास नवल काय ?

सिद्धपूर सोडून उभयतांचा पुढील प्रवास सुरू झाला. गुजराथचें पंढरपूर अशा डाकोर क्षेत्रांत ते आले. डाकूरजींचें दर्शन घेतलें व पुढील पर्यटन करतां करतां नर्मदा तटाकीं सिनोर येथें आले. सिनोरहून तिलकवाड्यावरून गुरुशिष्य जोडी चिखलदा येथें आली. तेथें चातुर्मास करून ते मंडलेश्वरीं आले. तेथें **श्री दत्तभगवान प्रभू यांनीं समर्थ वासुदेवांना साक्षात्कार दिला कीं,** उज्जयनी येथे तुमचे दंडगुरु श्री. नारायणानंद सरस्वति अतिशय आजारी आहेत म्हणून त्यांच्या सेवेला त्वरित जावें. त्यांची सेवा उत्तम प्रकारें करावयाची अनुज्ञा श्रीदत्तांनीं गुरुदेवांना दिली. खऱ्या भक्ताचें आपलें सारें जीवन श्री सद्गुरुच्या स्वाधीन असतें. त्वरेनें ही गुरुशिष्य जोडी उज्जयनीस आली. अधिकारी पुरुष **नारायणानंद सरस्वति** यांच्या शुश्रूषेस लागली. सुमारें सात आठ महिन्यांचा काळ हां हां म्हणतां निघून गेला. योगश्रेष्ठ नारायणानंद सरस्वति

पूर्ववत् हिंडूं फिरूं लागले. नंतर क्षिप्रा नदी तटाकी असलेल्या महत्पूरगांवीं ही गुरुशिष्य जोडी आली. निष्काम गुरुसेवेइतकेंच प्राणिमात्रांच्या सेवेला महत्त्व आहे हें तत्त्व गुरुदेवांच्या सहवासानें सद्‌गुरु गांडा महाराज यांच्या आचरणांत दिसूं लागलें. **उत्कृष्ट सेवा म्हणजेच देहअहंता व ममत्व झडण्याचें उत्कृष्ट साधन या मताचे ते** बनले. परमात्मदर्शनाचा हमरस्ता निरहंतेनें केलेली प्राणिमात्राची सेवा हीच होय.

आपलें सारें सारें आहे तें गुरुदेवाचें. सर्वस्वी प्रेरक तोच असा अढळ विश्वास शिष्याच्या अंतःकरणांत खोलवर रूजतो. हा एकनिष्ठ भावच परमात्म्याला आवडत असतो. गुरुची आज्ञा प्रमाण. **गुरु सतत माझ्या पाठीशीं उभे आहेत असा दांडगा आत्मविश्वास उत्पन्न झाला तरच भक्तीचा खरा अर्थ त्या शिष्याला समजला असें समजलें जातें; मनाची अशी दांडगी तयारी झाली तरच परमात्मतत्त्व भक्ताचें महत्त्व वाढविण्यासाठीं धांवत येत असतें.** जो कैक वर्षें तपश्चर्या करणाऱ्या ऋषीमुनींना स्वप्नांतही दर्शन द्यावयास तयार नसतो तोच श्रीहरी जनाबाईंचीं लुगडीं धुतो, तिच्याबरोबर दळूं लागतो, अर्जुनाचीं घोडीं धुतो; अगदीं प्रातःकाळीं स्नान केल्याविना कर्माबाईंनीं केलेली खिचडी खावयास आतुरलेला असतो. हें कशाचें फळ? तर अप्रतिम गुरुसेवेनें परमात्मशक्तीशीं शिष्याचें जडलेल्या नात्यांचेंच हें अमृत संजीवनी फळ होय. गावबासारख्या अडाणी अक्षरशत्रूला भावार्थ रामायणासारख्या अध्यात्मविचाराचा उर्वरित राहिलेला भाग संत एकनाथांनीं लिहावयास लाविला यांत गुरुतत्त्वाच्या अप्रतिम तेजाचा उच्चतम आविष्कार घडविला नाहीं तर काय? गुरुतत्त्वाचें अमृत ज्या भाग्यवानास चाखावयास मिळालें तो ज्ञानसूर्य अडाणी राहूंच शकत नाहीं. स्त्रीराज्यात अडकलेल्या सद्गुरु मच्छिंद्रनाथास सोडवावयास स्त्रियांच्या संगीत काफिल्याबरोबर स्त्रीवेषांत सच्छिष्य नाथपंथ शिरोमणि गोरखनाथ यांनीं तबल्यांतून चलो मच्छिंदर गोरख आया,

असे बोल वारंवार काढून सद्गुरुंना सूचन केले. गोरखनाथ कोणत्या गायनशाळेंत तबला शिकावयास गेले होते ? गुरुतत्त्वाचा हा विजय आहे. निस्सीम गुरुसेवेचा हा आविष्कार आहे. गुरुतत्त्व काय करूं शकत नाहीं ? अशा सेवेंत सद्गुरु गांडा महाराज सदा सर्वदा निमग्न असत. सत्संगांत अमृत वर्षत असते. मेघबिंदू पिण्याचें भाग्य चातकासारख्या भाग्यवानाच्या नशिबीं असतें. चातक मेघबिंदूवांचून अन्य पाणी पिऊंच शकत नाहीं, तसेच सद्गुरु गांडा महाराजांची मनोवृत्ति गुरुसेवा, शुश्रुषा याविना अन्यत्र कधींच रमली नाहीं. सद्गुरु गांडा महाराज गुरूदेवांची सेवा करतांना गोपगोपीप्रमाणेंच देहभाव विसरून जात. ते देहाला काय कष्ट पडतात हें कधींच बघत नसत. **कार्य कितीहि कष्टतर असो, जे सदा अंतःप्रेरणेनें घडत असते, त्या कार्याला थकवा हा शब्दच अपरीचित असतो.** मन रमविल्याविना जीं जीं कार्यें घडत असतात अशा कार्यांत थकवा यावयाचाच असा अटळ नियम आहे ! म्हणूनच बिगारी कार्य हें त्या कार्याचें विडंबन ठरत असते. खऱ्या गुरुसेवेंत भूक तहान हरपत असते. गुरु आज्ञेचें अक्षरशः पालन करणें हाच सद्गुरु गांडा महाराजांचा महामंत्र होता.

## महत्पूर

महत्पुराला चातुर्मास्य झाला. त्या वेळेला नित्यनियमानुसार श्री गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति उपनिषदावर अत्यंत मार्मिक पण अगदीं सोप्या भाषेंत विवेचन करीत असत. श्रोत्यांत सद्गुरु गांडा महाराज, श्री. व्यंकटराव, श्री. आप्पा हे असायचेच. अधिकारी श्रोते पाहून विवेचकालाहि स्फुरण चढत असतें. एकदां प्रवचन रंगांत आलें व गुरुदेव म्हणाले, प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयांत श्रीहरीचा वास असतो असें सांगून

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टः ॥

प्राणिनां देहमाश्रितः

वगैरे स्मृति वाक्याकडे अंगुली निर्देश केला. व पुढें म्हणाले.

ईश्यावास्यमिद सर्वं चत्किंच जगत्यां जगत्।

या उपनिषदाकडे गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति वळले व आपल्या अमृतवाणीनें त्यांतील खडान् खडा भक्तवृंदांच्या ह्रदयाला पटविला. हीं वाक्यें आपण वारंवार वाचतो. रोज गीतेच्या पाठांचीं कैक आवर्तनें आपण करतों. देव प्राणिमात्रांच्या ह्रदयांत आहे असा घोष आपण येतां-जातांहि करीत असतो. पण वर्तन पहाल तर त्याच्या अगदीं विरुद्ध टोकाचें असतें. आपल्या वागण्यांत प्राणिमात्रांच्या ह्रदयांत देव रहात असतो याचें स्मरण नसतें. तिकडे आपण लक्षहि देत नसतो. इतकेंच नव्हे तर काम, क्रोध, लोभ, मोह यांचे गुलाम बनून जें करूं नये तेंच करीत असतों. तर तोंडांतील गीतेच्या वाक्याचा उद्घोष व स्वतः करीत असलेलें आचरण यांचा मेळ बसावा कसा? आपण पदोपदीं वासनेचे दास बनत असतो. गीतेच्या शिकवणीचें आपणास विस्मरण होत असेल तर श्लोक जिभेवर वारंवार खेळवून जिव्हा तरी कां भ्रष्ट करावी? गीतेचें हें नसतें अवडंबर कशाला? अशानें आपण नाहक खोट्या दंभाच्या आहारीं नकळत जात असतो. बोल व कृति यांचा मेळ नसेल तर काय उपयोग असें वागणें ही मानवाची मानवता खास नाहीं. ही मानवता नव्हेच नव्हे तर दानवता आहे, पशुता आहे. खऱ्या ज्ञानाचें विस्मरण करून, ज्ञान गुंडाळून ठेवण्यांत, अज्ञान्यासारखें वर्तन करण्यांत खऱ्या ज्ञानाचा अंश तरी असतो का? हा डांस, हा हत्ती, हा ब्राह्मण, हा मांग, ही गाय, हें गाढव यासारखे अन्य भेद आत्मतत्त्वांत आहेत काय? आत्मतत्त्व सर्वत्र एकच असतें. नाम, रूप, आकार, लिंग, भेदरहित असे गुणातीत, भेदातीत सर्वत्र एकता व समरस यांनीं व्याप्त असतें. तें सर्वस्वरूप आहे. सर्वांतरयामीं आहे. त्याविरहित असें एकहि स्थल नाहीं. पण **केवळ अज्ञानानेंच आपण आत्मतत्त्वाच्या एकतेंत बिघाड करून**

**अनेकता उत्पन्न करतों याचें कारण स्वार्थ व मोह यांचा वज्रहात आपल्या पाठीशीं असतो.** व याच स्वार्थ व मोहापायीं मानव खऱ्या मानवतेपासून दोन हात दूर जाऊन निष्कारण मायाजाळांत गुरफुटून हवें तें बरळूं लागतो व हवें तसें वागूं लागतो.

बरें, देहदृष्टीनें विचार केला तरी ज्या पंचमहाभूतांच्या राज्यांत आपण वावरत आहोंत तींच पंचमहाभूतें राजाच्या शरिरांत आहेत, तींच कीटकांत, तींच मांगाच्याहि शरिरांत असतात. म्हणजे तात्त्विक दृष्टीनें अगर भूतदृष्टीनेंहि भेद नाहीं. बरें, आत्मदृष्टीनेंहि विचार केला तरी सर्व व्याप्त, आत्मा प्राणीमात्रांच्या ठायींहि सर्व व्याप्तच आहे. तो भेदातीत आहे. ज्ञान दृष्टीनें पहाल तर देवेंद्रापासून तों मुंगीपर्यंत साऱ्यांचेंच शरीर पंचभूतात्मक असतें. देह नश्वर आहे, तो केव्हां तरी पडायचाच. पण आत्मा अमर, अखंड, अविरत वावरत असतो. आत्म्याला ना जरा ना मरण सर्व बाजूंनीं विचार केला तरी चिन्मय चैतन्यघन परमात्म्याशिवाय इतरेत्र कांहींच दिसणार नाहीं. असा रंग प्रवचनांत चालू असतांनाच गुरुदेवांनीं उपनिषदांतील रहस्य अगदीं गोड व सोप्या भाषेंत ऐकविलें. संतांच्या वाणीचा महिमा काय वर्णावा? थोडक्यांत पुष्कळ समजावून सांगण्याची हातोटी संतांचीच, पण संतांच्या अमृतवाणीचें मर्म सहजासहजीं समजत नसतें. तितकी हृदयाची तयारी हवी असते. उपनिषदांचा अर्थ समजाविणारें महान् महान् ग्रंथ आहेत. ग्रंथपठणापेक्षां संतवाणी श्रवण करण्यांत आगळा आनंद असतो, आगळें वैशिष्ट्य असतें.

शास्त्रोक्त प्रणालिकेच्या निरंतर परिपाठानें सद्गुरु गांडा महाराज यांचें ज्ञान दृढ होत गेलें. अमृतमय संजीवनी आपल्या अमृतमय वाणीनें गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति त्यांना नित्यशः भरवीत होती. श्रवण, मनन, निजध्यास या साक्षात्काराच्या पूर्व भूमिका असतात. हें तत्त्व त्यांच्या मनावर पूर्ण प्रतिबिंबित झालें. यांतूनच गुरुकृपा चंद्रकांतमणी पाषाणाप्रमाणें

निरंतर पाझरत होती. चंद्रकिरण बघतांच चंद्रकांत मण्यांतून पाणी पाझरूं लागतें. तद्वत या गुरुशिष्यांचें झालें. सद्गुरु गांडा महाराजांना बघतांच सद्गुरुचंद्र आपला अमृतस्राव सुरूं करीत असत. यांत शिष्याच्या मनाच्या उच्च भूमिकेचाहि तो आविष्कार होता. वाटेल त्या भूमींत गहूं उगवत नसतात, तर चांगल्या मशागतीची खताळ जमीनच गव्हास लागत असते.

## गुरुतत्त्वाचा विज्ञानापर प्रभाव

योगशक्ति व मंत्रसामर्थ्य किती अद्‌भुत व प्रभावी असते हें दाखवून मोठमोठ्या शस्त्रक्रिया करणाऱ्या सिव्हिल सर्जनांनाहि विस्मयचकित करून आश्चर्यानें तोंडांत बोटें घालविणारी घटना श्री गुरुदेव, अतुल शक्तीचें सागर श्री. वासुदेवानंद सरस्वति यांजकडून घडली. गुरुतत्त्व काय करूं शकत नाहीं? हीच गोष्ट त्यांनीं दुनियेला पटविली. गुरुदेवांचें चातुर्मास महत्पूर येथेंच चालूं होतें. शस्त्रक्रियेंत ज्यांचा हातखंडा आहे असा लौकिक सर्वत्र दुमदुमत होता, ज्यांच्या हातून शस्त्रक्रियेची अलौकिक अशीं अनेक कामें झालेलीं होती असे गुणवत येथील महशूर डॉक्टर श्री. विश्वनाथ ताटके रोग निवारण्यासाठीं महत्पुर येथें गुरुदेव श्री वासुदेवानंद सरस्वति यांजकडेस आले. सारी अथपासून इतिपर्यंत रोगाची हकिकत सांगितली. या हाड्याव्रण रोगावर सारे सारे वैद्य डॉक्टरांचे उपाय करून थकलों. महान् महान् सिव्हिल सर्जनहि अपयशी ठरले, पाय कापून काढणें हाच आतां त्यांचा शेवटचा उपाय राहिला आहे; गुरु महाराज, सर्वस्वीं शरण आहे हें ऐकतांच गुरुदेवांनीं डॉक्टर महाशयांना एक मंत्र उतरून दिला. त्या मंत्राच्या जपाचा विधि निवेदन केला. आवश्यक त्या सूचना दिल्या. मनाच्या समाधानासाठीं निमित्तमात्र कांहीं औषधहि सांगितलें. सर्वतोपरी निराश झालेल्या डॉक्टर ताटके यांनीं साऱ्या गोष्टी अतिश्रद्धेनें बिनचूक केल्या. आश्चर्य! थोड्याच दिवसांत ते रोगरहित झाले. ते मजेनें हिंडूं फिरूं लागले. हें बघतांच मोठमोठ्या शास्त्रज्ञांना अचंबा वाटला. डॉक्टर

ताटकेच काय परंतु इतर शास्त्रज्ञहि महाराजांचे परमभक्त बनले. आधिभौतिकावर मात करणारी आध्यात्मिक घटना सर्वश्रेष्ठ ठरली. डॉक्टर ताटके हे सद्गुरु गांडा महाराजांचे चिरपरिचित होते. सद्गुरुनाथ वासुदेवानंद यांच्या समवेत सद्गुरु गांडा महाराज नेहमींच असल्यामुळें हेही पुष्कळांचे परिचित झाले होते.

## खेचरी मुद्रा

योगशास्त्रसंपन्न योगीराणा परमतत्त्वनिष्ठ श्री वासुदेवानंद सरस्वति महाराज यांनीं सद्गुरु गांडा महाराज यांची योगशास्त्रांतील प्रगति अजमाविली. या योगशास्त्रांतील प्रगतिबद्दल त्यांना समाधान वाटलें. परमतत्त्वाच्या तात्त्विक ज्ञानासाठीं, विज्ञानासाठीं **ऋतंभरा प्रज्ञा** जागृत करावयाची आवश्यकता असते. सामान्य बुद्धीचा जसजसा विकास होत जातो तसतसा बुद्धीला प्रज्ञा, मेधा इत्यादि संज्ञा दिल्या जातात. अशा रीतीनें पूर्णपणें विकसित झालेल्या बुद्धीला ऋतंभरा प्रज्ञा असें नामाभिधान देतात. ही **ऋतंभरा प्रज्ञा जागृत करण्यासाठीं खेचरी मुद्रा आवश्यक असते.** खेचरी मुद्रा साध्य करण्यासाठीं जिभेच्या खालीं असलेल्या एका सूक्ष्म नसेचें छेदन करावयाचें असतें. हें छेदन सदोष झालें तर त्याचा विपरीत परिणाम भोगावा लागतो. छेदनक्रिया नीट व्हावी म्हणून गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं सद्गुरु गांडा महाराज व इतर दोन शिष्य यांना शस्त्रक्रिया विशारद डॉ. ताटके यांजकडेस पाठविलें. ज्यांचा हाड्यावर्ण रोग मंत्रसामर्थ्यानें गुरुदेवांनीं बरा केला होता त्या डॉ. ताटके यांनीं गुरुआज्ञा शिरसावंद्य केली. गुरूची सेवा करण्याचा लाभ मिळाला म्हणून समाधान वाटलें. इतर दोन शिष्यांचें शिरोच्छेदन निर्विघ्नपणें पार पडलें. पण सद्गुरु गांडा महाराज यांचें शिरच्छेदन नीट झालें नाहीं. शेवटीं सद्गुरु गांडा महाराज गुरुदेवांना शरण गेले. त्यांनीं रक्त थांबविलें पण सद्गुरु गांडा महाराज यांना पराकोटीची अशक्तता

आलेली होती. प्रमाणाबाहेर रक्त गेलें. हृदय दुर्बल झाल्यामुळें ते मोठ्या कष्टानें हालचाल करीत. कर्मभोग याशिवाय त्याला दुसरें उत्तर काय असणार? दिवसेंदिवस अशक्तता वाढूं लागली. शरीर केवळ हाडांचा पिंजरा बनलें. अशा अंतिम परिस्थितींतही त्यांची गुरूनिष्ठा अढळ होती. गुरुसेवा चालूंच होती. गुरुभक्ति मेरूप्रमाणें अचल होती. गुरुदेव वासुदेवानंद महत्पुराहून ब्रह्मावर्ताकडे गेले. तिकडील थंड हवा मानवणार नाहीं म्हणून शिष्यांना नर्मदातटाकीं राहून तपसाधना करा असा आदेश दिला. पराकोटीच्या अशक्ततेमुळें सद्‌गुरु गांडा महाराज यांनीं आपल्या बहिणीकडे भडोच येथें रहाण्याची परवानगी मागून घेतली. सद्‌गुरु गांडा महाराज भडोच येथें आपली बहीण सौ. यमुनाबाई यांच्या घरीं आले. माझें पत्र येण्यापूर्वीं जड पदार्थांचा आहार करावयाचा नाहीं अशी गुरु-देवाची सद्‌गुरु गांडा महाराज यांना सक्त ताकीद होती. अशक्ततेमुळें सद्‌गुरु गांडा महाराज यांना रोज ताप येत होता. अतिशय रोडावलेलें असें भावाचें शरीर पाहून बहीण यमुनाबाई यांचें हृदय अतिशय भडभडून आलें. माझा भाऊ जगेल काय? असें प्रश्नचिन्ह तिच्या अंतर्मनापुढें उभें राहिलें. भाऊ कांहींच खाईना. गुरु आज्ञा कांटेतोलपणें पाळण्यांत त्यांचें चित्त गुंतलेलें होतें. माझ्या गुरुचा शब्द वेदप्रमाण अशी त्यांची अंतर्निष्ठा होती. भाऊ दोन घांस खाईल म्हणजे रक्त वाढेल, रक्त वाढलें कीं माझा भाऊ सशक्त होईल या विचारांनीं प्रेरित होऊन दोन घांस खाण्यासाठीं बहिणीचा सदाचा तगादा असे. भाऊ अन्नास स्पर्श करीना, त्यामुळें घरांत हो ना चा झगडा चाले. भाऊ अन्न खात नाहीं म्हणून बहीण अगदीं रडकुंडीस आली. दोन घांस खाल्ल्याशिवाय रक्त कसें येणार? हा तिचा नित्याचा सवाल असे. सद्‌गुरु गांडा महाराज अन्नाला स्पर्श करीनात. ताई! वाईट वाटून घेऊं नकोस, माझे कर्मभोग माझे मीच निस्तरले पाहिजेत. ते भोगल्याशिवाय गत्यंतर नाहीं. अशी समजूत

बंधुराज बहिणीची घालीत. दैवकर्मानुसार त्याच वेळीं गुरुदेवांचें पत्र आलें. ते लिहितात,

रा. गांडा यास नारायण

बडवायी येथें भाद्रपद पोर्णिमापावेतों रहाणार. आपण खेचरी अभ्यासाचा आळस करूं नये. न घडला तरी पुनः पुनः चालवावा.

नारायण

शिष्याच्या भल्यासाठीं गुरुची किती व कशी तळमळ असते याचें प्रतीक हें पत्र आहे. पुन्हां गुरुदेवांचे दुसरें पत्र आलें.

श्रीमद्भगवद्भक्तिपरायण गांडा यास नारायण

आपण खेचरीचा अभ्यास वेगें वेळच्या वेळीं चालवावा. तूर्त किती अभ्यास होतो हें कळवावें.

नारायण

प्रकृतीला पेलवेल असा खेचरीचा अभ्यास सद्गुरु गांडा महाराज यांचा चालूंच होता. गुरुदेवांनीं योगाभ्यासांत आहार विहार यांत नियमितपणा असावा असें शास्त्राधारें सूचन केलेलें होतें. सद्गुरु गांडा महाराज गुरुदेवांच्या आज्ञा अगदीं कटाक्षानें पाळीत असत. योगशास्त्रांत सात्त्विक आहाराला आत्यंतिक महत्त्व आहे. **सात्त्विक आहार घ्यावा असें गुरुदेवांचें पत्र आल्यावर सद्गुरु गांडा महाराज थोडेंथोडें मुगाचे वरणाचें पाणी घेऊं लागले. ते मीठ खात नसत.** धीरे धीरे थोडें थोडें अन्नहि ग्रहण करूं लागले. हिंडूं फिरूं लागले. थोड्याच दिवसांत सद्गुरु गांडा महाराजांची तब्येत पूर्ववत् चांगली झाली.

## परिव्राजक सद्गुरु गांडा महाराज

सद्गुरु गांडा महाराजांची तब्येत चांगली झाली, ते हिंडूं फिरूं लागले. **ब्रह्मरूप संत हे परमात्मशक्तीचें माध्यम असते.** संत या जंगम ब्रह्मावाटें परमात्मा धर्मलोप थांबवून सामान्यांना धर्मपरायण करवीत

असतो. संसारी संकुचित दृष्टीचे असतात. तें व त्यांचें घर इतकीच व्याप्ति त्यांच्या दृष्टीची असते. पण ईशप्रेरणेनें, ईश अनुज्ञेनें "वसुधैव कुटुंबकं" इतक्या व्यापक दृष्टीचे संत बनलेले असतात. दैवीशक्ति, दैवीसंचार, आत्यंतिक चित्तशुद्धि, आत्मसाक्षात्कार इत्यादि दैवीसंपत्तीचे संत असल्यामुळें त्यांच्या तपबलानें साहजिकच दुनिया त्यांच्याकडे आकर्षिली जाते. संतवाणी ही परावाणींतून निघत असल्यामुळें संतांची वाणी अमृत ठरते. त्यांच्या बोलाला त्यांच्या अनुज्ञेला हिऱ्यामाणक्यांची किंमत येते. त्यांतले त्यांत संतांच्या दैवी चमत्काराचा अनुभव येतांच नास्तिकांनाहि आस्तिक बनावें लागते. अशा रीतीनें जनता धर्माभिमुख करण्यांत परमात्मशक्तीचा प्रधान हेतू संतांच्या माध्यमांतून साधला जातो. दैवीशक्तीच्या प्रभावी आविष्कारामुळें सामान्य जनता लोटांगण घालूं लागते. जनता संत सहवासांत आत्मभिमुख होण्यापेक्षां सांसरिक, मायिक अडचणी, संकटें, रोगराई यांचें निवारणार्थ संत हे कल्पतरू आहेत, अशा भावनेनें दुनिया संताकडे पहाते, नवससायास करते. नवसास पावणारा देव म्हणून कित्येकांची भक्ति असते. बहुरंगी, बहुढंगी दुनियेला संत हे देव वाटतात. म्हणूनच संतांना जंगम ब्रह्म अशी ब्रीदावली मिळाली आहे. संत सर्वहितैषी असतात. त्याग, निरपेक्ष सेवा, निरहंकारवृत्ति यांतच संत रमलेले असतात. गुरुदेवाचें अवतारकार्य पुढें अविरतपणें चालविण्यासाठींच सच्छिष्य असतात. धर्मयात्रा, पवित्र स्थलें, तीर्थें पायीं पायीं करून जागोजागीं जनतासंपर्क करून हीन, दीन, अज्ञानी लोकांत धर्माची गोडी लावून धर्मजागृति साधणें हा त्यांचा प्रधान हेतू असतो. सत् तत्त्वाची जाणीव करून देण्यासाठींच संतांचे नंदादीप प्रज्वलित असतात. सद्गुरु गांडा महाराजांनीं हाच बाणा स्वीकारून **सर्व दुनिया आपली या उच्चतम भावनेंत रमून ते परिव्राजक बनले.** पर्यटनास सुरुवात केली. भडोच सोडलें. प्रथम आपली अनाविल ब्राह्मण ही जात सुधारली पाहिजे. त्यांना

धार्मिक वळण लाविलें पाहिजे. भ्रष्ट आचारांतून त्यांना सदाचाराकडे वळविलें पाहिजे. धर्माची गोडी त्यांना लाविली पाहिजे. स्नानसंध्यादि कर्मे समाजांत लोपलीं आहेत. त्यांच्या दिनचर्येत धार्मिक कार्यक्रम आणले पाहिजेत इत्यादि संकल्प मनाशीं ठरवून ते प्रथम पलसाणा येथें आले. त्यांचें सासर याच गांवांत होतें तरी जांवई म्हणून न येतां धर्मप्रचारक या भूमिकेनें त्यांनीं तेथें प्रवेश केला. कारण या गांवीं अनाविल ब्राह्मणांची बरीच वस्ती असून बहुतेक सारे शेती-भातीमुळें सुखवस्तू आहेत. गळ्यांत जानवें होतें पण त्यामागील धार्मिक आचार लोपला होता. संध्या, वैश्वदेव, पंचयज्ञ इत्यादि धार्मिक विधीकडे कल नव्हता. ऐहिक उन्नतीपेक्षां आध्यात्मिक उन्नति श्रेष्ठ हे तत्त्व बिंबवावयाचें होतें. चार महिने तेथें मुक्काम केला. जागृति केली. ब्रह्मनित्यकर्म म्हणून लहानसें पुस्तक छापवून प्रती मोफत वाटल्या. धर्मकार्यांत सहकारी मिळतातच. तेथील रहिवासी श्री. खंडूभाई नागरजी देसाई यांनीं पुस्तिकेचा खर्च केला. पलसाणा तेथील स्वजातीय अनाविल ब्राह्मणांची संध्या, वैश्वदेवादि कर्मे करण्याकडे मनें वळविलीं. **कार्याचा श्रीगणेशा सद्गुरु गांडा महाराज यांनीं पलसाणा या गांवापासून केला.** तेथून ते **डुंगरी** येथें जाऊन धर्मप्रेमी श्री. मोरारजीभाई यांच्या आमंत्रणावरून आले. तेथें दोन महिन्यांच्या मुक्कामांत जनता धर्मपरायण बनविली. धर्मप्रेमी लोक निरनिराळ्या गांवाहून दर्शनास येत. अगत्यानें आमच्या गांवीं या म्हणून आग्रह करीत. सद्गुरु गांडा महाराजांच्या भरीव कार्याकडे साऱ्यांचें लक्ष आकर्षिलें गेलें. श्री. भीमभाई परभूभाई यांच्या आमंत्रणावरून **टिंबरवा** येथें कांहीं दिवस थांबले. तेथून **तळोदरा** येथें श्री. गणपतराम हरिशंकर यांचे घरीं आले. महाराजांचा मुक्काम येथें असतांना महाराजांचे कनिष्ठ बंधू श्री. रघुजीभाई त्यांच्या दर्शनासाठीं आले होते. **रघुजी तुझें कार्यक्षेत्र व भाग्योदय सोनगड येथेंच आहे. अडीअडचणी**

**सोसून सोनगडासच वास्तव्य कर, असा स्पष्ट इशारा दिला.** ते सोनगडास रहावयास गेले. पण तेथील हवापाणी सोसवेना. ताप येऊं लागला. परत महाराजांच्या भेटीस आले. तुझें भवितव्य सोनगडांतच ठरणार आहे. सोनगड सोडूं नकोस. रोगादि हे शरिराचे भोग आहेत. कांहीं नुकसान होणार नाहीं. नशीब केव्हां? कोणाचे? कोठें? उघडेल हें सांगतांच येणार नाहीं. तूं सोनगडास रहा, असें पुन्हां सांगितलें. संतांच्या वाणींत भवितव्याचें रहस्य असतें याची सामान्यांना कल्पना नसते. श्री. रघुजीभाई महाराजांच्या आज्ञेप्रमाणें सोनगडलाच स्थिर झाले म्हणून आज ते धन, कण, संपत्ति, सुख, शांति, पुत्र, पौत्र यांचें ऐश्वर्य भोगत आहेत. संतवाणी फलदायी होत असते. सद्गुरु गांडा महाराज तळोदराहून **साकी** येथें श्री. कुवरजी भुलाभाई या धार्मिक व तत्त्वनिष्ठ गृहस्थाच्या आमंत्रणावरून गेले. हिरव्या चाफ्याच्या फुलाचा सुवास जंगलांत दूरवर पसरत असतो. तसेच सद्गुरु गांडा महाराजांचे बाबतींत झालें. अलोट दुनिया दर्शनास येऊं लागली. त्यामुळें धर्मप्रवृत्तीकडे जनतेचीं मनें वळूं लागलीं. धर्मरत बनविणें हाच संतांच्या पर्यटनाचा हेतू असतो. सद्गुरु गांडा महाराजांचीं धार्मिक प्रवचनें फारच गाजलीं. पुरुषधर्मनिरूपण, स्त्रीधर्मनीति इत्यादि सद्गुरु गांडा महाराज यांच्या ग्रंथांचा ओनामा धर्मपरायण कुवरजीभाई त्यांचे कर्मनिष्ठ व अतिश्रद्धाळू चिरंजीव मगनभाई यांच्या पवित्रतम व मंगल गृहवास्तूंतूनच झाला. मंगल वातावरण हें अध्यात्माचें प्रांगण असतें. एक कवि म्हणतो,

"मंगल वातावरणीं विहरतो सांब सदाशीव" हें त्याचें म्हणणें काय खोटें आहे?

धर्मकार्यरत व सद्वृत्तीचे प्रवर्तक सद्गुरु गांडा महाराज ठायीं ठायीं धर्मप्रवचनें देतां देतां ते भडोच येथें आपली बहीण सौ. यमुनाबाई व मेहुणे कल्याणजी यांचेकडे आले. **भागलकोटात अभिमुक्तेश्वराच्या**

**शिवालयाच्या जवळच धर्मशाळा आहे तींत मुक्काम केला.** भिक्षे-साठीं श्री. कल्याणजीकडे जात. भडोच येथेंहि त्यांचें जनजागृतीचें कार्य अविरतपणें चालूंच होते, इतरत्र होत असे तसें भडोच येथें अन्नसंतर्पण, भाविक लोकांचा जमाव, प्रवचनें इत्यादि गोष्टी चालूंच होत्या. श्री. कल्याणजी येणाराजाणारांची उत्तम बडदास्त ठेवीत. जनसेवा हीच ईशसेवा या वृत्तींत ते रमत. गुरुदेवांचें कार्य सद्गुरु गांडा महाराज मोठ्या उत्साहानें करीत. जनकल्याणासाठीं देह झिजवणें यांतच संतांचें संतपण असतें.

देवाच्या लीला अगाध असतात. सं. १९५९ तलंगपुरांत प्लेगनें हाहाकार मांडला. सद्गुरु गांडा महाराजांच्या मातुश्री व भावजय यांना प्लेगनें पछाडलें. घरोघर बिछाने पडले. **भडोच येथें सद्‌गुरु गांडा महाराज असतांना संत शिरोमणि, महान् योगी वासुदेवानंद सरस्वति महाराजांनीं स्वप्नांत साक्षात्कार दिला कीं, तूं येथें आनंदांत घोरत पडला आहेस, तिकडे तलंगपुराला तुझ्या मातुश्री व तुझी वहिनी यांनीं आत्यंतिक आजारीपणामुळें गादी धरली आहे.** असा दृष्टांत होतांच सारी हकिकत बहिणीला निवेदन केली. घाईनें दोन घांस खाल्ले. तांतडीनें गाडी गांठली. डोळ्यापुढें आईचा ध्यास चालत होता. तलंगपूर गांठून आईचें दर्शन केव्हां घेईन असें त्यांना झालें. सुमारें बाराच्या सुमारास सचीन स्टेशनावर उतरले. पण पुढें जावयास वाहनाची सोय न जमल्यामुळें तडक पायींच निघाले. जन्मदात्या आईची सेवा कशी घडेल याशिवाय डोक्यांत अन्य विषय नव्हता. पायाच्या वेगाला ताळ नव्हता. मातृदर्शनासाठीं मन आतुरलेलें होतें. तिकडे मातृ-हृदय गांडा केव्हां भेटेल असें तळमळत होतें, बेचैन होतें. प्रेमाकर्षणांत असें एक अजब सामर्थ्य असतें कीं, मनाच्या बॅटरीवर परस्परांचे टेलि-फोननंबर लागून आत्यंतिक जिव्हाळ्याचें आकर्षण घडलें जातें. सारेच सद्गुरु गांडा महाराजांची मार्गप्रतीक्षा करीत होते. तितक्यांत गांडा महाराज

घरांत प्रवेशले. आई, वहिनीच्या आजारामुळें घरास अवकळा आलेली होती. पिताजींना महाराजांनीं साष्टांग नमस्कार घातला. रघुजींनीं महाराजांना नमस्कार करतांच तडक महाराज आईच्या बिछान्याजवळ गेले. आई वेदनेमुळें डोळे मिटून निश्चेष्ट पडलेल्या होत्या. माघ शुद्ध १४ संवत् १९५९ हा तो दिवस होता. आई मी गांडा आलों असें मोठ्यानें ओरडून सांगतांच मातृहृदय जागे झालें. इप्सित साधलें. मी गांडाच्या खांद्यावर जाणार असें समाधान वाटलें. प्रेमाश्रूंचे मोती गालावर ओघळूं लागले. मातृहृदयानें गांडा तुझें भलें होईल असा शुभाशीर्वाद दिला. बाळ, तूं आतां मला सोडून जाऊं नकोस म्हणून कळवळून सांगितलें. सद्गुरु मातृभेटीनें लोण्यासारखे विरघळले. अत्यानंदानें बोल फुटेना. शांतीचा निश्वास टाकला. जिच्या उदरांतून मी जन्मलों तिचें ऋण मी कसें फेडूं? **आई अमृत असतें.** आईची सेवा करून तिचा उतराई होईन इत्यादि विचारांचें काहूर सद्गुरु गांडा महाराजांचे मनांत चालू होतें. ते आईला म्हणाले, आई! मी आतां तुझीच सेवा करणार. मी येथेंच राहीन. तूं परवानगी दिलीस तरच इतरत्र जाईन. या मधु बोलांनीं मातेला तृप्तीचा ढेकर आला. हृदय फुलले. माझा बाळ म्हणून मातृहृदयानें सद्गुरु गांडा महाराजांना जवळ घेतलें. शांति समाधान वाटलें. आई! तुजसाठीं मी मोसंबीं आणिलीं. हा मोसंबीचा रस घे. आईनें मोसंबीचा रस घेतला. चर्येवर आनंद चमकला, वृत्ति स्थिरावली पण रोगानें उचल केली. ताप फणफणत होता तसतशी बेचैनी वाढत होती. सद्गुरु गांडा महाराजांना आईच्या सेवेवांचून दुसरें कांहीं सुचेचना. ते सेवारत झाले. रोग पाय मागें घेईना. रोग कोणाचीहि भीड ठेवीत नसतो. माघ शुद्ध पौर्णिमेला सकाळपासून प्लेगनें अकांड तांडव सुरू केलें. आतां आई आपली नाहीं असें निदान सद्गुरु गांडा महाराजांना होतांच आईकडून दानधर्म करविला. आईला बजावलें, **आई आतां तूं फक्त आत्मानुसंधानांत रत हो.**

**श्रीदत्तप्रभूचें ध्यान कर. आई आत्मानुसंधानांत रमली. मन पूर्ण शांत झालें. दत्तप्रभूची मूर्ति अंतर्नयनानें बघतां बघतांच त्यांचें देहावसान झालें.** ब्रह्मनिष्ठाची आई, ब्रह्मनिष्ठ सुपुत्र जवळ असतांना परागतीला कां जाणार नाहीं ? याहून भाग्यमरण दुसरें कोणतें असणार ? सात आठ कोसांवर असणाऱ्या तापीकांठीं असलेल्या अश्विनी-कुमार क्षेत्रावर मातुश्रींची सद्गती सद्गुरु गांडा महाराज यांनीं केली. बंधू रघूजी या स्मशानयात्रेंत येऊं शकले नाहींत, कारण त्यांच्या पत्नी घरांत प्लेगानेंच अत्यवस्थ होत्या. योगायोग विचित्र असतात. **माघशुद्ध पौर्णिमा संवत् १९५९ ला सद्गुरु गांडा महाराज यांच्या मातुश्री स्वर्गवासी झाल्या.** गुरुमाऊली वासुदेवानंद सरस्वति यांनीं साक्षात्कारांत मातुश्रींच्या आत्यंतिक आजाराचें सूचन केलें नसतें तर मातुश्रींचें अंत्य-दर्शन घडलें नसतें. समर्थ गुरुमाऊलीचें अनंत उपकार आहेत. समर्थ ते समर्थच, असें गुरुपूजन सद्गुरु गांडा महाराजांनीं मनोमनीं केले. सासूबाई स्वर्गवासी झाल्या त्याच्या चौथ्याच दिवशीं बंधू कल्याणजी यांच्या पत्नी यांनीं माघ व. ४ ला सासू नंतर सुनेनेंही स्वर्गारोहण केलें. घरांत हाहाकार माजला. सासू नंतर सूनही आटोपली. त्या निर्घृण काळानें जगांत कोणाला सोडलें आहे ? जन्मला तो मरायचाच.

## धर्मापेक्षां समजांत रूढीचेंच प्राबल्य

सद्गुरु गांडा महाराज यांचे बंधू रघुजी यांच्या पत्नी दिवंगत झाल्या त्या वेळीं दोन प्रश्न उपस्थित झाले. मातुश्रींचे निधनास ३ दिवस झालेले तेव्हां वहिनी मृत झाल्यानें सुतकांत सुतक आलें. गंधमुक्त केव्हां होता येईल ? आईचा बारावा तेरावा दिवस वहिनीच्या सुतकांत येतो. या साऱ्या प्रश्नांची भवति न भवति झाल्यावर सद्गुरु गांडा महाराजांनीं निर्णय दिला कीं, मोठ्यांच्या सुतकांत लहानाचें सुतक आलें तर मोठ्याच्या सुतकांतच लहानाच्या सुतकाचा अंतर्भाव होत असतो. शास्त्राधारें केलेलें

कथन त्यांनीं आपल्या गुरुमूर्ति चरित्रांत २१ व २२ अध्यायांत लिहून व इतरत्रही लिहून साऱ्यांना उत्तम मार्गदर्शन केलें आहे. अनाविल ब्राह्मणांत पतीला दुसरी बायको करावयाची असेल तर पती पत्नीचें और्ध्वदेहिक कार्य करूं शकत नाहीं, इतरानें करावें ही त्यांच्यांतील रूढी सद्गुरु गांडा महाराजांना पसंत नव्हती. पत्नीचें और्ध्वदेहिक कार्य पतीकडूनच झालें पाहिजे. **रूढी मानवांच्या आवडीनिवडीनुसार असतात.** या त्यांच्या निर्णयानंतर बंधू रघूजी यांनीं यथाशास्त्र अंत्यविधि केला. सारे धर्मविधि श्राद्ध, तर्पण, मासिकें करून ब्राह्मणांना तृप्त केलें. लवकरच बंधू रघुजी यांचें लग्न झालें. लग्नांत सद्गुरु गांडा महाराज उपस्थित होते. जलालपूरचे सुखवस्तू गृहस्थ श्री. गोविंदजी डाह्याभाई देसाई यांची सुकन्या पार्वती हिच्याशीं श्री. रघुजी यांचें लग्न झालें. लग्नसमारंभ उत्तम तऱ्हेनें **पार** पडला. नंतर सद्गुरु गांडा महाराज **कतार** गांवाचे नागरिक श्री. दाजीभाई गोविंदजी यांच्या आमंत्रणावरून कतार गांवीं गेले व तेथेंच त्यांनीं चातुर्मास्य केलें. पण तितकेसें समाधान वाटलें नाहीं म्हणून पुढील चातुर्मासहि कतार येथेंच करावा अशी कळकळीची विनंति केली. तापीकाठीं हा चातुर्मास झाला. कतारा येथें रोगानें जर्जर पण सर्व उपाय करून थकलेला एक रोगी महाराजांना दाखविण्यांत आला. मी औषध देतों, रोग बरा होईल पण कडक पथ्य पाळशील तरच. पथ्य मोडलें तर रोग वाढेल अशी कडक ताकीद सद्गुरु गांडा महाराजांनीं दिली. रोगी कबूल झाला. कांहीं दिवस पथ्य पाळलें. त्याला पुष्कळ बरेंहि वाटूं लागलें. पण रसास्वादाला बळी पडून रोग्यानें पथ्य मोडलें. प्रश्नच मिटला. **रासायनिक औषधांत कडक पथ्याला आगळें महत्त्व असतें.** कुपथ्यानें रोग उलटतो.

कतार गांवीं सद्गुरु गांडा महाराजांनीं चातुर्मास केला. तेथून ते **मडोच** गांवीं आपल्या बहिणीकडे आले. कारण सद्‌गुरुंची उपवर मुलगी उजवा-

वयाची होती. स्थळ शोधलें. अनाविल ब्राह्मणांच्या वस्तीपैकीं प्रतिष्ठित गणले जाणाऱ्या **उंटडी गांवचे रहिवासी श्री. खुशालभाई यांचे चिरंजीव मगनलाल यांचे बरोबर वाग्दान झालेलें** होतें. संवत् १९६२ त लग्न करावयाचें नक्की ठरलें गेलें. हुंडा, वरकरणी, प्रयोजन इत्यादि बाबी चालू जमान्याप्रमाणें ठरविल्या जातांना मुलीच्या बापाच्या मनांतील अंतर्वेदना फक्त तो भगवानच जाणें. सुधारलेल्या पांढरपेशा समाजाला सुशिक्षित जावई मिळावा म्हणून वरपक्ष मांडील ती योजना कबूल केल्याविना मुलीच्या बापाला गत्यंतर नसतें. मुलीचा बाप होणें शाप ठरतो. समाजा ! ही तुझी सुधारणा कीं कुधारणा ? योगायोग ठरलेले असतात. सद्गुरु गांडा महाराजांनीं घरून मदत घ्यावयाची नाहीं असें ठरविलें होतें. ब्रह्मनिष्ठच ते ! त्यांची काळजी देवाला. देव ब्रह्मविदांच्या संकल्पांत कांहीं कमी पडूं देत नाहीं. नरसी मेहेता यांचें उदाहरण जग-जाहीर आहे. तसेंच सद्गुरु गांडा महाराज यांच्या कन्येच्या लग्नांत झालें. लग्न आनंदानें पार पडलें. व्याही, जांवई यांनाही शांति समाधान वाटलें. मुलीचें लग्न झाल्यामुळें सांसारिक जबाबदारी सद्गुरु गांडा महाराज यांजवर राहिली नाहीं. सद्‌गुरु गांडा महाराज विरक्त म्हणून लग्नाची सारी व्यवस्था व्यवहारकुशल श्री. कल्याणजीभाई यांनीं ठेविली होती. संताच्या घरचें कार्य त्यामुळें दूरदूरचे लोक ह्या अलौकिक समारंभास हजर होते. कन्या-दानाचें महत्पुण्य समजलें जातें, पण आपल्यांत वाढलेली, आपण पोसलेली लाडकी कन्या सासरीं प्रथम जाते तेव्हां माया, आपुलकी डोळ्यांतून गंगा-यमुना वहावयास लावते. कन्येचा विरह शोकाकुल बनवितो. तो विरह ऋषिमुनि यांनाहि सोसवत नाहीं, तर सामान्यांची काय कथा ? मुलगी आपलें भवितव्य ठरविण्यासाठींच जात आहे या गोड कल्पनेंत मुलीचा विरह आराम पावतो. मुलगी सासरीं गेली. आपल्या गुणानें व कार्यकुशलतेनें सासरच्या साऱ्या माणसांना तिनें आपलेसें केलें. माणूस गोड नसतो

तर काम गोड असतें. सेवा, शुश्रूषा, कामधंदा पाहून माहेरच्या वळणाचें कौतुक होऊं लागलें. संसार भरलेला होता. गुणानें ती साऱ्यांचीच लाडकी बनली. ब्रह्मविदाचेंच आत्मतेज होतें तें. संसार मजेनें चालला होता तें या निघृण काळाला बघवलें नाहीं.

## कन्येचा आडांत पडून मृत्यू

सद्गुरु गांडा महाराजांची कन्या आडावर पाणी भरत होती. पायांत दोर अडकला, झोंक गेला, आडांत पडली. माथ्याला भयंकर खोंच पडली. पाणी फुप्फुसांत गेलें. आवाज होतांच सारे आडाजवळ धांवले. इतर लोकहि तांतडीनें आले. कांहीं आडांत उतरले. तिला वर काढलें. मृतवत् होती. जीवपक्षी स्त्रीदेहांतून केंव्हांच उडून गेलेला होता. हाहाकार झाला. चांगल्या वस्तू देव जगांत ठेवीत नसतो. आपणहि बगिच्यांतील उत्तम फूल प्रथम तोडीत असतों. मृताच्या बातम्या लवकर पसरत असतात. वाऱ्याला तेंच काम असतें. या अघटित घटनेनें साऱ्यांचेच डोळे ओलावले. सासरचीं माणसें तिचे गुण आठवून धाय धाय रडूं लागलीं. भडोचला बातमी पोहोंचतांच सद्गुरु गांडा महाराजांची बहीण सौ. यमुनाबाई हिच्यावर तर आभाळ कोसळल्यासारखें झालें. विरक्त भावाच्या मुलीचा वेलवंश वाढेल या आशेवर ती जगत होती. मुळावरच कुऱ्हाड पडली. निराशा झाली. रडून रडून तिनें आकांत केला पण काय उपयोग? सद्गुरु गांडा महाराज यांनीं तिला पुष्कळपरीं समजाविलें! भगिनी! रडून रडून मेलेलीं माणसें कधीं परत येतात काय? जो जन्मला तो एक दिवस जाणारच! मग शोक कां? **साऱ्या घटना देव भल्यासाठीं करीत असतो** याची सामान्यांना कल्पना नसते. आज माझी मुलगी भरल्या कुंकवानें उटी भरून गेली हेंच बरें झालें.

## संतांची दूर दृष्टि

या पुढें महाराजांची ब्रह्मविद वाणी बोलली भागिनी! नाहींतरी ती सह

महिन्यांनीं विधवा झाली असती, परस्वाधीन जिणें झालें असतें त्यापेक्षां तिला सौभाग्यमरण आलें तें काय वाईट? बंधुराजांची भविष्य वाणी ऐकून ती शांत झाली. योगायोग विचित्र असतात. सहा महिन्यांनीं जांवई मेल्याची वार्ता कानीं आली तेव्हां जें झालें तें बरें झालें असे बहीणीचेहि उद्गगार निघाले. संसारिकाला फक्त पायाखालचीच जमीन दिसत असते पण ब्रह्मविदांना भवितव्य दिसत असते. हा पडताळा पडला. ब्रह्मविद सद्गुरु गांडा महाराज मोहातीत होते. जगाची नश्वरता त्यांना पटलेली होती. विकल्प आवरण इत्यादि मायेचे पडदे फाटले गेल्यामुळें व मन मारले गेल्यामुळें विकारांचा प्रश्नच नव्हता. रडविणारें, हंसविणारें मनच स्थिरावलेलें, तेथें सारें ब्रह्मच अशा पायरीवर सद्गुरु गांडा महाराज होते. ऋणानुबंध संपला एवढेच त्यांचे उद्गार निघाले असावे. ऋजुता व निर्दंभता संतांत असते.

## परब्रह्मस्वरूप श्री दत्तभगवान

परब्रह्मस्वरूप श्रीदत्तभगवान लीलाधारी खरेच. कसोट्या घेतल्याविना ते कोणाला जवळ येऊं देत नसतात. माझी भेट घ्यावयास आत्माभिमुख होऊन या, देहध्यासांत रमणाऱ्या भक्तासाठीं मी नाहीं हा संदेश पटविण्यासाठींच दत्तप्रभूचें वास्तव्य अवघडतम अशा गिरनार, अबु, कुरुगड्डी, ( कुरवपूर ), माहूर अशा बिकट स्थळीं ठेविलें तर नसेल? हीं स्थळें दत्तदर्शनाच्या अपेक्षितांच्या देहाचें पाणी पाणी करवितात, देहध्यास घटवितात. काय अवघड जागा ही असे सहजोद्गार काढवितात. तरी अलिकडे वरील स्थळास जावयास बऱ्याच सुखसोयी झाल्या आहेत तरी भाविक हैराण होत असतो. पण जेव्हां चढावयाच्या सुखसोयी नव्हत्या. सर्वत्र पहाड, पायवाटेचीहि वानवा, जंगलांतील किर्र झाडी,

व्याघ्रादिकांच्या डरकाळ्या, सर्पांचें वारंवार दर्शन व भेटी, जंगली प्राण्यांचें सतावणें, काळ्यातोंडी माकडांच्या माकडचेष्टा, ना खाण्यापिण्याची सोय अशा वेळीं विरक्त, आत्मरत, श्रद्धाळू, देहभाव विसरलेल्यांनाच वरील ठिकाणीं दत्तदर्शन होण्याची शक्यता होती. कसोटीस उतरेल तोच दर्शन घेईल.

* * *

# किरण नववा

## कुरवपूर – कुरुगड्डी

श्रीमत् सद्गुरु परिव्राजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वति महाराज कुरवपूर येथें गेल्याची बातमी सद्गुरु गांडा महाराज यांना भडोच येथें मिळाली. गुरुदर्शनासाठीं मन आतुरलेलें होतें. भडोच सोडलें. पाय चालूं लागले. मद्रासमार्गे कृष्णा स्टेशनापासून अति बिकट वाटेंतून अठरा मैलांवर कुरुगड्डी-कुरवपूर हें ठिकाण आहे.

गगनचुंबित वृक्षराजी जंगलांत कित्येक मैल सूर्यदर्शन घडूं देत नाहीं. जिकडे पहाल तिकडे निसर्ग सुंदरी हंसतमुखानें स्वागतास आतुरलेली. वृक्षांच्या गळ्यांत पडून नयनमनोहर झोंके घेत असलेल्या लतावरील आकर्षक हंसरीं फुलें, निसर्गांत देव असतो हें विसरणाऱ्यांना, हंसत होतीं. फुलांचा हांसरा नाच पाहून वृक्ष आपापल्या माना डोलवीत होते. वृक्ष, सरितप्रवाहानें ओबडधोबड, उंच, काळ्याभिन्न खडकांना न डरतां, डुलत डुलत, ईशस्तवन करीत करीत त्या निसर्ग सुंदरीनें नटलेल्या भागास तिन्ही बाजूनें घातलेला कृष्णाबाईचा वळसा चांदीचा कमरपट्टाच भासत होता. पक्षांचे किलबिल आवाज त्या एकांत, सुरम्यवनीं वेदऋच्या म्हणत होते. पदोपदीं अवघड व दिसावयास भेसूर अशा मोठमोठ्या खडकांनीं दत्तदर्शन घडूं नये म्हणून साधकांची वाट अडविलेली, कृष्णामाईचा वेदघोष सर्वत्र गाजत होता. पायवाट लपलेली, जिकडे पहाल तिकडे महान् महान् खडकांचेंच साम्राज्य, रस्ता कोण कोणाला दाखविणार? अध्यात्मांत मनाची एकाग्रता केली तरच पुढील रस्ता सुचणार! तशीच गत तेथील पायवाटेची. अशा निसर्गानें नटलेल्या निसर्ग सुंदरीकडे

श्रीपाद श्रीवल्लभ आलेले. निसर्गांत मला शोधून काढा म्हणून तर दत्तप्रभू येथें आले नसतील ? योगीजनांना बहारलेला निसर्ग आवडतो. नितांत शांतता योगाभ्यासास हवी असते. लोकांचा संपर्क टाळण्यासाठींच ते निबिड अरण्यांत रमत असतात. समाधीसाठीं अगदींच एकांत हवा. श्रीपाद श्रीवल्लभांच्या पवित्रतम वातावरणांत आपणहि तप केलेलें बरें असें प्रतिदत्तांना—वासुदेवानंद सरस्वतींना--वाटलें असावें. कृष्णेवरून येतां जातां खडकांवर कपडे धुणारा रजक एकाग्रतेनें मनोभावें श्रीपाद श्रीवल्लभांना नमन करी, त्याचा शुद्ध सात्त्विक भाव बघूनच रजकाचा राजा केला गेला इत्यादि स्मृतींची स्मृति करण्यास प्रतिदत्त भगवान् वासुदेवानंद यतिराज आले असावे. मला निसर्गांत शोधा हा दत्ताचा संदेश ऐकूनच सद्गुरु गांडा महाराज गुरु वासुदेवानंद यांना शोधितां शोधितां आले. सद्गुरु गांडा महाराजांनीं गुरुदेवांना साष्टांग प्राणिपात केला. हरीहरांच्या भेटी झाल्या. सद्गुरु गांडा महाराज गुरुसेवारत झाले. कुरुगड्डीला चातुर्मास करावयाचा होता. गुरुदेव योगीराज वासुदेवानंद सरस्वति यांनीं दोन उंच व भव्य खडकांत एखादा मनुष्य अति प्रयासानें बसूं शकेल इतकी अरुंद जागा अनुष्ठानास व समाधीसाठीं पसंत केली. महात्म्यांचे सारेंच महात्म्यपर असावयाचें. नित्यनियमानुसार गुरुदेव वासुदेवानंद ज्ञानाचें बोधामृत तेथें येणाऱ्या भाविकांना नियमानें पाजीत. येणाऱ्या-जाणाऱ्यांची संख्या शेंकड्यावरून हजारांवर गेली असें म्हणण्यापेक्षां या सुरम्य स्थळीं श्रीपाद श्रीवल्लभांच्या वेळेसारखीच श्रद्धाळूंची यात्रा भरूं लागली, कैकांना चमत्कारांचा अनुभव आला. दत्तप्रभूंच्या लीला पूर्ववत् चालूं लागल्या. येणाऱ्या-जाणाऱ्यांची तजवीज तेथील अधिकाऱ्यांमार्फत सद्गुरु गांडा महाराजांनीं शिरावर घेतली; श्रीपाद श्रीवल्लभांइतकीच लीला केली जात होती. हें नयन मनोहर स्थळ इतकें रम्य आहे कीं, तें दृश्य बघतांच मानव देहभाव विसरतो. आत्मभावांत रंगतो. श्रीदत्तप्रभूंच्या अगाध लीलांचें गुणगान करूं लागतो.

श्रीपाद श्रीवल्लभांच्या पादुकास्थळीं पदनत होतो. धन्य ते खडक ज्यावरून श्रीपाद श्रीवल्लभ चालत होते. धन्य ती कृष्णा जिला श्रींचा पदस्पर्श वारंवार घडत होता. ज्या परममंगल वातावरणांत श्रीपाद श्रीवल्लभ विहरत होते तें पवित्रतम वातावरण भाग्यवान तर खरेंच. भाविकांना पूर्ववत् आजही दत्तप्रभूचा साक्षात्कार घडत असतो. दत्ताचा अवतार, तें दिव्य-तपतेज अमर आहे. तसा त्यांचा साक्षात्कारही. येणाऱ्या भाविकांत आत्मा-नुसंधानांत रमणारे बोटांवर मोजण्याइतकेच असतात; पण ऐहिक संकटें, ऐहिक वैभव, रोगराई, कीर्ति, संतती इत्यादिकांचें रडगाणें गाणारेच जास्त असतात. जसा ज्याचा भाव तसा त्याचा देव हा साक्षात्कार येथें वारंवार घडतो. आत्मरत, आत्मानंदी, भाविकांवर दत्तकृपा त्वरित होत असते, प्रगति घडते. आत्मानुछंदी बनण्यांतच नरदेहाची सार्थकता असते ही शिकवण येथील मंगलतम वातावरण देत असते. **निष्काम कर्म व निस्सीम सेवेलाच प्राधान्य आहे हा बोध मनावर ठसतो.** सकाम कर्में जरी ब्रह्मार्पण केलेलीं असलीं तरी तीं गौणच. सामान्यांना ईशभक्तीची गोडी लावण्याचा तो मार्ग आहे, इतकेंच.

### महत्त्वाचीं सात वाक्यें

**१. वृत्ति स्थिरावली पाहिजे; २. वासना मेली पाहिजे; ३. एकाग्रता वाढली पाहिजे; ४. देहध्यास विरमला पाहिजे; ५. आत्मध्यास रंगला पाहिजे; ६. मनांत ऊर्मी येतांच ती मुळासकट कापली पाहिजे; ७. सम्यक् दृष्टि बनली पाहिजे ही वेद, उपनिषदें यांची महत्त्वाची शिकवण वरील सात वाक्यांत या मंगल वातावरणांत ठायीं ठायीं दृग्गोचर होते,** हें श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या या स्थानाचें वैशिष्ट्य आहे. हा लोण्याचा गोळा मिळविणाऱ्यांपेक्षां सांसारिक सुखांच्या ताकावरच राजी होणाऱ्यांची भाऊगर्दीच जास्त दिसत असते. सद्गुरु गांडा महाराज गुरुदेवाची सेवा

अप्रतिम करीत होते. तशी जनताजनार्दनाचीहि. त्यांचा देव सेवेंत दिसत होता. मनापासून सेवा करणाऱ्याला देहकष्टाची काय कदर? कुरुगड्डी येथील चातुर्मास पुरा झाला. जनसंपर्क टाळण्यासाठीं गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति एकाएकीं अदृश्य झाले. सद्गुरु गांडा महाराज गुरुदेवांच्या सहवासांत असावयाचे. ही गुरुशिष्य जोडी तीर्थक्षेत्रें बघत बघत पर्यटन करीत होती. एके दिवशीं गुरुदेव वासुदेवानंद सरस्वती महाराज यांच्या डोक्यावर कावळा येऊन बसला. संन्याशाच्या डोक्यावर कावळा! अपवित्रता वाटली. वैद्यक शास्त्रांत कावळा डोक्यावर बसणें मृत्यू समीप आल्याचें चिन्ह समजतात. तितक्यांत गुरुदेवांना श्रीदत्तांचा दृष्टांत झाला कीं, दक्षिणेंत जहागीरदारांचें सोनपेठ गांव आहे. जवळच गोदावरी कांठीं वाणीसंगम स्थान आहे तेथें जाऊन स्नान केलें कीं, काकस्पर्शदोषाचा परिहार होईल. आज्ञा प्रमाण मानून गुरुदेव त्या मार्गानें चालूं लागले.

## लिंबेकर नानासाहेब जहागीरदार

मार्ग कापीत असतां लिंबेकर नानासाहेब जहागीरदार यांनीं गुरुदेवांना साष्टांग नमस्कार घातला. तें दिव्य तपतेज पाहून महाराजांचे पाय घरास लागावे अशी हात जोडून प्रार्थना केली. **लिंब** येथें सद्गुरुसह मुक्काम केला. पुरातन काळचें एक गणपति मंदिर आहे तेथें महाराज थांबले. त्या मंदिरांत गुरुदाजी हे ब्रह्मचारी रहात असत. परिचय वाढला. सेवारत झाले. गुरुदेवांना साष्टांग प्रणिपात करून नम्र भावानें प्रार्थना केली कीं, योगसाधनांतील या अडचणी दूर करावयाचा मार्ग दाखवा. ब्रह्मचाऱ्याची क्रियाशीलता बघून गुरुदेवांना समाधान वाटलें. योग्य तें मार्गदर्शन केलें. योगमार्ग सहज सुलभ करून दाखविला. पुढें या ब्रह्मचाऱ्यानें संन्यास घेऊन माधवानंद नाम धारण करून पालम तालुक्यांतील नैकुटवाडी गांवीं शिवालयांत वास्तव्य केलें. ब्रह्मविदांकडून

मार्गदर्शन व्हावयास पूर्वसंचित उफाळत असतें. ब्रह्मनिष्ठ समर्थ सद्गुरु योगपिपासूंना योग्य तें मार्गदर्शन करण्यासाठींच ठायीं ठायीं वितरत असतात. परहितार्थच त्यांचा देह झिजत असतो. अनेक झुंडीच्या झुंडी गुरुदर्शनास येऊं लागल्या. पावन होऊन ते धन्य झाले.

## अघटित घटना

लिंब येथील नानासाहेब जहागीरदार यांच्या गांवी गुरुदेव व सद्गुरु गांडा महाराज यांचें वास्तव्य असतां गुरुदेवांची लीला बघावयास सांपडली. नानासाहेबांचे उपाध्याय प्रल्हाददेव ब्रह्मपुरकर यांची बारा तेरा वर्षांची कन्या अगदीं मरणोन्मुख स्थितींत होती. ही गोष्ट सद्गुरु गांडा महाराज यांच्या कानावर आली. गुरुदेवांना त्यांनीं सुचविलें. दयासागर गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं लगेच अभिमंत्रित तीर्थ दिलें. अंगारा म्हणून भस्म दिलें व मुलीच्या हातांत एक ताईत बांधला. आश्चर्य! दुसऱ्या दिवसापासून मुलीला आराम पडूं लागला. ती हिंडती फिरती झाली. रोगाचें समूळ उच्चाटन झालें. एका मुलीला जीवदान दिलें गेलें. एक दुःखी कुटुंब आनंदांत रमविलें. हेंच संतांचें कार्य असतें. सद्गुरु गांडा महाराजांच्या चरित्राची माहिती संकलित करणारे श्री. नारायणराव नरवरकर यांची धर्मपत्नी तीच गुरूदेवाकडून जीवदान मिळालेली भाग्यवती सुकन्या. मंत्रशास्त्रांत किती अतुलनीय सामर्थ्य असतें याची प्रचीती गुरू-देवांनीं सामान्यांना करून दिली.

**लिंबहून** मुक्काम हलविला. काकस्पर्श अशुचिता घालविण्यासाठीं दत्तप्रभूंच्या आज्ञेप्रमाणें वाणीसंगमांत स्नान केलें. तेथून **परळी वैजनाथास** जाऊन वैजनाथाचें दर्शन घेतलें. नंतर दादाहरीच्या वडगांवमोर सांगली या गांवीं आले. भाविक श्री. रामराव पांडे यांनीं गुरूशिष्यांना आपल्या **रेणापुर** गांवीं नेलें. तेथून ही गुरुशिष्य जोडी **गंगामसळे, गुज** वगैरे तीर्थे पहात पहात, मार्ग आक्रमण करीत करीत नर्मदा तटाकीं चातुर्मास

करण्यासाठीं **चिखलदा** येथें आली. रस्त्यानें येतां येतां **काचरगांवचें** रहिवासी श्री. अंबादास राव यांनीं काचर येथें यज्ञ करावा अशी प्रार्थना केली होती. त्यावर तुमच्या गांवीं यज्ञ होऊं शकणार नाहीं. दुसरें ठिकाण शोधा असें गुरूदेवाकडून प्रत्युत्तर मिळालें होतें. चिखलदा हें गुरूदेवाचें परिचित स्थान होतें. तेथें पूर्वी चातुर्मास केला होता. चातुर्मास झाल्यावर गुरूशिष्य जोडी गोदावरी कांठीं रमत रमत जाऊं लागले. गुरूदेवाच्या सतत जवळ असणारे सद्गुरु गांडा महाराज साऱ्यांचेच चिरपरचित झाले. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति जेथें जेथें जात तेथें तेथें भाविकांची अलोट गर्दी जमावयाचीच, दिवा बघतांच न बोलवतां कीटक त्याकडे आपोआप आकर्षिला जातोच जातो. ब्रह्मनिष्ठ योगशास्त्र व मंत्रशास्त्र विशारद मांगल्यधाम चिन्मय सूर्याकडे, तपतेजोनिधि गुरूदेवाकडे सामान्य जीव कां आकर्षिला जाणार नाहीं ? आपल्या गुरूदेवाबरोबर सद्गुरु गांडा महाराज होते.

## राजूरचा यज्ञ

अति गांजलेला, अन्नदानाची लयलूट करणारा, दैवी चमत्कारांचें दर्शन घडविणारा या यज्ञासारखा यज्ञ हाच असें एका शब्दांत त्याचें वर्णन करतां येईल. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचे कनिष्ट बंधू अधिकारी पुरुष व आत्मानंदांत डुलणारे सीताराम महाराज यांनीं गोदावरी तटाकीं राजूरगांवीं महान यज्ञ करण्याची मनिषा गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांना कळविली. गुरुशिष्य जोडी तेथें फिरतां फिरतां आली. या यज्ञासाठीं संहितेचा प्रत्येक छंद, ऋषि वगैरे तयार करण्यासाठीं गुरुदेव अवधाराचे **गोंड गांवांत** महिनाभर राहिले. गुरुदेवांचा सहवास लाभावा म्हणून सद्भक्तमंडळ श्री. माणिकराव चौधरी कुटुंब, अंबादास काचरकर इत्यादिकांनीं रुद्रस्वाहाकार करविला. राजूरच्या यज्ञाची उत्तम व्यवस्था ठेविली गेली. श्री. नानासाहेब देशपांडे, श्री. परळीकर, श्री.

बाळेराव चौधरी आदि पाथरीकर चौधरी कुटुंब, श्री. देसाई आजेगांवकर, श्री. बाळासाहेब एलीचपुरकर वगैरे मंडळी उपस्थित होती. समुद्राला मिळाल्यावर नदीच्या पाण्याला स्वतंत्र अस्तित्व नसतेंच. सद्‌गुरु गांडा महाराज **सदा सर्वकाळ गुरुदेव वासुदेवानंद यांच्या सेवेला असावयाचें त्यामुळें त्यांचें जीवनचरित्र गुरुदेवांच्या लीला चरित्रांतच निगडित असणार.** त्यांनीं आपलें जीवनच असें व्यतीत केलें कीं, गुरुशीं अभिन्नता हेंच सद्‌गुरु गांडा महाराजांचें जीवनचरित्र. **गुरुदेवांनीं गुरुडेश्वरीं समाधि घेतल्यानंतर ते गोदातीरीं आठ वर्षें गुंज येथें विहरले. तेव्हांच त्यांच्या जीवन सूर्याचा स्वतंत्र प्रकाश फैलावूं लागला.** त्याच वेळीं तपस्वी गांडा महाराज यांच्या तपतेजाची साऱ्यांना जाणीव झाली. ब्रह्मविद असल्याची प्रचीती येऊं लागतांच सारा मराठवाडा त्यांचा शिष्यगण झाला. अन्नकोटाच्या वेळीं दिसणारें दृश्य बघतांच मराठवाड्यांत गुरुभक्ति किती खोलवर समजली गेली आहे यांचा साक्षात्कार घडतो. राजूरच्या महायज्ञांत साऱ्यांच्या डोळ्यांत भरण्यासारखी एकच गोष्ट प्रामुख्यानें दिसत होती ती ही कीं, अत्यंत करडा, तापट, कडक स्वभावाचा, साऱ्यांनाच यमदूत वाटणारा असा मुसलमान परभणीचा कलेक्टर आपल्या सरकारी अधिकारी व लवाजम्यासह रामाचा मारुती तसा गुरुदेवाचा मुसलमान कलेक्टर आत्यंतिक श्रद्धेनें, अत्यंत चोखपणें, घरचेंच कार्य समजून रात्रंदिवस यज्ञाचा सारा पुरवठा व येणाऱ्याजाणाऱ्याचें स्वागत करण्यासाठीं झटत होता. त्यामुळें यज्ञाची सारी व्यवस्था बिनबोभाट होत होती. गुरुदेवांची कृपा लाधण्यासाठींच त्याचा सारा हा अट्टाहास होता. गुरुदेवांचें दर्शन मोठ्या अटीतटीनें सद्‌गुरु गांडा महाराज यांनीं घडविलें होतें. गुरुदेवाची ती तेज:पुंज मूर्ति बघतांच तो लोण्यासारखा विरघळला. आपलें कडक वर्तन, आपलें कलेक्टरपणच नव्हे तर गुरुसेवेसाठीं तो स्वत:लाहि विसरला. श्रीपाद श्रीवल्लभांच्या

वेळीं गाजलेल्या व जात विसरलेल्या रजकाचीच ही द्वितीयावृत्ति आहे असें साऱ्यांनाच वाटल्यास काय नवल ? एखाद्याचें पूर्वसंचितच असल्या घटना घडवीत असते. आपल्या अजब सामर्थ्यानें कलेक्टराचा हातीं न येणारा मुलगा झटपट बरा केला होता. त्या महान् आश्चर्यानें तो इतका सेवारत बनला गेला. गुरुकृपा काय करूं शकत नाहीं. योग्यांचें तपतेज जगताच्या कल्याणासाठीं असतें. दयेच्या अथांग सागरांत संतांना कुठलाच भेद नसतो, ते भेदातीत असतात. जनतेला आत्माभिमुख करण्यांत त्यांचा हातखंडा असतो. यज्ञ विशाल पायावर सुरूं झाला. यज्ञाच्या वेळीं गुरुदेवांनीं न भूतो न भविष्यति अशा लीला दाखविल्या. आश्चर्याचे धक्क्यावर धक्के बसत होते. दत्तमहाराजांच्या लीला अगाध असतात. परभणीचा कलेक्टरच तैनातीला तेथें काय कमी असणार ? या यज्ञांत किती तरी संत महात्मे आले. सात्त्विक आनंदाची लयलूट चालली होती. महात्म्यांना ऊर्मी येण्याचा अवकाश, तत्क्षणींच परमात्मशक्ति प्रगटून सारें व्यवस्थित घडवीत असे. **हंपीचे मठाधीश श्री शंकराचार्य महाराज, धनगर टाकळीचे दाजी महाराज** इत्यादि अधिकारी पुरुष प्रामुख्यानें यज्ञांत चमकत होते. **मुक्त अन्नदानाला तर सुमारच नव्हता.** अन्नदान किती भव्य प्रमाणांत घडलें याची कल्पना पुढील घटनेवरून येईल. अफाट मानवमेदिनी जमली होती. प्रसाद घेतल्याशिवाय कोणीही जाऊं नये अशी गुरुदेवांची आज्ञा होती. यज्ञाचा प्रसाद तो. तत्त्वशुद्धीची अजब शक्ति त्यांत असणार. जो प्रसादाला मुकला तो सर्वस्वाला मुकला अशी प्रेरणा त्या प्रसादांत होती. प्रसादासाठीं सारेच आतुर. योगायोगानें यज्ञासाठीं आलेल्या एका बाईचा मुलगा सांपडेना. ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. मुलाच्या शोधासाठीं तिनें सारी जमीन पालथी घातली तरी तपास लागेना. गुरुदेवांच्या कानीं ही गोष्ट गेली. अंतर्साक्षी प्रभूला काय दिसणार नाहीं ? गुरुदेव झट्कन् उठले. **जेथें डोंगराएवढा उष्ट्या**

**पत्रावळींचा ढीग पडला होता** ती जागा दाखविली. **या पत्रावळी खालीं मुलगा दाबला गेला आहे,** त्याला बाहेर काढा असें सांगून गुरुदेव निघून गेले. पत्रावळी दूर करावयास सारे हात लागले. निश्चेष्ट पडलेला मुलगा हातीं आला. त्याला हातांवर घेऊन रडत रडत ती बाई गुरुदेवाकडे आली. गुरुदेवांनीं कमंडलूतील तीर्थ त्याच्यावर सिंचन करतांच मुलगा पूर्ववत् झाला. मुलास व आईस घरीं जावयाची आज्ञा दिली. समर्थांचें सामर्थ्य अजब असतें. यज्ञाच्या पूर्णाहुतीची वेळ आली. यज्ञांतील साऱ्या गोष्टी राजैश्वर्यानें पार पडल्या; पण व्यवस्थापक मंडळींना असें आढळून आलें कीं, यज्ञांतील ब्राह्मणांना मनसोक्त किंवा यथासांग दक्षणा द्यावयास पुरेसे पैसे नाहींत. चिंतेची छटा त्यांच्या चर्येवर पसरली. वेळ नाहीं, काय करावें असें प्रश्नचिन्ह प्रत्येकापुढें होतें. गुरुदेवापाशीं जावयास कोणी धजेना. तेंव्हां पाथरीकर इत्यादि सभ्यमंडळ महाराजाकडे गेलें. सद्गुरु गांडा महाराजहि समवेत होते. महाराज सारी दुनिया आपल्या दर्शनासाठीं कालपासून तिष्ठत उभी आहे. त्यांना दर्शन द्यावें असा विषय काढतांच गुरुदेव वासुदेवानंदांनीं अंतर्ज्ञानानें सारें ओळखले व म्हणाले, तुम्ही यासाठीं आला नाहीं तर ब्राह्मणांना दक्षणा कमी पडते म्हणून तुम्ही आलां आहांत. पैसे पाहिजे ना ? असें म्हणत ताडकन उठले. आपली छाटी झटकली. दर्शनार्थ्यांनीं गुरुदेवाच्या पायांपुढें दक्षणा इतकी ठेविली कीं त्यांच्या डोक्याइतक्या उंचीइतका कलदार रुपयांचा ढीग पडला. हवे तितके रुपये ब्राह्मणांना देऊन संतुष्ट करा असें बोलतात न बोलतात तोंच एका रुपयाचा स्पर्श त्यांच्या पायाच्या आंगठ्याला झाला. ब्रह्मनिष्ठांना पैशाचा संपर्क सोसवत नसतो. लगेच अदृश्य झाले. साऱ्यांना यथेच्छ दक्षणा देऊन बाकी साऱ्यांचे हिशेब पुरे करून बरेच रुपये उरले. यज्ञाची पूर्णाहुती झालेली होती. यज्ञसमारंभ उत्कृष्टपणें पार पडला. गुरुदेवांच्या शोधांत सद्गुरु गांडा महाराज पाथरीकर होते त्यांना **केंव्हा** जवळ

गुरुदेवांचें दर्शन झालें. तेथून भक्तमंडळ त्यांना **साखरा** येथें घेऊन गेले. नंतर महाराजासह सारें भक्तमंडळ दुसऱ्या यज्ञासाठीं पाथरीकडे गेले. पाथरीजवळील गोंडेगाव येथें यज्ञ करणार होते.

गोंडेगाव येथें श्री. बाळेराव पाथरीकर यांच्या वाड्यांत गुरुदेव व सद्‌गुरु गांडा महाराज यांचा मुक्काम होता. **विशाल वृक्षाखालीं ते थांबले होते. त्या विशाल निंबवृक्षाखालीं बसून पाथरीचे अण्णादेव व अप्पादेव यांना अरण म्हणजे वेदांचा शिरोभाग शिकविला. वेद श्रवणानें त्या भाग्यवान निंबवृक्षाचीं पानें गोड झालीं.**

गोंडेगांवला यज्ञ चालू झाला. सारी जबाबदारी पाथरीच्या चौधरी कुटुंबियांनीं घेतली होती. सारें व्यवस्थित झालें. पूर्णाहुतीच्या पूर्वींपासून चौधरी मंडळीपैकीं यज्ञमंडपांत कोणीच फिरकेना. गुरुदेवांना त्या सद्‌भक्तांची आठवण येई. शेवटीं त्यांनीं विचारलेंही. चौधऱ्यापैकीं कोणींच दिसत नाहीं ही काय भानगड आहे? इतरांनीं व सद्‌गुरु गांडा महाराज यांनीं कचरत कचरत भीत भीत सांगितलें कीं, शामराव चौधरी यांची नात वारली आहे. छेः छेः! असें कसें होईल! यज्ञ चालू असतांना ती जाणार कशी? आणा तिला मजकडे! मृत कन्या महाराजांसमोर ठेवण्यांत आली. कमंडलूंतील तीर्थ मंत्रानें तिजवर शिंपडलें. बाई! ऊठ म्हणतांच ती उठली. साऱ्यांना गुरुमाऊलीची लीला चिरस्मरणीय झाली. पाथरीची सारी चौधरी मंडळी यज्ञांत मोठ्या हुरूपानें भाग घेऊं लागली.

**गोपेगांवाहून** गुरुशिष्य जोडी निघाली. गोदातटाकीचीं तीर्थें पहात पहात चाळीसगांवीं आली. तेव्हां गुरुदेव सद्गुरु गांडा महाराजांना म्हणाले, गांडा! आतां तुझ्या गुजराथची हद्द जवळ आल्यामुळें गुजराथचे बरेच लोकदर्शनास येतील. त्यामुळें माझ्या रोजच्या आन्हिकांत विक्षेप होईल. मी आतां नर्मदा काठीं चिखलदा येथें जाऊन चातुर्मास करणार

आहे. तूं भडोचला जा. गुरुदेवाची ताटातूट सोसवेना. पण गुरुवाक्य वेदप्रमाण मानून सद्गुरु गांडा महाराज भडोचकडे जावयास निघाले.

## गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं अरण कां शिकविलें ?

पाथरीकर देशमुखांच्या साऱ्याच शाखांवर गुरुदेवांचें आत्यंतिक प्रेम होतें. कारण साऱ्यांनाच स्वामी देव वाटत. चाळीस वर्षांपूर्वी पाथरी येथें दत्तमंदिरांत श्री दत्तांच्या पादुकांची स्थापना केली होती. तेव्हां जमलेल्या विद्वान ब्राह्मणांची व ब्रह्मवृंदाची वेदाध्ययनाची परीक्षा घेतली. समाधान व्यक्त केलें. तेव्हां गुरुदेव म्हणाले, तुमच्यापैकीं कोणाला अरण येत नाहीं कां ? त्यावर अप्पादेव व अण्णादेव यांनीं गुरुदेवांना प्रार्थना केली कीं, आमची अरण शिकावयाची इच्छा आहे पण अरण शिकविणारे भेटत नाहींत. गोपेगांवला यज्ञ आहे, तेथें या म्हणजे मी शिकवीन असा भाग्ययोग या दोन विद्वानांना लाभला.

१. ज्या झाडाखालीं अरण शिकविला गेला त्या कडूनिंबाच्या झाडाचीं पानें आजही गोड लागतात.

२. ज्या जागीं अरण शिकविले होंते ती जागा जाळून काढिली. तसे केलें नसतें तर त्या जागेवरून जाणारे उडते पक्षी, गर्भिणी स्त्रिया, गर्भिणी गाई गेल्या असल्या तर त्यांचा गर्भपात झाला असता, पक्षी मेले असते. हें अरिष्ट टाळण्यासाठीं ती पवित्रतम व वेदघोष झालेली जागा साऱ्यांनाच उपयोगी व्हावी कोणालाहि त्रास होऊं नये म्हणून बुद्धिपुरःसर जाळून काढिली.

भडोचला जाण्याच्या मार्गावर **पवनी** गांव आहे. तेथें सद्गुरु गांडा महाराजांनीं चातुर्मास केला. गुरुदेवांनीं चिखलदा येथें चातुर्मास करून ते गरुडेश्वरीं गेले. चातुर्मास पवनी येथें पुरा झाल्यावर सद्गुरु गांडा महाराज नरसोबाच्या वाडीला गेले. तेथून भडोचला आले.

## साकी येथील गंगापूजा

पळसाणा तालुक्यांत साकी गांवचे भगवतभक्त श्री. कुवरजी भुलाभाई हे चारी धाम करून आले. पूर्वीच्या त्या यात्रा. जिवंत परत येणारा भाग्यवान असा तो काळ होता. त्यांनीं गंगापूजन करावयाचें ठरविलें. सद्गुरु गांडा महाराज व इतर विद्वान विप्रसमाज यांनाही आमंत्रण होतें. फार-मोठा समाज जमला होता. म्हणून सुमारें एकहजार पानांचा स्वयंपाक बनविला होता. समारंभास सद्गुरु गांडा महाराज आले आहेत ही बातमी पसरल्यामुळें त्यांच्या दर्शनार्थ तीनहजारांच्या जवळपास जनसमुदाय जमलेला बघतांच स्वयंपाक कसा पुरणार, हा प्रश्न होता. स्वयंपाक पुन्हां बनवावयास वेळ बराच लागणार ! ही गोष्ट सद्गुरु गांडा महाराज यांच्या कानावर जातांच ते स्वयंपाक गृहांत गेले. तुपाचा दिवा तेवत ठेवावयास सांगितलें. मंत्रोदक तयार अन्नावर शिंपडलें. सद्गुरुची प्रार्थना व जयघोष केला. साऱ्यांना जेवावयास बसविलें. मजा ही कीं, सारें तृप्त झाले. इतरांना देऊनही अन्न बरेंच उरलें. कल्याण देवता शिव भक्तांची आर्त हांक ऐकतांच जगन्माता पार्वती तीच अन्नपूर्णा हिचा साक्षात्कार घडवीत असते. भक्तांच्या शुद्ध, सात्त्विक प्रेमावर अन्नपूर्णा सदा खूष असतें. श्रीकुरवजी भाईचे उधना येथील चिरंजीव श्री. मगनभाई सात्त्विक समाधानानें आयुष्य कंठीत असतात, ते दरसाल सद्गुरु गांडा महाराजांच्या पुण्यतिथीला गुंज येथें जातात. साकीहून श्री. भीमभाई परभूभाई हे सद्गुरु गांडा महाराजांना आपल्या **टिंबरवा** गांवीं घेऊन गेले. सद्गुरुंचें यथोचित स्वागत झालें. नंतर सद्गुरु भाच्याच्या लग्नासाठीं श्री. मोरारजी लालभाई यांच्याकडे **डुंगरी** येथें आलें. थोडे दिवस तेथें राहून सद्गुरु **भडोचला** आले. **व्यारा** येथील भक्तहृदय सात्त्विक ब्राह्मण श्री. देवशंकर प्रभाशंकर यांनीं आर्त भावानें सद्गुरु गांडा महाराजांना आपल्या घरीं आणलें. सारें घर आनंदानें दुमदुमलें, भाव भक्तीचीं फुलें उधळलीं. सद्गुरु गांडा महाराज

व्यारा येथें आलेले आहेत असें समजतांच त्यांचे कनिष्ठ बंधू श्री. रघुजी कमलकुव्याहून महाराजांच्या दर्शनास आले. सोनगड सोडून ते कमल-कुव्यास घेऊन गेले पण तब्येत ठीक रहात नसल्यामुळें सद्‌गुरु भडोचला परत गेले.

## सिद्धवाणीचा अनादर व त्याचा परिणाम

सिद्धवाणीच्या बाहेर वागण्यानें कसें अनिष्ट घडतें याचा अनुभव श्री. रघुजी यांना घडला. सोनगड हीच तुझी कर्मभूमि, भाग्यभूमि आहे असे बंधु रघुजी यांना सद्गुरूंनीं बजाविलें असतांहि सोनगड सोडून ते कमल-कुव्यास नोकरीस आलेले होते. सारे बाहेर गेलेले होते. श्री. रघुजी यांच्या पत्नी जेवण झाल्यावर दुपारीं पलंगावर निजलेल्या होत्या. पोटांत पांच-सात महिन्यांचा गर्भ होता. बाईला झोंप लागलेली होती. महाभयंकर विषारी मोठा नाग फूत्कार टाकतां टाकतां ओसरीवर फिरत होता. नागाच्या फुत्कारानें बाई जागी झाली. सापाचें भयंकर दृश्य पाहिलें व घाबरली. काय करावें सुचेना, असहाय झाली. मरण डोळ्यापुढें दिसतच होते. बिचारी काय करणार? दत्तप्रभूचा धांवा जीवें भावें करूं लागली. दत्ताला दया आली. नाग कोपऱ्यांत पाण्याच्या भांड्याजवळ दडून बसला. हुषारीनें दार उघडलें, आरडाओरड केली. लोक जमले, एकानें भाल्याने सापाला ठार मारले. सायंकाळीं श्री. रघुजी घरीं आले. त्यांना सारा प्रकार समजला. या कमलकुव्यास आतां रहावयाचें नाहीं असा पक्का निश्चय केला. सद्गुरु गांडा महाराज भेटले, सोनगड हीच तुझी यशोभूमि आहे, हे माझे बोल तूं विसरलास काय? अजून सांगतों सोनगडासच रहा. सद्गुरु गांडा महाराजांनीं गुरुदेवांना हें निवेदन केलें. गेल्या जन्मीं या बाईनें नाग मारला होता. या जन्मींहि मारविला. नारायण नागबली करून मुक्त व्हा असा आदेश गुरुदेवांनीं दिला. पुरुषार्थ प्रारब्धाच्या आधीन असतो ही गोष्ट श्री. रघुजी यांच्या मनावर बिंबली. नाग

मारण्याच्या दोषानें श्री. रघुजी यांचा वंश वाढत नव्हता. दोष निरसनार्थ गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें नारायण नागबली केला. भाग्य फुललें. घरांत पाळणा हालूं लागला.

## गुरुकृपाहि केवलम्

सद्गुरूंचे वडिलांची तब्येत दिवसेंदिवस खंगत चालली. शरिरांत त्राण राहिला नाहीं. सोनगडहून सपत्नीक रघुजी सेवेला बोलविले गेले. वडिलांना संन्यास द्यावा अशीं बोलणीं सुरूं झाली. वडिलांची सारीं हकिकत गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांच्या कानीं घालण्यासाठीं सद्गुरु गांडा महाराज भडोचहून गरुडेश्वरीं आले. वडिलांच्या तब्येतीची सारी हकिकत सांगितली. त्यावर गुरुदेव म्हणाले, तब्येत दिवसें दिवस अधिकाधिक खंगत आहे तरी **वडिलांचा मृत्यू अजून** दूर आहे. **सात वर्षांनंतर देहावसान होईल.** मायाजाल आवरण घालविण्यासाठीं त्यांना तूर्त आतुर संन्यास दिलेला बरा. आज्ञा घेतली. घरीं आल्यावर **गुरुदेवांच्या आज्ञेनुसार कार्तिक शुद्ध द्वितीया संवत् एकोणवीसशें सत्तर या दिवशीं भडोच येथें आतुर संन्यासाची दीक्षा त्यांना दिली.**

## भडोच येथील अभिमुक्तेश्वर धर्मशाळेचा जीर्णोद्धार

सद्गुरु गांडा महाराज यांनीं नर्मदाकांठच्या भडोच गांवीं अभिमुक्तेश्वर महादेवाच्या धर्मशाळेंत कायम वास्तव्य करावयाचें ठरविलें होतें. हेतू हा कीं, नर्मदा मातेचा पवित्र किनारा; दुसरें वडिलांच्या सान्निध्यांत पितृसेवा घडावी; तिसरें गुरूदेवांच्या दर्शनास सहजासहजीं गरुडेश्वरीं जातां यावें म्हणून हें स्थान पसंत केलें.

## भडोचला अभिमुक्तेश्वरच्या धर्मशाळेला आग

एके दिवशीं सद्गुरु स्नानसंध्या आटोपून एका खोलींत समाधि लावून बसले होते. गाढ समाधि लागली पण कारण न कळे एकाएकीं

धर्मशाळेच्या छपराला आग लागून आगीचे डोंब सर्वत्र उसळले. जीर्ण व जुनें छप्पर कापरासारखें जळूं लागलें. लोकांनीं आग विझविण्याची शिकस्त केली पण सारी निष्फळ ठरली. आग भडकतच होती. सद्‌गुरुचें बंधु श्री. कल्याणजी ऑफिसांत होते त्यांच्या कानीं धर्मशाळेला आग लागली हें समजतांच ते वेड्यासारखे धर्मशाळेजवळ धांवत आले. सद्गुरु गांडा महाराजांचा तपास करूं लागले. त्यांच्या खोलीचें छप्परही आगीनें धगधगत होतें. अग्निदेवता ज्वालावर ज्वाला फेंकीत होती. त्यामुळें त्या खोलींत जाणें धोक्याचें होतें. मजा ही कीं धर्मशाळेला साऱ्या बाजूंनीं आगीचा डोंब पेटला असतांना, शेंकडों लोकांच्या गडबडीचा गोंगांट बाहेर चालू होता तरी सद्गुरु गांडा महाराजांना त्याची कांहीं कल्पनाच नव्हती, कारण ते गाढ समाधींत होते. बंधुराज कल्याणजी यांनीं महा शिकस्तीनें सद्‌गुरु गांडा महाराज यांना आगीच्या डोंबांतून बाहेर काढलें. बंधुराज कल्याणजी धांवत आले नसते तर सद्‌गुरु आगीच्या भक्ष्यस्थानीं पडण्याची शक्यता होती. ब्रह्मनिष्ठांना काय? ते सदा आत्मानंदाच्या समाधींत मग्न असणार? समाधि उतरल्यावर धर्मशाळेचें छप्पर आगीच्या भक्ष्यस्थानीं पडल्याचें दिसलें. आग कां व कशी लागली याची चर्चा लोक करीत असतांना सद्‌गुरु गांडा महाराज म्हणाले, तपानुष्ठान व अन्य पुण्यकर्में यामुळें सात्त्विक वातावरण बनत जातें. त्यामुळें स्थान साहजिकच पवित्र होतें. अशा पुण्यस्थानाचें जीर्ण, नादुरुस्त झालेलें छप्पर देवास बघवलें नाहीं. धर्मशाळेचा मालक दुरुस्ती करण्यास असमर्थ व सांपत्तिक परिस्थितीनें गांजलेला. तें नवीन व्हावें अशी देवाची इच्छा असल्यामुळें तें जीर्णशीर्ण छप्पर अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडलें. मालकास बोलाविलें. देवाची इच्छा निवेदन केली. दुरुस्ती आम्ही करूं. धर्मशाळेवर मालकी सर्वस्वीं तुमचीच राहील असें स्पष्ट सांगितलें. मालकानें संमति

दिली. सद्गुरु गांडा महाराज नर्मदामातेच्या स्नानास दुसऱ्या दिवशीं गेले. स्नान करून आल्यावर खोलीचें दार उघडून पाहतात तों रुपयांची भरलेली मोठी पिशवी दिसली. समाधींत नर्मदामातेनें धर्मशाळेच्या जीर्णोद्धारास लागणारा खर्च यांत आहे, जीर्णोद्धार त्वरित कर असे सूचन केलें. सद्गुरूंच्या तपतेजाची यावरून कल्पना येईल.

* * *

# किरण दहावा

## गुरुदेवांच्या भेटीची तळमळ

सद्‌गुरु गांडा महाराज यांना गुरुदेव योगाधिराज श्री. वासुदेवानंद सरस्वति यांना केव्हां भेटेन असें झालें होतें. बंधू श्री. कल्याणजी यांच्या समवेत ते गरुडेश्वरीं गेले. साष्टांग प्रणिपात केला. कांहीं दिवस सान्निध्यांत राहिले. एके दिवशीं गुरुदेव सद्गुरूंना म्हणाले, गांडा, तूं आतां भडोचला जा, वडिलांची सेवा कर. मला सोडून जावेसें तुला वाटत नाहीं हें मी जाणतों पण माझी आज्ञा आहे कीं वडिलांच्या सेवेंत तूं मला पहा. ते व मी भिन्न नाहीं, एकरूप आहोंत. वडिलांच्या सेवेंत रहाणें अत्यावश्यक आहे. माझ्या सेवेसाठीं कैक भक्तगण आहेत. मातृदेवो भव ही वेदाज्ञा उत्तम पाळिलीस आतां पितृदेवो भव या ही वेदाज्ञेचें उत्तम प्रतिपालन कर. पिता व गुरु या उभयतांचें स्थान एकच आहे, असें मनांत बिंबवून तूं पित्याची सेवा कर. पुन्हां **एक गोष्ट ध्यानांत ठेव कीं, पिताजींच्या मृत्युनंतर जन्मभूमीच्या भागांत मुळींच राहूं नकोस, सदा तीर्थाटन कर. परिभम्रण करण्यानें मोह कमी होत असतो. निर्मोही बनतांच संन्यास घे.** असा उपदेश करून त्यांना **भडोच** येथें जावयाची आज्ञा दिली. ससद्गुरु गांडा महाराज हें सारें ऐकत होतें. गुरुस्थान सोडतांना जीव खालींवर होत होता. गुरुमाऊलीच्या वात्सल्याचें तें बिंब होतें. गुरुदेव हा सारा निरवानिरवीचा संदेश देत आहेत असें वाटलें. गुर्वाज्ञेप्रमाणें सद्गुरु गांडा महाराज भडोच येथें परत आले. भडोचला चातुर्मास पुरा केला. तेथून बहिणीकडे बलसाडला गेले. तेथें गरुडेश्वरीं गुरुदेवांची तब्येत बरीच बिघडल्याची बातमी समजली.

लगेच भक्तमंडळासह सद्गुरु गांडा महाराज गरुडेश्वरीं आले. गुरुदेवांचें दर्शन घेतलें. सद्गुरु गांडा महाराजांना बघतांच गुरुदेव म्हणाले, गांडा, तुझा गुरुप्रेमाचा मोह अजून दूर झाला नाहीं. तूं तुझ्या वडिलांच्या सेवेंत खंड पाडून वारंवार येथें येतोस, हें ठीक नाहीं. माझी काळजी करायचें कांहीं कारण नाहीं. यांतील मर्म सद्गुरुंच्या ध्यानीं आले. गुरुदेव आतां थोड्याच दिवसांचे सोबती आहेत असा अर्थबोध झाला. गुरुदेवाची देहावरील आसक्ति आतां सुटली आहे. गुरुदेवा ! आपल्या सहवासांत ब्रह्मात्मता लागली. गुरुत्वाशिवाय आपली सेवा कशी पूर्ण होणार ? या सद्गुरुच्या वाणीनें गुरुदेवांनीं स्मितहास्य केलें.

**यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।**

गुरुदेवानें जो उपदेशमंत्र दिला असेल त्याचा ज्ञानाचा परिपाक व्हावा म्हणून गुरुमाऊलींतच ईश्वर आहे अशा भावनेंतच गुरुमंत्राचा आदर करीत जावा. गुरुमंत्र सिद्ध होतांच गुरुमाऊली निरंतर आपल्या जवळ आहे अशा भूमिकेंत भक्त येतो व गुरुमाऊलींत रमत असतो.

पुढें गुरुदेव सद्गुरूंशीं बोलूं लागले.

षडंगादि वेदो मुखे शास्त्रविद्या ।
कवित्वादि गद्यं सुपद्यं करोति ।
गुरोरंघ्रि पद्मे मनश्चेन्न लग्नम् ।
ततः किं, ततः किं, ततः किं, ततः किं ? ॥

या प्रमाणें श्री. शंकराचार्यांच्या उपदेशानुसार त्यांचेंच भजन करावें म्हणजे गुरुनें जें ज्ञान दिलें असेल, जो गुरुमंत्र दिला असेल त्याचें प्रतिबिंब वास्तविक रीतीनें भक्त हृदयावर उमटतें व त्यांतच ज्ञान दृढ होतें. **ज्ञान दृढ झालें म्हणजे गुरुमाऊली आपल्या पाठीशीं आहे असा साक्षात्कार भक्त हृदयास होऊं लागतो.** अशा रीतीनें गुरुदेवांनीं सद्गुरुंना स्वरुपबोध केला. गुरु व परमतत्त्व एकच आहे याची

गुरुकिल्ली सद्‌गुरुंना दाखविली. सद्गुरुनीं गुरुदेवांना साष्टांग नमस्कार घातला तेव्हां गुरुदेवांनीं सद्गुरुच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेविला व आशिर्वाद दिला. आपल्या अंतसमयीं गुरुदेव सद्गुरूंना दूर ठेवूं इच्छितात. पट्टशिष्य दूर ठेवितात याचें तेथें हजर असलेल्या लोकांना आश्चर्य वाटलें. त्या बिचाऱ्यांना गुरुदेव व गांडा महाराज यांचा आत्मा अभिन्न आहे याची काय कल्पना असणार? आत्मा एक, देह दोन इतकें त्यांचें एकात्म्य होतें. त्या वेळीं एकानें गांडा महाराजांना प्रश्न विचारला कीं, गुरुदेवांनीं तुम्हांला सुचविलें आहे कीं, तूं जेथें असशील तेथें मी सदोदित तुझ्या-पाशींच तुझ्याबरोबर असणारच याचा अर्थ काय? त्यावर सद्गुरु गांडा महाराजांनीं प्रत्युत्तर केलें. हें तत्त्व अजून तुला समजलें नाहीं असें मला वाटतें म्हणून तूं वडिलांच्या सेवेला जा. वडिलांच्या रूपांत तुला मी दिसेन असें गुरुदेवांनीं मला सूचन केलें आहे. सद्गुरु गांडा महाराज यांच्या ब्रह्मस्थितींत थोडाहि फरक पडलेला नव्हता. स्थूळ दृष्टीनें गुरुदेवांपासून कितीहि दूर असो पण अंतर्दृष्टीनें ते एकच असतात. हें तत्त्व संपूर्णपणें गळीं उतरतांच मानवदेहाचें सार्थक होतें म्हणजेच जिवाचा शिव होतो. हें केव्हां घडतें? याची सुंदर चिकित्सा नाम-चिंतामणी भाग १ व २ यांत केलेली आहे. गुरूनीं दिलेला मंत्र असंख्यच नव्हे तर इतका जपावा, इतका जपावा कीं, त्या मंत्राच्या अहोरात्र रटनानें, जपण्यानें शरिरांतील अंतस्नायूं-वर, ज्ञानतंतूंवर असा परिणाम होत जातो कीं, ते स्नायू, ते ज्ञानतंतू त्या जपांतील अक्षरांचीच आकृति धारण करतात. तेव्हां त्यावर सद्गुरु हंसत आहे असें दर्शन साधकास होतें व सद्गुरु समीप आहेच असा आत्मविश्वास येतो.

## गुरुतत्त्वाचा साक्षात्कार

को गुरुः! आगमवेत्ता ब्रह्मानंदनिमग्न उपदेष्टा।

[ ब्रह्मनिष्ठ नारेश्वरचे संत रंगावधूत ]

कैक जन्मांची पुण्याई असली तरच ब्रह्मनिष्ठ गुरु भेटतो. शेंकडो जन्मांची

पुण्याई असल्याशिवाय ब्रह्मनिष्ठ तेथील भिक्षा घेत नसतो. एका ब्रह्मनिष्ठास जेऊं घातलें तर एक लाख ब्राह्मणांना जेऊं घातल्याचें पुण्य लाभतें. खरे ब्रह्मनिष्ठ दुर्मिळ असतात. भाग्यवानास पूर्वसंचितानें ब्रह्मनिष्ठाचा सहवास घडत असतो. श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठ गुरु, शिष्याच्या मनाची तयारी पाहून गुरुतत्त्वाचें दर्शन घडवितात. वास्तविक गुरुतत्त्व व परमतत्त्व एकच असतें. **सगुणरूप तें गुरुतत्व व निर्गुणरूप तें परमतत्व** पण ब्रह्मनिष्ठ गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय परमतत्त्वाचें दर्शन कसें घडणार ? गुरु वाटाडे असतात. श्रद्धा, निर्मळ पण स्थिर मन, शुद्ध चित्त, गुरुवरील प्रचंड प्रेम, ब्रह्मचर्य इत्यादि व्रतांचें कडक पालन, आसनसिद्धि, पराकोटीची एकतानता, शुद्ध, सात्त्विक, नियमित आहार-विहार, उषःकालांत ध्यानधारणा, प्राण-अपान वायूंचें निरोधन व त्यावरील पकड, संत सहवास, मंगल भूमींत वास्तव्य, ऊर्मीविना मन, सर्वत्र समदृष्टि, स्वतःला विसरून आत्मनिष्ठ होण्याचा सतत अभ्यास, मनाला आत्मचिंतनांत सदैव गढविणें इत्यादि पायऱ्यांनीं व तयारीनीं दुनियेनें बेकार, वेडा ठरविलेला गांडा ( मूळचें नांव कल्याण ) ब्रह्मनिष्ठ सद्गुरु गांडा महाराज बनले. तूं वारंवार मजसाठीं गरूडेश्वरीं येतोस हें बरें नव्हे. भडोचला राहून वडिलांची सेवा कर. तुझा मोह अजून सुटला नाहीं. गुरुप्रेमाचा सात्त्विक मोह सोड म्हणजे गुरुतत्त्व समजेल; गुरुतत्त्वाचा दृढ अभ्यास झाला कीं, परमतत्त्वमय तूं होशील अशी गोड गुरुतत्त्वाची शिकवण योगानंदांत सदा डुलणाऱ्या गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति महाराजांनीं सद्गुरु गांडा महाराजांना दिली. गुरुतत्त्वाची ओळख व्हावयास अधिकारी शिष्य हवा. गुरुतत्त्वाची ओळख कित्येक जन्मांच्या पुण्याईशिवाय होत नसते. गुरुसेवा हें अमृत आहे. गुरुसेवेनें विषयनिर्मुलन होतें. चित्त चिद्रुप होतें, द्वैत लोपतें, आपण चिदानंद आहोंत असें वाटूं लागतें. काया ब्रह्मरसानें रसरसलेली बनते. एकतेचा उदय होतो. निजानंदांत मन डोलूं लागतें. पण हें केव्हां घडतें ?

शिष्याची मनोभूमिका तयार असेल तर! अधिकारी शिष्य कोण? याबद्दल उपनिषदांत म्हटलें आहे कीं,

तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक्
प्रशांत चित्ताय शमान्विताय।
येक्षनारं पुरुषं वेद सत्यं
प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम्॥

प्रशांतचित्त, शमदमादि गुणांनीं युक्त, गुरुभेटीसाठीं तळमळणारा हा शिष्य आहे अशी खात्री झाल्यामुळेंच गुरुदेवांनीं सद्गुरु गांडा महाराज यांना अगत्यानें ठेवून घेतलें होतें. शिल्पकारही चांगला टणक दगड बघूनच त्यांतून सुंदर मूर्ति घडवीत असतो. श्रद्धा, वैराग्य, त्याग व ब्रह्मत्वासाठीं तळमळ या सत् शिष्याच्या चार कसोट्या असतात. ब्रह्मविद्येच्या ज्ञानावांचून ब्रह्मतत्त्वाचें ज्ञान कसें होणार? म्हणून त्यासाठीं वृत्ति अध्यात्मपर हवी. यासाठीं ब्रह्मनिष्ठ गुरु मार्गदर्शन फक्त करतात. परमनिधि म्हणजेच परमतत्त्व या शेवटच्या पायरीवर गुरुतत्त्व पोहोंचवीन असतें. गाय पासवल्याशिवाय पान्हा देत नसते. तसे गुरु प्रसन्न-चित्त झाल्याशिवाय आदर्श शिष्याला गुरुतत्त्व दर्शन घडवीत नसतात. परम तपोनिधि योगाधीश गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचा अधिकार फार मोठा होता. त्यांच्या माध्यमांतून परमात्मशक्ति श्री दत्तभगवान सारी कर्मे घडवीत होता. अशा परममंगल गुरुदेवाकडून सद्गुरु गांडा महाराज यांना गुरुतत्त्व परमतत्त्व अशा उच्चतर उच्चतम पायऱ्या गांठतां आल्या. अशा सद्‌गुरु गांडा महाराजांची महति कमी कशी असणार? गुरुंचा प्रत्येक शब्द त्यांना वेदप्रमाण होता. गुरुविना त्यांना दुसरें कांहींच दिसेना. हीच सम्यक दृष्टि! सद्गुरु गांडा महाराज यांनीं शूलपाणेश्वराच्या दाट झाडींत केलेल्या तीव्रतर तपस्येनंतर नर्मदा माता प्रसन्न झाली. लुटारूंना त्यांचें सेवक बनविले, महान् अधिकारी पांडुरंग महाराज यांचें दर्शन घडविलें.

पांडुरंग महाराजांचा इतका थोर अधिकार होता कीं, नर्मदामाता त्यांचें बरोबर दळूं लागे व तें सारे पीठ नर्मदापरिक्रमावासीयांना दिलें जाई. या आदर्श शिष्याला परम तपोनिधि गुरु हवा म्हणून पांडुरंग महाराज स्वतः अधिकारी व्यक्ति असतांनाहि गुरुतत्त्वदर्शन घडवूं शकतील अशा गुरुदेव वासुदेवानंद सरस्वतीकडे त्यांना पाठविलें. सद्गुरुवांचोनि सांपडेना सोय।

महत्सेवा द्वारमाहु विमुक्तये ।

गुरुतत्त्व दर्शन म्हणजे

सत्यं ज्ञानमनंत यद्‌ ब्रह्मज्योतिः सनातनम्
यदेवात्मैक एवाहं भूमा सुखमयः सदा ।

या स्थितीचा अनुभव. हा अनुभव स्वसंवेद्य आहे. बोलून दाखवित येण्यासारखा नसतो. अशा ब्रह्मानंद स्थितींत असणाऱ्यांना कसलें देहभान ? परमानंदाच्या अमृतधारा वर्षत असतांना मृत्युलोकांतील पीयुषाची काय किंमत वाटणार ?

सर्वंखल्विदं ब्रह्म । तत्त्वमऽसि ।
अहं ब्रह्माऽस्मि । अयमाता ब्रह्म ।

वगैरे वेदवाक्यांचें विज्ञान, प्रत्यक्ष साक्षात्कार घडविणारें तेंच गुरुतत्त्व, परमतत्त्व. गुरुदेव, तूं व मी निराळा नाहीं, एकच आहोंत. देहभावानें तुझा असलेला दास जीवभावानें अंश होतो. पण गुरुदेवा, तत्त्वभावानें तूं व मी एकच आहें. दुसरें कांहीं नाहींच. ही गुरुतत्त्व समजणाऱ्याची भाषा असते. आत्यंतिक अढळनिष्ठा, पवित्रतम शिष्य व समर्थ गुरु या त्रिवेणीचा उत्तम परिपाक म्हणजेच गुरुतत्त्वबोध होय; अढळ भक्तीचा पाया असला तर कर्म उपासनेंत, उपासना ज्ञानांत, व ज्ञान पराभक्तींत म्हणजे गुरुतत्त्वांत विराम पावत असतें. आत्मदृष्टीनें कोण गुरु ? कोण चेला ?

ईशावास्यमिदं सर्वं यत्किं च जगत्यां जगत् ।

या न्यायानें सर्वत्र परम तत्त्वच विलसत आहे. परमतत्त्व बुद्धिगम्य

नाहीं, बुद्धीच्याहि पलिकडे आहे. **बुद्धेः परतस्तु सः।** **मुंडोपनिषदांत** म्हटलें आहे. गुरुतत्त्व, तेंच परमतत्त्व कसें आहे ?

परीक्ष्य लोकान्मर्मचितान्ब्राह्मणो
निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन ।
तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्
समित्पाणिः श्रोतियं ब्रह्मनिष्ठम् ॥

कैक जन्मांच्या पुण्याईनें गुरुतत्त्वदर्शन ब्रह्मनिष्ठ गुरुकृपेनें घडतें.

## श्रीदत्तप्रभूची अमोघ वाणी

मी राहीन गरुडेश्वरीं । हीच होईल गाणगापुरी ।
राहीन रेवामातातीरीं । कलियुगांत ॥

गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांच्या सेवेला श्री सद्गुरु गांडा महाराज होते. तेव्हां गुरुदेव सद्गुरु गांडा महाराजांना म्हणाले, आतां माझ्या देहाचें काम संपलेलें आहे, आतां या देहाचा भरवसा नाहीं. ही दत्ताची चांदीची मूर्ति नरसोबाच्या वाडीला ठेवून ये किंवा गाणगापुरीं ने, अगर एखाद्या सुभक्ताला अर्पण कर. आतां माझा देह रहाणार नाहीं हें निश्चित आहे. आतां गुरुमाऊली अंतरणार, गाय-वासराची ताटातूट होणार इत्यादि भावनांनीं हृदय गद्गद् झालें. गुरुमाऊलीवरील प्रचंड प्रेमानें अंतर्मन धाय धाय रडूं लागलें. सात्त्विक मोह सोड ही गुरुदेवांची आज्ञा आहे. मोह अजून सुटला नाहीं. मूग गिळून दगडासारखे स्तब्ध झाले. गुरु आज्ञेप्रमाणें मूर्तीची व्यवस्था केली पाहिजे याचा विचार करूं लागले. श्रीदत्तप्रभूंनीं गुरुदेव वासुदेवानंद यांना रात्रीं दृष्टांत दिला कीं, **मला अजून गरुडेश्वरींच रहावयाचें आहे. मी इतरत्र जाणार नाहीं.** या स्थानाचा महिमा नरसोबाची वाडी व गाणगापुरासारखा नव्हे तर त्याहूनही विशेष व्हावयाचा आहे. तो सावकाश होईल. मूर्ति येथेंच ठेवून भक्तांकडून दत्तमंदिर बांधवा. त्याच्या पूजनाची सारी व्यवस्था चोख

राहील असें ठरवा. असें सांगून श्रीदत्तप्रभू त्या मूर्तींत अंतर्धान पावले. सद्‌गुरु गांडा महाराज सेवेला येतांच गुरुदेवानें रात्रीं दत्तानें दिलेला दृष्टांत त्यांना सांगितला. दत्तप्रभूची वाणी ऐकून सद्‌गुरु विस्मित झाले. श्री दत्तप्रभूच्या इच्छेप्रमाणें सारें झालें पाहिजे. दत्तमंदिर बांधावयाचें आहे, सढळ हातानें दत्ताची इच्छा पुरी करावयास हातभार लावावा. स्वतःची सेवा म्हणून त्या पत्रकांत सद्‌गुरु गांडा महाराज यांनीं एक हजार रुपयांचा आकडा टाकला. दत्तकृपेनें एका तासांत आठ हजार रुपयांचा आकडा त्या पत्रकांत भरला गेला. गुरुदेवांचें शरीर अगदीं मरणासन्न झालेलें होतें. मंदिरासाठीं या देहाकडून कांहीं होईल असें वाटत नाहीं. दत्ता, आतां मला या देहाचा कंटाळा आलेला आहे. दत्ता, तुझ्या स्वरूपांत आतां मला मिळव हे गुरुदेवाचे शब्द ऐकून दत्तप्रभूंनीं स्मित हास्य केलें. गुरुदेवांनीं भडोच येथें जावयाची सद्‌गुरूंना आज्ञा दिलेली होती. गुरु कैलासाच्या दारांत, पाय निघेना. विरह, वियोग सोसवेना, गेले पाहिजे. या करुण प्रसंगाचें वर्णन पूज्यश्री रंगावधूत महाराज यांनीं आपल्या गुरुलीलामृतांत तिसऱ्या खंडांत १४७ साव्या अध्यायांत दोहे ३० ते ४२ त वस्तुस्थिति डोळ्यांपुढें येईल असें केलें आहे. सद्‌गुरु गांडा महाराज यांनीं आपल्या गुरुमूर्ति चरित्रांत १३५साव्या अध्यायांत ७ ते १६ ओवींत लिहिलें आहे. संतांचा विरह अति दारुण असतो.

## गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति अत्यवस्थ-स्वरूपविलय.

ही बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरली. त्यांच्या दर्शनासाठीं ठायीं ठायींचे अनंत भक्तगण टोळीटोळीनें जमल्यामुळें अफाट जनसागर गरुडेश्वरीं जमला. साक्षात् दत्तच होते ते. सारा देह लोककल्याणार्थ झिजविला. त्यांच्या दर्शनासाठीं कोण येणार नाहीं? सोनगडहून श्री. रघुभाई बाळूभाई बरोबर आले. गुरुदेवांच्या प्रज्ञावान शिष्यांपैकीं सद्‌गुरु नरसिंह सरस्वति स्वामी, दीक्षित स्वामी, सद्‌गुरु सीताराम महाराज, सद्‌गुरु गांडा

महाराज ही त्रयी होती. गुरुदेवांचे लौकिक व्यक्तिमत्त्व अलौकिक होतें. **गुरुदेवांनीं आपला भौतिक देह नर्मदाकाठीं गुरुडेश्वरीं शके १८३६ इ. स. १९१४ त आषाढ शुद्ध प्रतिपदेला सोडला.** उत्तराभिमुख बसून समाधि लावून समाधींत दत्तदर्शन घेत घेत ते श्री. दत्तप्रभूंत विलीन झाले. त्यांना नर्मदेंत जलसमाधि दिली. सद्गुरु गांडा महाराजांसारखा त्याग, वैराग्यनिष्ठ शिष्य गुरुदेवाच्या सेवेला निरंतर हजर असावयाचा.

## सद्गुरु गांडा महाराज यांच्या पिताजींना संन्यासदीक्षा

वडिलांची तब्येत दिवसेंदिवस खंगत चालली. त्यामुळें प्राण केव्हां जाईल याचा नियम नव्हता. तुझे वडील सात वर्षें जात नाहीं. ह्या गुरुदेवाच्या भविष्यवाणीची मुदत संपत आलेली होती. गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें पूर्वींच त्यांना आतुर-संन्यास दिलेला होता. संवत् १९७५ त श्रावण शुद्ध नवमीला तब्येत फारच बिघडली. हें पाहून पिताजींना-स्वामींना पाटावर बसवून स्नान करविलें. नंतर वस्त्रें देऊन पाटावर बसविलें. परमात्म तत्त्वाकडे सारें लक्ष लावावयास सांगितलें. त्यांनीं हं असें डोकें हलवून सूचना मान्य झाल्याचें सुचविलें. नारायण, नारायण म्हणतां म्हणतां त्यांचा प्राणपक्षी उडून गेला. ईश्वरस्मरणांत शांतीनें मरण आलें. पूर्वतपस्या फळली. दुधाचा एक मण शिरा प्रसादासाठीं गांडा महाराजांच्या प्रेरणेनें तयार केला गेला. स्मशान यात्रा निघाली. यात्रेस सारा गांव उलटला होता. पुण्यप्राणी गेला असें सारें हळहळत होते. भजनकीर्तन करतां करतां नवचौकीच्या जवळ आले. नर्मदेला महापूर आलेला होता. होड्या टाकण्यास नावाडी धजत नव्हतें. पुण्यवानांच्या पुण्यानें फौजदाराच्या हुकुमानें एक होडीवाला तयार झाला. मृत देहाची पुन्हां षोडशोपचार पूजा केली. शिऱ्यांचा नैवेद्य दाखविला. स्वामीच्या मृत देहाला मोठमोठे दगड बांधुन नर्मदेच्या मधोमध होडी नेऊन स्वामींना

जलसमाधि दिली. नर्मदेच्या प्रवाहांत विसर्जन केलें. या गर्दींत ब्राह्मणाचा एक मुलगा नदींत पडला, पण तो पोहत पोहत कांठास लागला. होडी पाठवून त्याला आणला तेव्हां साऱ्यांच्या जीवांत जीव आला. भक्तांची लाज देवाला. सद्गुरु गांडा महाराजांना गुरुदेवांच्या कृपेनें आत्मसिद्धि व योगसिद्धि लाभली होती. सिद्धीचा उपयोग करण्यांत तपहानी असते. खरे संत सिद्धी राबवीत नसतात. पण सिद्धीच संतसेवेला तयार असतात. एक मण शिऱ्याचा प्रसाद साऱ्यांना वाटून उरला. तो आप्तस्वकीयांना देण्यांत आला.

सद्गुरु गांडा महाराजांनीं दहा दिवस लिंगपूजा केली. यथाशास्त्र अकरावा, बारावा दिवस केला. त्रयोदशीच्या दिवशीं आराधना केली. तीनचार हजार लोक जेवावयास होते. स्वयंपाक तयार झाला पण आकाशांत ढगांनीं इतकी भाऊगर्दी केली कीं पाऊस आतां येणार. जोराजोराच्या मेघगर्जना होऊं लागल्या. पावसाचें पाणी आपल्या जेवणांचेंही पाणी करणार अशी साशंक भीति होती. सद्गुरु गांडा महाराजांनीं आज्ञा दिली कीं पानें टाका, लवकर वाढा. तुमचें जेवण होईपर्यंत पाऊस येणार नाहीं. सिद्धवाणीच ती. साऱ्यांचीं जेवणें झालीं. नंतर इतका जोराचा पाऊस आला कीं, तीनचार हजार लोकांच्या उष्ट्या पत्रावळी पावसाच्या पाण्यानें नर्मदेंत नेऊन टाकल्या. अशा रीतीनें सद्गुरु गांडा महाराज आईबापांना दिलेल्या वचनांतून मुक्त झाले. पूर्वपुण्याई बलवत्तर दुसरें काय ?

## योगानंद सरस्वति

सद्गुरु गांडा महाराज मातृपितृऋणांतून मुक्त झाले. गुरुदेवाची आज्ञा पिताजी गेल्यावर संन्यास घे. परमुलुखांत प्रारब्ध बघावें व लोककल्याणासाठीं निरपेक्षपणें उर्वरित आयुष्य व्यतीत करावें म्हणून संन्यास घ्यावयाची तयारी केली. जो मनाचा संन्यासी, त्यागाचा काषाय, भगवा रंग ज्याच्या मनानें पूर्वाश्रमांपासून घेतलेला, संन्यासाश्रमाचीं सारीं चिन्हें

पूर्वाश्रमांतही सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ दिसत होतीं, अशा सद्गुरु गांडा महाराजांनीं संन्यास घ्यावयाचें ठरविले हा शब्दप्रयोगच चुकीचा वाटतो या वेळीं संत रोहिदासांची आठवण येते. संत रोहिदास जातीचे चांभार वरकरणी होते. हृदय ब्राह्मणाचें होतें. ब्राह्मण पंक्तींत बसावयास नाराज दिसतांच, शरिरांतील जन्मजात जानवें अरीनें शरिराचा भाग चिरून दाखवितांच ब्रह्मवृंद संतोषला. संन्याशाच्या वरच्या पोषाखावर कां संन्यास अवलंबून असतो? मनाचा संन्यासी तो खरा संन्यासी. संन्यास घेण्यापूर्वीं अंतर्मन प्रश्न करीत असतें, तूं सारें सारें सोडलें आहेसना? खरा त्यागी आहेस का स्मशानवैराग्याचा त्यागी आहेस? तूं निर्द्वेषी, निर्मोही, निर्वैरी, निरिच्छ, निष्काम, निष्कांचन, निरुपद्रवी, निर्घोर, निरलस, निर्भोगी, निर्विकारी, निरपेक्ष, निरुपाधिक, निष्कपटी, निष्कर्मी अशा चौदा-पंधरा नकारांत तूं निरंतर रहाणार आहेस ना? संन्यासांत त्याग हा आत्मा असतो तर पूर्ण वैराग्य हा प्राण असतो. अंतर्मनानें विचारलेल्या चौदा-पंधरा नकारांना जो दृढनिश्चयानें, निधड्या छातीनें छातीठोक उत्तर देतो तो खरा संन्यासी.

सद्गुरु गांडा महाराजांनीं संन्यास घ्यावयाचें ठरविलें. पण संन्यास कोणाकडून घ्यावयाचा हा विचार मनांत येतांच गुरुदेव वासुदेवानंद यांनीं साक्षात्कार दिला कीं तुझें दंडगुरु कृष्णानंद सरस्वति आहेत. आतां कृष्णानंद सरस्वति यांचा शोध सुरू झाला. गोमती नदी कांठीं डाकोर येथें मोठ्या महाराजांचे गुरुबंधु कृष्णानंद सरस्वति हे महान् अधिकारी पुरुष असल्याचें तपासाअंतीं समजलें. शरण गेले. संन्यास घेण्याची इच्छा दर्शविली. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांच्या साक्षात्कारानें आपल्या चरणीं आलों आहें. शिष्याचीं सारींच लक्षणें उत्तम असलेलीं पाहून समाधान व संतोष वाटला. संवत् १९७६ च्या माघ महिन्यांत

श्री कृष्णानंद सरस्वति यांनी सद्गुरु गांडा महाराजांना संन्यास दीक्षा, योगपट व दंड देऊन योगानंद सरस्वति हें नामाभिधान ठेविलें.

योगानंद सरस्वति झाल्यावर शके १८४१ पहिला चातुर्मास भडोच येथें केला. दुसरा शके १८४२ त नाशिकांत केला. हा चातुर्मास पुरा झाल्यावर फिरतां फिरतां कावेरी नदीकाठीं असलेल्या पुराणप्रसिद्ध अनावल स्थानांत आले. सद्गुरु गांडा महाराजांनीं संन्यासदीक्षा घेतली तेव्हां पूर्वाश्रमांतील आसन, पांचरात्रयाची धावळी दुसऱ्या अधिकारी व्यक्तीला दिली. रा. रविशंकर यांना पादुका दिल्या. स्वतःजवळचा अंगुष्ठमात्र दत्त महाराजांचा फोटो होता तो व श्रीफळ श्री. रघुजीचे सासरे श्री. गोविंदजी यांना दिलें. अशी निरवानिरव करून पूर्वाश्रमांतील कोणतीहि वस्तू जवळ ठेविली नाहीं. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं जितक्या कटाक्षानें संन्यासदीक्षेचें पालन केलें तितक्याच कटाक्षानें पाळण्याचा दृढनिश्चय केला.

## अनावल येथें तिसरा चातुर्मास सं. १९७८ शके १८४३

नवसारी प्रांतांत सुरत जिल्ह्यांत महुवा तालुक्यांत कावेरी व कावेरा या नद्यांच्या संगमावर शुक्लेश्वर हें पुराणप्रसिद्ध धाम आहे. शुक्लेश्वर महादेवाचें स्वयंभू शिवलिंग अनाविल ब्राह्मणांचें आराध्य दैवत आहे. आपल्या जातीच्या आराध्य दैवतापाशीं चातुर्मास काढावा या हेतूनें योगानंद सरस्वति तेथें आले. अति दाट जंगल, पायवाट दिसायची पंचाईत. दहा बारा झोपड्या. गांवांत वाघाची भीति, रहावयास सोय नाहीं. नदीचें पाणी दूर, आकाशाच्या छत्राखालीं स्वयंभू शिवलिंग, जवळच देवालयाचे पडके अवशेष. हें शब्दचित्र त्या वेळेच्या तेथील स्थितीचें आहे. योगानंद सरस्वतींनीं इष्ट देवतेची आराधना करण्यांत चातुर्मास घालविला. अनाविल ब्राह्मण दरसाल इष्टदेवतेच्या दर्शनासाठीं जातातच. योगानंदांनींच चातुर्मासांत रहाण्यासाठीं गवताची झोपडी बनविली होती. अनाविल समाजाच्या पुढाऱ्यांनीं, धनिकांनीं, इष्ट देवतेची जागा आज प्रतिकैलास

भुवन बनविलें आहे. पाण्याचे नळ, घाट, इलेक्ट्रिक, टोलेजंग इमारती, अतिथिगृह, लग्न, मौंजी थोडक्यांत करावयाच्या सुखसोयी करून तें पवित्र ठिकाण अगदीं सुरम्य बनविलें आहे. सारा नूर पालटला. खरें विश्रामधाम बनविलें गेलें. श्री. गांडुभाई खंडूभाई व प्रमुख त्यांची कार्यवाहक मंडळी यांच्या व इतर साहाय्यकांच्या प्रयत्नानें शुक्लेश्वर स्वयंभू लिंग गुजराथबाहेरही गाजत आहे. योगानंद सरस्वतींनीं अनावलस्थान सोडलें, नव्हे गुजराथ सोडलें. परत ते गुजराथेंत कधीं आले नाहींत. गुरुदेव वासुदेवांनीं माणगांव सोडलें; परत ते जन्मांत तिकडे गेलेच नाहींत. गुरुच्या पावलावर पाऊल याहि बाबतींत शिष्यवर योगानंदांनीं टाकिलें. एका गुजराथी महान संतानें गुजराथला शेवटचा रामराम करून अपरिचित, भिन्न भाषेच्या मराठवाड्यांत पाऊल टाकिलें. पदयात्रा सुरू झाली. **निष्कांचन, निरुपाधिक, निःसंग, निर्विकार, निष्काम, निराधार, निरिच्छ या सप्ततीर्थांतून आपल्या आयुष्याची त्यांनीं सप्तपदी सुरू केली.** योगाभ्यास, समाधि व आत्मानुसंधान यांत रमून हा ब्रह्मनिष्ठ संत जन-हितार्थ काया झिजवूं लागला. गुरुदेव पाठीशीं आहेत, त्यांची आज्ञा प्रमाण या सूत्रांत त्यांनीं आपलें आयुष्य व्यतीत केलें. अनावल येथें असतांना योगसूत्रावर बरेंच लिखाण केलें, तें अप्रसिद्ध आहे. येथून योगानंद व्यारा येथील भक्त रा. देवशंकर प्रभाशंकर पाठक याजकडे गेले—नव्हे त्यांच्या सद्भावानें त्यांना ओढून नेलें. महाभाग्य त्यांचें; ब्रह्मनिष्ठानें त्यांचेकडील भिक्षा घेऊन एक लाख ब्राह्मण जेऊं घातल्याचें पुण्य त्यांच्याकडून घडविलें.

## भडोचचे कल्याणजी

## श्रीसमर्थांचा कल्याण, दुसरा सद्गुरु गांडा महाराजांचा कल्याण

श्री. कल्याणजींचें एकनाथाप्रमाणेंच संसार व परमार्थ यांची उत्तम सांगड घालणारें भाविक हृदय होतें. सद्गुरु गांडा महाराज यांची वडील बहीण यमुनाबाई हिचे हे यजमान. मूळचे खरसाडचे रहिवासी. तलाठ्याच्या

नोकरीनिमित्त भडोचला आले ते तेथेंच रमले. सेवा कशी करावी याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे हें दांपत्य. गोड हृदय, सेवेला वाहिलेलें मन, उत्कृष्ट आदरातिथ्य, अटळ व अढळ श्रद्धा, संतसेवेची आवड, धार्मिक वृत्ति, पापभीरुता व मोहक वाणी यांनीं यांचा संसार नटलेला होता. म्हणूनच श्रीमत् परिव्राजकाचार्य योगभूषण गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं कल्याणजींना कृष्णाचा मंत्र व त्यांच्या पत्नीला अन्नपूर्णेचा मंत्र देऊन पुनीत केलें होतें. श्री सद्गुरु गांडा महाराज यांच्या जीवनांत व हालचालींत कल्याणजींचा फार मोठा भाग आहे. कल्याणजी कृपापात्र होते एकाच ब्रह्मनिष्ठाचे नाहीं तर तीन ब्रह्मनिष्ठांचें. ब्रह्मनिष्ठ वासुदेवानंद सरस्वति यांचे गुरु होते. ब्रह्मनिष्ठ सद्गुरु गांडा महाराजाचे मेहुणे म्हणून नव्हे तर सेवक म्हणूनच त्यांच्या जीवनांत ते गाजले. तिसरे ब्रह्मनिष्ठ पूज्य श्री रंगावधूत नारेश्वर यांचे साहाय्यक गुरुदेवांच्या दोन्ही साक्षत्कारांच्या वेळीं. ही घ्या दत्तपुराणाची पोथी व गांडा दक्षिणेंत तुझी वाट पहात आहे. तेव्हां गांडा कोण व कोठें याचें सूचन ब्रह्मनिष्ठ रंगावधूतांना करणारे तेच हे कल्याणजी. गंगा, यमुना, सरस्वति या पवित्र तीर्थत्रयीप्रमाणें तीन ब्रह्मनिष्ठांची सेवा घडून त्यांचे कृपापात्र होण्याचें भाग्य कल्याणजीसारख्या एखाद्याच भाग्यवानाचे नशिबीं येतें. तीन ब्रह्मनिष्ठ म्हणजे तीनमुखी दत्त यांच्या निरंतर पाठीशीं असत म्हणून संसार हाच त्यांचा परमार्थ बनला. नारेश्वरचे ब्रह्मचारी परमपूज्य श्री रंगावधूत महाराज यांना परमतत्त्वाचा आदेश आला. दत्तपुराणाचीं एकशें आठ पारायणें कर. तेव्हां दत्तपुराणाची पोथी कोठें मिळेल या तपासांत होते. कांहीं कारणावरून पूज्य श्री रंगावधूत भडोच येथें आले तेव्हां त्यांच्या मनांत आनंद मावेना. त्याची प्रचीती श्री. कल्याणजीकडून त्यांना दत्तपुराणाची पोथी मिळाली व त्यांनीं आपला इच्छित संकेत पुरा केला. पूज्य श्री रंगावधूतांना गुरुतत्त्वाकडून लागोपाठ दोन आदेश आले. एकशें आठ दिवसांत नर्मदा परिक्रमा करावी व दुसरा ब्रह्मचारी

तुझी दक्षिणेंत गांडा वाट पहात आहे. दक्षिणेंत जा. दक्षिणेंत कोठें जावें ? व गांडा कोण ? याची माहिती भडोचला श्री. कल्याणजी यांचेकडूनच पूज्यश्रीना समजली व ते प्रयत्नास लागले ! श्रीसद्गुरु गांडा महाराज विरचित श्रीगुरुमूर्ति चरित्र भडोच येथें छापवितांना प्रुफें तपासावयास पूज्यश्री सहा महिने राहिले होते. त्यामुळें चिरपरिचय झाला व पूज्यश्रींचीहि सेवा करावयाचा लाभ त्यांना लाभला. पूर्वपुण्याईशिवाय असल्या गोष्टी व योग घडत नसतात. निकोऱ्याहून श्रीसद्गुरु गांडा महाराज वैतागून घर सोडून तीर्थाटनास गेले. तपासा अंतीं कित्येक महिने तपास लागला नाहीं. पण ओळखूं येण्याच्या रोड परिस्थितींत सद्गुरु परत निकोऱ्यास आले. पूर्वपरिचित इसमानें त्यांना नोकरी लावून दिली. वडिलांना तलंगापुरास त्या पूर्वपरिचित इसमानें पत्र पाठविलें. सद्गुरुचा शोध लागला. निकोऱ्यास पितापुत्रांची भेट झाली. या साऱ्या खटाटोपांत श्री. कल्याणजींचा बराच मोठा भाग होता. दगदगीनें ते त्रासले नाहींत कीं, त्यांनीं कधीं कंटाळा केला नाहीं. त्याचीच दुसरी आवृत्ति सद्गुरु गांडा महाराजांचा शोध लागेना. गुरुदेवांच्या सेवेंत सिनोर येथें असतांना एका न्यायाधीशानें ओळखलें, वडिलांना पत्र पाठविलें, तपास लागला. या धावाधावींतही कल्याणजी अग्रगण्य होते. त्यांनींच गुरुदेवांना बिकट गृहपरिस्थिति निवेदिली. नंतर गुरुच्या आज्ञेनें परत तलंगपुरास सद्गुरु आले. सद्गुरुच्या सेवाभावांत कल्याणजी सदा रमलेले असत. सद्गुरुंना भिक्षा देतांना कितीहि अतिथि येवोत, त्यांना भोजन देण्यास हें दांपत्य कधींच कंटाळले नाहीं. मेहुण्याच्या नात्यानें कल्याणजींनीं नजरचुकीनें एकदांहि थट्टामस्करी केली नाहीं. सेव्यसेवक नात्यानें सद्गुरु गांडा महाराजांशीं सदा संबंध असत. कंटाळा हा शब्द कल्याणजीना अपरिचित होता. वृत्ति रंगलेली. आपण भलें, आपलें काम भले. वसिष्ठअरूंधतीप्रमाणेंच हें जोडपें शोभत होतें. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांची आचारसंहिता आत्यंतिक कडक होती. ते

अत्यंत कर्मठ होते. हिमालयाच्या चातुर्मास्यांत अतिशय थंडी असल्यामुळें एका साधूच्या शेकोटीजवळ शेकावयास बसतांच ऊठ, अग्नीजवळ बसतोस ? अशी कडक ताकीद देऊन श्रीदत्तांनीं गुरुदेवांना शिक्षा केली. आचारसंहितेंत थोडीहि चूक झालेली खपत नसे. गुरुदेवाचे प्रतिबिंब ते सद्‌गुरु गांडा महाराज फारच आचारनिष्ठ व कर्मनिष्ठ असत.

## उष्टी पत्रावळ काढिली

सद्‌गुरु गांडा महाराजाबरोबर आलेल्या वाणी अतिथींचें भोजन श्री. कल्याणजी यांचें घरीं झालें होतें. त्यावेळीं घरांत मोलकरीण हजर नसल्यामुळे त्याची उष्टी पत्रावळ सौ. यमुनाबाई, सद्गुरुची बहीण, यांनीं काढतांना सद्‌गुरु गांडा महाराजांनीं पाहिली. हें त्यांना सोसवलें नाहीं. दुसऱ्या दिवसांपासून कल्याणजी यापुढें तुझ्या घरची भिक्षा घ्यायची नाहीं. ब्राह्मणानें इतराची उष्टी पत्रावळ काढावी ? ब्राह्मणधर्म काय राहिला ? हा धर्माचा प्रश्न नसून हा प्रश्न तत्त्वाचा आहे. हे शब्द ऐकतांच कल्याणजी व त्यांच्या सेवारत धर्मपत्नी पाण्यांत पडलेल्या मातीच्या ढेकळासारख्या विरघळल्या. क्षमायाचन केलें. सद्‌गुरुच्या प्रेमाला सुरुंग लागलेला त्यांना सोसवेना. सद्‌गुरुंची भिक्षा नित्याप्रमाणें आपल्या घरीं झाली पाहिजे हा त्यांच्या मनाचा अट्टाहास होता. सद्‌गुरु गांडा महाराज अतिकडक होते. त्यांच्या पुढें ब्र बोलण्याची कोणांत हिंमत नसे. सद्‌गुरु शांत कसे होतील हा प्रश्न होता. सारे चिंतेंत पडले. तेव्हां सद्गुरुनीं यावर उपाय सांगितला. काय करावयास पाहिजे तो आचार समजाविला. त्या दांपत्याची देहशुद्धि करविली व तीन दिवस गोमुत्रावर रहाण्याची आज्ञा केली. श्रीसद्‌गुरुची आज्ञा शिरसावंद्य करून त्या श्रद्धाळू दांपत्यानें तीन दिवस केवळ गोमुत्रा-वर काढिलें. तेव्हां सद्गुरु शांत झाले व त्यांनीं पूर्ववत् श्री. कल्याणजीकडील भिक्षा घेणें सुरु केलें. **देहशुद्धि, अन्नशुद्धि, आसनशुद्धि, वासनाशुद्धि, कर्मशुद्धि, चित्तशुद्धि झाल्याविना आत्मशुद्धि होत नसते.** वेदान्त

वाणींत नाहीं तर आचरणांत उतरावयाचा असतो. चित्त शुद्धीविना केलेली परमात्मसेवा वायफळ असते. **श्री सद्‌गुरु गांडा महाराजासारखा अतुल त्याग व कल्याणजीसारखी संतसेवा क्वचितच बघावयास मिळेल.** गुरुसेवा कशी करावी याचें उत्तम प्रतिक सद्गुरु गांडा महाराज होते. अगदीं साध्या व सरळ व्यक्तिमत्त्वांतून ब्रह्मनिष्ठ, होण्याइतकी मजल गांठावयास ब्रह्मनिष्ठ गांडा महाराज, ब्रह्मनिष्ठ रंगावधूत महाराज यांची तीव्रतर तपस्या, अढळ गुरुनिष्ठा व निःसीम असा विवेकयुक्त त्याग ही त्रयीच कारणीभूत झाली. या व्यक्ति सामान्यांतून उच्चपदास पोहोंचल्या असल्यामुळें साऱ्यांना त्या आपल्या व जवळच्या वाटतात व आपण त्यांच्या समान व्हावें ही क्षणिक ऊर्मि मनांत उसळ्तें. तेव्हां त्यांची कैक जन्मांची तपस्या योगभ्रष्टांना साहाय्यभूत झाली आहे ही गोष्ट आपण विसरतों.

## भाग्यवान कल्याणजी

भाग्यवान कल्याणजी सद्‌गुरु सेवेमुळें गाजले, अमर झाले. ज्याला गुरुसेवेची गोडी लागली तो देहाकडे पहात नसतो संसाराकडे पहात नसतो याचें प्रात्यक्षिक नारेश्वरचे अमृतलाल मोदीकाका यांच्यांत मला दिसलें. दोन घांस कसें तरी खावयाचे व सारे तनमन गुरुकार्यांत वहावयाचे, सारी व्यवस्था बिनबोभाट अविरत श्रमानें रात्रंदिवस करावयाची हें मी आजवर कधीं न पाहिलेलें नारेश्वराचें दृश्य पाहून लेखकाची लेखणी जशी स्तिमित झाली तशीच कल्याणजीची मति कुंठित झाली असावी. असल्या आदर्श दृश्यामुळेंच त्यांच्यांत इतका गुरुभक्तिसंचार झाला असावा. असल्या व्यक्ति अमर ठरतात, अमर असतात. देहाची दोन चिमुट माती केव्हां तरी मातींत मिळतें पण सेवाकार्य अमर असतें. सद्गुरु गांडा महाराज यांचे चरित्र गुजराथींत लिहिणारे वकील निःसीम गुरुभक्त श्री. जमियतराम अध्वर्य यांच्यांत पूर्वीं संचारत असणाऱ्या भावावेशाचें

वर्णन लेखकापाशीं होतें. प्रेमाभक्तीचा आविष्कार भावावेश असतो. सात्त्विक अष्टभावाची परिसीमा तो भावावेश. पुज्यश्रींच्या आदेशानुसार वकिली सोडून परमात्मतत्त्वाच्या प्राप्तीसाठीं ते गुरुसेवेंत अखंड रत झाले आहेत. त्यांच्या व पुज्यश्रींच्या आज्ञेनें व शुभ आशीर्वादानें लेखकाची लेखणी सद्गुरु योगानंद सरस्वतींचें गुणगान गाऊं लागली आहे, हें लेखक आपलें महत्भाग्य समजतो. सद्भक्तांचा अंतकाळ भाग्यवान ठरत असतो. तो त्यांच्या पुण्याईचा परिपाक असतो. भडोचला गुरुमूर्तिचरित्र छापण्याचें काम चालू होतें. प्रुफें तपासावयास तपतेजोनिधि श्री. रंगावधूत महाराज सहा महिने भूतनाथाच्या शिवालयांत राहिले होते. त्या वेळीं त्यांची सेवा घडत होती. सत्समागमांत काळ जात होता. काळ श्री. कल्याणजींना न्यावयास टपलेला होता. पुज्यश्रींशीं आत्मीयता वाढत होती. (पुष्पसंगें मातीस वास लागे ) या न्यायानें कल्याणजी आत्मरत होऊं लागले. गुरुमूर्तिचरित्र छापून तयार झाले तेव्हां पूज्यश्री रंगावधूत यांनीं स्वतः गुरुमूर्तिचरित्राचें पारायण श्री. कल्याणजी यांना वाचून दाखविलें. किती महत्भाग्य कल्याणजींचें! ब्रह्मनिष्ठाची अमृतवाणी दुसऱ्या ब्रह्मनिष्ठाकडून ऐकावयास मिळाली. तब्येत तोळामासा करूं लागली. तेव्हां कल्याणजी हें पारायण पुरें ऐका, मी हजर असतांना बिचारा काळ कसा येऊं शकेल? पारायण पुरें झालें. आतां हा देह आपला नाहीं अशी कल्याणजींची खात्री झाली. श्री. अवधूतांनाहि समजलें. म्हणून ब्रह्मसाक्षात्कारी श्री रंगअवधूतांनीं श्री. कल्याणजींना प्रेषोच्चार करून आतूर संन्यास दिला. श्री. कल्याणजींना स्मरण आलें कीं, सद्गुरु गांडा महाराज म्हणाले होते. तुझ्या अंतःकाळीं मी हजर राहीन. ते श्रीरंगावधूतांच्या सान्निध्यानें खरें ठरलें. शांति समाधान लाभले. आत्मरंगांत रंगून मार्गशीर्ष वद्य २ इ. स. १९२८ रोजीं ते दत्तपदीं विलीन झालें. त्यांचा मृतदेह नर्मदेंत विसर्जन झाला. श्री. रंगावधूत त्यांच्या बाराव्या तेराव्यास परत भडोचला आले. धन्य ती आत्मीयता!

## सद्गुरु गांडा महाराज यांचें मराठवाड्यांत पदार्पण

गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें गुजराथमायभूमीला कायमचें वंदन करून सद्गुरु गांडा महाराज हे नंदुरबार, चाळीसगांव, वेरूळ, अजिंठा करीत करीत औरंगाबादेस आले. एका गुजराथी इसमाकडे थांबले. गुजराथचे महानयोगी संत आले आहेत. असें समजतांच लोक दर्शनार्थ येऊं लागले. पाथरीचे श्री. पंडीतराव चौधरी यांची भेट झाली. गुरुदेवाबरोबर प्रवासांत असावयाचे म्हणून बरीचशी मंडळी इकडे पूर्वपरिचित होतीच. इतर दक्षिणी मंडळी आलेली होती. त्यांच्यावर सद्गुरु गांडा महाराज यांच्या खोल ज्ञानाचा व योगतेजाचा प्रभाव पडला. औरंगाबाद, शेद्र, साटोना इत्यादि ठिकाणचे गुरुबंधू भेटले. सद्गुरुंना पाथरीच्या चौधरी मंडळींनीं पाथरीस आणले. गुंज येथें गोदावरी-गंगेच्या स्नानास नेलें. तें रम्य ठिकाण पाहून सद्गुरु तेथेंच रमले.

### मराठवाडा

मराठवाडा म्हणजे गोदावरीमातेचा मंगल हार. गोदातीर सोन्याचा तुकडा समजला जातो. किती तरी संत, महात्मे, सत्पुरुष, विभूति यांची तपभूमि असणारा तो मराठवाडा, ठायीं ठायीं आत्मानंदांत योग्यांना डुलविणारा तो मराठवाडा, वीतभर मराठवाड्यांत २ शक्तिपीठें, ३ ज्योतिर्लिंगें व मोरेश्वर बाप्पाचें पुरातन स्थान आहे. मोंगल साम्राज्यांत डुलत असतांनाहि इतके संत, इतकीं क्षेत्रें हें मराठवाड्याचें वैशिष्ट्य आहे. मराठवाडा मराठीची मायभूमि, जन्मभूमि. मुंबई-पुण्यानें तिला वाढवून मोठें केलें. कांहीं काळ तिची जोपासना करून मराठीला चांगलेंच बाळसें आणिलें. एकनाथ महाराजांचे नातू पूर्णानंद यांनीं सुमारें दीडशें ग्रंथ मराठी भाषेंत लिहिले. सुप्रसिद्ध विठोबा आण्णा दप्तदार हे मराठवाड्यांतील बीदरचे रहिवासी होते.

टाकळीचे सिद्ध दाजी महाराज, मुद्गलचे सत्पुरुष हृषिकेषानंद ( नागोबा

देव ), नयकुटवाडीचे श्री. माधवानंद इत्यादि योगरत्नें सद्गुरु योगानंदाच्या समकालीन तळपत होती. संतवाङ्मयांत आपलें उत्तर आयुष्य सर्वस्वीं घालविणारे संतचरणरज पण मनानें अधिकारी असणारे श्री. दासगणू मराठवाड्यांतील नांदेडचे गुरुचरित्रासारखा मराठींत प्रासादिक ग्रंथ-लिहिणारे सायंदेवाचे वंशज कडगंजीचे, याच मराठवाड्यांत संत एकनाथ पैठणास गाजत आहेत तर पुणतांब्याला चांगदेव वटेश्वर आजहि कीर्तीनें डुलत आहेत. मंजरसला त्रिविक्रमाचें मंदिर साधकाला आकर्षणीय आहे. मांजरीच्या हत्येच्या पापाच्या निरसनार्थ कैक भावीक मंजरसला येत असतात. सादोळा येथील गौतममुनींचा आश्रम बघण्यासारखा आहे तर गंगामसला येथील मोरेश्वर गणपतीचें स्थान अनादिसिद्ध आहे. गोंड-गावची देवी प्रति माहुरचीच वाटते तर मुद्गल गांवीं मुद्गलऋषींच्या तप-तेजाची आठवण येते. रत्नेश्वर रामपुरीला प्रभुरामचंद्रानीं रत्नांनीं शिव-पूजन केले तर राक्षसभुवनाचें शनीचें मंदीर भारतांत प्रख्यात आहे. उमर-खेडचे तुकामाई संत गोंदवलेकर महाराजांचे गुरु मराठवाड्यांतील. दौल-ताबादचे जनार्दन स्वामी, संत एकनाथांचे गुरु यांची कार्यभूमि मराठ-वाडा. आंबेजोगाई येथें दासोपंत, मुकुंदराज, जोगेश्वरी यांचा विजयध्वज व कीर्तिपताका फडफडत आहे तर वीरसनी, बनवस इत्यादि दत्तसांप्र-दायिक व एळेगांवचे तुकाराम महाराज याच मराठवाड्यांत कीर्तीनें अजरामर झालेले आहेत. आंबेजोगाईचे दासोपंत, जांबचे श्रीसमर्थ रामदास हीं तेजस्वीं रत्नें मराठवाड्यांतीलच. तुळजापूरची भवानी, बासरची सरस्वति हीं शक्तीचीं आद्यपीठें मराठवाड्यांतीलच ग्रुंजपासून पांच मैलांवर शुक्रतीर्थ ( निमगांव ) येथें पूर्ववाहिनी गोदा शुकदर्शनासाठीं पश्चिमवाहिनी बनली. परळी वैजनाथचें सिद्ध तुळशीरामबाबा देहीं असून देहातीत होते. परळी वैजनाथ, अवंढ्या नागनाथ, घृणेश्वर हीं ज्योतीर्लिंगें मराठवाड्याचीं कीर्तिमंदिरें होत. मुद्गलेश्वर हें शिवस्थान

कर्नाटक, आंध्र, दक्षिणेंतील वैष्णवांचें कुलदैवत आहें. अशा मराठवाड्यांत सद्गुरुनीं प्रवेश केला. व्यारा, नंदुरबार असा प्रवास करतां करतां चाळिसगांवाहून उम्हाळे वेरुळ करीत औरंगाबादेस आले. गुरुदेवांच्या सान्निध्यांत सद्गुरु गांडा महाराजांना या भागांतील बऱ्याच लोकांनीं पाहिले होते; थोडा फार परिचय झालेला होता.

## औरंगाबाद

सद्गुरु लोकनाथतीर्थांच्या शक्तिपातदीक्षेचे अधिकारी अनुयायी, गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचें शिष्य ज्यांनीं गुरुदेवांचे समग्र ग्रंथ छापवून प्रकाशित केले, जे स्वत: महान अधिकारीपुरुष आहेत ते पुणें येथें राहणारे सद्गुरु गुळवणी महाराज यांचे अनुयायी औरंगाबादला श्री. विष्णुपंत पंची कांहीं कामानिमित्त आलेले त्यांना श्री. योगानंद सरस्वति यांचें दर्शन घडलें. अत्यानंद झाला. अत्याग्रहानें यतिवर्यांना आपल्या सेलूगांवीं घेऊन गेले.

## सेलूगांव

हरिभक्तिपरायण श्री. विष्णुपंत पंची यांनीं योगानंदांची अमृतरसवाणी ऐकण्यासाठीं बरेच दिवस ठेवून घेतलें. भक्तमंडळ जमूं लागलें. दर्शनार्थी लोकांची संख्या बरीच वाढत गेली. सत्संग घडूं लागला, अध्यात्मिक विषयाची चर्चा होऊं लागली, भजन, पंचपदी कार्यक्रम नियमित होऊं लागले. नंतर पारमार्थिक चर्चेंत बराच रंग येऊं लागला. एके दिवशीं श्री. विष्णुपंत पंचीनें योगानंद महाराजांना विनम्र भावानें प्रार्थना करून एक प्रश्न विचारला. तोच प्रश्न योगायोगानें योगानंद सरस्वति महाराजांचें जीवनचरित्र लिहिण्यासाठीं गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति, योगानंद सरस्वति या ब्रह्मनिष्ठांवर निस्सीम प्रेम असणारे पांथरीचे चौधरी कुटुंब यांचेकडेस लेखकाचा आठ दहा दिवस मुक्काम होता, त्या वेळीं श्री. विठ्ठलराव चौधरी यांनीं लेखकाला तोच प्रश्न विचारला. **मानव जन्माची**

**सार्थकता कशी करतां येईल?** संसारांतील सारे व्याप सांभाळून आत्माभिमुख होण्याचा संसारिकांना राजमार्ग कोणता? अज्ञानी जीवांना भवसागर तरून जावयास कांहीं उपाय आहे काय? असा तो प्रश्न होता. त्यावर अधिकारी व्यक्ति योगानंद सरस्वति यांनीं जें उत्तर दिलें तें जरा व्यापकपणें सामान्यांना मार्गदर्शनासाठीं मुद्दाम लिहीत आहे.

* * *

# किरण अकरावा

## सेलू येथें योगानंद सरस्वति यांचें पहिलें प्रवचन

सच्चिदानंद प्रभूनें या चराचर संसारांत अनेक योनि निर्माण केलेल्या आहेत. इतक्या साऱ्या योनि तयार करून जगन्नियंत्याला समाधान वाटलें नाहीं. तेव्हां त्यानें मनुष्ययोनि तयार केली. देवाला वाटलें या मानवयोनी मार्फत प्रभूप्राप्ति होऊं शकेल. ब्रह्मविद्या प्राप्त करायला मानवदेहच समर्थ आहे, इतर योनि केवळ भोगयोनि आहेत पण मानवदेह हा भोगयोनि आहे व कर्मयोनि पण आहे. मानवप्राणी म्हणा कां इतर प्राणी म्हणा यांत अहं व मम या भावना असणारच. या भावना इतर प्राण्यांत मर्यादित आहेत तर मानवांत तसें नाहीं. निसर्ग हें मायेचें खेळणें आहे तसें मानव हेंही मायेच्या हातांतील बाहुलें आहे कारण मानवही निसर्गाचाच भाग आहे. माया जशी नाचवील तसें सारे नाचणार. **मानवांत पशूपेक्षां बुद्धि हें आगळें वैशिष्ट्य आहे.** या बुद्धीचा मानव सदुपयोग करीत नाहीं पण विषयलोलुप होऊन देवानें मुद्दाम दिलेल्या बुद्धीचा तो दुरुपयोग मात्र करतो. त्यामुळें जन्ममृत्यूंच्या फेऱ्यांतून त्याची सुटका होत नसते. आपल्या विषयवासनेमुळें, चौऱ्यायशी लक्ष योनि फिरण्याच्या रहाटगाडग्यांत तो सांपडतो. **मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति** । मानवरूपधारी पशूसारखा तो फिरत असतो. मनाशीं नीट विचार केला तर मानवमनांत देवाला आपलासा करतां येईल अशी दांडगी परमात्मशक्ति सुप्त असते ती त्यानें जागृत केली तर गुरुदेव वासुदेवानंद सरस्वतीप्रमाणें परमतत्त्वाशीं मिळून ब्रह्मांडनायक होतां येईल हें गुरुदेवांनीं आपल्या उदाहरणानें जगाला प्रत्यक्ष दाखविलें आहे. मानव जर विचार करील, दृढनिश्चय करील तर योगद्वारां अहंता व ममता या

मायेच्या लेंकरांना लाथ मारून परमतत्त्वाच्या प्राप्तीची एकमेव साधन असणारी ब्रह्मविद्या हाताळून, प्राप्त करून, जन्ममृत्यूची बेडी तड तडातोडून त्यांतून तो मुक्त होऊं शकतो. जे जीव अनेक योनींत भ्रमण करीत असतात ते शेवटीं केंव्हां तरी दुर्लभ अशा मानवयोनींत येऊन कर्म करूं शकतात. आत्मोपलब्धीसाठीं करावयाचीं कर्में करून, कर्म, ज्ञान, उपासना आदि शास्त्रांत सांगितलेलीं कर्मे करून परमतत्त्वाची प्राप्ती करूं शकतात. बंधन व मोक्ष ही भावना मानव देहालाच असते. म्हणून मुक्तिसुद्धां मानवदेह-धाऱ्यांनाच मिळत असते. देह तर जड आहे पण त्यांत वास करणारा चैतन्य, आत्मा जेंव्हां जीवेंभावें, मनापासून कर्म, ज्ञान, उपासना इत्यादि साधनांनीं मुक्त होतो तेंव्हां स्वस्वरूपाला जाणून त्या रूपांत तो समरस होत असतो. हा पुरुषार्थ फक्त मनुष्य योनीच करू शकतें. इतर योनींतील प्राणी हा पुरुषार्थ करावयास समर्थ नसतात. कर्मे करीत असतांनाहि त्यांना मुक्ति मिळत नाहीं. याचें एकमेव कारण अहंता व ममता आहे. अहंतायुक्त बनून ममत्त्वपूर्ण वृत्तींनीं जीं कर्मे केलीं जातात तीं कर्मेच बंधनाचें कारण बनत असतात, पण हींच कर्में जर अहंता व ममता सोडून निष्कामभावनेनें केलीं गेलीं तर बंधन करीत नाहीं, इतकेंच नव्हे तर तींच कर्मे मोक्षप्राप्तीचें साधन बनतात. आहार, निद्रा, भय, मैथुन या वृत्ति सर्व प्राणिमात्रांत एक-सारख्या बघण्यांत येतात. पण मनुष्ययोनींत कांहीं विशेष असेल तर त्याच्यांत भगवानानें बुद्धि ही अगम्य वस्तू जास्त दिलेली आहे. या बुद्धिचा सदुपयोग करून तिच्या योगानें सारासार विचार करून, हंसक्षीर न्यायानें सार तेवढें ग्रहण करून, असाराचा त्याग फक्त मानव करूं शकतो. अश रीतीनें सारग्राही बुद्धीच्या योगानें परमतत्त्व प्राप्त करणें हेंच मानवदेहाचें परमध्येय आहे. मानव शरीर खरोखर अति दुर्लभ आहे. **पापपुण्य सम-समान होतात तेंव्हांच मानव योनि प्राप्त होत असते.** तो नरदेह प्राप्त झाला असतां त्याचा सदुपयोग न करणारा नर कसला, पशूच असतो!

पुण्यकर्मे करून स्वर्गांत जावयाचा सरळ मार्ग, विषयलपंट होऊन अघोर पापांनीं मिळणारा बिकट मार्ग, स्वर्ग व नरक यांना टाळून स्वरुपज्ञानाचा लाभ मिळवून, आत्मतत्त्वांत समरस बनून परम तत्त्वाचा लाभ मिळवून देणारा विहंगम मार्ग इत्यादि मार्ग केवळ मानवासाठींच मोकळे आहेत. आपल्या मानवदेहाला मोक्षद्वार असें गौरवानें म्हटलें जात असतें. ही काया क्षणभंगुर, पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें केव्हां फुटेल याचा नियम-नाहीं. झाडावर पिकलेलें पान केव्हां जमीनदोस्त होईल हें सांगतां येत नाहीं. हिरेमाणीक मोलाचा एकदां गेलेला मानवदेह पुन्हां परत केव्हां मिळेल याची शाश्वति नाहीं. केवळ पापकर्मे करणाऱ्यांना जडयोनि मिळत असते. केवळ पुण्यकर्मे करणाऱ्यांना देवयोनि मिळत असते. जड योनींत कर्मे करुनही मुक्त होतां येत नसते. पण ज्या कर्मांमुळें ही योनी मिळाली त्या कर्मांचें प्रारब्ध क्षीण झाल्यावर दुसरी योनि फार तर मिळेल. देवयोनी हीसुद्धां भोगयोनि आहे. ज्या पुण्यकर्मामुळें देवयोनि मिळाली होती त्यांचा क्षय होतांच

**क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशान्ति ।**

या न्यायानें त्यांना परत मृत्यूलोकांत यावेंच लागतें. याप्रमाणें जड-योनि व देवयोनि ही भोगयोनीच आहे, कर्मयोनि नाहीं. पण मानवयोनि अशी आहे कीं, तिच्यांत कर्मे पण करतां येतात व प्रारब्धभोगहि भोगतां येतात, बंधनही सहज सुलभ तोडतां येतें. व मुक्तिलाभहि मिळवितां येतो.

## मानवयोनीचें महत्त्व

धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारी पुरुषार्थ साधावयास मानवयोनि हेंच एकमेव साधन आहे. निष्काम भावानें सत्कर्मे करून एकरूप होण्यास मानवयोनीच योग्य व पात्र आहे. अशीं सत्कर्मे करण्याचा अधिकार मानवयोनीचाच, याप्रमाणें सारीं शास्त्रें कंठरवानें सांगत असतात. अशी सत्य परिस्थिति असल्यामुळें या साऱ्या गोष्टींचें मनन करून श्रोत्यांनीं,

वाचकांनीं क्षणाचाहि विलंब लावितां धर्माला साधनभूत असणाऱ्या या मानव देहाचा सदुपयोग करून प्रभूपूजनाकडे आपली प्रवृत्ति निरंतर वळवून, प्रभूजनांत एकरस तल्लीन बनून आपली एकतानता वाढविली पाहिजे. स्वतःचा उद्धार स्वतःच केला पाहिजे व अधोगतीचा मार्ग कटाक्षानें टाळिला पाहिजे. तरच नरजन्माचें सार्थक होईल. हा मानवधर्म आहे. वाचून, ऐकून त्याचा कांहींच उपयोग होत नसेल तर नाहक खटाटोप कशाला? मानव देह देवांनाहि दुर्लभ आहे, भाग्यानच मानवदेह प्राप्त होत असतो. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें देवयोनि ही भोगयोनि असल्यामुळें देवयोनींत कोणतींच कर्में घडूं शकत नसतात. पुण्यकर्मांचा क्षय होतांच अवशिष्ट प्रारब्ध भोगावयास त्यांना मृत्युलोकांत यावेंच लागतें. मानव देह कठीण, त्यांतलें त्यांत ब्राह्मण जन्म, ब्राह्मणांत कर्मनिष्ठ, वेदविद् होणें त्याहून कठीण, संतदर्शन त्याहून कठीण, संतसहवास त्याहून कठीण; संताचा सहवास घडूनही त्यांचें आचरण आपल्या आचरणांत आणणें त्याहून कठीण, संत कृपा होऊन परमतत्त्व घडणें हें आत्यंतिक कठीण असतें. मानवयोनीचा ध्येयबिंदू मोक्ष. त्याकडे ज्यानें आपलें लक्ष केंद्रित केलें नाहीं त्याचा इहलोक व परलोक फुकाच गेला. जो स्वतःचें जीवन सुधारूं शकत नाहीं, ज्याला अमोल घडीचें महत्त्व नाहीं, दुर्लभ नरदेहाची जाणीव नाहीं, अशा लोकांत व रौरवांत वळवळणाऱ्या अळ्यांत काय फरक? त्यांच्या भाग्यांत जन्मोजन्मींच्या विटंबनाच. यातना, चिंता, कपाळकूट, दुःख, संकटें यांतच त्याचा सारा काळ जाणार. काळ येऊन त्याला नरकयातना भोगावयास भाग पडणार व मजा ही कीं हवीं तीं पापकर्में करून त्याचें प्रायश्चित भोगत असतांना तो देव, दैव यांना ठपका देत रडगाणें गात असतो. कृति तसें फळ या गोष्टीचा देवाला ठपका देतांना सोईस्कर विसर पडलेला असतो. वासनेला बळी पडून, हवीं तीं कुकर्में व पापें करून दारुण भोग म्हणजे पापांचे विपरीत परिणाम भोगतांना देवाला

दोष देण्यांत काय पुरुषार्थ? मानवदेहाचें साध्य विषयभोग हें नाहीं. नरदेहांत शुभ कर्मे करून स्वर्गप्राप्ति हेंहि मानवदेहाचें साध्य नाहीं, तें क्षुल्लक आहे. शेवटीं स्वर्गप्राप्तीहि दुःखदायी होते.

## अंतीम लक्ष्य

**मानव जन्माचें खरें साध्य परमेश्वराला ओळखून संसार व परमार्थ सुधारून, आत्मलाभ करून घेणें हें आहे. भवसागर तरून, भयमुक्त होऊन आत्मतत्त्वांत–स्वस्वरूपांत–विलीन होणें हेंच मानवजन्माचें अंतीम लक्ष्य आहे.** नरदेह प्राप्त झाला असतांना परमार्थ अमृत सोडून विषयविषांत मग्न होणारा मानव व कामधेनू घरीं आली असतांना तिला लाथाडून गर्दभीचें दूध पिण्यांत मग्न असणाऱ्या वेड्यांत व विषयमग्न जीवांत काय फरक आहे? कावळा मिष्टान्न सोडून विष्टेंतील दाणे खाण्यांतच मजा मानीत असतो. बचनाग विषारी असतांना त्या विषांत–बचनाग खाण्यांतच–बचनागांतील किडे आनंद मानीत असतात. तशीच गत क्षणिक सुखासाठीं धडपडणाऱ्या जीवांची. लोखंडाचें सोनें करणाऱ्या परिसाला सोडून झुंबराच्या कांचेंतच मजा मारणाऱ्या वेड्यासारखी ही गत आहे. भवसागर तरावयास सद्गुरु हा कुशल नावाडी आहे. दुर्लभ नरकाया ही नौका आहे. सद्‌गुरुवांचून ही नौका भवपार होत नसते. जो मानव भवसागर पार होत नाहीं तो कृतघ्न, मंदमति व आत्मघातक्यासारखा आहे. नरजन्म देवाची भक्तीच करण्यासाठीं आहे, हाच नरजन्मासाठीं सहज सुलभ उपाय आहे.

## परमतत्त्वाचा साक्षात्कार

परमतत्त्व सर्वव्याप्त आहे. ज्यांचीं इंद्रियें सूक्ष्म झालीं, दृष्टि सूक्ष्म झाली, अंतइंद्रियें जागृत झालीं, अशा सत्पुरुष योग्यांना परमतत्त्वाच्या लाटा, लहरी, झेलण्याची शक्ती आलेली असते. व परब्रह्माचे बोल ते ऐकूं शकतात. स्थूल इंद्रियें ही शक्ति पेलण्यास असमर्थ असतात. म्हणून

सामान्यांत तसा साक्षात्कार घडत नसतो. सद्‌गुरु गांडा महाराजांनीं गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांच्या अलौकिक योगशक्तीचें गुणगान करणारा **गुरुमूर्ति चरित्र** हा ग्रंथ मराठींत लिहिला. सद्‌गुरु गांडा महाराज गुजराथी होते, त्यामुळें मराठींत लिहिलेल्या ग्रंथांत व्याकरणदृष्ट्या चुका व दोषस्थळें रहाण्याची शक्यता होती. त्यामुळें ते चिंतेंत पडले होते. योगी इच्छा करीत नसतात, मागत नसतात पण **योग्यता अशी एक अजब शक्ति असते कीं त्यांच्या मनांत एखादी ऊर्मी येण्याचा अवकाश लगेच त्यांचे मनोगत पूर्ण करण्याची जबाबदारी परब्रह्म आपल्या शिरावर घेऊन इप्सित पुरें करीत असतें.** तसेंच झालें. दत्तगुरु गुरुदेव यांचा आवाज सद्‌गुरु गांडा महाराजाच्या कानांत आला. साक्षात्कार झाला कीं, गांडा काळजी काय करतोस ? **ब्रह्मचारी येत आहे.** सद्‌गुरु मनांत विचार करूं लागले, ब्रह्मचारी हा कोण ? कुठला ? कोणत्या कामासाठीं येणार त्याची काय त्याला कल्पना ? ते ब्रह्मचाऱ्याच्या येण्याची मार्गप्रतिक्षा करीत बसले. तिकडे नारेश्वरीं पूज्यश्री रंगावधूत महाराज यांच्या कानांत दत्तगुरु गुरुदेव यांनी आज्ञा केली कीं, **दक्षिणेंत जा गांडा तुझी वाट पहात आहे.** आज्ञा ऐकिली. हा गांडा कोण ? कुठें असणार ? दक्षिणेंत कोठें जावें ? याचा ते नारेश्वरी विचार करूं लागले. असे दोघांनाहि परमतत्त्वानें एकाच वेळीं संदेश दिले. सामान्यांना हे चमत्कार वाटतात. आपले टेलिफोन व योग्यांच्या हृदयाकाशांतील बिनतारी टेलिफोन यांत फरक असतो. नारेश्वरीं पुज्यश्री रंगावधूत महाराज यांच्या मनांत गांडा महाराजांची भेट कोठें होणार, दक्षिणेंत कोठें जावें ? हें विचार घोळत असतांना सरखेज येथील शिष्य श्री. केशवलाल शेट पूज्यश्रींच्या दर्शनासाठीं नारेश्वरीं आले. नमस्कार केला तेव्हां पुज्यश्री गुरुदेवांची अशी आज्ञा झालेली आहे. ना पत्ता, ना ठिकाणा ठाऊक तर दक्षिणेंत जावें कोठें ? त्यावर श्री.

केशवलाल शेट म्हणाले, मला ठाऊक नाहीं. पण भडोच येथें पूर्वी रहात असणारे श्री. गांडा महाराज असें त्यांचें नांव मात्र मी ऐकून आहे. ते गुरुदेवांचे शिष्य आहेत. त्यांचे नातलग श्री. कल्याणजी भाई भडोचला रहातात. त्यांना भेटलें तर पत्ता मिळण्याचा संभव आहे. त्यावर पूज्यश्री रंगावधूत म्हणाले गुरुदेवांची आज्ञा पाळण्यासाठीं मला दक्षिणेंत गेलेंच पाहिजे. लगेच श्री. केशवलाल शेट भडोचला गेले, योगायोग भडोच स्टेशनावर उतरले तोंच श्री. कल्याणजीचे चि. झिणाभाईंना श्री. केशवटशेट भेटले. येथें येण्याचें कारण सांगितलें. श्री. कल्याणजी गुरुदेवांचे शिष्य आहेत ही हकिकत समजली. श्री. कल्याणजी यांचे पुत्र श्री. झिणाभाई यांनी श्री. केशवलाल शेटजींना श्री. गांडा महाराज, हल्लीं त्यांचा मुक्काम, याची समग्र माहिती दिली. गांडा महाराज श्री. योगानंद सरस्वति हल्लीं दक्षिणेंत मराठवाड्यांत सातोनाजवळ दूधगंगेच्या कांठीं वांकडी येथें चातुर्मास करणार आहेत असें त्यांचें भडोच येथें कालच पत्र आलें आहे. त्यांचा पत्ता दिला. गुरुदेवांची आज्ञा पाळण्यासाठीं आकाशपातळ एक करणाऱ्या पूज्यश्री रंगावधूतांना शांति समाधान लाभलें. गुरुदेवांची आज्ञा शक्य तों लवकर पाळण्याचा पूज्यश्रींचा दंडक असतो. गांडा कोठें याचा पत्ता लागला. त्यामुळें कोठें जावयाचें हें समजलें. कोणत्या मार्गांनीं कसें? हा प्रश्न त्यांचे मन सोडवूं लागले. इच्छित ध्येयासाठीं नारेश्वर सोडण्याचा त्यांचा निश्चय झाला. ते दिवस प्रवासाला अनुकूल नव्हते. आषाढ महिना, नदी-नाले भरलेले, मेघांना गर्जना करावयास चेव आलेला, आकाश मेघांनीं व्यापलेलें. सूर्यनारायण मेघांत दडलेला. लहरी विद्युत् आपले अस्तित्त्व दाखविण्यास सोकावलेली. जंगलांतून पायी प्रवास, पायवाटा बुजलेल्या. मार्गाची नीट कल्पना नाहीं अशा स्थितींत गुरुदेवांची आज्ञा पार पाडण्यासाठीं पूज्यश्री रंगावधूतांनीं **नारेश्वर सोडलें.** एक दोन वस्त्रें, लाठी, कांबळा, विदुषकासारखी उंच टोपी, काखेंत छोटीशी

पिशवी घेऊन श्री. रंगावधूतांचे पाय चालूं लागले. आपत्ति, क्लेश, भूक, तहान, पाऊस यांची दाद न घेतां निस्पृह अवधूत **सातोना** गाठावयास आतुर होते. चाळीस, पन्नास मैल मार्ग झपाट्यानें तोडतां तोडतां कित्येक मैल मागें टाकिले. नदींतील पाणी पिऊन दिवस काढावें, रात्रीं कोठें तरी आंग टाकावें व वेगानें मार्ग आक्रमण करावें असें चालू असतां लहानशा **रोटेगांव** स्टेशनाजजीक आले. तीनचार दिवसांत पोटांत अन्नाचा कण नाहीं, दांडग्या प्रवासानें शरीर थकलेलें, प्रवास अजून किती तरी करावयाचा होता. आपल्या निस्सीम भक्ताचें हाल परमात्म शक्तीस बघवले नाहींत. रात्रीं रोटेगांवच्या स्टेशनमास्तराच्या बायकोला दत्तप्रभूनीं सांगितलें कीं, उद्यां ब्रह्मचारी येईल त्याला जेऊं घाल म्हणजे तुझी कामना पुरी होईल. ही गोष्ट तिनें आपल्या धार्मिक व श्रद्धाळू पतिराजांना—स्टेशन-मास्तरांना—सांगितली. स्टेशनमास्तर कर्नाटकी होते. ते ब्रह्मचाऱ्याच्या तपासास लागले, त्यांच्या टेहळणीवर होते. तेजस्वी अंगकांति व चर्येवरील ब्रह्मतेज, अति निस्पृह वृत्ति बघून त्यांचा अंतरात्मा जागृत झाला. बायकोला पडलेल्या स्वप्नांत याच ब्रह्मचाऱ्याला जेऊं घालण्याचा आदेश झाला असावा अशी त्यांची खात्री झाली. ब्रह्मचारी फिरत असतां स्टेशन-मास्तरांनीं इंग्रजींत ( अवधूत बी. ए. झालेले आहेत.) आदरपूर्वक विचारलें महाराज कोठें जावयाचें आहे ? अवधूतांनीं सातोन्यास असें उत्तर दिलें. सातोना येथून जवळजवळ शंभर मैलांवर आहे. अवधूत म्हणाले, मी तेथें तीन दिवसांत पोहोंचणारच असें बोलतां बोलतां निस्पृह अवधूतांनीं चालण्यास सुरवात केली. त्यांना स्टेशनमास्तरांनीं अडवून म्हटलें, महाराज गरिबाची विनंति ऐका. आज एकादशी आहे, थोडा फलाहार करा. जरा विश्रांति घ्या. मी रेल्वेनें तुम्हांस सातोन्यास पोहोंचवितों. मला तें पटणार नाहीं. स्टेशनमास्तराला किंवा गार्डाला सांगून मला गाडींत बसविलें तर तें तत्त्वाला सोडून होतें. तसें नव्हे. मी तुम्हांला तिकीट काढून

देतों, पण रेल्वेनें जा. माझी विनंति ऐका. अवधूत कबूल करीनात. फारच गयावया करूं लागल्यानंतर अवधूतांनीं संमति दिली. स्टेशन-मास्तराच्या सद्भावनांना मान द्यावा लागला. घरीं गेले, स्नानसंध्या आटोपून फलाहार केला, थोडी विश्रांति घेतली. अवधूत जेव्हां लहरींत येऊन या गोष्टी सांगतात तेव्हां तर फारच मजा येते. रस्त्यांतील एका गांवांत ब्राह्मणांचीं दहा बारा घरें होतीं. पण रुपया एवढीहि माधुकरी मिळाली नाहीं. पांच सात दिवसांच्या वाटचालीनें पराकोटीचा थकवा आला. पोटांत कांहीं नव्हतें. ऊन मी म्हणत होतें. आषाढाचा उष्मा घाम घाम काढीत होता, पाय पुढें निघेना. पोटांत कांहींच नसल्यामुळें देहांत त्राण उरलें नव्हतें. नदी अथांग भरलेली. पुलावरून अति ओढ घेणारें माणसाच्या कमरेइतकें असें पाणी वेगांत वहात होतें. पूल ओलांडावयाचा होता. अशा स्थितींत पुलाच्या अलिकडील एका भव्य वृक्षाखालीं विसांवा घेण्यासाठीं अवधूत निजले. अति थकल्यामुळें गाढ झोंप लागली. **परमतत्त्वानें अजब लीला केली.** आश्चर्य ? तीन चार तासांनीं झोपेंतून उठून पहातात तों पूल ओलांडून नदीच्या पार आहोंत. आतां पूल ओलांडावयाचें कारण राहिलें नाहीं, असें दिसलें. **दैवीशक्तीनें पूल ओलांडून भक्ताला त्या पार नेलें. अचंबा वाटला.** आपणांस कोणी स्पर्श करून गाडींत ठेविलें नाहीं खास. दत्ताला भक्ताची काळजी म्हणून अशी अजब घटना घडली. प्रारब्धांत होतें म्हणून स्टेशनमास्तरां-कडील भिक्षा घेतली गेली. देहाला विसावा मिळाला. स्टेशनमास्तरानें तिकिट काढून दिलें. सातोन्यास आले पण तेथें सद्गुरु गांडा नव्हते. अनोळखी प्रदेश, रस्ता ठाऊक नाहीं. गांडा महाराजांचा शोध कोठें करावा ? त्यांना समजलें, वाकडीला किसनराव पटवारी यांजकडे जाऊन सद्गुरु गांडा महाराजांचा तपास लागेल. पाय चालूं लागले. कुणाशीं बोलायचें नाहीं, विचारावयाचें नाहीं, वाकडी आली पण ती नव्हे. **तीन वांकडी गांवें**



**श्री रङ्ग अवधूत महाराज**

नारेश्वर धाम



पूर्णा येथील धनिक, परमभक्त श्रीराम शेट तोतला.
[ श्री. सद्‌गुरु योगानंदांचे परमशिष्य ]

**आहेत.** दुसरीला गेले. ती नाहीं. चला तिसरीला. आपल्या धूनमध्यें चालून पंधरावीस मैलांचा फेरा नाहक पडला. पण कोणाला विचारावयाचें नाहीं, हा कृतनिश्चय कायम. लोक भेटत पण डोक्यावर जटा, हातांत उंच काठी, भव्य शरीर, मुद्रा तारठलेली. कांबळा अंगाला लपेटलेला असें ध्यान इकडे बघण्यांत नसे त्यामुळें पूज्यश्रींना सारे लोक भूत समजत व भीतीनें दूर पळत. एकदां तहान लागली, पाणी मागितलें. भूत आहे घरांतलें पाणी देऊं नका, अशानें भूत घरांत शिरेल म्हणून एक इसम हातांत मशाल ! खूप दूर अंतरावर राहून तो नदीचा रस्ता दाखवूं लागला. दुरून नदी दाखविली. असे भूताच्या भीतीनें सारे दूर रहात. केदारवाकडी, मीमेवाकडी येथें निरर्थक भटकून तिसऱ्या **ब्रह्मवाकडीला** आले. तेथेंहि सद्गुरु गांडा महाराज नव्हते. सातोन्याहून आज येणार आहे असें समजलें. दोघे गुरुबंधू परस्परांस भेटले. रामभरत भेटीचें दृश्य अवर्णनीय होतें. गुरुभक्ति उचंबळली, अष्टभाव दाटले, परस्परांच्या देहांचें परस्परांस दर्शन घडलें. आत्मीयता वाढली. प्रत्येकांच्या तपतेजाचा साक्षात्कार झाला. 'मी आपली कधींपासून वाट पहात आहे' सद्गुरु बोलले. अशा रीतीनें गुरुदेव परमतत्त्वानें हे दोन धागे एकत्रित आले. आनंद लुटला. आत्मतेजाची प्रचिती आली. किसनराव सद्गुरु गांडा महाराज यांचे शिष्य होते, यंदाचा चातुर्मास वांकडीला ठरलेला होता. श्री. किसनराव हे वजनदार श्रीमंत गृहस्थ होते. वांकडींत मारुतीच्या लहान मंदीरांत सद्गुरु गांडा महाराज पूज्य श्रीसह रहात असत. तेथेंच त्यांनीं लिहिलेल्या **श्रीगुरुमूर्तिचरित्राचें संशोधन करण्याचें काम दुसऱ्या दिवसापासून सुरूं केलें.** या निमित्तानें दोघां ब्रह्मनिष्ठांचा देहभाव व आत्मभाव वाढीस लागला. पूज्यश्री रंगावधूत महाराजांची विद्वत्ता, मेधाशक्ति, कवित्व शक्ति, संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, निघणाऱ्या ब्रह्मबोलाची खोली, मराठी भाषेची आकर्षक हातोटी, गुजराथ्यांनाहि

लाजवील अशी गुजराथी रसवंति, परमतत्त्वाला भिडून निघालेली पारमार्थिक वाणी यांची प्रचिती सद्गुरुंना आली. सद्गुरुंच्या स्मृति पटलावर त्यांचें नांव अमर राहील असा तो गोड सहवास होता. परस्परांनीं आनंदाची लयलूट इतकी केली कीं, परस्पर परस्परांना कधींच विसरूं शकणार नाहीं इतकें ते एकमेकांच्या जवळ आले. यथाकालीं गुरूमूर्ति चरित्राच्या संशोधनाचें कार्य समाप्त झालें. नारेश्वरास जावयास पूज्यश्री आतुर झाले. पण सद्गुरु त्यांना सोडीनात. दहा पंधरा दिवस आग्रहानें ठेवून घेतलें. गुरुमूर्तिचरित्र छापविण्याची सर्व जबाबदारी सद्गुरुनीं पूज्य श्रीवर सोपविली म्हणून ते भडोच येथें श्री. कल्याणजीकडे आले. त्यांनीं चांगला सहकार दिला, सेवा केली. भूतनाथ महादेवाच्या देवळांत राहून या ग्रंथाचीं प्रुफें तपासून देत. सहा महिन्यांत श्रीगुरुमूर्तिचरित्र हा ग्रंथ तयार झाला. पूज्यश्री श्री. कल्याणजीकडे भिक्षेस येत. आत्मीयता वाढली. श्री. कल्याण यांचे शरीर फारच झुकलेलें होते. पूज्यश्रींनीं गुरुमूर्ति चरित्राचें पारायण त्यांना ऐकविलें. ग्रंथ छापून पुरा झाल्यानंतर पूज्यश्री रंगावधूत महाराजांनीं भडोचहून सद्गुरु योगानंद सरस्वति महाराजांना पत्र पाठविलें, तें जितकें उद्बोधक आहे तितकेंच हृदयस्पर्शी आहे. त्यांच्या पत्रांत ठायीं ठायीं सद्गुरुबद्दल किती पवित्रतम भावना होती याचें दर्शन त्या पत्रांत घडतें.

श्री.

भडोच.

मार्गशीर्ष शु॥ १

श्री. स. गु. प. प योगानंद स्वामी महाराजांचें सेवेसी,

नमन असो सद्गुरुवर्या । क्षमाशील अमितशौर्या ।
वाढवोनि सात्त्विक धैर्या । कृपौदार्या ओपिजे ॥ १ ॥

ग्रंथ जाहला संपूर्ण । क्षमा कीजे अधिकन्यून ।
अल्पज्ञत्व ओळखून । गोड करुनि घेईजे ॥ २ ॥

मुद्रण सहावें पातक। ग्रंथ–सौंदर्य–घातक।
गणिलें कित्येकें निःशंक। अर्थांतक सत्यचि ॥ ३ ॥
यथाशक्ति केलें शोधन। मनप्राण एकवटून।
तथापि सदोष शुद्धिकरण। आशीर्वचन देऊनि ॥ ४ ॥
दूर कीजे दयाघना। योगानंदा पतितपावना।
पोटीं घालिजे दोष नाना। प्रार्थना आन नसे कांहीं ॥ ५ ॥
जें कांहीं सौंदर्य ग्रंथीं। ती आपलीच कृति निश्चिती।
सांगणें नलगे श्रीपती। बालमति बोलिली ॥ ६ ॥
आज्ञेनुसार पारायण। देवा सन्निध परिपूर्ण।
होतांचि जयंती करुन। प्रयाण करीन सद्भावें ॥ ७ ॥
करीन हें हि फोल बोलणें। कर्ता करविता तोचि जाणे।
होईल प्रारब्धें जें जें होणें। मी तों नेणें कांहींच ॥ ८ ॥
एथोनि जातो नारेश्वरा। आज्ञा ओपिजे करुणाकरा।
विश्रांतीसाठीं सुखकरा। दया करा दयांबुधें ॥ ९ ॥
कृपादृष्टि असो द्यावी। दासाकरें सेवा घ्यावी।
वृत्ति पदीं स्थिर रहावी। एवढी द्यावी सुभिक्षा ॥ १० ॥
मागणें तें आन नाहीं। विस्मरण न व्हावें कदाहि।
पुनर्दर्शन लवलाही। देऊनि आई तोषवावें ॥ ११ ॥
पांडुरंग करितसे भावें। नमो नारायण स्वीकारावें।
नारायण स्वरूप करावें। हें चि द्यावें वरदान ॥ १२ ॥
मुखीं दत्तनामस्मरण। चित्तीं असावें हें चि ध्यान।
अंतीं पायाचें निर्वाण। सच्चिद्घन नमूं भावें ॥ १३ ॥

न कळे काय लिहावे ?। पायापाशीं कसे वागावें ?।
क्षमादृष्टीं दासा पहावें। बहू मानावें अल्प हें ॥ १४ ॥

दत्तपदीं लेखणी ठेविली। विद्योपाधि दूर केली।
शांति अखंड हेचि भली। मनीं गमली सद्गुरु ॥ १५ ॥

पुनः पुनः नमस्कार। लोटांगण वारंवार।
मौनीं अमौन प्रकार। मनीं निर्धार जाणावा ॥ १६ ॥

आपला
ब्रह्मचारी पांडुरंग याचा
ॐ नमो नारायण.

एका अधिकारी ब्रह्मनिष्ठाचें आपल्या वडील गुरुबंधुला लिहिलेलें हें पत्र आहे. त्यांत शालीनता शालीन बनली. लेखणी स्तंभित झाली म्हणून गुरुचरणीं ठेविली. आत्मीयतेचे फवारे पदोपदी उफाळलें, भाषा विनम्र झाली. याचना हात जोडून उभी राहिली, हृदयाची विशालता प्रगटली, तो अहं नामशेष झाला. सरस्वतीमातेचें नर्तन अक्षरा-अक्षरांत झंकार देऊं लागलें. परमतत्त्वाला भिडलेली भाषा आपला आविर्भाव दाखवूं लागली, गोड मधूर वाणीनें अमृताचे झरे वाहूं लागले. असें हें सद्भावानें ओथंबलेलें एका ब्रह्मविदाचें पत्र किती गोड म्हणूनच त्यांत शब्दब्रह्माचा साक्षात्कार घडतो.

## श्रीगुरुमूर्तिचरित्र

गुंजचे सद्गुरु योगानंद सरस्वति यांची मूळभाषा गुजराथी असतांना मराठींत हा वेदान्त प्रचुर ग्रंथ लिहिला. यांत वैशिष्ट्य आहे. जेम तेम ज्याचे गुजराथी सातवीपर्यंत शिक्षण झालेलें पण गुरुकृपेनें त्यांचा ज्ञानचक्षू उघडला, प्रज्ञा स्थिर झाली, मेधाशक्ति उचंबळली. ते सर्वज्ञ बनले व वाणीवर

सरस्वति नाचूं लागली. गुरुकृपा काय करूं शकत नाहीं? पुराणांतील कैक कथा त्यांत गोंविलेल्या आहेत. पिशाच्च योनीची स्पष्ट कल्पना देऊन पिशाच्च विमोचनाचे मार्ग कोणते हें स्पष्ट करणाऱ्या गोष्टी त्यांत आहेत. श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यांचें अगाध ज्ञान व अवतारकार्य त्यांत उत्तम तऱ्हेनें ग्रथित केलें आहे.

* * *

# किरण बारावा

## गुरुमूर्ति चरित्र

गोदावरी तीरीं असलेलें रम्य स्थान गुंज येथील सिद्धेश्वराच्या देवालयांत सद्गुरु गांडा महाराज रमले. तेथील रमणीयता पाहून तेथेंच कायम वस्ती करावी असें त्यांच्या मनानें घेतलें. पाथरी येथील देशमुखीचा सारा कारभार धर्मपरायण श्रीमति आबई पहात असत. त्यांच्या प्रारब्धानें लक्ष्मी त्यांच्या घरीं पाणी भरीत होती. वृत्ति धार्मिक होती त्यामुळें त्यांनीं गुंज येथें ( सिद्धेश्वर महादेव ) हें दुसरें शिवस्थान बांधलें. पाथरी येथील केदारेश्वर हें दगडी भव्य शिवालय त्यांनींच बांधलें. सद्गुरु गांडा महाराजांचें वास्तव्य गुंज येथें असतांना रोज सायंकाळीं संत **कृष्णाबुवा रामदासी** यांच्याशीं अध्यात्मपर गप्पा चालत. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचें चरित्र लिहिलें. त्या अनुरोधानें श्रीगुरुमूर्ति चरित्र लिहिण्याचा निश्चय कायम झाला. गुरुमूर्ति चरित्र यांतील **विचार सद्गुरु बोलत व लिखाण कृष्णाबुवा रामदासी लिहीत. असे पंधरा अध्याय गुंज येथें सिद्धेश्वर देवालयांत लिहिले गेले.** नंतर क्रमानें दोन चातुर्मास सद्गुरुचें प्रदीर्घ वास्तव्य वाकडी येथें झालें. **महाराज सांगत व दादा साहेब वाकडीकर लिहित, अशा रीतीनें वाकडी येथें श्रीगुरुमूर्ति चरित्र हा ग्रंथ पुरा झाला.** सद्गुरुच्या आदेशाप्रमाणें नारेश्वराहून ब्रह्मचारी रंगावधूत महाराज वाकडीस आले. योग्य संशोधन करून त्यांनीं **भडोच येथें ग्रंथ छापविला.** श्रीगुरुमूर्ति चरित्रांत ज्ञानकांड, कर्मकांड, उपासना कांड हे भाग करून या तिन्ही कांडांचें स्पष्टीकरण एकशें पस्तीस अध्यायांत मोठ्या जोरदारपणें केलेलें आहे. साधकांना

योग्य मार्गदर्शन करून गुरुमहती गातांना लेखक भाषेंत अगदीं तादात्म्य पावले आहेत. अनंत पारायणें करण्याजोगा हा ग्रंथ आहे, प्रासादिक आहे. श्रीगुरुमूर्ति चरित्र या ग्रंथांत **एकशेंपस्तीस अध्याय असून ओव्यांची संख्या चौदाहजार आठशें त्र्यांयशी आहे. त्यांत संस्कृत श्लोक-संख्या चारशें सत्याहत्तर आहे.** ठायीं ठायीं ते सुंदर मार्गदर्शन करतात. सद्गुरु म्हणतात, शरीरावरील मळ काढून मानव निर्मल होत नसतो तर मन निर्मळ बनविलें पाहिजे.

**मानसे तु मले त्यक्ते भवत्यंस्तु निर्मलः**
**तीर्थसेवासमं नास्ति स्वशरीरस्य शोधनम् ॥**

मन निर्मळ करावयास तीर्थसेवेसारखें अन्य साधन नाहीं. ते लिहितात मन सदा प्रसन्न असणें ही एक सिद्धीच आहे. संसार बंधनरूप केव्हां होत नसतो याबद्दल सांगतात—

सर्व इंद्रिय शांत करून । स्वस्वरूपाचें अनुसंधान ।
ठेवावें तैलधारें समान । तेणें बंधनेरपि न संसार

अध्याय ३३ ओवी पंच्याण्णव

कोणत्या ठायीं कोणतीं धार्मिक कृत्यें केलीं तर अधिक फळदायी होत असतात याबद्दल अध्याय एकोणपन्नासांत एकोणनव्वद ओवींत लिहितातः

**तपश्च नर्मदातीरे । मरणं जान्हवी तटे ।**
**दानं दद्यात् कुरुक्षेत्रे । त्रिफलं गौतमी तटे ॥**

तप करावयास नर्मदाकांठ उत्तम, गंगेकाठीं मरण, कुरुक्षेत्रांत दान अधिक फळदायी होतात हें सत्य आहे. ही हिन्ही फलें गोदावरी कांठीं मिळत असतात. ते सुचवितात, **श्री भगवान विष्णूपासून कृष्णा, सूर्यभगवानापासून तापी, शंकरापासून नर्मदा, शंभूच्या शिरा-वरील गंगेंतून गोदावरी असें या नद्यांना महत्त्व आहे.** नरदेहाचें सार्थक केव्हां, कसें होतें याबद्दल ते लिहितात :

गुरुची कृपा झालियावरी। लिंगदेह निरसे तो निर्धारी।
तेणें मी तूं पण होय दुरी। प्रगटे अंतरीं चिद्रूपत्त्व॥
ऐशी स्थिति झालिया पूर्ण। बुद्धि, वैखरी आणि मन।
सहजचि आलस्य दूर करून। सदां तव गुण वर्णतील॥

अध्याय २ ओवी १२-१३

**साधु पुरुषाचें चरित्र। ऐकतां देह होय पवित्र।**
**जरी गांठीं असेल पुण्य। तरी सत्कथा होय श्रवण।**

साधु ओळखावा कसा याबद्दल ते लिहितात :

**चित्त आणि अहंकार। यांचा खुंटविला व्यापार।**
**ऐसा जयाचा अधिकार। तोचि ईश्वर साधुजन।**
**वृत्ति जयाची असंगउदास। वासनांची होळी केली खास।**
**चिंता न स्पर्शे ज्याचे मनास। शांतिनिधान तो साधू॥**

अध्याय ओवी ४०-४१

संसारीं अधिक पैसे मिळावे म्हणून दौडादौड करतात त्यांना उद्देशून ते लिहितातः

हा देह पूर्व कर्मानुसार। उत्पन्न झालासे साचार।
तरी तो प्राक्तनाधीन रहाणार। असे निर्धार सत्यचि॥

अध्याय ३३ ओवी ९

योगी शांतचित्त, स्थिर केव्हां होतात; तर

**संचित क्रियमाण जळतां। योगियाचे आनंदित चित्ता।**
**शांत मुद्वत् अवस्था। होऊनि स्थैर्य येतसे॥**

ते खोल तत्त्वज्ञान सांगतात.

आत्मज्ञान होत नाहीं, तोंपावेतों हा सत्रा तत्त्वांचा लिंगदेह नाश पावणार नाहीं. नाना योनींतून भटकविणारा हा लिंगदेह असतो. जगदंबा त्रिपुरा सुंदरीचें दर्शन केव्हां घडतें?

**मी तूं पण असे जोंवरीं । अनुभवास न ये तोंवरीं ।**
**देहाभिमान नष्ट झालियावरी। त्रिपुर सुंदरी सदैव दिसे ॥**
अध्याय १ ओवी ५३

असे किती तरी सुविचारांचें भांडार या श्रीगुरुमूर्तिचरित्रांत मोठ्या कौशल्यानें ग्रथित केलें आहे. ग्रंथ मननीय आहे. प्रत्येकानें अवश्य वाचण्याजोगा आहे. त्याबद्दल लिहावें तितकें थोडेंच आहे. गुंज संस्थानचे ब्रह्मनिष्ठ योगानंद सरस्वति महाराज यांनीं श्रीगुरुमूर्तिचरित्र मराठींत लिहिलें पण गुजराथी भाषेंत भाविक मनांना वळण लावण्यासाठीं व धर्मपरायण करण्यासाठीं अनेक ग्रंथ लिहिले आहेत. ते सारे ग्रंथ श्री. कल्याणजी यांनीं छापविलें.

## महाराजांचे ग्रंथ

१. **गुरुदेव वासुदेवानंद यांचें चरित्र** फारच भावभक्तीनें भरलेलें आहे.

२. **अज्ञान तिमिर दीपक** :—हा ग्रंथ मानवत, वांकडी या भागांत सद्गुरुचें वास्तव्य असतांना लिहिला. नांवावरून ज्ञानदीप प्रज्वलित करणारा तो नंदादीप आहे हें सहज लक्षांत येईल.

महाराजांना दंडदिक्षा देणारे उज्जयनीचे अधिकारी पुरुष कृष्णानंद सरस्वति स्वामी यांच्या अज्ञान तिमिर प्रदीप या ग्रंथाचें तें भाषांतर आहे.

४. **स्त्रीधर्म निरूपण** :—या गुजराथी ग्रंथांत स्त्रियांचे आचारविचार, व्रतवैकल्यें, उपासतापास, वैशाखादि स्नानें, प्रदोष, शिवरात्र, ऋषि पंचमी, इत्यादि व्रतें व स्त्रियांचा तरणोपाय इत्यादि माहिती साधार पण सोप्या भाषेंत सांगितली आहे.

५. **पुरुषधर्म निरूपण** :—यांत पुरुषांना मार्गदर्शन केलें असून त्यांच्यावरील जबाबदारीची कल्पना स्पष्टपणें दिली आहे. संसार सुखावह करण्याची गुरुकिल्ली दाखविली आहे. एवढेंच नव्हे तर ध्यान, धारणा इ.

करून मानवजन्माचें सार्थक संसारांत राहूनही कसें करतां येतें याचा राजमार्ग आपल्या हृदयस्पर्शी भाषेनें दाखविला आहे. संत सदा परहित-मग्न असतात. ग्रंथ हे सद्विचारांचें भांडार असतात.

## संतलीला

मानवतची इ. स. १९२४ ची गोष्ट ती. शके १८४६ हें नांव काढले तरी मानवतकरांच्या अंगावर काटे येतील. महादुष्काळ, सगळीकडे पाण्याची रडारड. आडांत पाणी नाहीं, विहिरी कोरड्या. नद्यांनीं राम म्हटलेला. तळीं, सरोवरें पाण्यावांचून उघडे नागडे. पाणी नाहीं. डोळ्यांतील पाणी रडून रडून आटलेलें. दुष्काळानें तोंडचें पाणी पळालें. जमिनीवर पाणी नाहीं. सारा ठणठणाट. जेष्ठांत भरपूर पाणी यावयाचें. पण ज्येष्ट अगदींच कोरडा गेला. आक्रोशून गळाहि कोरडा झाला. आकाशहि कोरडें. आकाशांत ओलावा नाहीं. ढगाचा पत्ता नाहीं, थंड हवेनें राम म्हटलेला. सहस्ररश्मी साऱ्यांना भाजून काढीत होता. धान्य नाहीं, पाणी नाहीं. जनावरांनाहि ना गवत ना पाणी, पोटांत अन्न-पाणी नसल्यानें सूर्याप्रमाणें प्रत्येकाचा जठराग्नीही भडकलेला. ऊन मी म्हणत होतें. जगावें कसें हा प्रश्न साऱ्यांपुढें आ वासून उभा होता. काय करावें ? हें सुचेना, बुद्धि चालेना, शरीर क्षीण झाल्यानें पाय चालेना ! तीन चार कोसांवरून प्यावयास पाणी मोठ्या कष्टानें आणावयाचें. अशा साऱ्यांच्या दैनाच दैना. आजूबाजूसही पावसानें डोळे वटारलेले. मुकीं बिचारीं जनावरें ! काय करतील. चाराच नाहीं. माणसांना नाहीं तर प्राण्यांना पाणी कसें मिळणार ! सद्गुरु योगानंद स्वामींना शरण गेले. सूर्य कडक, ऊन कडक तसें स्वामीहि. त्यांच्यापुढें रडगाणें गावयाची कोणाची हिंमत होईना. साऱ्यांनीं बाबा कल्हे यांना पुढें केलें. परममंगलखनि, दयानिधे प्रभो ! स्वामि, आम्ही सारे शरण आलों आहों. पाऊस नाहीं. दया करा, आम्हा सर्वांना जीवदान द्या. पाऊस पाऊस हाच साऱ्यांचा आक्रोश

आहे. दयावंत प्रभूला दयेचा पाझर फुटला. त्यांनीं परमतत्त्वाची आराधना करतांच, परमात्म शक्तीनें त्यांचा शब्द झेलला. पाऊसच पाऊस. ढग गडगडाट करूं लागले. विजा चमकल्या. तीन दिवस अहोरात्र पाऊसच पाऊस. नदीनाले, आड, विहिरी साऱ्या भरून गेल्या. सर्वत्र जलमय झालें. लोकांच्या तोंडचें पळालेलें पाणी चर्येवर दिसूं लागलें. संतलीलेची महति मानवतकर विसरणार नाहीं.

## मानवत [ शके १८४६ इ. स. १९२४ ]

पावसानें ताण दिल्यामुळें जनता पाणी पाणी असा आक्रोश करीत होती. तीच जनता अति आनंदानें जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें असा शांतीचा श्वास घेऊं लागली. दुष्काळानें तोंडचें पाणी पळालें होतें. तेथें प्रत्येकाच्या चर्येवर आनंदाचें पाणीच पाणी दिसूं लागलें. आड, विहिरी पाण्यानें तुडुंब भरल्या. **सद्‌गुरु योगानंद महाराज सिद्ध असून साक्षात्कारी पुरुष आहेत असा आत्मविश्वास प्रत्येकाच्या मनांत तुडुंब भरलेला होता.** अवकळा जाऊन आनंद आला. निराशेची जागा आशेनें पटकावली. जमिनींतून हिरवळ डोकावूं लागली. दुष्काळांत वाऱ्यावर जगणारीं मुकीं जनावरें हिरव्या गवतानें संतुष्ट झालीं. त्यांच्यांत आनंदाचें वारें संचारूं लागलें. आनंद, शांति, समाधान यांचें साम्राज्य पसरलें. हरिभक्त परायण श्री. निगडीकर शास्त्री यांचें कीर्तन मंदिरांत आज रात्रीं होणार, कीर्तन ऐकावयास सद्गुरु योगानंद महाराजही येणार आहेत ही बातमी वायुवेगानें गांवांत पसरतांच भाविकांची रीघ लागली. मंदिरच काय? पण बाहेरचें प्रांगण स्त्रीपुरुषांनीं चिक्कार भरलें गेलें. महाराज कीर्तन ऐकत होते. कीर्तनांत कीर्तनकार पूर्ण रंगले होते. श्रोते डुलत होते. जमिनीवर टांचणी पडली तर तिचा आवाज ऐकूं जाईल इतकी नितांत शांतता पसरलेली होती. इतक्यांत कीर्तनकार निगडीकर शास्त्री यांचा **माथेशूळ इतका भडकला कीं, त्यांना पुढें**

**काय बोलावें हें सुचेना.** इतके बेचैन झालें कीं, आपण झोंक जाऊन खालीं पडतों कीं काय असें झाले. त्या अति वेदनेमुळें संदर्भ सुटला. मध्येंच आई आई असें बरळूं लागलें. दत्ताला शरण जा असा आदेश गुरूंनीं दिला. कीर्तनाचा विरस झाला. श्रोते हें काय? हें काय? बोलूं लागलें. कीर्तन बंद होऊं नये म्हणून गुरुमाऊली योगानंद स्वामींनीं **भस्माची एक चिमूट कीर्तनकारांच्या कपाळीं लावतांच माथेशूळ पार पळाला.** बत्तीचा प्रकाश मंद होतो तेंव्हां पिन करतांच लख्ख प्रकाश पडतो, तसेंच झालें. कीर्तन अति उल्हासानें फारच रंगलें. सद्गुरु योगानंदांच्या अजब सामर्थ्याचा साऱ्यांना चांगलाच साक्षात्कार घडला.

## भस्माची चिमूट

भस्माच्या एका चिमूटेनें श्री. शास्त्रीबुवांचा माथेशूळ गेला. हें अजब सामर्थ्य भस्मांत नसतें, तर ज्या विभूतीकडून भस्म दिलें जातें त्या विभूतीच्या दुर्गम्य तपतेजांत असतें. गुरुदेव वासुदेवानंद यांनीं भस्माच्या चिमुटेनें कैकांची पिशाच्चबाधा घालविली. जिंद, खवीस यासारख्या अतृप्त आत्म्यांना पार पळविलें. मच्छिंद्रनाथाच्या एका निपुत्रिक बाईस दिलेल्या भस्माच्या एका चिमुटीनें उकिरड्यांतून नाथपंथप्रवर्तक गोरखनाथ प्रगटले.

**संत महात्मे यांना आपल्या प्रखर तपश्चर्येनें तपबल व परमात्म तत्त्वांत आपल्या मनांतील ऊर्मी मिळविण्याची अलौकिक शक्ति प्राप्त झालेली असते.** सिद्धि पायाशीं लोटांगण घेत असतात. पण आत्मतृप्त संत सिद्धीकडे ढुंकूनही पहात नाहींत. आपला प्रचंड प्रताप दाखवून, भुलवून आपलें तपसामर्थ्य कमी करावयास त्या आपल्यापुढें घुळघुळ करीत असतात. त्यांच्या नादीं न लागलेलें बरें अशा ठाम निश्चयाचे खरे संत असतात.

## खरे संत

खऱ्या संतांना स्वत:साठीं असें कांहींच करावयाचें नसतें. त्यांचा देहभाव मेलेला असतो. प्रारब्धभोग भोगावयासाठींच ते उरलेले असतात. त्यांचें मन मेलेले असल्यामुळें सुख, दु:ख, धन, संपत्ति, आशा, निराशा, कीर्ति, मान याहून ते पर असतात. मन जिवंत असले तरच वरील सर्व भावना होणार. **त्यांच्या वासनाक्षयामुळें ते सदा सहज समाधींत डुलत असतात, परहिततत्पर असा त्यांचा पिंड असतो.** केवळ जनकल्याण साधावें यासाठीं एकादी ऊर्मी संतांच्या मनांत येतांच त्यांच्या तपोबलानें ती उर्मी परमतत्त्वांत विलीन होते. सर्वव्याप्त परमतत्त्वांत ती ऊर्मि मिसळतांच तिची शक्ति इतकी अफाट होते कीं, आपल्या अनंत बाहूंनीं परमात्मा तें कार्य झटपट पार पाडतो. पाऊस हवा, कीर्तनांत रसभंग होऊं नये या ऊर्मी योगानंदांचें मनांत येतांच परमात्म्यानें झेलल्या. सर्वत्र आनंदी आनंद घडविला.

## मानवत

सद्गुरु योगानंद स्वामींचीं गुंज व मानवत हीं दोन महत्त्वाचीं कार्यक्षेत्रें बनलीं. का नाहीं बनणार? मानवतच्या दत्तमूर्तीची स्थापना झाल्यामुळें दत्तभक्तीच्या भावनेला पूर आलेला. महान्‌सिद्ध म्हणून स्वामींची ख्याति पसरलेली. स्वामींची गोड व सुश्राव्य अशी रसवंती त्यामुळें भाविक मनें साहजिकच आकर्षिलीं गेलीं. देव नवसाला पावतो. स्वामींच्या सहवासांत मनकामना पूर्ण होतात अशा भावनांनीं श्रद्धेनें ईप्सित कामनार्थ्यांची भाऊगर्दी जमली होती. पुडीच्या वेळेला होणारी अन्नदानाची लयलूट ही त्यामुळें पोटार्थी भक्तांचें तर पेवच फुटलें होतें. स्वामींच्या मानवत येथील अल्प सहवासांत मानवत प्रतिगोकुळ बनलें होतें. आनंदाचें साम्राज्य, भक्तीची लयलूट, दत्तनामाचा जयघोष, सुश्राव्य पंचपदीचा कर्णमधुर निनाद त्यामुळें आत्मानंद, हृदयशांति, हास्याची लयलूट, आनंदी चेहेरे

सर्वत्र दिसत. परमानंद हा एकच साऱ्यांचा विषय झाला होता. बडीबडी सभ्य मंडळी अविरतपणें महाराजांच्या सेवेला असत त्यामुळें सामान्य जनतेचे हात स्फुरत. अशा रीतीनें हजारों हातांनीं, गुण्यागोविंदानें सर्व व्यवस्था झटपट व संतोषदायी होत असे. मानवतचे श्री. रामभाऊ झांडगे, श्री. रणसिंग, श्री. पांडुरंग नाईक भरड, श्री. बाबा कल्हे, श्री. नाना दलाल, श्री. सांभदादा दलाल, श्री. आबासाहेब बादल, श्री. गोविंद रामभाऊ कत्रुवार इत्यादि मंडळी प्रामुख्यानें चमकत. इतरही बरेच असत. साऱ्यांचीं नांवें लिहिण्यास लेखक असमर्थ आहे. साऱ्यांच्या कार्यक्षमतेनें सारीं कामें यंत्रासारखीं झटपट होत. तें वातावरणच असें तयार होई कीं, सद्गुरु योगानंदस्वामी मला उपदेश देतील काय ? असें प्रत्येकाचें अंतर्मन प्रत्येकास विचारी. श्री. झांडगे यांचे जांवई श्री. शंकरराव मारुतीराव कुलकर्णी चांदजकर यांची भावना सद्गुरु करावयाची इतकी जोरानें उचंबळली कीं, त्यांनीं आपला मनोदय आपलें श्वशुरांना सांगितला. श्वशुरांनीं जावयाच्या हितासाठीं स्वामीच्या कानांवर जावयाच्या आर्त हृदयाची हांक घातली. संमति मिळविली. **सद्गुरु योगानंद स्वामी तिथें अन्नपूर्णा माता सदा सेवेला असावायाचीच. अन्नपूर्णेचा वरदहस्त त्यांच्यावर होता असें म्हणण्यापेक्षां योगाधीश सुपुत्राच्या सेवेला रहाण्यांतच तिला धन्यता वाटावयाची असें म्हटलेलें बरें.** स्वामींची पुडी या शब्दांत हजारों लोकांना अन्नदान असा गर्भित अर्थ त्यावेळीं रूढ झालेला होता. गरिबांनाहि आपली पुडी करतां यावी, त्यांची इच्छा पुरी व्हावी म्हणून त्यांच्या शक्यतेप्रमाणें वरणभाकरीचीं पुडी कराल तर येईन, असें मातृहृदयानें सांगत. श्रीमंतांच्या पुडीच्या वेळीं तर राजैश्वर्य प्रगटावयाचें. एका श्रीमंत कोमटी भक्ताकडे महाराज पुडीला जाणार होते. अत्यंत भाविक भक्तानें सारें साहित्य अगदिं मुक्तहातानें दिलें. बासुंदी पुरीचा नैवेद्य होता. इतके लोक येणार म्हणून १०० शेर पायस भांड्यांत

उकळत होतें. अग्निनारायणांना भूक लागली होती ही कल्पना कोणाच्या ध्यानींमनीं नव्हती. बासुंदी तयार झाली. सारी मंडळी पानावर येऊन बसली. पानावर वाढलें. बांसुदीचें भांडे अग्नींवरून खालीं उतरवीत असता. ईशकरणी अजब असते—त्या भांड्यांच्या कड्या भांड्यापासून निखळून हातांत आल्यामुळें भाड्यांतील सारे पायस अग्निस्तृप्यंताम् झालें. तयार झालेली बासुंदी अग्निनारायण यांनीं स्वाहा केली. मंडळी जेवावयास बसलेली, पानें वाढून तयार होतीं. आतां वेळेवर पक्वान्न काय वाढणार? सारे चिंतेंत पडलें? कां रे? सारें चूपचाप कां? असें थिजलें कां? अजून ब्राह्मण जेवावयास कां बसत नाही. असे सद्गुरूंचे बोल ऐकतांच पायस अग्नींत पडल्याचें त्यांना समजलें. वा! नामी गोष्ट झाली. अग्निदेवतेला भूक लागली होती म्हणून तिनें पायस स्वीकारलें. तिच्या तृप्तीनें अग्निनारायणाचा आपणास आशीर्वाद लाभला. आतां स्वस्थ कां बसलांत? भक्त श्रीमंत आहे. साहित्य मागवा. झटपट चुरम्यांचे लाडू करा व साऱ्यांना लवकर जेवावयास बसवा. गुरुआज्ञेप्रमाणें सारें कांहीं व्यवस्थित झालें. असा थाटमाट सद्गुरूच्या सहवासांत होई. असे मंगलप्रद वातावरणांत कशाची कमतरता असणार? श्री. झांगाडे यांचे चांदजचे जांवई श्री. शंकरराव कुलकर्णी यांना बोलविलें गेलें व आज्ञा केली. गाडी घेऊन ये आम्ही तुझ्या चांदज गांवीं येणार आहोंत.

## सद्गुरु योगानंद सरस्वती

हिरव्या चाफ्याच्या फुलांचा सुवास दूरवर साऱ्या जंगलांत दरवळतो. आपला सुवास सर्वत्र पसरून लोकांनीं आपली वाहवा करावी अशी कल्पना फुलाच्या स्वप्नांतहि नसते. कांहीं मोबदला मिळण्याची कल्पनाहि त्या फुलास सहन होणार नाहीं. फुलाचा आत्माराम हा आपल्यासाठीं नसून परहितासाठीं असतो याची फुलाला पक्की जाणीव असते.

अगदीं अशीच गोष्ट खऱ्या संताची असते. ते स्वतःचे नसतात किंवा

एखाद्याचे नसतात तर साऱ्यांचे असतात. एखाद्या **विंचवाचा त्यांच्यावर जितका प्रेम करण्याचा अधिकार असतो तितकाच एखाद्या राजाचा. त्यांच्या दृष्टींत विकार, विकृति नसतात तर दृष्टीं सदाच निर्मल असते.** दाट जंगल होतें. आपल्या कुटींत पूज्यश्री रंगावधूत लंगोटी लावून समाधींत बसले होते. सात आठ तास समाधि लावून उठल्यावर त्यांच्या लंगोटींत कांहीं वळवळूं लागले म्हणून पहातात व झटकतात तो मोठा नाग लंगोटींतून बाहेर पडला तेंव्हां ते म्हणतात लंबे नारायण! झाली आपली झोंप. जा. असें म्हणतांच साप सळसळत निघून गेला. आपली दृष्टि विकृत असल्यामुळें सापाचें भय, त्याला मारणें या गोष्टी आपल्या हातून होत असतात. निर्मळ दृष्टि असणाऱ्या संतांना सारेच देव वाटतात. मग तो वाघ असो का सर्प. असो. आपली दृष्टि व संतांची दृष्टि यांत जमीन-अस्मानाइतकें अंतर असते. अगदीं परवां परवा पर्यंत नारेश्वरीं पूज्यश्री रंगावधूत यांच्या मातुश्री थाळींत दूध घालून हातांत घेऊन सर्प, नाग यांना दूध पाजीत. दूध पिऊन झाल्यावर विषारी सर्प, डुलत डुलत मजेनें निघून जात.

## योग्यांची निर्मळ दृष्टि

संद्गुरु योगानंद प्रवचन करीत होते. श्रोतृसमुदाय बराच जमलेला होता. निवांत, नितांत वातावरण होतें. तों भला नाग सळसळत त्या व्यासपीठाकडे येऊं लागला. नागाला पाहून सारे घाबरले. चळवळ करूं लागले. नागाला मारावयाच्या विचारांत होते. सद्गुरु आवेशांत म्हणाले, पूर्वीं बसला होता तसे सारे चुपचाप बसा. अगदीं शांत व्हा. नाग तुम्हांस डसणार नाहीं अशी मी खात्री देतों. सारें वातावरण शांत झालें. नागोबा मोठ्या ऐटींत संतवाणी ऐकत होते. थोड्या वेळानंतर सद्गुरु नागोबांना म्हणाले, लंबे नारायण! आपण जंगलांतील ज्या बिळांतून आलांत तेथेंच परत जा. तुम्हांस कोणी मारणार नाहीं. **दोन शब्द**

**शांतीनें ऐकले ना.** नाग निघून गेल्यावर सद्गुरु साऱ्यांना उद्देशून म्हणाले. प्रवचन ऐकावयास तुम्ही जसे आलांत तसा तो घरून आला. यांत घाबरण्यासारखें काय आहे? **द्वैत हें भीतीचें मूळ.**

## योग्यांची निर्मळ दृष्टि तीच सम्यक् दृष्टि

दत्तावतार अक्कलकोटच्या स्वामींचा लौकिक सर्वत्र पसरला होता. सारी दुनिया त्यांच्या दर्शनासाठीं वेडी झाली. कैकांना अनुभव आले. पण महाराजांचा द्वेष करणारी व त्यांचें वाईटांत वाईट चिंतणारी एक रिटोळ टोळी होती. अति सौंदर्यखनि, गाणारी नर्तकी व स्वरूपसुंदर अशा वेश्येकडे जाऊन या रिटोळ टोळीनें तिला सांगितलें कीं, कांहींहि कर पण तुझ्या रूपावर, नखऱ्यावर महाराजांना भाळवून तुझ्या मोहपाशांत घे. महाराज तुझ्या नादीं लागले कीं तूं मागशील तें बक्षीस तुला आम्ही देऊं. तिनें हें मान्य केलें. महाराजांना मोहपाशांत गुंतवीनच असा विडा उचलून महाराजाकडे आली. बहुविध चाळे करूं लागली. सर्वतोपरी प्रयत्न केले. **संतांची दृष्टि सम्यक् असते.** अरेरे! हा जीव वाया जातो, **अशी** ऊर्मी मनांत आणून तिजकडे पाहिलें. तिच्या छातीवर स्तनच उरलें नाहीं. **ती स्त्री होती, पुरुष झाली व तो पुरुषभक्त स्वामींचा परमभक्त बनला.** योग्यांची अहिंसा सिद्ध झाली म्हणजे वाघ, सर्प, हिंस्रपशू, दुष्ट, चांडाळ, पापी इत्यादि भेद मिटतात असें सद्गुरु नेहमीं म्हणत. देवीचें वाहन वाघसिंह आहे. शंकराच्या गळ्यांत नाग असतात या गोष्टी अहिंसा पूर्ण सिद्ध झाली हें दर्शवितात.

## पुष्पसंगें मातीस वास लागे

संतांचा सहवास दुर्जनांचें हृदयपरिवर्तन घडवीत असतो. संतांच्या दृष्टींत चांडाल, पापी, दुराचारी, दुष्ट, चोर, घातकी असा भेद नसतो. ते साऱ्यांनाच परमात्मस्वरूप समजत असतात. हे वरील सारे भेद आपल्या विकारी, स्वार्थी, विकृत दृष्टीनें दिसत असतात. संत हे अग्नीचें धगधगीत

निखारे आहेत. त्यावर रज, तम गुणांचें आवरण नसतें म्हणून तर **संत सत्त्वगुणप्रधान असतात.** आपणहि तेच निखारे आहोंत, तेच आहोंत. पण आपल्या धगधगीत निखाऱ्यावर, आपल्या ओजस्वी, तेजस्वी मूळरूपावर रजोगुण, तमोगुण यांची दाट राख आच्छादिली गेली आहे. तेंच आवरण ! त्यामुळें आपण कोण या मूळाला विसरलों आहोंत. डाकू, चोर, पापी, लुटारू, कपटी, लोभी, कंजूष इत्यादि दुष्ट चांडाळ लोकहि मूळचे तेजस्वी हिरे पण त्यांच्यावर तमोगुणाचा पगडा इतका जोराचा बसल्यामुळें तें तेजस्वी तत्त्व असलीं नीच कर्में करूं लागले. आपण स्वतःचीं धार्मिक नित्यकर्में न करणाऱ्या ब्राह्मणाला हेटाळतो. पण संत म्हणतात तो कितीहि हलकट कर्में करणारा ब्राह्मण असो तो ब्रह्मबीज आहे ना? म्हणून मानायचें अशी संतांची विचारसरणी असते. पापी, चांडाल, दुष्ट तो तमोगुणानें बनला. मूळचा तो तसा नाहीं. मूळ पहा. त्याचा दुष्ट, हलकटपणा कां बघतां? तमोगुण कमी होतांच तो इतका हलकट रहाणार नाहीं. रजोगुणाचा पगडा बसेल तर इतका पापी रहाणार नाहीं. पण विलासी बनेल. रजोगुणाचा पगडा जाऊन सत्त्वगुणाचा पगडा बसेल तर ईशध्यानीं भक्त साधु होईल. अशी विचार सरणी संतांची असते. अत्यंत बदमाष, डाकू वाल्या कोळी हा तमोगुणाचा अर्क होता. पण संत नारदमुनींचा सहवास घडतांच तमोगुण पार जाऊन सत्त्वगुणांचे माहेरघर तेच वाल्मीकिमुनि बनले. म्हणून संत अधम लोकांचा द्वेष न करतां त्यांना सज्जनाइतकेंच मानतात. कारण ते व्यक्ति म्हणून पहात नसून आत्मतत्त्व या दृष्टीनें त्याजकडे बघत असतात. गुरुमाऊली योगानंद बोलूं लागली, व्यक्तीचा द्वेष करूं नका तर त्यांच्यातील अवगुणाकडे वाईट दृष्टीनें पहा. त्याला सुधारण्याचा रस्ता दाखवा. आजचे गुणीबाळ उद्यां अवगुणांचा भांडार बनेल, तर आजचा अवगुण सम्राट उद्यां सद्गुणांचे भांडार बनेल. आपण सारें प्रारब्धाधीन

आहोंत. आपण सारे सत्त्व, रज, तम यांच्या हातांतील बाहुलें आहोंत. या तीन गुणांच्या वर्चस्वासाठीं सतत अंतर्गत झगडे चाळूंच असतात, चाळूंच रहाणार. प्रत्येक गुणाचा प्रयत्न माझा वरचष्मा रहावा असा असतो. या तिन्ही गुणांत कोणाचें तरी एकाचें विशेष प्राबल्य असतें. तेव्हां इतर दोन गुण हिरमुसले होऊन बिचारे चुपचाप बसलेले असतात. असें जरी असलें तरी आपला प्रभाव अधिक कसा पडेल याबद्दल त्यांचे आंतून प्रयत्न चाळूंच असतात. तमोगुण श्रेष्ठ ठरला तर हिंसक कृत्यें, पापाचरण, स्वार्थ, आपलपोटेपणा, हम करसो कायदा ही प्रवृत्ति अवगुण या रूपानें ही व्यक्ती तमोगुणप्रधान आहे असें अनुमान सज्जन काढितात. रजोगुणाचा खाक्या और असतो तो इतका अघोरी, इतका हिंसक नसतो पण विलास, सुखे, देहशांति, ताठा, ऐश्वर्य यांतच तो मग्न असतो. पण सत्त्व गुणांत वरील साऱ्या गोष्टींचा बहुधा अभाव असतो. सात्त्विक, दैविक गुणांतः तपानुचरण, ईशभक्ति, दया, क्षमा, शांति या गोष्टी दिसतात. संत सत्त्वगुणप्रधान असतात. संसारी रजतमाचें दास असतात. पापी, निष्ठुर चोर, डाकू, नाच-तमाशांत रमणारा तमगुणप्रधान असतो असें त्रयगुणांचे वर्चस्वाचे झगडे चालतात.

* * *

# किरण तेरावा

## सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज

यांचेवर लोकांची निःसीम भक्ति बसली होती. मानवत येथें सद्गुरु योगानंद महाराज यांचे वास्तव्य असतांना त्यांची व येणाऱ्या भक्तांची सारी व्यवस्था ठेवण्याची सारी जबाबदारी स्वामिनिष्ठ भगवद्भक्त श्री. बाबा कल्हे यांनीं आपल्या अंगावर घेतली होती. स्वामींचे ते एकनिष्ठ सेवक होते. सद्गुरुवरील अढळ श्रद्धेमुळें स्वामींच्या पुडीचे आमंत्रण एकाच दिवशीं कैक भक्तांकडून येई. प्रत्येकाला आपल्या घरीं स्वामींनीं पुडी घ्यावी अशी दांडगी मनिषा असे. गरिब श्रीमंतीचा प्रश्न नव्हता. एकाच दिवशीं सद्गुरु अनेक ठिकाणीं पुड्या कशा घेणार? म्हणून कोणालाहि नाखुष न करतां आजची पुडी कोणाकडे हें निश्चित धोरण श्री. बाबा कल्हे ठरवीत. अशा शिस्तीनें दोन दिवस उशिरां पण साऱ्या भक्तांचें समाधान होई. पुन्हां स्वामींनीं आपल्याकडे पुडीला यावें अशी इच्छा करणाऱ्यांना बरेच दिवस थांबावे लागे. महाराजांची पुडी ही साधी गोष्ट नव्हती. महाराजांबरोबरच परग्रामस्थ शिष्यगण व इतर यांच्यासमवेत महाराज पुडी घेत. महाराजांच्या पुडीबरोबर किती लोक येतील किंवा असतील याचा कांहींच नियम सांगतां येत नसे, निदान दीडशें-दोनशेंच्या वरच सद्गुरुच्या पुडीच्या वेळीं लोक असावयाचे. त्यामुळें अन्नसत्राची लयलूटच अन्नपूर्णामातेनें चालविली होती असें म्हटलें तर अनाठायी होणार नाहीं. सद्गुरुंच्या सान्निध्यांत असा नवा नवा उत्सव व उत्साह सर्वत्र दुमदुमत होता. सद्गुरुंच्या वास्तव्यानें मानवत येथील सारें वातावरण मंगलप्रद व पवित्र झाले होते. दत्त नाम सर्वत्र गर्जत होते.

तो संतांच्या पदरजकणांचा प्रकर्ष असतो. **संतांच्या संकल्पाची पवित्र आंदोलनें सारें वातावरण मंगल व पवित्र बनवितात.** संतांना स्वतःचें संकल्प नसतात. ते करीत नसतात पण संकल्प केले गेलेंच तर परहितासाठीं, जनकल्याणासाठीं, धार्मिक वातावरण फैलावण्यासाठीं असतात.

## सेलू

मानवतहून स्वामी सेलूला गेले. तेथेंहि तेंच वातावरण, तीच अन्नदानाची लयलूट. भक्तजनांना आपल्या घरीं स्वामी पुडीला कधीं येतील याच आर्त भावना असावयाच्या. नियमित पंचपदी, भजन, सप्ताह झाल्यावर सद्गुरु योगानंद सरस्वति महाराज धार्मिक पण मार्गदर्शनपर असे दोन शब्द सांगत. सद्गुरुच्या अमृतवाणीनें साऱ्यांचे कान तृप्त होत व आत्मभावाकडे प्रवृत्ति वळे. एकदां पवित्र भावनेनें एकानें महाराजांना एक शंका विचारली,

**प्रश्न**—पापकर्में घडलीं तर त्यांच्या निरसनार्थ शास्त्रांत प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत, त्यांनीं पापांचा नाश होतो काय? तसें असेल तर नामस्मरण कां करावें?

त्यावर सद्गुरु योगानंद महाराजांनीं उत्तर दिलें :

**उत्तर**—आपला प्रश्न उत्तम आहे. प्रायश्चित्तांनीं पातकांचा अवश्य नाश होतो.

**साबू अंगाला लाविला म्हणजे अंगावरील मळ निघून जातो पण अंगावर मळ पुन्हां येणार नाहीं अशी तरतूद साबणांत नसते.** तीच गोष्ट प्रायश्चित्ताची. प्रायश्चित्तानें पातकांचें शमन होतें ही गोष्ट खरी पण **पातक करावयाची प्रवृत्ति नष्ट होत नाहीं.** जरी प्रायश्चित घेतलें तरी पाप करण्याची प्रवृत्ति पुन्हां पापें करणारच. **प्रायश्चित्त गजस्नानासारखें आहे.** हत्ती नदींतून सारा मळ झाडून स्वच्छ होऊन

येतो. पण बाहेर येतांच सोंडेनें धूळ घेऊन अंगावर फेकण्याची संवय असते. मग हत्तीनें स्नान करण्याचा काय उपयोग?

## नामस्मरणाचें महत्त्व

पुढें सद्गुरु बोलूं लागले. नामस्मरणाचें तसें नाहीं. नामस्मरण म्हणजे किर्लोस्करांचा लोखंडी नांगर. जमीन खोल नांगरून खालची सारीं जाळींमुळें उपटून काढतो. **पातकाचीं खोलवर गेलेलीं मुळें प्रभुनाम कायमचीं खणून काढावयास समर्थ असतें.** लुटारूपणाचीं पापें करून वाल्याकोळ्यानें प्रत्येक पापाच्या स्मरणार्थ एकेक खडा टाकून सात मोठें रांजण भरून खडे सांठविलें होते. इतका पापी असूनही नारदानें त्याला राम राम म्हणावयास सांगितलें. पण कुसंस्कारानें तो रामाऐवजीं मरा मरा असा जप करावयाचा. त्याच्या अंगावर मोठमोठीं वारुळें झालीं होतीं तरी त्याचा जप चालू होता. आश्चर्य वाटेल तो नराधम पापी वाल्मीकीऋषि बनला. वाल्मीक रामायण त्यानें केलें. नामांत अजब शक्ति आहे. नाम पातकाचीं पाळेंमुळें खणून काढतें व दुसरें दुसऱ्यांदा पाप करण्याची प्रवृत्तीच होऊं देत नाहीं असें नामजप महात्म्य आहे. पापी अजामीळ नामानेंच तरला. नाम हें गजस्नान नसून ते गंगास्नान आहे. कलियुगांत नाम हेंच उद्धाराचें साधन आहे. एक कोट जप झाला तर देहशुद्धि होऊन कोणताहि रोग राहो पण नखहि दुखावयाचें नाहीं. दोन कोटी जप झाला तर लक्ष्मी तुमची दासी होते म्हणजे धनस्थान शुद्ध होते. रामभक्त रामदासस्वामी यांनीं गोदावरींत उभे राहून तेरा कोट जप केला. ते समर्थ झाले, ब्रह्मविद् झाले इतकेंच नव्हे रामदर्शन घडलें. जप किती करावा? या प्रश्नावर ते म्हणाले शरिरांतील अणूअणूंत प्रभूनाम पोहोंचलें पाहिजे. प्रत्येक श्वास प्रभु जपावाचून होऊं नये. संत जनाबाईच्या श्वासाश्वासावर प्रभूनाम खिळलें होतें. आणि त्याचा परिणाम ती शेणाच्या गवऱ्या करी तेव्हां तिच्या शरिरांतील नामजपाचें

परिमाणू गवरींत जात. गवरीच्या मालकीवरून जनीशीं भांडण झालें. जनी म्हणाली गवरी कानाला लावा. ज्या गवरींतून विठ्ठल विठ्ठल आवाज ऐकू येईल ती माझी. नाम इतकें भिनलें पाहिजे.

## सद्गुरु गांडा महाराज गुंज येथेंच कां थांबले ?

सद्गुरु गांडा महाराज पाथरी येथें वास्तव्यास असतांना गंगास्नान घडावें अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली. पाथरीपासून ३–४ कोसांच्या आंत गुंज येथें गोदावरी स्नान सहजसुलभ आहे. व गुंज हे आपल्या सत्तेखालील गांव असल्यामुळें गुरुसेवेला अनुकूल परिस्थिति आहे म्हणून सद्गुरु गांडा महाराजांना गुंज येथें चौधरी या भाविक भक्तगणांनीं आणिले. तो गोदावरीचा रम्यतर तटाक, निर्मल वातावरणांत डुलणारें तें सिद्धेश्वर स्थान. त्याभोंवतीं बहरलेला निसर्ग पाहून चातुर्माससच नव्हे तर कायम वास्तव्यास हेंच स्थल उत्तम असें त्यांचें अंतर्मन त्यांना ठणाणून सांगू लागलें. गुरुबंधू असलेली ही भाविक चौधरी मंडळी, गुरुसेवेस तत्पर असलेला येथील भाविक समाज. गुरुदेवाबरोबर आपण गोदातटाकीं फिरत असतांना याच भागांत चिरपरिचित झालेल्या व्यक्ति चौधरी मंडळी यांचें देशमुखीचें व अधिकाराखालीं असलेले गुंज गांव इत्यादि अनुकूल वातावरणाची त्यांना कल्पना आल्यामुळें, असल्यामुळें त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र गुंज गांव करावें असें निश्चित ठरविलें. असें म्हणण्यापेक्षां त्या जागेच्या होणाऱ्या भाग्योदयानें त्यांनीं तेथेंच रहावें अशी वृत्ति स्थिर बनविली असें म्हणणें योग्य होईल.

## गुंज क्षेत्र गाजलें

मानवाच्या भवितव्याप्रमाणें जागेलाहि भवितव्य असतें. कोणत्या जागेचा भाग्योदय केव्हां ? कोणाकडून ? कसा होईल ? हें कांहींच सांगतां येणार नाहीं. पाथरी येथील चौधरी घराण्याची गुंज इ. देशमुखीचीं गांवें असत. त्या काळीं सर्वाधिकारीहि तेच असावयाचे. गुंज हें छोटेसें

गांव त्यांत पाथरीच्या देशमुखाची गढी आपल्या उंच मानेच्या कोटानें डुलत असावयाची. पवित्र गोदामातेच्या मंगल प्रवाहानें स्थानाला पावित्र्य आलेलें. सिद्धेश्वर महादेव हें रमणीय स्थान गोदा कांठीं पुरातन काला-पासून वसलेलें, त्याच्याभोंवती जिकडे पहाल तिकडे फड्यानिवडुंगाचें दाट रान पसरलेले. शेती, मजुरी, क्वचित व्यापार अशा व्यवसायांत ग्रामस्थ रमलेले. कष्टाळू तसें धार्मिकही असावयाचे. देशमुखाचे ते देशमुखी गांव असल्यामुळें पाथरीकर चौधरी मंडळीचें वास्तव्य अधूनमधून तेथें असावयाचे. अशा या गुंज-गांवांत शके १८४४ त सद्गुरु गांडा महाराज पाथरीहून चौधरीमंडळीसह आले. संत सज्जन आपल्या गांवांत प्रथम येणार, आतां आपले गांव संतचरणधुळीनें पावन होणार अशा गोड सात्त्विकभावानें सारें गांव साफ ठेविलें, सिद्धेश्वरमंदिर आम्रपल्लवांनीं सजविलें व वाजतगाजत सद्गुरु गांडा महाराजांना सिद्धेश्वराच्या देवालयांतील जागेंत लादणीत उतर-ण्याची त्यांची सोय केली. व बाकीच्या लोकांची रहाण्याबसण्याची सोय श्री. औटी वाणी यांच्या वाड्यांत करण्यांत आली. संत आपल्या गांवीं आले. सर्वांचा उत्साह वाढला. खूप लोक संत दर्शनास येऊं लागले. साऱ्यांना क्षणभर टेकावयास स्वच्छ व मोकळी जागा हवी म्हणून सिद्धेश्वराच्या लाद-णीसमोरील आजूबाजूस असलेले निवडुंग काढून सारी जागा साफ कराव-यास साऱ्यांचे हात दुसऱ्या दिवसांपासून लागले. सिद्धेश्वराच्या आजूबाजूस असणारे पटांगण अशा रीतीनें साफ होऊं लागले त्या जागीं भजन, किर्तन, पंचपदी, येणाऱ्या लोकांचें वास्तव्य व अन्नदान होऊं लागले. कोणी संत गुंज येथें आले आहेत ही बातमी वाऱ्याप्रमाणें सर्वत्र पसरली. त्यामुळें आजूबाजूच्या खेड्यांतील भाविकांची रीघ लागली. त्या जागीं सांवलीसाठीं मोठा मांडव घालणें भाग पडलें. चातुर्मास, दशहरा गुंज येथें झाला. भजनाला रंग चढूं लागला. सारी मंडळी त्या वातावरणांत रंगूं लागली. त्यामुळें महाराजांची पुडी व अन्नदान यांत मनाला चंढणारा रंग और

होता. भलीभली व प्रतिष्ठित मंडळी या सत्कार्यास, संतसेवेंत आपलें अंग झाडून मोठ्या उत्साहानें, तडफीनें व धडाडीनें सारीं कामें हातावेगळीं करीत. श्री. बाबुराव व गणपतराव देशमुख, बाबाराव दिवाणजी, केशवबुवा, विनायकबुवा, शंकरबुवा जोशी हे सत्कारमंडळ येणाऱ्या-जाणाऱ्यांची उत्तम बडदास्त ठेवीत. त्यामुळें स्थानाबद्दल आस्था सर्वत्र वाढूं लागली, स्थानमहात्म्य गाजूं लागले तों तों जनसंमर्द अधिकाधिक लोटूं लागला. सद्गुरुंची पुडी आपल्या घरीं होत आहे हें आपलें धन्यभाग्य असा सात्त्विक आनंद प्रत्येकास होऊं लागला. लहान मुलांशीं सद्गुरु गांडा महाराज फारच प्रेमानें वागत. प्रसाद देत, खाऊं देत, त्यांचे लाड पुरवीत. त्यामुळें बालगोपालांच्या गर्दीनें मांडव भरलेला असावयाचा. चौधरी मंडळी व गणपतराव आडगांवकर देशमुख इत्यादि भक्त सद्गुरु गांडा महाराज यांचे गुरुबंधू असल्यामुळें महाराज यांजकडे सादर दृष्टीनें बघत व त्यांचा शब्द प्रमाण मानीत; असा परस्परांचा गाढ प्रेमा जडूं लागला. साऱ्यांचा उत्साह व श्रींचे वास्तव्यामुळें तें स्थान हंसूं लागलें, हसवूं लागलें, साऱ्यांना आनंदानें डोलवूं लागलें. गोदावरीचा हंसरा खळखळाट व निर्मळ पवित्र जीवन यामुळें तेथील आनंदी वृत्तीस शब्दशः आनंदाचा पूर येई. ईश्वररंगांत रंगलेल्या जीवांस क्षणभर घरादाराचा विसर पडे असें आगळें महत्त्व त्या स्थानास आलें होतें. सर्व जातींचे, सर्व धर्मांचे लोक कुतुहलानें तेथें येऊं लागले व तेही आनंदांत सहभागी होत.

सद्गुरु गांडा महाराजांची दिनचर्या ठराविक असे. ब्राह्मी मुहूर्तावर उठावयाचें. स्नान, आन्हिक, समाधि नित्यक्रम यांत रमावयाचें. यांत सात्त्विक आनंदाची लयलूट भोगल्यावर कांहीं वेळ दर्शनार्थी लोकांशीं वार्तालाप, सदुपदेश, योग्य तें सूचन करावयाचें. मार्गदर्शन करून जनांच्या सद्वृत्ति पोसावयाच्या, त्यांना धर्मपरायण करावयाचें हा तर त्यांच्या तेथील

वास्तव्याचा प्रधान हेतू होता. माध्यान्ह काळीं अन्नपूर्णा माता प्रगटून अन्नदान धूमधडाक्यानें होई. प्रसाद घेण्यास सारेच आतुर असत.

## दुसऱ्या चातुर्मासांत शके १८४५

सद्गुरु गांडा महाराज अंतर्ज्ञानी होते. लादणींत त्यांना कांहीं अशुभ वस्तू जमिनींत गाडलेल्या दिसल्या. रहात असलेल्या वाण्याला घालविलें. दक्षिणेकडील लादणींतून अस्थि, मडकें काढविलें. तसेंच उत्तरेकडील लादणींतून खोपटी काढविली. अमंगल वस्तू काढल्यामुळें वातावरण मंगल व प्रसन्न बनलें. तसेंच विनायकबुवा ब्रह्मचारी लादणींत रहात असत. त्यांनीं आतां वर रहाण्यास सुरवात केली. ते मोठे मांत्रिक होते. भानुमती विद्या ते चांगलीच जाणत होते. महाराज येथें वस्तीस आल्यानंतर त्यांचें मंत्रसामर्थ्य स्थगित झालें. जेथें राम तेथें भुतें कशीं असणार? योग सामर्थ्यापुढें अघोरी मंत्र विद्या कशी रहाणार?

## मोरेगांवचा दशाहरा

आई गोदावरी आपल्या पवित्र प्रवाहानें ठायीं ठायीं धर्मभावना उधळीत आपल्या पतिदर्शनाच्या मीलनासाठीं—समुद्रास मिळण्यासाठीं—आगेकुच करीत होती. तिच्या मंगलसूत्रांत किती तरी तीर्थें, पवित्रस्थानें, क्षेत्रें ओविलेलीं आहेत. तिच्या सान्निध्यांत साऱ्या मराठवाड्यांत किती सिद्धा योगी, महात्मे आपल्या तपबलानें प्रथितयश बनलेले आहेत. मराठवाडा म्हणजे संतांचें पेव असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. या भागांत दशाहरा याला प्राधान्य दिलें जातें. कारण गोदावरीस अनेक तीर्थें त्या वेळीं भेटावयास येतील, असें गोदावरीमातेला वरदान आहे.

पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें सद्गुरु योगानंद सरस्वति यांचें तपतेज साऱ्या मराठवाड्यास उल्हसित व आकर्षित करीत होतें. सारा मराठवाडा त्यांच्या दर्शनासाठीं आतुरलेला होता. गुरुप्रेम, ईशभक्ति, दत्तनामस्मरण यांचा जयजयकार या साऱ्याच भागांत सारखा दुमदुमत होता. महाराजांनीं

आपल्या गांवीं यावें, त्यांचें चरणरज आपल्या घरीं पडावें अशी प्रेरणा प्रत्येक भक्तास होऊं लागली. सद्‌गुरु योगानंदांची गोजिरी, साजिरी, निष्पाप व प्रेमळांमूर्ति प्रत्येकाच्या ध्यानांत ठाण मांडून बसली. गुरु माऊलीचें मातृह्रदय आठवतांच भक्तांच्या नेत्रकमलांतून आनंदोर्मी उमळत. गुरु-माऊलीचा सहवास जास्तींत जास्त कसा घडेल म्हणून प्रत्येक भक्तह्रदय धडपडूं लागलें. म्हणून गुरुमाऊलीनें आपल्या गांवीं यावें म्हणून आमंत्रणावर आमंत्रणें येऊं लागलीं. जनतेला भक्तीमार्गाकडे वळविण्यासाठीं आत्मानंदांत डुलविण्यासाठीं, अनीति, अधर्म या जागीं धर्मतत्त्वें बिंबवण्यासाठीं, वृत्ति सदाचारी व धर्मरत करण्यासाठीं संत, सज्जन, महात्मे यांचा प्रवास होत असतो. दगदग, त्रास देहाला झाला तरी संत आनंदानें सोशीत असतात. अभिलाषा, लोकेषणा, मिष्टान्नाची चटक, सुखाभिलाषा, विलास, याहून संत दूर असतात. फक्त धर्माची गोडी लावणें या हेतूनेंच ते फिरत असतात.

## मोरेगांव

गेल्या वर्षीं गोपेगांव येथें पाथरीच्या चौधरी कुटुंबाकडून दशाहर उत्सव मोठ्या थाटानें साजरा झाला होता. चौधरी हे सारें कुटुंब अति श्रद्धाळू, अतिथिसत्कारकुशल, धर्मभीरु, गुरुमाऊली हेंच आपलें सर्वस्व मानणारे, श्रीमंत असून गुरु सेवेंत रमलेले आहे. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांची या घराण्यावर मोठी कृपा होती. यांची भक्ति पाहून गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं यज्ञाच्या पूर्णाहुतीस अडथळा होऊं नये म्हणून एक मृत कन्या उठविली, चौधरी कुटुंबांतील एका शाखेला पुत्ररत्न देऊन ती शाखा टवटवीत केली इत्यादि चमत्कार गुरुदेवांनीं दाखविल्यामुळें सारें चौधरी कुटुंब सद्गुरु योगानंदांच्या इतकेंच नव्हे तर गुंज संस्थानाच्या सेवेला हुकमी पत्त्याप्रमाणें सदा सर्वकाळ दक्ष असतें. निराळ्या शब्दांत सांगावयाचें असेल तर गुंज संस्थान व त्याची

सेवा याशिवाय साऱ्या चौधरी कुटुंबाच्या मनांत दुसरा विषयच नसतो. मनोभावें सेवा करण्यांत सारे, लक्ष्मीपुत्र असतांहि, धन्य समजत असतात सारें गुरुदेवाचें, आमचें काय ? अशी पवित्रतम भावना बुडाशीं असते.

## बामणगांवची आंबराई

सद्गुरु योगानंद सरस्वति महाराजांना दशाहरा उत्सव करण्यासाठीं मोरेगांव येथें आणून या भागांत उत्सव गाजवावा अशी भक्तांना प्रेरणा झाली. श्री. अप्पाराव कुळकर्णी हे सद्गुरुंचे महान भक्त होते. त्यांनीं प्रार्थना केली. तेव्हां त्यांचें सेवामंडळही बरोबर होतें. सद्गुरु मोरेगांवला येणार हें निश्चित झालें. गुरुमाऊली येतांच हजारों भक्तमंडळ त्यांच्यासाठीं येणारच. शिवाय दर्शनार्थी अगणित येतातच. या साऱ्यांच्या सुखसोयीच्या दृष्टीनें विस्तृत जागा कोणती शोधावी ? या काळजींत सारें सेवामंडळ होतें. साऱ्यांच्या नजरेसमोर साऱ्या सोईची अशी एका लक्ष्मीपुत्र धनगराची बामणगांवची आंबराई होती. पण ती मिळावी कशी ? धनगराच्या डोळ्यांत लक्ष्मीची धुंदी भरलेली, विलासी, इत्यादि लक्ष्मीचे दहा अवगुण त्यांत भरलेले त्यामुळें तो देईल अशी खात्री नव्हती. दत्त अवतारा इतकी चपळाई अन्य अवतारांत क्वचितच दिसेल. क्षणांत येथें तर क्षणांत तेथें. भक्तमंडळ जागेच्या शोधांत व काळजींत आहे असें सद्गुरुच्या कानीं येतांच त्यांना न कळत सद्गुरु धनगरास भेटले. दहा दिवसांसाठीं दशाहरा-निमित्त तुझी ही आंबराई आम्हांस उतरावयास पाहिजे आहे, आंब्यावरील एकहि फळ कोणी तोडणार नाहीं ही जबाबदारी मी माझ्यावर घेतों, असें सद्गुरुनीं स्पष्ट शब्दांत त्या धनगरास सांगितलें. प्रभूची लीला अगाध असते. दिव्यापुढें अंधार टिकतो काय ? कापूर तेथें मुंग्या रहातात काय ? सर्पापुढें बेडूक टिकाव धरील काय ? सत्त्वगुणापुढें तमोगुणाचा प्रभाव पडेल काय ? सद्गुरुना बघतांच त्याचा हृदयपालट झाला. आपण सद्गुरु-पुढें कःपदार्थ ही भावना त्याच्या मनांत उचंबळली. धन्य माझें भाग्य

म्हणूनच सद्गुरूंचें दर्शन अनायासें मला घडलें. त्याचा सारा अहं मावळला. त्यानें सद्‌गुरुच्या पायावर मस्तक ठेविलें व सद्‌गद कंठानें बोलूं लागला. गुरु माऊली हें सारें आपलें आहे. दहाच दिवस नव्हे तर आपण येथें कितीहि दिवस राहूं शकतां. सारे आंबे तुटले गेले तरी मला आपल्यापुढें त्यांची किंमत नाहीं. जरूर या व गरिबाची सेवा घ्या असें विनवणी करून सांगितलें. सद्‌गुरु स्थानावर आले. आंबराई ही जागा निश्चित झाली हें साऱ्यांना कळविलें गेलें; हां हां म्हणतां गुरुसेवेसाठीं गुरु सहवासासाठीं प्रचंड जनसागर जमला. आंबराई दाट असल्यामुळें शीतल छायेंत भक्तांचे पडाव दिसूं लागले. पाण्याची सोय उत्तम होती. भजन, श्रवण, कीर्तन, पंचपदी यांत साऱ्यांच्या वृत्ति रंगल्या. आनंद सर्वत्र आनंद उधळूं लागला. दत्तनामाच्या गजरानें दाहीदिशा दणाणून गेल्या. असें आंबराईचें भाग्य उदयाला आलें.

## भावना म्हणजे रज, तम, सत्त्व गुणांचे खेळ

सद्‌गुरु गुरुमाऊलीची अमृतवाणी निघूं लागली. जनसंमर्द डोलूं लागला. पाणी मूळचें स्वच्छ असतें. प्रत्येक व्यक्ति हरिरूप आहे. पाण्याला मळाचा, घाणीचा संपर्क झाला तरच तें निर्मळ पाणी घाण ठरतें—होतें. आपला सहवास, परिस्थिति, संगत, आवडनिवड, अभिरुचि, रज, तम, गुणांचा आविष्कार यांच्या सहवासानें देवस्वरूप असणारे बालक, तमोगुणी, स्वार्थी, विषयलंपट बनत असतें. मूळ तें पाण्याप्रमाणें स्वच्छ निर्मळ असतें. झाडावर फुललेलें, चांगलें टवटवीत सुवासिक हंसरें फूल बघतांच आपला स्वार्थी निष्ठुर हात लालसा, आशा, लोभ, विलास या भावनांनीं दूषित होऊन कुठलाहि मागचा पुढचा विचार न करतां त्या हंसऱ्या फुलाकडे वळतो. तो निर्दय हात त्या झाडापासून आपल्या लेकराची, त्या हंसऱ्या फुलाची ताटातूट करतो. मानव क्षणभर त्या फुलाच्या सहवासांत आनंद मानतो. दुसऱ्या क्षणीं तें हंसरें फूल निर्माल्य बनतें,

स्वार्थलोलुप मानव त्या निर्माल्याकडे हेटाळणीनें बघूं लागतो. पण तेंच फुल झाडावरच राहिलें असतें, निर्मळ राहिलें असतें तर तें हंसरें फुल स्वतः हंसतच राहिलें असतें, इतरांना हंसविलें असतें, आपल्या सुवासानें साऱ्यांच्या मनाला गुदगुल्या केल्या असत्या. **संत हे मूळतत्त्वांत रमलेले असतात. स्वतः हंसतात इतरांना, हंसवितात.** आपल्या तपबलानें साऱ्यांचीं हृदयें आकर्षून घेऊन त्यांना सदासर्वदा प्रमुदित ठेवितात. **परमात्मशक्तीला संत सतत चिकटून असल्यामुळें ते हसऱ्या फुलाप्रमाणें विचारी असतात.** सद्विचार फैलावतात. त्यांतून सद्भावना निर्माण करतात. सदानंदांत डुलवितात. चिदानंदापासून मानव हातानें स्वार्थासाठीं त्या हंसऱ्या फुलाचा चिदानंद पोरका केला. तसेंच परमात्म शक्तीपासून मानवमनाला दूर खेचणारा निर्दय मन व माया याचा हात असतो.

## मानव दुःखी कष्टी कां असतो ?

आतां सद्गुरु माऊली मानवांचें कोठें व कसें चुकते ? मानव दुःखी कष्टी कां असतो ? व संत हृदय सदा हंसरे कां असते ? या विषयाकडे वळली. झाडापासून झालेली ताटातूट त्या हंसऱ्या फुलाला सोसवली नाहीं म्हणून तें म्लान झालें. दुःखी कष्टी झालें. फुलानें मूळ झाडाला, मूळ परमतत्त्वाला संताप्रमाणें अट्टाहासानें सोडलें नसतें तर संताप्रमाणें सदा हंसरें राहिलें असते. संत व संसारी यांत तफावत यामुळें असते. माया ही पुतना मावशी ( राक्षसीण ) आहे. मन तिचा भोप्या आहे. माया व मन यांचा निष्ठुर हात प्रभूपासून मानवाला तोडण्याला, ताटातूट करावयाला सतत टपलेला असतो याची पूर्ण जाणीव संतांना असते. त्यामुळें संत माया व मन याबाबत सदा जागृत असतात, दक्ष असतात. त्याच्या उलट संसारी जनाचें असतें.

## अभिलाषेचे बळी

मायेच्या गोड गोड आमिषाला, विषयसुखाला, लांचावलेलें नको मानव मन, स्वतः कोण आहोंत हें विसरून मायेच्या वेश्येप्रमाणें असणाऱ्या बहुविध चाळ्यांना बळी पडून, सत्त्व, स्वत्व व तत्त्व गमावतो व माया मदारीण जसें नाचवील तसें अस्वलाप्रमाणें तिच्यापुढें नाचण्यांतच धन्यता मानतें. अजामीळ या माया वेश्येच्या नादीं लागून आपलें सर्वस्व भुलला होता. तसें मानवमन भुलत असतें. जिभेच्या स्वादाला भुळून आकड्यांत आमिष्टासाठीं लावलेला कणकेचा गोळा खावयास जातांच कणकेच्या आमिषाला बळी पडून मासा आपला जीव गमावतो. तर गानलुब्ध हरीण पारध्यानें काढलेल्या कर्णमधुर सुरावर इतकें लुब्ध होतें कीं देहभान विसरतें. अशा अवस्थेंत हरीण पारध्याच्या पाशांत अडकतें. कडक लांकडांना कोरणारा भ्रमर कमलाच्या सुंदर वासावर लुब्ध होऊन कोमल कमलांत अडकून पडतो तो इतका कीं, कमलांतून बाहेर पडावयास तो असमर्थ ठरतो. **क्षणिक सुखाभिलाषा हेंच दुःखाचें मूळ.** ज्याची आशा सुटली त्याचा संसार सुटला. वासनेमुळेंच पुनर्जन्म घ्यावा लागतो. गजकर्ण खाजवितांना खुप आनंद वाटतो तो इतका कीं, खाजवितांना इतकी एकाग्रता होते कीं, जणु काय योगीच तपाला बसला. भोग, सुखलोलुपता ही अशीच असते पण गजकर्णाची कंड शमल्यावर इतकी आग होतें कीं, जीव नकोसा होतो. तशीच गत साऱ्या इंद्रियसुखाची, विषयभोगाची. 'घी देखा, लेकीन बडगा नही देखा' अशी संसारी जनांची दैना होते म्हणून ते दुःखी कष्टी असतात. **जो स्वत्व विसरला तो सारेंच विसरला.** म्हणून मी कोण? याची जाणीव सतत मनांत बाळगून सदा मूळतत्त्वाकडे जावयासाठीं प्रभूभजनांत रमावें, संत सहवास करावा, सद्ग्रंथ वाचावें व सदाचारानें वागून मनांत शांति मिळवावी. मन हें असें कां? या विचारलेल्या प्रश्नावर गुरुमाऊली बोलूं लागली.

लहान मुल रडूं लागलें तर त्याला एखाद्या जागेकडे बोट दाखवून गप्प बैस ती पहा भोकाडी, भूत असें आपण दाखवितों व त्याला गप्प बसवितों. वास्तविक तेथें भोकाडी भूत नसतें. तें आहे अशी आपण लहान बालकाची भावना करून देतों. तोच प्रयोग मन आपणा साऱ्यावर करीत असते. **सारें जग भावनांवर तरारत असतें.** आजचा लाडका उद्यांचा वैरी होतो म्हणून हें सारें जग भावनांवर नटलेलें आहे. श्रद्धा आहे तेथपावेतों देव—नाहीं तर फत्तर. **साऱ्या भावना जडविणारें, बदलविणारें मनच असतें. संसारी मनाचे गुलाम असतात तर मन संताचा गुलाम असतें.** म्हणून मनाचे चाळे संतावर होत नसतात. **वास्तविक जगांत ना सुख ना दुःख, ना शोक ना चिंता, ना भीती ना आनंद. या वस्तू कोणी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत काय? हे सारे मनाचे चाळे आहेत.** लहान मुलांना भोकाडी दाखवून तुम्ही बनवितां तसें हें कुटिल मन तुम्हां साऱ्यांना बनवितें, नसत्या दोरीचा साप खोट्या भीतीनें करतात. सुखदुःखाची काल्पनिक भुतें बनवून हसतात, रडतात असा तमाशा आहे.

* * *

# किरण चौदावा

## मोरेगांव

### गुरुमाऊलीची भक्तजनांवर आईच्या मायेची पाखर

सद्गुरुचे एकनिष्ठ सेवक श्री. अप्पासाहेब कुलकर्णी मोरेगांवकर यांनीं सद्‌गुरुनीं मुलाच्या आजारपणानंतर महापुडी घ्यावी असा आग्रह चालूं केला होता. भक्ताधीन परमेश्वर. होकार दिला. मोठ्या थाटामाटानें अन्न-संतपर्ण झालें. हजारों भाविक पुडीच्या वेळीं प्रसादास बोलविले होते. आंबरसाचा बेत होता. दोन मोठे डबे आंबरस होता. एका डब्यांत फार तर अठरावीस शेर रस असणार. पण प्रसादास हजारोंच्यावर आमंत्रित होते. सद्‌गुरु गांडा महाराजांनीं आपली छाटी त्या डब्यावर झाकलेली होती. तुपाचा दिवा तेवत होता. गुरुमाऊलींनीं मायेची पाखर घातली. भक्ताला कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. पंक्तीवर पंक्ति उठल्या. पण आंब-रस सरेना. साऱ्यांनीं प्रसाद घेतला. तरी डब्यांत आंबरस बराच शिल्लक होता. भक्ताची बूज राखणारा भक्तकामकल्पद्रुम सद्‌गुरुची अगाध लीला साऱ्यांच्या प्रत्ययास आली.

श्री. आप्पासाहेब कुलकर्णी यांचे चिरंजीव श्री. बापुराव कुलकर्णी यांचें लग्न फाल्गुन व. ६ ला झालें पण तो आनंद प्रारब्धास न बघविल्यामुळें बापुरावास लग्नानंतर दहाव्या दिवशीं प्लेगची गांठ झाली. त्यामुळें सारा आनंद मावळला. आजुबाजूसही प्लेगाचें तांडव चालू होतें. प्लेगाची गाठ व ताप यांत बेहोष झालेल्या बापुरावाकडे पाहून साऱ्या कुटुंबांत दुःखाची छाया पसरली. आनंदाची जागा चिंतेनें घेतली. साऱ्यांच्या तोंडचें पाणी

पळालें. सद्गुरु गुरुमाऊलीशिवाय भाविक हृदयाला दुसरा कोणाचा आधार असणार? चातकाचा आधार मेघ, मीनाचा आधार पाणी, भक्ताचा आधार गुरुमाऊली. दुसरे कोण असणार? श्री. बापुरावांच्या वेदना बघवेनात. धांवाधांव सुरू झाली, जिंतूरला सद्गुरु माऊलीचा मुक्काम होता. जिंतूर येथें ब्रह्मब्रह्मणस्पति महाराज यांचा गायत्रीपुरश्चरणाचा यज्ञ होता, तेथें सद्गुरु होते. त्यांना तांतडीनें आणविलें गेलें. भक्तपुत्र बापुरावांचें विव्हळणें बघितलें यमपाश पक्के आवळले गेले आहेत. कठीण आहे. असें त्यांना वाटलें. संकटकाळीं भक्तानें कोणाच्या तोंडाकडे बघावें? ही जाणीव असल्या-मुळें गुरुमाऊलीनें तीर्थ व अंगारा दिला व बजावलें कठीण आहे. पण मी जरी जिंतुरला असलों तरी मजकडून रोज अंगारा व तीर्थ मागवीत जा. अंगारा अंगास लावीत जा, तीर्थ पाजीत जा. करुणात्रिपदीचे रोज २१ पाठ करा व अंगाऱ्याची पुडी आंथरुणांत कायमची ठेवा. आंथरूणा-बाहेर अंगारा काढूं नका इतकी दक्षता घेतली कीं, कांहीं होणार नाहीं. ईशस्मरण करा म्हणजे देव रक्षणकर्ता होईल असा स्पष्ट इशारा देऊन सद्गुरु जिंतूरला गेले. साऱ्यांना धीर वाटला क्षुधितास अन्नदाता मिळावा असें साऱ्यांना वाटलें. याप्रमाणें सारे डोळ्यांत तेल घालून दक्षता घेत.

## भस्ममहिमा

काळ आला पण वेळ आली नव्हती. बापुराव बेशुद्ध बेचैन झाले. डोळ्यांपुढें यमदूत दिसूं लागले. यमपाश आवळले गेले त्यामुळें अक्राळ-विक्राळ ओरडणें, शरिराच्या विचित्र हालचाली डोळ्याची तंद्री गेलेली. भयंकर यमदूत स्वप्नसृष्टींत रमलेले. आंथरुणांतून तूं ती भस्माची पुडी काढ किंवा जरा आंथरुणाखालीं ये असा त्यांचा संवाद चाललेला. व्याकुळ जीव भस्माची पुडी सोडीना, अशा दोघांच्या झटपटींत यमदूत कंटाळले. त्राग्यानें सणकाडीचा भारा बापूरावावर टाकून निराश होऊन निघून गेले. अशा स्वप्नांतून बापूराव जेव्हां जागे होऊन थोडीशी हालचाल करूं

लागले तेव्हां साऱ्यांच्या जीवांत जीव आला. वेळ टळली. आतां धोका नाहीं असा सद्गुरुचा जितूरहून निरोप आला.

## यमाच्या जबड्यांतून सुटलेले बापूराव कुलकर्णी

यमाच्या तोंडांतून सुटलेला बापूराव कुलकर्णी यांना आपणांस जीवदान देणाऱ्या सद्गुरुबद्दल आत्यंतिक आदरभाव कां वाटणार नाहीं? सद्गुरुच्या आजन्मसेवेला ते स्वतः कां वाहून घेणार नाहीं? ही सारी हकीकत सांगत असतांना गुरुप्रेमाचा पान्हा दाटून आल्यामुळें त्यांच्या डोळ्यांतील अश्रूंना खळ नव्हता. तो प्रेमा, ते हुंदके पाहून लेखकाच्या डोळ्यांतही पाणी तरारूं लागलें. सद्गुरुमाऊली तुझी लीला अगाध आहे असें सहजोद्गार बाहेर पडले.

मानव प्राक्तनाधीन आहे. सद्गुरु गांडा महाराज वांकडी येथें श्रीगुरुमूर्तिचरित्र हा स्वकृत ग्रंथ मुखानें बोलत व लिखाण हनुमंत शंकर कुलकर्णी दादासाहेब वाकडीकर हे करीत. अशा रीतीनें वांकडीच्या दोन चातुर्मासांत तो ग्रंथ पुरा झाला. यमाच्या तोंडांतून ज्यांना वाचविलें ते श्री. बापुसाहेब कुलकर्णी हे ग्रंथ लिहवीत असतांना शाई घोटून रोज ताजी शाई करून मोरेगांवहून वांकडीला न चुकतां नियमानें घेऊन जाण्याची सेवा बिनचूक बजावीत. गुरुमूर्तिचरित्र हा १३५ अध्यायांचा ग्रंथ लिहितांना लागणारी सारी शाई बापुराव यांनीं रोज शाई घोटून रोज ताजी शाई देण्याची सेवा अगदीं मनापासून केलेली होती. सद्गुरु गांडा महाराज बापुरावाकडे पाहून एक दिवस म्हणाले बापू! गुरुमूर्तिचरित्र लिहितांना शाई पुरविण्याची केलेली सेवा अमोल आहे. पण तो एक दिवस पडलेला खाडा पडला नसता तर तुझ्यासारखा भाग्यवान तूंच. मनुष्य प्रारब्धाधीन असतो दुसरें काय?

## मोरेगांवची आंबराई हिंसक अहिंसक बनतात

संत-महात्म्यांच्या सहवासांत हिंसकाची वृत्ति पालटते. हिंस्रप्राणी

अभयतेनें वावरतात, भयरहित होतात, द्वैत लोपते. आपलें विषारीपण विसरतात, असे मुनि पातंजलीनें आपल्या पातंजल सूत्रांत म्हटलें आहे. याचें मुख्य बीज संतमहात्म्यांच्या निर्मळ दृष्टींत असते. सत्त्वगुणांचा तो प्रकर्ष असतो. सारें वातावरणच अहिंसकवृत्तीचें आपोआप होतेंच याचा साक्षात्कार मोरेगांवच्या दशाहरांत त्या धनगराच्या आंबराईंत साऱ्यांना आला. सद्‌गुरु गांडा महाराज त्या आंबराईंत येतांच त्या, भयाण आंबराईचा नूर पालटला. आंबराईला क्षणांत छावणीचें रूप आलें. आंबराईंत संतसहवासानें आंबे डुलत होते. आम्रफलांनीं वृक्ष नम्र झाले होते. विशालकाय वृक्षांच्या खालीं ठायीं ठायीं भक्तगणांचे पडाव पडलेले होते. पक्षीगणाच्या कलकलाटास पंचपदी, भजन, दत्तधून यांची साथ मिळत होती. साऱ्या साऱ्या गोष्टींचें सुख होतें. पण आंबराईचें अफाट शेत, शेतांतील काळी जमीन, जमिनींत वस्ती करून रहाणारे विंचू, सर्प वारंवार दिसत. त्यामुळें भक्त-मनें दचकत, भीतीनें घाबरत व गर्भगळीत होत. तेव्हां सद्‌गुरु गांडा महाराज सर्वांना अभय देत, घाबरूं नका, ते डंसणार नाहींत, त्रास देणार नाहींत. अगदीं शांत रहा. असा धीर देत पण साऱ्यांच्या मनांतून धास्ती जात नसे. श्री. नरवणकर शिक्षक, श्री. दत्तोपंत अडसकर, श्री. धुंडिराज वाघमारे त्याचप्रमाणें मानवतचे बरेचसे भाविक, बाबा कल्हे इत्यादि मंडळी त्यांत प्रामुख्यानें चमकत होती. विंचू, सर्प यांचें साम्राज्य होतें. त्यामुळें आंतून सारे घाबरत. निजल्यानंतर काय होईल? झोंपेंत डसलें तर? अशा ध्यासांत निजत. एकदां श्री. नरवणकर गाढ झोंपीं गेले होते, आंगावर उपरणें पांघरलेलें होतें. उपरण्यावर दहाबारा विंचू मजेनें फिरत होते. त्यांना जागे करण्यांत आले. घाबरले पण एकहि विंचू डसला नाहीं. गुरुमाऊलीच्या सान्निध्याचा प्रभाव. दुसरें काय? बरेच अनुग्रहित झाले. असा मोरेगांवचा दशहरा झाला. मोरेगांव येथें तीन दशाहरा व वांकडी येथें तीन चातुर्मास क्रमानें झालें. मोरेगांवचा दशहरा

केला. चांदजला प्लेगमुळें सारे गांव बाहेर पडलेलें. अशा स्थितींत सद्गुरु योगानंदस्वामींना आपल्या गांवीं आणावें कसें? अशी श्री. शंकरराव कुलकर्णी इत्यादिकांना मोठी चिंता होती. गाडी घेऊन ये अशी सद्गुरुंची आज्ञा झालेली. असलेल्या प्राप्त स्थितींत सद्गुरुंना चांदज येथें आणावयाचें निश्चित झालें.

## चांदज

गुरुमाऊली येणार, आपल्याला उपदेश देणार म्हणून चांदजच्या श्री. शंकरराव कुलकर्णी यांची धांवपळ सुरू झाली. प्लेग हा असा. सारें अरण्यवासी! जंगलांत सद्‌गुरुंची निगा कशी ठेविली जाणार? स्वामीबरोबर येणाऱ्यांची सोय कशी करावयाची? असे एक ना अनेक प्रश्न मनांत ठाण बांधून बसले. सारें व्यवस्थित होईल, काळजी करूं नकोस असें अंतर्मन त्यांना धीर देत होतें. मोठा मांडव घालून साऱ्यांची निजाबसावयाची सोय केली जाईल असें मनानें ठरविलें. बोरी येथील बंधुराज याजकडून साहित्य येतांच मांडव उभारला गेला. घरची शेती असल्यामुळें अन्नधान्याचा इतका प्रश्न नव्हता. गरीबाची मीठभाकर गुरुमाऊली गोड करून घेईल असा आत्मविश्वास होता. कांहीं कमीजास्त पडलेंच तर प्लेगची सबब आड लपावयास होतीच. चांदजच्या कर्परा नदीच्या कांठाला हा मांडव तयार केला गेला.

## सद्गुरुंचें आगमन

मोरेगांवाहून सुमारे पंचवीस मंडळींसह सद्गुरु योगानंदस्वामी चांदजला आले. जिंतूरचे श्री. देविदासराव पंडित, श्री. काठेकर, श्री. देशमुख वकील इत्यादि वजनदार भक्तमंडळ श्रींच्या समवेत होते. श्री. शंकरराव यांच्या हौशी स्वभावानें, मोठ्या आदरानें, त्यांना वाजतगाजत आणलें. शक्तिअनुसार सत्कार केला. जंगलांत साऱ्या मंडळींना सद्‌गुरूंनीं तीन दिवस ठेवून घेतलें. पंचपदी, भजन इत्यादि कार्यक्रम जंगल दणाणून सोडत

होता. दंडस्नानाचा थाट पन्नास साठ मंडळीसह व्हावयाचा, मोठी मजा व्हावयाची. दंडस्नानाचा विधि मोहक तर खराच.

## चांदजला सद्‌गुरूंनीं दाखविलेली लीला

कर्परा नदीच्या कांठीं दंडस्नानाचा विधि सारा भक्तगण एकाग्रपणें पहाण्यांत रमला होता. पण तिकडे डोहांत एक भोई मासे पकडून आपल्या जवळील गाठोड्यांत मासे सांठवीत होता. बिचारे मासे धडपडत धडपडत जीव सोडीत होतें. हें अमंगल कृत्य सद्‌गुरु गुरुमाऊलीला बघवेना. म्हणून त्याला दूर दुसरीकडे जावयाचा हुकूम केला. हिरवट, तमोगुणी भोयाला हें पटलें नाहीं, तो ती जागा सोडीना. हमरी तुमरी झाली. सगुरुद्‌ची आज्ञा पाळीत नाहीं म्हणून भक्तांना चेव आला. त्याजवर रागावलें व त्या रागाच्या भरांत ते मारलेल्या माशांचें गाठोडें कांहीं रंगेल भक्तांनीं पाण्यांत भिरकावून दिलें. शेपन्नास मासे असतील त्यांची सद्‌गुरुंना दया आली. सद्‌गुरुनीं लीला केली. पिजऱ्यांतून सुटलेल्या वाघाप्रमाणें ते सारे मृत मासे जिवंत होऊन रस्ता मिळेल तिकडे जीव घेऊन पळेत सुटले. ही सारी लीला पाहून सारेच थक्क झाले. सद्‌गुरुच्या योगिक बलाची साऱ्यावर पकड बसली. दत्तनामाच्या गजरांत सारें स्वस्थळीं आले.

## जिंतूर

जिंतूर येथील भक्तगणांनीं जिंतूरला यावयाची प्रार्थना केली. सद्‌गुरु जिंतूरला आले, दत्तमंदिरांत मुक्काम केला. जिंतूरला भाविक भक्त इतके होते कीं, सद्‌गुरुला आपल्या घरीं पुडीला यावयास कधीं वाव मिळेल अशी प्रत्येकाला चिंता होती. गरीब श्रीमंतीचा प्रश्न नव्हता. आपल्या घरीं पुडी घेतल्याशिवाय सद्‌गुरुंना जाऊं द्यावयाचें नाहीं असा प्रत्येकाचा कृतनिश्चय होता. सद्‌गुरुची पुडी म्हणजे निदान दोनशें तीनशें लोकांना अन्नदान, असें समीकरणच बसविलें गेले होतें. श्रद्धा फोफावत होती.

गुरुभक्ति ऐन रंगांत होती. सेवा स्वतःला विसरली होती. भावभक्ति खूपच उचंबळलेली असल्यामुळें स्मित हास्य प्रत्येकाच्या चर्येवर झळकत होतें.

## तमोगुणावर सत्त्वगुणाची मात

जिंतूरला सारें सारें व्यवस्थित चाललें होतें. आनंदानें धुमाकूळ घातला होता. भावभक्तीनें सारें वातावरण व्यापलें होतें. दत्तभक्तीला भरती आलेली होती. पण दत्तमंदिराचें जीर्ण देवालय जिंतूरच्या नागरिकांच्या दांभिक भक्तीला हिणवीत होतें. या गोष्टीकडे सद्‌गुरूंनीं साऱ्यांचें मन वेधलें. अहो सज्जन! तुम्ही मोठमोठ्या अलिशान इमारतींत रहातात. दत्तनामाचा गजर करतात. दत्ताच्या नांवावर पंक्ति झोडतात. त्या दत्ताला रहावयास असें पडकें घर? एक तर गाय पाळूं नये. पाळिली तर तिची निगा नीट ठेविली जावी. नाहीं तर आबाळझालेली गाय शाप दिल्यावांचून रहाणार नाहीं. गोमातेचा शाप सारें सारें सपाट करून देईल अशी सद्‌गुरूची वाणी ऐकतांच सारी जनता भडकली. दत्तमंदिराचा जीर्णोद्धार झालाच पाहिजे या एकाच विचारानें भारली गेली. अनंत हात अनंत डोकी जीर्णोद्धारास लागल्यामुळे चुटकींसरशीं नवचैतन्यांत तें दत्तमंदिर डोलूं लागलें.

मुसलमानांचें साम्राज्य होतें तें. हिंदूंची धार्मिक भावना मुठींत जीव धरून गोंगलगाईसारखी जगत होती. हिंदू जनता जगत होती. पण कशी? हें ज्याचे त्याला विचारा! ही दैना दत्ताला बघविली नाहीं म्हणूनच ठायीं ठायीं विभूति विखरून हिंदूंच्या नैराश्य वादाला माती चारून नवचैतन्य आणलें जात होतें. एखादे हिंदू देवालयाच्या जीर्णोद्धारासाठीं पणजोबांनीं अर्ज केला असेल तर नातवंडाच्या नातवापर्यंत जीर्णोद्धाराची परवानगी येण्याची आशा नव्हती. आशा कसली? निराशेच्या जीवनावरच सारा हिंदू समाज तरंगत होता. या विचारसरणीनें भारलेल्या तेथील मुसलमान तहशीलदाराचें नवचैतन्यामुळें आनंदानें डुलूं लागलेल्या त्या दत्त-

मंदिराकडे लक्ष गेलें. परवानगीवांचून बांधकाम ? मी तहशीदार असतांना ? तो बेचैन झाला तळपायाची आग मस्तकांत भडकली.

## बेफाम अधिकारमद

अधिकाराचा मद तो. बेफाम सुटलेल्या हत्तीसारखा असतो. पाया खालचें दिसत नसतें. सारी दृष्टि अधांतरी असते. विचारानें फारकत घेतलेली असते. काय करीत आहोंत याचें भान रहात नसतें. खवळला ! परवानगीवांचून बांधकाम ! हा प्रश्न डोळ्यांत तरातरत होता. शिपाया-सह तहशीलदार मोठ्या तोऱ्यांत दणफण दणफण करतां करतां दत्त-मंदिराच्या माडीवर गेले. त्यांच्या बुटांचा खाड्खाड् खाडखाड असा आवाज त्यांच्या रागाचें तपमान दाखवीत होता. सद्गुरु योगानंदस्वामि दत्तमंदिरांत एका कोपऱ्यांत विसावा घेण्यासाठीं पहुडले होते. कदाचित् त्यांचा डोळा लागलाहि असेल पण तहशीलदाराच्या बुटांच्या खाड्खाड् आवाजानें सद्गुरूंना जाग आली. दत्तमंदिरांत मुसलमान ? जोडे घालून फिरतो ? असेल तहशीलदार ? पण कांहीं अदब ठेवावयास हवी ! बूट काढून नंतर त्यांनीं बांधकामाची पहाणी केली असती तर आमची ना नव्हती असे विचार चालू असतांना तहशीलदारांची दृष्टादृष्ट झाली. दोन दोन गोष्टी झाल्या. तहशीलदाराचा अधिकार बोलत होता. त्यावर तळमजल्या पासून काम केलें असतें. तर परवानगीची जरुरी, असें सद्गुरु बोलले. हें बांधकाम नसून दुरुस्ती आहे. दत्तमंदिर आहे. अदबीनें बूट काढून नंतर पहाणी केली असती तर आमच्या भावना दुखवल्या गेल्या नसत्या. **तमोगुण व सत्त्वगुण यांचा तो झगडा होता.** तह-शीलदार रागारागानें निघून गेले. सद्गुरु योगानंद तहशीलदारांच्या हिरवट वर्तनानें जरा बेचैन झाले. इतर लोकांना ही सर्व हकिकत समजली. स्वामींचा राग चर्येवर दिसत होता. श्री. निळकंठराव वकील इटोलीकर यांच्याकडे स्वामींची आज महापुडी होती. चारशेंपांचशें लोकांना

आमंत्रण होतें. स्वामीला पुडी घेण्यासाठीं बोलावणें आलें. सारी मंडळी पानावर येऊन बसली. पण असला हा तहशीलदार? तुम्ही हिंदू काय करतात? या रागांत पुडीला येण्याचें साफ नाकारलें. सारे पानावर येऊन बसले. अन्न गार होत आहे. सद्गुरु आज पुडीला यावयास तयार नाहींत. सारे श्रम फुकट जाणार? स्वामींचा स्वभाव कडक! तहशीलदारानें तरी बूट घालून मंदिरांत कां फिरावें? या एकाच प्रश्नावर साऱ्यांच्या भावना एकत्रित झाल्या. सारेच संतापले. पोटांत भूक मावेना. पोटांत कावळे काव काव करूं लागले. त्यामुळें आलेला चेव बळावला. श्री. निळकंठराव वकील इत्यादि पुढारी मंडळी तहशीलदाराकडे गेली. घडलेली सारी घटना सांगितली. महाराज म्हणजे पैगंबर परवरदिगर आहे. मोठा महात्मा आहे. रागावले तर मातींत मिळून जाल. परवां मासे कसे जिवंत केले ही हकिकत सांगून ते परमेश्वर आहेत अशी खात्री पटवून दिली. हें सारें ऐकून तहशीलदार पाण्यांत पडलेल्या मातीच्या ढेकळाप्रमाणें विरघळला. थिजला. आपण चूक केली. ही जाणीव झाली. अहं मावळला. चला मी तुमच्या महाराजापाशीं येऊन माफी मागतो. तडक निघाला. महाराज चुकलों क्षमा करा असें म्हणत साष्टांग नमस्कार केला त्यामुळें या प्रकरणावर पडदा पडला. महाराज पुडीला गेले. त्यांच्यासह साऱ्यांनीं प्रसाद घेतला. दत्तप्रभूच्या कडक साक्षात्कारानें आविर्भावानें दत्तस्थान जागृत आहे अशी साऱ्यांची भावना झाली. घडलेल्या प्रकारानें आजच्या जेवणास अमृताची गोडी लाभली होती. बराचसा काळ तेथें घालवून सद्गुरु माऊली परत चांदजला आली.

## चांदज

सद्गुरु योगानंद स्वामि परत चांदजला आले तेव्हां त्यांच्या बरोबर पाथरीचें श्री. बाळेराव चौधरी, श्री. भय्यासाहेब, गुंजचे बाबा दिवाणजी (ज्यांनीं पुढें संन्यास घेतला ते) इत्यादि भक्तमंडळ महाराजाबरोबर होतें.

या साऱ्यांना सद्गुरूंनीं तीन दिवस ठेवून घेतलें. दत्तभक्तीची लयलूट केली. तेथून सद्गुरु बोरीला गेले.

### बोरी

बोरीचे श्री. कुळकर्णी, भास्करराव वकील यांनीं आमंत्रण दिलें. सद्गुरूंच्या दोन दिवसांच्या सहवासांत दांडगें अन्नदान केलें. तेथून सद्गुरु वसा येथें गेले.

### वसा

वसा येथें चंद्रमौळी शिवालयांत सद्गुरूंचा मुक्काम महिनाभर होता. श्री. माधवबुवा अग्निहोत्री यांचे चिरंजीव रामकृष्ण याच्या आवाजाला गोडी होती. भजन सुंदर म्हणत असे. त्यानें कांहीं सरस भजनें जुळविलीं. पंचपदींत त्यांचा समावेश केला गेला. काळ मजेत गेला. तेथून दशाहरासाठीं सद्गुरु वांकडीला आले.

### वांकडी

शके १८४९ वांकडीला दशहरा श्री. किसनराव पटवारी इत्यादि सद्भक्तांसह मजेनें पार पडला. महाराज तेथें अन्नदान हें सूत्र कायम ठरल्यासारखें होतें वांकडीहून.

### मोरेगांव

येथें कांहीं दिवस काढल्यानंतर सोन्ने गोगलगाय येथील गुरुभक्त श्री. वामनराव यांनीं आपल्यागांवीं आणलें.

### सोन्ने गोगलगांव

श्री. वामनराव यांना चार-पांच स्त्रिया असून संतति नाहीं ही गोष्ट वामनरावांचें काळीत जाळीज होती. प्रारब्धापुढें ते हतबल झाले होते. गुरुमाऊलीला भक्ताच्या अंतर्वेदना सोसवेना. कांहीं साधना सांगून गुरुमाऊलींनीं त्यांच्यावर कृपा केली. दत्त प्रसन्न झालें, दोन तीन मुली, दोन मुलें अशा परिवारांत श्री. वामनराव गुरुसेवारत झाले. गुंजक्षेत्रांत

स्वतःला विसरून कोणाच्याहि डोळ्यांत भरेल अशी सेवा करीत असत. सद्गुरु योगानंद महाराजांचे प्रमुख सेवेकरी बनले.

## सद्गुरु योगानंद सरस्वति

मोठें खडतर जीवन होतें त्यांचें. हैद्राबादचे संत भटजीबापूप्रमाणें. त्यागांत आनंद लुटावयाची कला त्यांना साधलेली होती. केवळ गुरु-भक्तीनें त्यांनीं कैवल्याचें शिखर गांठलें होतें. शके १८४४ चा चातुर्मास गुंज येथें केला. नवरात्रासाठीं पाथरीस आले. मानवतला मार्गशीर्ष शुद्ध पोर्णिमेस दत्तमूर्तीची स्थापना केली. मानवतहून अष्टीस आले. भस्म अंगारा देऊन लक्ष्मणशास्त्र्यांची महामारी थांबविली. कीर्तन ऐकत होतें. देवभक्तीनें आकळला गेला तर भक्ताचीं हवी तीं कामें करतो हें खरें पण कीर्तनकार विपर्यास करून भक्त देवाला हुकूम करून वाटेल तसें वागवून घेतो, असें विधान सांगत असतां कीर्तन बंद करविलें. भाविकांच्या मनाला वाईट वळण लावणारा धोका कीर्तन बंद करून थांबविला. तेथून गोळेगांव, धामणगांव येथें गेले. नंतर सेलू येथें बरेच दिवस वास्तव्य केलें. सेलूचें प्रवचन संस्मरणीय झालें. सिद्धनाथ बोरगांव करून शके १८४५ चा दशहरा करण्यासाठीं गोपेगांव येथें गेले. तेथें एकदीड महिना राहिले. हेतू फार पवित्र होता. गुरुदेव यांनीं ज्या निंबवृक्षाखालीं बसून अरण सांगितलें होतें ती जागा, तें शेत तें स्थळ दत्तसांप्रदायिक कार्याची ज्योत प्रज्वलित करण्याच्या उपयोगी आणावें. पण शेताचा मालक गंगाराम पाटील शेत देईना. पाथरीच्या देशमुखांनीं त्याऐवजीं दुसरे शेत देतों. असें सांगितलें तरी तो ऐकेना म्हणून तो नाद सोडला. नाथरामंजरथ, रामपुरी रत्नेश्वर, साहोळा या भागांत भक्तांच्या आमंत्रणावरून गेले व तेथून शके १८४५ चा चातुर्मास करावयास गुंज येथें परत आले. सद्गुरु गुंज येथें दसऱ्यापर्यंत राहिले. नंतर मानवत, मोरेगांव, सोन्ने, गोगलगांव, पिंपळगांव असा मुकाम करीत करीत चांदज येथील श्री.

कुलकर्णी यांना उपदेश देऊन जिंतूर, कासारबोरी येथें थांबले. कुंभारी गांवीं महायज्ञ सद्गुरूंच्या उपस्थितींत झाला. वसा येथें एकदीड महिना थांबून परत चांदजला आले. वाळूजमार्गें सेलूस आले. तेथें भक्तजनांना योग्य तें मार्गदर्शन करून पिंपळगांव परभणी येथें वास्तव्य केलें. टाकळीच्या दाजीमहाराजाकडे दशाहरा शके १८४६ चा केला. अन्नदान, त्रिपदी, भजन, दत्तनाम गजर प्रत्येक ठिकाणीं होत असत. जिंतूरपासून श्री. बापूदेव दडके हे सद्गुरूंच्या सेवेस राहूं लागले. शके १८४६ चा चातुर्मास कानडखेड येथें केला. बऱ्याच लोकांनीं महाराजांचा अनुग्रह घेतला.

## कानडखेड

येथें सुमारें साडेचार महिने सद्गुरूंचा मुक्काम सिद्धेश्वर शिवालयांत होता. टाकळीहून दशहरानंतर पिंपळगांव व तेथून कानडखेडला आले. गाईला पाणी पाजून मृत गाईस जिवंत केले व येथील एका भरडाच्या येथील पिशाच्च बाधा घालविली. धार्मिक कार्यक्रम जोरांत चालत होते. त्यामुळें धर्मभावना उचंबळत होत्या. आपल्या घरीं महाराज पुढील कधीं येतील अशी भक्तांची तळमळ असायची. त्रिपदीवर विशेष भर होता. वसा येथें दीड महिना मुक्काम होता तेंव्हां मुद्दाम श्री. शामराव कुलकर्णी यांनीं आपल्या साडेगांवीं नेले होते. तात्यासाहेब पटवारी याची सून श्री. गयाबाई हिला पिशाच्चबाधेंतून मुक्त केली. वाडा विकत घेतल्यामुळें वाड्याच्या मालकाच्या भुतानें हिला पिछाडलें होते, श्री. रंगराव भास्करराव पटवारी गाणगापुरास चालले होते, सद्गुरु टाकळी येथें मुक्कामास आहेत. असें त्यांना पूर्णा येथें समजतांच गाणगापुराचा बेत रहीत करून सद्गुरूंना भेटलें. अनुग्रह घ्यावयाची इच्छा प्रदर्शित केली. टांकळी येथें दंडस्नानाचें वेळीं दीडशेंदोनशे लोक सहज असत. सद्गुरु कानडखेडला आले. सद्-गुरूकडून उपदेश घेतला. श्रींचें आगमन जनतेला दीपवाळी वाटल्यास

काय नवल? सद्गुरु जेथें उतरले होतें ती जागा अनुष्ठानास, रहावयास त्यांना पसंत नव्हती. म्हणून ते इतरत्र मुक्काम हलविणार होते. पण श्री. रंगनाथ यांची माडी स्वच्छ करून सद्गुरूंनीं तेथें मुक्काम केला. बऱ्याच लोकांनीं अनुग्रह घेतला. श्रीमत् प. प. स. वासुदेवानंद सरस्वति यांचे चरित्राचें लिखाण सद्गुरूंनीं केलें. सद्गुरुचे प्रवचन चालू असतां एक नाग शांततेनें ऐकत बसत होता. महाराजांनीं साऱ्यांना शांततेनें यसावयाची अनुज्ञा दिली होती. नाग शांततेनें निघून गेला. कानडखेड येथें मुक्काम असतांना मानवतचे श्री. बाबा कव्हे, पाथरीचे श्री. शामराव चौधरी यांनीं वारंवार दर्शनास यावे. त्यांना गुरुसेवेचा तो छंदच लागला होता. आपल्या अंतर्मनास विचारून आज किती लोकांचा स्वयंपाक बनवावयाचा याचें सूचन सद्गुरु सकाळीं करीत. हें वैशिष्ट्य होतें. घरांतील मंडळीचें व मुलीचे गंडांतर श्रीच्या सान्निध्यानें टळलें, असें मोठ्या भक्तिभावानें श्री. रंगराव सांगत असतात. त्यांच्या पत्नी श्री. सौ. प्रयागबाई सहज कचरा फेंकावयास गेल्या. एकाएकीं बेशुद्ध झाल्या. अशा स्थितींत बराच काळ पडून होत्या. सद्गुरूना समजलें. कमंडलूंतील तीर्थ शिंपडतांच बाई शुद्धीवर आली. गंडातर टळलें. त्यांची मुलगी चि. सरस्वती फारच आजारी असे पण सद्गुरु स्नानास जातांना व येतांना तिच्या आंगावर कमंडलूंतील पाणी शिंपडीत. त्या प्रासादिक तीर्थानें तिचा रोग गेला व ती हिंडू फिरूं लागली. सद्गुरु कृपा दुसरें काय? जिंतुरहून दंडस्नानाच्या वेळेला दत्तात्रय धर्माधिकारी नांवाचा दहा वर्षांचा मुलगा त्या गडबडींत बुडाला. पण सद्गुरूंनीं त्याला जीवदान दिलें व वाचविला. महाराज एकदां आपली नित्याची जागा सोडून दूर एका बाजूस कोपऱ्यांत जाऊन बसले तेव्हां असें कां? विचारतांच ते म्हणाले आज गुरुदेवांचा जन्मदिवस आहे. त्यांच्या भेटीस अंत:प्रेरणेनें गेलों होतों. दसरा सण सद्गुरूंनीं येथेंच साजरा केला; शिष्य त्यांच्या कृपाछायेंत सुखासमाधानानें रहात

असत. भक्तगण आत्मतृप्त होता. सद्‌गुरु येथून दीपवाळीसाठीं श्री. श्रीराम शेटाकडे गेले.

## पूर्णा

दीपवाळीसाठीं सद्‌गुरूना पूर्णेचे पेढीवाले व व्यापारी श्री. श्रीरामशेट तोतला यांनीं पूर्णेस आणिलें. या भाविक हृदयांत धर्मप्रीति तसेच संत-सहवास या गोष्टींना विशेष स्थान होतें. श्रीरामशेट यांचें मुनीम श्री. नारायणराव पाठक व त्याचे व्याही श्री. केशवराव डंख महाराजांच्या सेवेंत रत असत. श्री. नारायणरावांच्या सेवेमुळें व गुरुप्रीतीमुळें महाराजांची कृपा होऊन त्यांना संतति झाली. दत्तनामाच्या गजरांत हा संतसहवास सदां आनंद उधळावयाचा. अन्नदान, पुडी या नित्याच्या गोष्टी मोठ्या भक्तिभावानें व्हावयाच्या. श्री. श्रीरामशेट यांच्या चिरंजिवांना धनुर्वात झाला होता तो सद्‌गुरूचें तीर्थ व अंगारा यांनीं शमला. असे कैकांना कैक अनुभव आलें. सद्‌गुरु पूर्णेला एकदीड महिना रमले. या काळांत व्यापार, धंदा, यांत बरकत आली. धंदा जोरांत चालूं लागला. त्यामुळें श्री. सदगुरुकृपा व संतसहवास याचें हें फळ आहे अशी श्रीराम-शेटजींची खात्री झाली. त्यामुळें सद्‌गुरूकडे ते जास्तच आकर्षिले गेलें, अधिक भाविक बनले. व सद्गुरु हेंच आपले दैवत असें त्यांना वाटूं लागले. त्याचा परिणाम श्रीरामशेट हे सद्‌गुरूचे अनन्य सेवक बनून सद्‌गुरूचे सेवेविना अन्य कांहीं सुचेना व सद्‌गुरुचीहि त्यांच्याबद्दल फारच आत्मीयता वाढली. ती इतकी कीं, आपलें मन सद्‌गुरु त्यांचेकडे नेहमीं मोकळें करीत. गुंज संस्थानाच्या सेवेंत श्रीरामशेटजीचा फार मोठा भाग आहे. श्रीरामशेट व त्या वेळचे निष्काम सेवेनेंच संस्थानासाठीं देह झिजविणारे श्री. चिंतामणी या उभयतांची अनन्यगतिक सेवाच आजच्या या गुंज संस्थानाच्या उत्कर्षास लौकिकास कारणीभूत झाली असें म्हटलें तर कोणाचेच दुमत होणार नाहीं. निष्कामसेवेचीं फळें गोड असतात.

त्याचा रसास्वाद गुंज येथील श्री. सद्गुरु चिंतामणी महाराज आज चाखीत आहेत. श्री. सगुद्रु चिंतामणी महाराज पाटोदा येथें आठवडाभर भक्ताच्या आग्रहास्तव राहिले. तेथून खांडवी येथें सद्गुरु आले. भगवान बोरगांवकर विहिरींत पडला होता. त्याला तीर्थसिंचनानें जीवदान दिलें. श्री. संतोपंत बोरगांकर तेथें अनुग्रहित झाले. श्री. प्रद्युम्ननाथ जोशी जिंतूरकर यांची पीडा निरसन करून माथेशूळ थांबविला. दोष परिहारार्थ कुरंडधाचे केशवरावाकडून सुवर्णदान करावयास लाविलें. तेथून दत्तजयंतीला माटेगांव येथें श्री. रंगलाल मारवाडी या भक्ताकडे गेले. जवळच असणाऱ्या संदलापूर गांवीं तेथील श्रीमती जहागीरदार बाईकडे तिच्या आग्रहावरून गेले. तेथे दंडस्नानास गेले असतां सद्गुरुना एक चक्र सांपडलें. तें आज बाईच्या देवघरांत आहे. भाविक जहागीरदार बाईवर गुरुकृपा झाली. नंतर सद्गुरु फिरत फिरत कातनेश्वर, एरंडेश्वर, वसमत, कुरुंदा इत्यादि गांवांस मुक्कामास आले.

## कुरुंदा

कुरुंदा येथील वास्तव्यांत फार मजा आली होंती. आजचे एम्. एल. सी. असलेले श्री. विश्वनाथराव कातनेश्वर यांना अनुग्रह झाला. सद्गुरूंना तेथील वातावरण फारच पवित्रतम वाटल्यामुळें स्वयंप्रेरणेनें आपली छाटी व खडावा प्रसाद म्हणून दिला. कुरुंद्यास येण्यापूर्वीं जोड सांगवीला मुक्काम होता. बरोबर बापूदेव दडके इ. भक्तमंडळी होती. श्री. गणभट बाजीभट यांच्या माडीवर सद्गुरूंचा मुक्काम होता. मध्यंतरीं साडेगांवचे शामराव कुलकर्णी साडेगांवकर या प्रेमळभक्तानें आपल्या गांवीं नेले होते. गुरुमंत्र घेतला. अन्नदान, त्रिपदी, पंचपदी, दत्तधून, वेदमंत्र इत्यादि गोष्टींनीं सारें वातावरण फारच मंगलप्रद बनलें होतें.

## अंतर्ज्ञानी सद्गुरु

दयासागर सद्गुरुमूर्ति योगानंद महाराज ठायीं ठायीं भक्तहृदयावर

दयेचा वर्षाव करीत होते. परहितार्थच अशा दिव्य विभूतींचा पिंड असतो. गोष्ट आठवली म्हणून सांगतों. सद्गुरूंचा पूर्णा येथें मुक्काम होता तेव्हां श्रीनिवासराव वांझोलकर यांनीं नमस्कार करतांच सद्गुरु म्हणाले, श्रीनिवास तूं येथें? तुझ्या घरीं तुझी पत्नी प्रसूतिवेदनेनें विव्हल होत आहे आणि तूं येथें रामकृष्णहरी असें भजन करावयास आला आहेस. हा अंगारा घे. ताबडतोब घरीं जा. तिला लाव म्हणजे त्या गायमाऊलीची लवकर सुटका होईल. तसें केलें गेलें. बाळ बाळंतीण मजेंत राहिली. योग्यांच्या योग दृष्टीला जगांतल्या साऱ्या घडामोडी दिसत असतात. अक्कलकोटचे स्वामी दगड मांडून त्यांशीं खेळत असत. त्या वेळीं १८५७ सालच्या बंडांत इंग्रज सैन्याची जुळवाजुळव करीत आहेत याचें सूचन त्या दगडाच्या फौजा करण्यांत होते. वागी धानोरा ता. जितूर येथील रावसाहेब कुलकर्णी, श्री. अप्पासाहेब इत्यादि सद्भक्त सद्गुरूंनीं लीला दाखविल्यामुळेंच इतके ते सेवारत झाले. सायखेड ता. मुधोळ येथील श्री. नारायणराव देशमुख मुधोळकर यांचे विनंतीवरून ( भय्यासाहेब चौधरी यांचे जांवई ) श्री सद्गुरु योगानंदांचा दोन दिवस मुक्काम होता. श्री. बापुदेव दडके बरोबर होते. त्यांच्या घरीं वाड्यांत असलेले पिशाच्च काढून भक्तहृदय सुखी केलें. त्या पिशाच्चानें या साऱ्या कुटुंबियांना अगदीं त्राही भगवान करून सोडलें होतें. सद्गुरूंनीं पिशाच्चाची मागणी मान्य करून त्याला पिशाच्चयोनींतून मुक्त केलें व भक्तकुटुंब आनंदित बनविलें.

* * *

# किरण पंधरावा

## गुंज येथील प्लेग

शके अठराशें पंचेचाळिस शेहेचाळीसच्या सुमाराला गुंज येथें प्लेग होता तरी भाविक दर्शनास येत. येण्यास बंदी केलेली होती तरी भाविकाची रीघ कमी होईना म्हणून सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज गुंजेहून सोनाशुक्लेश्वर तीर्थ गांवीं गेले. त्या वेळीं त्यांच्याबरोबर त्यांचे शिष्यमंडळ श्री. महारुद्रबुवा, श्री. सखाराम देशमुख, श्री. दत्तोपंत मास्तर, श्री. प्रल्हाद सेलुकर इ. भक्त सद्‌गुरूबरोबर महिनाभर होते.

सद्गुरु योगानंद सरस्वति महाराज यांच्या सहवासांत हमेशा श्री. कृष्णबुवा रामदासी, श्री. चिंतामणबुवा जोशी, श्री. विनायकबुवा जोशी, श्री. शंकरबुवा जोशी, श्री. बाबाराव देशमुख, श्री. गणपतराव देशमुख, श्री. बाबाराव दिवाणजी हे नेहमीं असावयाचेच.

या पंचवीस वर्षांत गुंज येथील दत्तसंस्थानांत सतत सेवारत अशा दोन व्यक्ति आहेत. जणुं काय पायाचे दगड, वर दिसत नसतात तसेंच श्री. सितारामपंत सांवरगांवकर व श्री. जानकीराम गुरु जोशी उमरेकर, आपली सेवा अविरतपणें करीत आहेत.

## सद्‌गुरु गांडा महाराजांचा आत्मविश्वास

मी हजर असतांना कॉलरा काय करणार? सद्‌गुरु पाथरीहून दुसरे चातुर्मासासाठीं गुंज येथें यावयास निघाले. त्या सुमारास गुंज येथें कॉलरा फार जोरात होता. त्या वेळीं पाथरीकर व मानवतकर भक्त मंडळींनीं सद्‌गुरूंना गुंज येथें जाण्यास मनाई केली. कॉलरा आहे. इतरत्र चातुर्मास

करावे. त्या वेळीं सद्गुरु योगानंद सरस्वति म्हणाले, मी गुंजेसच चातुर्मास करणार. महाराज गुंजेस आले; योगायोग लगेच कॉलरा बंद झाला.

## पहिला फोटो

सद्गुरु योगानंदांचा पहिला फोटो पूर्णा येथें शके १८४६ त काढला गेला. सद्गुरुचा वातविकार वाढला. राजाबहाद्दूर डॉक्टरांनीं इंजेक्शनें दिल्यामुळें लवकर आराम पडला. पण डॉक्टर बिलाचे पैसे घेईना. तेव्हांचे मुनीम श्री. नारायणराव होते. त्यांना डॉक्टर म्हणाले, मला बिल नको. ती संतसेवा मला घडली. पण सद्गुरु योगानंदांचा फोटो मला रोजच्या पूजेंत पाहिजे. फोटो काढला, भाविक डॉक्टरांना संतांचा फोटो पुजनास मिळाला. मराठवाड्यांत महाराजांचा हाच पहिला फोटो आहे.

महाराजांची टाकळी, वसमत, औंढा या भागाकडे प्रयाण होऊन चातुर्मास औंढा येथें केला. श्री. बापुदेव जोशी औंढेकर यांच्या घरीं मुक्काम. वाल्हूरचे श्री. विद्याधर श्रीधर पाठक यांना वयाच्या सातव्या वर्षीं अनुग्रह मिळाला होता. भक्तकैवारी संत असतात. श्री. पंडितराव कुलकर्णी यांना सद्गुरुंना पुडी करावयाची मनापासून इच्छा होती. पण जागाच नव्हती. सद्गुरुंनीं त्यांचे मनांतील ओळखलें. अंगणांत पुडी कर नंतर पाऊस येईल. पुडी घेतल्यानंतर पाऊस आला व भक्ताची मनोकामना पूर्ण झाली. वसेकर रामकृष्णपंत यांचा मुलगा अत्यवस्थ होता सारे काळजींत होते. महाराज सद्गुरु हे देवघरांत होते. अंतर्ज्ञानानें ओळखून आपणहूनच मुलास देवघरांत आणा. त्याच्याकडे अमृतदृष्टीनें पाहिलें अंगारा दिला. तब्येतीस आराम पडल्यामुळें साऱ्या घरांत आनंद खेळूं लागला. परभणी जवळील सावंगी या खेड्यांत अनेक भाविक भक्त आहेत. कर्परा व पूर्णा यांचें संगमस्थान आहे. सद्गुरु देशपांड्यांच्या वाड्यांत उतरले होते. दशहरा तेथें केला शके १८४७. त्यांचा दिगंबर

८ वर्षांचा मुलगा वरून पडला. बराच जखमी झाला. सद्‌गुरुंच्या केवळ अंगाऱ्यानें मुलाला कांहीं त्रास झाला नाहीं.

## धोतरजोड्यांची अष्टी

श्री. भगवानबुवा अष्टीकर या दांपत्याला उपदेश दिला. संतति होईल त्याचें नांव दिगंबर ठेवा. मुलगा झाला. मृत झाला. पुन्हां होईल त्याचें नांव दिगंबरच ठेवा असें सद्‌गुरुंनीं पुन्हां त्यांना सांगितलें. महाराजांचें भगवानबुवांवर अति प्रेम होतें. महाराजांबरोबर फिरस्तींत ते सदा रमत. मुलगा झाला. संन्यास घेणार अशा वावड्या हवेंत उडत होत्या. महाराजांना समजलें. लोकांच्या अफवेवर विश्वास ठेवूं नका. तो संसार करील. माझा वरदहस्त त्याचेवर असल्यामुळें तो देवध्यानी बनेल व देहाचें सार्थक करील. अष्टीहून सहा मैलांवर नंदिनी व गोदावरी संगमावर तेथील दंड स्नानाच्या वेळीं मार्गशीर्ष शु. १५ ला तेथें जनसागर जमला होता. त्या जनसमुदायावर दंडस्नानाचें पाणी सर्वांवर शिंपडीत श्री. अवधूतचिंतन श्रीगुरुदेवदत्त असा जयघोष करतांना प्रत्येक जीव आपणास धन्य समजत असे. मानवत, अष्टी, गोळेगांव, नाथरा, सादोळ, आडगांव, धामणगांव, जोडसावंगी असा एकदां सगुद्रु महाराज यांनीं प्रवास केला होता. भक्तगणांच्या विनंतीला मान देऊन धर्मजागृतीसाठीं संत भक्तांची इच्छा पूर्ण करीत असतात. सोन्ने, सातोना, गोळेगांव, मोरेगांव येथील अनुग्रहीत शिष्यमंडळ वारंवार सद्गुरूंच्या दर्शनास येत. सद्गुरु योगानंद जिंतूर येथें दत्तविधानाच्या कार्यक्रमास जावयास निघाले तेव्हां गुरुदेवांनीं साक्षात्कार दिला कीं, हें काय लाविलें आहे ? दत्तविधानास कां ? म्हणून सद्गुरु जिंतूरला न जातां सोन्न्यास आले. श्री. वामनराव सोन्नेकर शिष्य झाले. संतान नव्हतें. गुरुकृपेनें मुलगा झाला. मोरेगांवला अप्पासाहेब मोरेगांवकर यांना खेचरी विद्या शिकविली. सद्गुरु अष्टी येथें असतांना राममंदिरांत मुक्काम होता.

## लिमगांव

गोदावरी पश्चिम वाहिनी आहे त्या लिमगांवीं रात्रीं सद्‌गुरुंचा मुक्काम झाला. रात्रीं कोणी तेथें निजत नसत. तेथून सोन्ने येथें आले. तेथें एका दक्षिणी ब्राह्मणाच्या मनांत शंका आली कीं सद्गुरु गुजराथी ब्राह्मण आहेत. त्यांना आपण नमस्कार कसा करावा? असा विक्षेप त्याच्या मनांत आल्यामुळें त्यानें सद्गुरुंना त्या वेळीं नमस्कार केला नाहीं. पण दुसरें दिवशीं गोडेगांव हें देवीचें स्थान आहे तेथें पुण्याचे गुळवणी महाराज मुक्कामास होते. सद्‌गुरु योगानंद सरस्वति त्यांच्या समवेत होते. तो ब्राह्मण येथें श्री सद्‌गुरु गांडा महाराजांना नमस्कार करूं लागला तेव्हां आत्मदर्शी सद्गुरु त्याला म्हणाले गुजराथी ब्राह्मणाच्या पाया कां पडतात? हें ऐकताच तो मनांतल्या मनांत विरमला.

असाच एक चमत्कार पूरजवळा या भागांत सद्गुरुंचा मुक्काम असतांना घडला. दंडस्नानाच्या वेळेला पायविहिरींत हजारों भक्तगण जमले होते. तेव्हां त्या नितांत शांततेला एक दोन वर्षांचें आजारी पोर सारखें रडत असल्यामुळें अडथळा होई. सद्‌गुरुंनीं लीला केली. तें रडकें पोर घेतलें व विहिरींत भिरकावून दिलें. श्री. हरिभाऊ कोमटी व त्याची पत्नी हें असें कसें अघोर कृत्य केलें म्हणून मोठमोठ्यानें ओरडून ठपका देऊं लागले. सद्गुरु शांतच होते! लोकांनीं उडी मारून त्या पोराला बाहेर काढलें. सद्‌गुरुंनीं कमंडलूंतील पाणी शिंपडलें. रुपयांत चौदा आणे रोग बरा झाला. काळजांत रागावलेले आईबाप सद्गुरुना म्हणाले, महाराज पुन्हां आमचे पोर विहिरींत फेका म्हणजे त्याचा सारा रोग झडून जाईल. सद्‌गुरु म्हणाले संन्यासी आतां लेकराला शिवत नसतो. बाई जा त्याचा रोग गेला.

## सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज

प्रभुमाया महा गहन आहे. तिचा थांगपत्ता मानवमनास कसा लागणार? मराठवाड्यांतील आपल्या सात आठ वर्षांच्या सहवासांत त्यांनीं जागोजागीं

कितीतरी भक्तिकेंद्रें प्रगटविली. सारा परभणी जिल्हा व थोडासा बीडचा भाग शब्दशः त्यांनीं पायदळीं घातला. दत्तगर्जनेंत रंगविला व कैकांचा उद्धार केला. सद्गुरु योगानंदांना कधींहि विषयानंदांत गोडी लागली नाहीं. ते इंद्रियाधीन नव्हते तर इंद्रियें त्यांच्या आधीन होतीं. म्हणूनच अखंड जीवनानंदांत ते पोहत असत. जीवनानंदापेक्षां वरच्या दर्जाचा आत्मानंद मनाची चांगली तयारी दिसतांच आत्मानंदाहून योगानंदांत गुरुदेवांनीं त्यांना नेलें. गुरुतत्त्वाची पूर्ण ओळख म्हणजेच ब्रह्मानंद, सद्गुरु योगानंद ब्रह्मानंदांत सदा डुलत असत. त्यांनीं सारा मराठवाडा दत्त-भक्तीनें जागविला. त्यासाठीं त्यांनीं पूर्णा, पाथरी, मानवत, जिंतूर, सेलू, मोरेगांव, सोन्ना, मोगलगांव, गुंज ही त्यांच्या कर्मभूमीचीं मुख्य केंद्रें ठरविलीं. साटोना, सिद्धनाथ दोरगांव, ब्रह्मवाकडी, अष्टी, गोळेगांव, नाथरा, सादोळा, मंजरथ, किटी, अडगांव, मात्रपाटोदा, कराळ, मंठा, चारठाणा, जिंतूर, बाळूज, पांचलेगांव, वसा, झरी, बोरी, पिंपळगांव, कुंभारी, खांडवी, पूर्णा, कानडखेड, वसमत, कुरुंदा, कातनेश्वर, एरंडेश्वर, पुरजवळ, हट्टा, औंढा, हिंगोली, नरसी, जोडसावगी, परभणी, पेडगांव, सायखेड, शुक्लेश्वर इत्यादि ठिकाणीं पायधूळ झाडून दत्तभक्तिज्योत तेवत ठेविली.

खालील ठिकाणीं चातुर्मास व दशाहरा केला.

| शके | चातुर्मास | दशाहरा |
|---|---|---|
| १८४४ | गुंज | गुंज |
| १८४५ | गुंज | गोपेगांव |
| १८४६ | गुंज | दाजी महाराजांची टाकळी |
| १८४७ | कानडखेड | मोरेगांव |
| १८४८ | औंढा | जोडसावंगी |
| १८४९ | वांकडी | मोरेगांव |
| १८५० | वांकडी | मोरेगांव |

खडतर तपश्चर्येंत जीवन व्यतीत करून साऱ्या मराठवाड्यांत धून जागवून व अन्नसंतर्पणाची लयलूट करून सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज यांनीं आपला देह झिजविला.

## दत्ततत्त्व काय करूं शकतें

मानवतची गोष्ट. एकदां तहशीलदारांची वक्रदृष्टि दत्तमूर्ति काढण्यावर वळली. मोंगल साम्राज्यच तें. कोण कोणाला आवरणार? मानवत येथें अण्णा घोडके यांच्या दत्तमंदिरावर धाड पडल्यानंतर सद्‌गुरुंनीं स्थापलेल्या मानवत येथील दत्तमंदिरावर ती तहशीलदारांची वक्रदृष्टि आली. हिंदूंत घबराट झाला. आतां दत्तमूर्तीचें काय होणार? नानासाहेब पटवारी बरोबर होते. त्या काळीं भरड ही व्यक्ति अशी गाजलेली होती. त्याचें तोंड बघितलें कीं, अपयश येणारच. अपयशी व्यक्ति होती. भरड यांना तहशीलदार याजकडे घेऊन जा म्हणजे ठीक. तसें केलें गेलें. तहशील-दारांचा असा समज करून दिला गेला कीं योगानंदस्वामी महान सिद्ध आहे. त्यांच्या दत्तमूर्तीला हात लाविला तर तुमचा निर्वंश होणारच. त्यावर तहशीलदार म्हणाले, असें जर आहे तर मी नसती आफत माझ्या वंशावर कां ओढवून घेऊं. नकोच ती उपाधि. असें म्हणून त्यांनीं दत्तमंदिरांत जावयाचें रहीत केलें. त्यामुळें मानवत येथील दत्तमूर्ति-वरील अरिष्ट टळलें.

२

मानवतला एक म्हातारा तांबोळी (मुसलमान) रहात असे. त्याच्या दारावरून सद्‌गुरु गांडा महाराज नेहमीं जात असत. त्याचा पाय सडून कांहीं बोटें नाहींशीं झालेली होतीं. बोटें नव्हतींच. सद्गुरुना शरण गेला. सद्‌गुरूंनीं या पाल्याचा रस लाव. पाय बांध. त्यावर रस पीळत जा. रस पीत जा. आश्चर्य! दत्तकृपा! सडलेला पाय बरा झाला. हिंडू फिरु लागला. पण कायमची गेलेलीं पायाची बोटें परत कशी येणार?

३

सद्गुरु गांडा महाराज ब्रह्मवाकडी येथें असतांना गुरुदेवांचा आदेश आला, आतां पुरें, लवकर गुंज येथें जा. या मृत्यूलोकचें अवतार कार्य आतां संपलें. आदेशानुसार सद्गुरु तांतडीनें गुंज येथें आले. पाथरीहून गुंजेला तेथील ब्राह्मणांनी व भक्तांनीं खांद्यावर मेणा घेऊन सद्गुरुंना गुंजेस आणलें.

## भक्तिकेंद्रें

भगवान दत्तप्रभू हें प्रमुख केंद्र असून यतिवर गुरुदेव श्री वासुदेवा-सरस्वति हें मुख्य उपकेंद्र आहे. सद्गुरु योगानंद सरस्वति हें शक्ति केंद्र असून मराठवाड्यांत स्वामींनीं कितीतरी भक्तिकेंद्रें उघडलीं आहेत. त्यांत गुंज, मानवत येथील दत्तमंदिरें हीं भक्तिपीठें बनलीं आहेत.

सद्गुरु योगानंद सरस्वति यांच्या गुंज संस्थानांत जातांना पाथरी येथें जावें लागलें. पाथरी ते गुंज हा प्रवास बैलगाडीनें करावा लागतो. पाथरीकर देशमुख मंडळी दत्तकेंद्राचे निःसीम भक्त आहेत. **पाथरी** येथील देशमुखांचीं नऊ घरें आतिथ्यशील असून स्वयंप्रेरणेनें गुंजपर्यंत एखाद्या दत्तभक्तास जरूर साहाय्यभूत होत असतात असा लेखकाला त्यांचेबद्दल आत्मविश्वास आलेला आहे. **पाथरीची देशमुख** मंडळी दत्तस्थान सेवेंत रमली आहेत. तर **मोरेगांवचे** अप्पासाहेब, बापूराव दत्तध्यान मग्न आहेत. **चांदजचे** शंकरराव व भाऊसाहेब कुलकर्णी दत्त-रंगांत रंगले आहेत. **जिंतूरचे** निळकंठराव इटोलीकर, ब्राह्मणस्पति अग्निहोत्री, देवीदास पंडीत, देशमुख वकील दत्त दत्त असा नामगजर करीत आहेत. **सातोन्याचे** किसनराव पटवारी, त्यांचें चिरंजीव लक्ष्मीकांत हे सद्गुरु योगानंदांचे आनंद विश्रामगृह होते. तर **सेलूचे** विष्णूपंत पंची धोंडीरामजी तोतला, भाऊसाहेब डिग्रजकर, बोरगांवकर बापुराव, गोकुळ-शेट बाबुराव या भक्तमंडळांत रमतांना स्वामींना फारच आनंद वाटे.

**कुरुंदचे** विश्वनाथराव कातनेश्वर वकील यांना तर सद्गुरूंनीं छाटी, पादुका देऊन त्यांचें घरच दत्तकेंद्र बनविले आहे. तात्याशास्त्री सद्गुरूंच्या सहवासांत सदा असतच. **सिद्धनाथ बोरगांवला** संतुकराव व बोरगांवकर कुटुंब दत्तनामांत रंगलें आहे. तर **कानडखेडचे** रंगराव कुलकर्णी यांच्या नजरेसमोरून दत्तमूर्ति हलणें कठीण आहे. **ओंढयाचे** बापूदेव जोशी ओंढेकर आपल्या गुरुस्मरणांत मग्न असतात. तर **पूर्णेचे** श्रीरामशेट तोतला त्यांचे चिरंजीव मुनीमजी नारायणराव पाठक, त्यांचे व्याही केशवराव डंख यांनीं सद्गुरूची अतुल सेवा केली आहे. **परळचे** भाऊसाहेब शालीग्रामजी, **परभणीचे** हनुमंतराव देशपांडे वकील साहेब, धोंडूनाना पिंपळगांवकर यांची अविरत दत्तसेवा चालूच असते. **आडगांवला** देसाईसाहेब, गोविंदराव नाना, विश्वासराव, पाटीलबुवा, बापुसाहेब देशमुख इत्यादि भक्तिकेंद्र चालवीत आहेत. तर दुसरें भक्तिकेंद्र **गोळेगांवला** श्रीधरराव कुलकर्णी, त्र्यंबकराव पाटील, बाबुराव पाटील भक्तिरसानें उचंबळत आहेत. **आष्टीची** धनिक नेवमंडळी, डाफणे मंडळी, गोपाळबुवा अन्नदान, दत्तसेवा, गुरुसेवा यांत रमली आहेत. तर **सोन्ने गोगलगांवचे** वामनराव सोन्नेकर, शंकरराव सोन्नेकर बंधु, आवार दत्तध्यान मग्न आहेत **ब्रह्मवांकडीचे** दादासाहेब वांकडीवर सद्गुरूंच्या नित्य सहवासांत असत. तर **वाळूजचे** विद्याधरबुवा यांना सातव्या वर्षींच उपदेश लाभला होता. गुंज संस्थान त्यांचें आंगणओसरी आहे. वाळूजचे गोविंदराव चौधरीहि परमभक्त आहेत. **साडेगांवचे** शामराव कुलकर्णी यांनीं तर सद्गुरूंना आपल्या घरीं आदरानें नेलें होतें. तर **माटेगावचे** रंगलाल मारवाड्यांनीं दत्तजयंतीला सद्गुरूंना आपल्या घरीं आणून दत्तजयंती मोठ्या थाटानें साजरी केली होती. संतोपंत बोरगावांना दत्तभक्तीचा तर रंगच चढला आहे. **मानवतकर** सद्गुरूंना विसरणार नाहींत. व त्यांचा दत्तभक्तीचा छंदहि सुटणार नाहीं. मानवतला सद्गुरूंचा बराच काळ, बऱ्याच वेळां

मुक्काम होता. सारींच भक्तहृदये तर नांवें कोणाकोणाचीं लिहूं? असा लेखकापुढे प्रश्न आहे. बाबा कल्हे, त्यांचे चिरंजीव राजाभाऊ, नानासाहेब पटवारी प्रामुख्यानें दाखवितां येतील. **बोरीचे** कुलकर्णी, तसेच भास्करराव वकील दत्तनामांत रंगले आहेत तर **वसाचे** माधवबुवा अग्निहोत्री, चिरंजीव सुरेल आवाजाचा रामकृष्ण आपल्या कोकिलकंठी आवाजानें नाद ब्रह्मांत डुलवीत असे. **सायखेडचे** नारायणराव देशमुख मुधोळकर दत्तनामीं रंगले. असे एक ना अनेक! कितीतरी भक्तिकेंद्रें ठायींठायीं विखुरलेलीं आहेत. लेखक खानदेशांतील नंदुरबार या गांवचा रहिवासी. अशीं कांहीं भक्तिकेंद्रें अपरिचित असणारच. कृपा करून सगुद्रु गांडा महाराजांची कांहीं माहिती लेखकाकडे पाठविली तर द्वितीयावृत्तींत तिला अवश्य स्थान दिलें जाईल लेखकाला द्वितीयावृत्तींत वाढविलेली माहिती लिहिण्याची सेवा घडेल; तरी भाविकांनीं, श्रद्धाळूंनीं, असलेली माहिती अवश्य पाठवावी. लेखक आभारी होईल. सद्‌गुरु गांडा महाराजांनीं मराठवाड्यांतील अनेक भक्तवृंदांची मनें जिंकिलीं होतीं. दत्तप्रेरणेनें सारीं कार्यें घडत असतात. गतजन्माची पुण्याई उफाळल्याशिवाय दत्तसेवा घडत नसते. आजचें गुंजसंस्थान प्रति वैकुंठ बनले आहे. त्या स्थळीं असलेले श्री. चिंतामणी महाराज यांच्यावरहि तितकीच श्रद्धा असल्यामुळें त्यांचीही शिष्यशाखा बरीच मोठी आहे.

## साटोना

ब्रह्मवांकडी येथील परमभक्त श्री. किसनराव पटवारी यांची सेवा वाखाणणीय आहे. म्हणून शके १८४९ व शके १८५० हे चातुर्मास येथें झाले. ब्रह्मवांकडीला पूर्वी चातुर्मास झाला होता.

सद्‌गुरु गांडा महाराज मारुतीच्या देवालयावर आलेल्या निंबवृक्षाच्या ज्या फांदीवर आपली छाटी, लंगोट वाळवीत असत ती निंबाची फांदी संस्कारित होऊन त्या फांदीवरील निंबाचीं पानें आपला कडवटपणा

विसरून गोड झाली आहेत. हा अनुभव आजही येतो. ब्रह्मवांकडीच्या या प्रदीर्घ मुक्कामांत श्रीगुरुमूर्ति चरित्र हा ग्रंथ पुरा झाला. सद्गुरु गांडा महाराजांच्या हस्तलिखितावरून दादासाहेब वांकडीकर लिहीत व ग्रंथास लागणारी ताजी शाई श्री. बापुराव कुलकर्णी पुरवीत असा संदर्भ पूर्वीं मोरेगांव या प्रकरणांत आलेला आहे. वांकडी येथें सद्गुरु योगानंद व पूज्य श्री रंगावधूत महाराज या ब्रह्मनिष्ठ गुरुबंधूच्या सहवासांत श्रीगुरुमूर्ति चरित्राचें काम पुरें होऊन नारेश्वरचे संत रंगावधूत महाराज यांनीं निरोप घेतला व भडोच येथें जाऊन सहा महीने तेथे राहून तो ग्रंथ छापविला व सद्गुरुंचें भडोच येथील मेहुणे श्री. कल्याणजी यांना गुरुमूर्ति चरित्राचें पारायण ऐकविले. हा भागही पूर्वीं आलेला आहे. वांकडीहून साटोना येथें सद्गुरु आल्यावर त्यांना गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं साक्षात्कार दिला कीं, ताबडतोब गुंजेस जा. तेथें उर्वरित आयुष्य पुरें होणार आहे. त्वरा करा असा गुरुदेवाचा दृष्टांत होतांच सद्गु पुन्हां मानवत येथें आले. रेल्वे निघून गेली होती. मालगाडीहि मिळाली नाहीं म्हणून मानवतला बैलगाडीनें यावें लागलें. मानवतहून मोटारीनें पाथरीस आले. पाथरींतील भाविक भक्तगणांनीं, ब्राह्मणांनीं खांद्यावर मेणा घेतला. मेण्यांतून सद्गुरुंना गुंज येथें आणलें गेलें. श्री. बाळेराव चौधरी, भय्यासाहेब चौधरी, शामराव चौधरी, दाजीसाहेब चौधरी, माणिकराव चौधरी, विष्णु पंची, वामनराव सोन्नीकर, अप्पाराव मोरेगांवकर, लक्ष्मीकांत सातोनेकर, आणि कांहीं भाविक हृदयें सद्गुरूंच्या गुरुसेवेंत जिवाचें पाणी करीत. सद्गुरु वांकडी येथें येण्यापूर्वींपासून २–३ वर्षांपासून उदर रोग सद्गुरूंना सतावीत होता. पोटाचा आकार वाढला, पायांना सूज आली. गुरुसेवेंत रमलेलें मन शरीर व्याधीकडे लक्ष देत नसे. कर्मभोग भोगून निस्तरले पाहिजेत या विचारांची पक्कड मनावर असल्यामुळें भक्तगण औषध घेण्यास विनवीत पण ते ध्यानीं घेत नसत. आजार वाढत चालला. रोग कोणाचा

मुलाहिजा ठेवीत नसतो. नित्यनियम, आन्हिक, गोदावरीस्नान, त्रिपदी, समाधि चालू होती. अंगावरील सुजेमुळें समाधि इत्यादि क्रिया मंदावल्या. निरनिराळ्या गांवांहून भक्तगण सद्गुरूंना भेटावयास येत जात. श्री. श्रीरामशेट सेवेला सदा तत्पर असत. मराठवाड्यांतील भक्तगण सद्गुरूंच्या दर्शनास येऊं लागला. पुडी, अन्नदान करण्यांत उत्सुक असे. त्यासाठीं सर्व साहित्य येथें मिळावें, येणाऱ्या जाणाऱ्यांची गैरसोय होऊं नये म्हणून मानवतचे सद्भक्त गोविंद रामभाऊ कत्रुवार कोमटी यांनीं लागणारें साहित्य दोनचार हजार रुपयांचें आणून लादणींत ठेवलें. कोठारावर गुंजेचे श्री. हिरालाल मारवाडी असत. भक्तगणांना हवें तें अन्नदानासाठीं लागणारें पुरवीत व त्यांजकडून रीतसर बिलें घेत. या योजनेमुळें साऱ्यांची गैरसोय टळली. पुडी करणाऱ्या भक्तांची सोय झाली. पाकशाळेंत स्वयंपाक सेवाभावें केला जाई. गांवांतील तरुण-तरुणी स्वयंपाकास लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा करीत. पिठाची गिरणी नसल्यामुळें सेवा म्हणून घरोघर दळण्याचीं जातीं फिरूं लागून लागणाऱ्या पिठाचा पुरवठा होऊं लागला. श्री. वामनराव सोन्नेकर, बाबुराव देशमुख, गणपतराव देशमुख, बाबाराव दिवाणजी, केशवबुवा, शंकरबुवा, विनायकबुवा इ. मंडळी प्रामुख्यानें येणाऱ्या भाविकांच्या सुखसोयीकडे बघत. जनसेवेंत त्यांना ईशसेवा घडत असे. भाविक भक्तांसाठीं रात्रीं टेंभेस्वामींचे शिष्य श्री. गणपतराव देशमुख स्वखर्चानें जेवण्याची सोय करीत. श्री. माधवराव गिरिदावर रेव्हिन्यु इन्पेक्टर सेवा म्हणून भक्तांना वाढण्याचें काम अप्रतिम करीत. सद्गुरु गांडा महाराजांचा आवडता पदार्थ चुल्या चुरम्याचा लाडू, खीरपुरी, पाथरी, गोखर, पांढरावसू यांची भाजी इ. असत. संत ब्रह्मदेव अळणी महाराज अळणीच खात. यांचा मुक्काम येथें बरेच दिवस होता. सद्गुरुचे उज्जयनि येथील दंडगुरु कृष्णानंद सरस्वति महाराज येथें आले होते. त्यांची बडदास्त उत्तम ठेविली. पक्वान्नांच्या पुडी होत. महाराजांनीं

साष्टांग नमस्कार केला. आनंदानें निरोप घेतला. पौष वद्य अमावास्येला अर्ध महोदय पर्व होता. त्यासाठीं व सद्गुरुचा सहवास फार दिवसांचा नाहीं अशी जाणीव लोकांत झाल्यामुळें लोकांचे थवेच्याथवे गुंज येथें आले. हजारों लोकांना अन्नदान होई. सद्गुरु गांडा महाराजांची आतां फार दिवसांची शाश्वति नाहीं असें समजल्यावरून गुजराथचे २०–२५ प्रेमी भक्त, श्री. रघुजीकाका, त्यांचे उपाध्ये देवशंकर प्रभाशंकर तसेंच नारेश्वरचे संत पूज्यश्री रंगावधूत महाराज इत्यादि प्रेमी मंडळी गुंज येथें आली होती. श्री. रघुजीकाका उपाध्ये, व पूज्य श्री महाराज येथें राहिले, बाकीची गुजराथी मंडळी परत गेली. श्री. रंगावधूत महाराज व सद्गुरु यांच्यांत त्या वेळीं झालेली सेवा, गोष्टी, इत्यादि बाबी स्वतंत्र प्रकरणांत येणार आहेत. ठायींठायींचे भक्तगण येत, सद्गुरुचें दर्शन घेत. परत जात असत व स्वतःला धन्य समजत. अमावास्येस सद्गुरु अंतरणार अशा पसरलेल्या अफवेनें भक्तांनीं गुंज क्षेत्र हें आपलें अगदीं आंगण–ओसरी बनविलें होतें.

## कालचा चिंतामणी आजचा मराठवाड्यांतील भक्तांच्या चिंता हरणारा चिंतामणी रत्न बनला

सद्गुरु समाधिस्थ होण्यापूर्वीं एक महिन्याची सेलू येथील गोष्ट. एक तरुण सद्गुरुंच्या दर्शनास आला. नमस्कार केला. महाराज मी पास होईन का? असा प्रश्न त्या तरुणानें विचारला. त्यावर सद्गुरूनें उत्तर दिलें, नापास. त्यावर तरुण म्हणाला, मला वकील व्हावयाचें आहे. तेजस्वी डोळे, आनंदी मुद्रा, गतजन्म तपस्या पाठीशीं, चुणचुणीत पण मुद्देसूद भाषा, कष्टानें कसलेलें शरीर, शिवभक्तीनें चर्येवर आलेलें तेज अशा त्या मोहक तरुणाकडे वळून सद्गुरु बोलले, बाळ तुझें भवितव्य मोठें आहे! तूं अवश्य वकील होशील. लक्ष्मीसाठीं भांडणाऱ्या कज्जेदलाल कोर्टाचा नव्हे तर तूं देवाच्या दरबारचा मोठा वकील होशील. घे अंगारा, नीट

जपून ठेव असें म्हणत सद्गुरूंनीं त्या तरुणाच्या तळहातावर अंगारा टाकिला. तरुण चलाख होता. सद्गुरुच्या अमोल अंगाऱ्याची हेळसांड होऊं नये म्हणून लगेच तोंडांत टाकिला व म्हणाला, आपला कृपा अंगारा अशा ठिकाणीं ठेविला आहे कीं त्याला आतां कोणी हात लावणार नाहीं. सद्गुरो! अंगारा खाऊन टाकिला. त्या टवटवीत तरुणाचें चटकदार उत्तर ऐकून सद्गुरुंना त्या मुलावर बेहद्द प्रेम करण्याची ऊर्मी आली. बाळ! तूं मोठा होशील असें म्हणत म्हणत सद्गुरुनीं त्या तरुणाकडे चाक्षुषी दीक्षेनें पाहिलें. कांसवीण आपल्या पिलाकडे बघते मात्र, तिकडे त्या तिच्या पिलाचें आकंठ दुग्धपान होत असतें. योग्यांची चाक्षुषी दीक्षा याच तऱ्हेची असते. योग्यांनीं कृपादृष्टीनें पाहिलें कीं त्यांच्यांतील योगप्रभाव, आत्मशक्ति, तपसामर्थ्य त्या कृपापात्र व्यक्तींत जात असतें असा योगशास्त्राचा अटळ नियम आहे. त्या चुणचुणीत भाग्यवान, गतजन्मीचा योगभ्रष्ट, व भक्त-हृदय त्या तरुणावर स्वामींची पूर्ण कृपा झाली. योगशक्तीचें बीज या प्रसंगांत त्या तरुणाच्या हृदयांत पेरलें गेलें. असें कां झालें? स्वामीपुढें मोठा प्रश्न होता. हा नश्वर देह आतां लवकरच सुटणार! गुरुपरंपरेचा वारसा यापुढें कोणाकडे सोपवावा? ही योगशक्ति, आत्मप्रभाव व तपतेज यापुढें कोणाला द्यावयाचे? ह्याच तरुण माझी दत्तपरंपरा चालवील अशी खात्री झाली. म्हणून कृपा केली. तो तरुण दुसरा तिसरा कोणी नसून आजचें सद्गुरु चिंतामणि महाराज होत.

* * *

# किरण सोळावा

**आम्ही जातों आमुच्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥**

अशा मनाच्या वृत्तींत समाधि पूर्वीं चार दिवस सद्गुरु बोलूं लागले. श्री. रघुजीकाका, बापुदेव दडके, श्रीरामशेट, वामनराव सोन्नेकर, चौधरी मंडळी, गांवांतील प्रमुख व्यक्ति इत्यादि निकटचे भक्त समोर बसले होते. सद्गुरूंनीं आपली मनिषा बोलून दाखविली. गुरु माऊली बोलूं लागली. दत्तसांप्रदायाचें कार्य, धर्मप्रसार व अन्नदान या गोष्टी गुंज येथें अव्याहत चालूं रहाव्या या दृष्टीनें येथें दत्तमंदिर बांधून संस्थानाच्या दृष्टीनें आंखणी व्हावी. वरील मंडळींनीं या कामीं पूर्ण लक्ष देऊन पुढाकार घ्यावा. काळजी करूं नये. दत्ताची कृपा, माझा आशीर्वाद पाठीशी राहीलच. कसें होईल ? कसें करावें ? ह्या गोष्टी मनांतही आणूं नये. पैशांची टंचाई पडणार नाहीं. नित्यनियम, त्रिपदी, पालखी, शंकराची अव्याहत बेलाची पूजा, अभिषेक यांत खंड पडूं नये. या मंडळींतून पंच, सरपंच नेमून कमेटी द्वारां सर्व हिशेब व्यवस्थित ठेवीत जावें. होणारी मालमत्ता संस्थानाच्या नांवावर राहील. बापूदेव दडके गेल्या पांच वर्षापासून पूजा अर्चा करीत आहेत. ते प्रमुख सेवेकरी रहातील. सद्गुरूंचा वरील आदेश त्यांचें मंडळ आजतागायत अमलांत आणीत आहे. पुढेंहि सद्गुरूंचा आदेश शब्दशः पाळतील. संन्यासाश्रमाला अंत्यविधि कसा करतात, याबद्दल स्पष्ट कल्पना दिली. सुजेनें व रोगानें जड झालेलें, हालचाल होणेंहि कठीण होते पण आपला अंतःकाळ जवळ आला आहे असें वाटतांच मन प्राण एकवटून ताडकन् उठले. पद्मासन घातलें. बैठक स्थिर केली. आपानप्राण यांचा

संयोग जुळवून प्राणायाम साधला. अग्निचक्रांत मन स्थिर केलें. गुरुदेवाच्या मूर्तींत रमले. दत्तप्रभू दिसूं लागतांच प्रणवोच्चारांत ब्रह्मांडांत प्राण नेला. चलन वलन बंद झालें. प्राणपक्षी उडून गेला त्याच योग्यसंधींत श्री. रघुनाथजी यांनीं मस्तकांत शंख मारून मस्तक भेद केला. दिव्यांश परमतत्त्वांत विलीन झाला. देह धरणी मातेवर पडला. अंत्यदर्शनासाठीं हजारोंच नव्हे तर सारा मराठवाडा आला असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. फाल्गुन वद्य १२ रात्रीं ४ वाजतां सद्गुरु दत्तपदीं लीन झाले. सद्गुरूंच्या मृतदेहाला अभिषेक करण्यात आला. अभिषेकाचें तीर्थ सर्वांना देण्यांत आलें. पंच पक्वान्नांचा नैवेद्य दाखविण्यांत आला. पिंपळाच्या लांकडाची डोली बनवून पुष्पहारांनी सजवून वाजत गाजत सद्गुरूंची अंत्ययात्रा निघाली. तेव्हां पैसे, खारका, मेवा, सुपाऱ्या, खोबरें भक्तगण उधळींत होते. दत्तनामाच्या घोषानें दाही दिशा दणाणल्या. ही यात्रा कमलजा डोहापर्यंत नेण्यांत आली. तेथें पुन्हां अभिषेक, त्रिपदी, भजन, धून होऊन नैवेद्य दाखविला. मृतदेहास धान्याचीं पोतीं, दगडी चाकें साखळ दंडानें बांधून अति खोल पाण्यांत दहा अकरा वाजतां जलसमाधि दिली. गुरु माऊली किती दयाळू ? आपल्या भक्तांना त्रास होऊं नये म्हणून निसर्गाकडून आकाश या सर्व कार्यक्रमांत अभ्रच्छादित ठेविलें होतें. अंत्य दर्शनाचा फोटो काढण्यांत आला. पुढील सारीं और्ध्वदेहिक कार्यें बंधुराज श्री. रघुजीभाई यांनीं केलीं. सद्गुरूंचा जन्मदिन मार्गशीर्ष शु. पोर्णिमा संवत हा असून अंतदिन फाल्गुन व॥ १२ शके १८५० हा आहे. आपल्या साठ वर्षांच्या आयुष्यांत सद्गुरु जिवाचे शिव झाले. अमर झाले. आपण ? साठी उलटल्यावर देवभजनास लागूं अशा ठाम विचाराचें असतो. संसार कांहीं सुचूंच देत नाहीं. सद्गुरूंचें निर्याण झाल्यास तीन तपें म्हणजे बरोबर छत्तीस वर्षें झालीं. पूज्यश्री नारेश्वरचे संत रंगावधूत महाराज यांच्या आदेशानें सद्गुरुचें जीवनचरित्र लिहावयाचें

भाग्य लाभलें हा परम भाग्याचा क्षण लेखकाच्या षष्ट्यब्दि पेक्षांहि परपरममांगलिक आहे. गुरुदेवा ! रंगावधूता ! ही सारी तुझीच कृपा.

## सद्गुरु गांडा महाराज यांची अढळ गुरुनिष्टा

गुंजची गोष्ट. एकादशीचा दिवस होता तो. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचें दर्शन त्यांना प्रथम होई. साधनशुचितेंत कांहीं तरी घोटाळा झाला असावा म्हणून गुरुदेवांचें दर्शन त्यांना घडलें नाहीं. अस्वस्थ झालें. तळमळ थांबेना. रडूं कोसळलें. सारा दिवस रडण्यांत गेला तरी गुरुदेव डोळ्यांपुढें येईनात. देह ही भाड्याची गाडी केव्हां तरी जाणार आहे. गुरुदेव दर्शन देत नाहींत म्हणून मी रडतों आहें, असें उत्तर एका भक्तानें विचारलेल्या प्रश्नावर दिलें गेलें. आज असें कां झालें ? हें समजेना. दर्शन घडलें नाहीं. म्हणून तोंडांत पाणी न घेण्याचा निर्धार कायम होता. शें, दीडशें भक्तगण आजूबाजूस चिंताग्रस्त होऊन बसलेले होते. साऱ्यांना खड्या आवाजांत त्रिपदी म्हणावयास सुचविलें. सारें वातावरण त्रिपदीनें गुंजून उठलें. तरी गुरुदेवांच्या दर्शनाचा पत्ता नाहीं. रात्रीं आठ वाजतां गुरुदेवांचें दर्शन झालें. त्यानंतर मोसंबीचा रस व पाणी सद्गुरु गांडा महाराज यांनीं प्राशन केलें. आत्यंतिक श्रद्धेशिवाय परमार्थमार्ग सुगम होत नसतो.

२

गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांचें सोवळें, कर्मठपणा अति कडक होता. ती वैराग्यमूर्ति स्वभावानेंहि अति कडक होती. थोडीशी चूकहि त्यांना सोसवेना. आचारसंहितेचें तें तर प्रतीकच होतें. कित्येक वर्षांपासून सद्गुरु गांडा महाराज त्यांच्या निकट सान्निध्यांत असत तरी पण सद्गुरु गांडा महाराज कोठेंतरी एका कोपऱ्यांत बसलेले असत. पण गुरुदेवाची हांक ऐकतांच मारुतीराया प्रमाणें झट् सेवेला हजर असत. गुरुदेवांच्या पंक्तींत प्रसाद घ्यावयास ते कधींच बसले

नाहींत, कीं पंक्तींत लुडबुड केली नाहीं. त्यांच्या उभ्या जन्मांत साऱ्यांचा प्रसाद घेणें झाल्यावरच एकटे कोठें तरी बसून अति शांतीनें प्रसाद घेत, जेवण करीत. अधिकारी व्यक्ति असतांनाहि किती शालीनता.

३

गुरुदेवाबद्दल अनादर दाखविलेला, सद्गुरु गांडा महाराजांना स्वप्नांतहि खपत नसे. तसें कांहीं दिसल्यास त्याची कडक हजेरी घ्यावयास कधींच विसरत नसत. अनादर दाखविणारी व्यक्ति कितीहि मोठी असो, तिच्यावर यांची सरबत्ती झडावयाचीच. गुरुदेवावरील नितांत आदरच त्यांना असें करावयास लावी. माझे गुरुदेव प्रत्यक्ष परब्रह्म आणि त्यांच्याबद्दल अनादर! अशी त्यांची विचारसरणी असे!

नारेश्वरची महान् व्यक्ति, तपस्वी ब्रह्मनिष्ठ पूज्य श्री रंगावधूत महाराज परमतत्त्वाच्या आदेशानुसार श्रीगुरुमूर्ति चरित्रांतील सदोष स्थळें दुरुस्त करावयाचें काम ब्रह्मवांकडी येथें हनुमानजीच्या मंदिरांत करीत होते. सद्गुरु गांडा महाराज कागदावर लिहीत व तो कागद शुद्ध अशुद्ध पहावयास पूज्य श्री रंगावधूत महाराजांकडे पाठवीत. असा क्रम चालू होता. एका कागदावर आरंभीं संस्कृत श्लोक लिहिलेला होता. त्यांत तीन दोषस्थळें होतीं म्हणून त्यावर अवधूतांनीं तीन फुल्या मारल्या व शिरस्त्याप्रमाणें सद्गुरु गांडा महाराजाकडे परत पाठविला. परत आलेला कागद बघतांच सद्गुरु गांडा महाराज एकदम कडाडले. बोलवा त्या ब्रह्मचाऱ्याला. ब्रह्मचारी समोर येतांच, खड्या आवाजांत ते बोलले. ब्रह्मचारी! हा कोणाचा श्लोक आहे हें ठाऊक आहे का? माझ्या गुरु माऊलीनें लिहिलेला श्लोक आहे तो! त्यांत तीन चुका? कसें शक्य आहे? हा सारा आविर्भाव पाहून पूज्य श्रींना कसेसेंच वाटलें. भरतीच्या पाण्यांत उडी टाकण्याचें साहस कोणता वेडा करणार? पावसाचें गढूळ पाणी ओसरल्याशिवाय स्वच्छ पाण्याची अपेक्षा कसली? मेघाच्छादित आकाशांत सूर्यदर्शन कसें

घडणार? पूज्य श्री मूग गिळून स्तब्ध उभे राहिले. आवेग ओसरल्यावर पूज्य श्री हळुवार शब्दांत बोलूं लागले. आपल्याप्रमाणेंच ते माझेहि गुरु आहेत. तो श्लोक गुरुदेवांचा नसावा. भारत भागवत यांतील तो कदाचित असेल. त्यावर सद्गुरु म्हणाले तो त्यांचाच आहे. ब्रह्मनिष्ठाचीच भाषा ही! बिनतोड बिनचूक असावयाचीच. त्यांतले त्यांत अवधूतांचा पिंड मूळचाच विनोदी! अवधूत म्हणाले त्या चुका गुरुदेवांच्याच आहेत असें माझे मुळींच म्हणणें नाहीं. इतरांच्या असण्याची शक्यता आहे, श्लोक लिहवीत असतांना, गुरुदेवांनीं काढलेले उद्गार लिहितांना, लिहिणाऱ्याच्या कमजास्त अवधानतेमुळें किंवा त्याच्या विकृत लिखाणामुळें श्लोक सदोष रहाण्याचीच शक्यता अधिक असते. लिहिणाऱ्याच्या हातून घडलेले दोष गुरुदेवांचे खास नसायचे. कित्येक वेळां शुद्ध श्लोक ऐकला तरी लेखकाच्या बथ्थड स्मरणशक्तीचाहि परिणाम घडत असतो, हा अवधूतांचा सरळ युक्तिवाद सद्गुरु गांडा महाराजांना पटतांच त्यांनीं चुका दुरुस्त केल्या हें ठीक झालें असेंच उद्गार निघाले. प्रियतम व्यक्तीचा कमीपणा प्रेमी जीव ऐकूंच शकत नाहीं, हेंच खरें.

४

प्रियशिष्य श्री. बाबा कल्हे याजवर किती प्रेम होतें हें खालील घटना दर्शविते. आतां आपण जगाचे फार दिवसांचे सोबती नाहीं हे दत्तप्रभूंच्या साक्षात्कारानें समजलें. साक्षात्काराप्रमाणें तातडीनें गुंज येथें जावयास निघाले. तब्येत तोळा मासा होती तरी नीट स्मरण ठेवून मानवतला बाबा कल्हे यांना निरोप दिला. श्री. बाबा कल्हे यांजकडे पुडी घेतली. तेव्हां बरोबर पांचशें भक्तवृंद होता. श्री. कल्हे यांचें सारें कुटुंबच सद्गुरु गांडा महाराज यांच्या प्रेमाभक्तींत रंगलेले होते. श्री. बाबा कल्हे यांचे चिरंजीव श्री. राजाभाऊ आपल्या मानवतला पंचपदी करण्यांत गुंग होते. त्यांना तेथें कोणीतरी सांगितलें कीं, गुंज येथें गांडा महाराज

समाधिस्थ झाले अन् तूं येथें कसा? श्री. राजाबापूंचें मन विरहानें भारावलें गेलें. मिळेल त्या साधनानें डोक्यावर मणभर खडिसाखर घेऊन धांवपळ करीत गुंजेस आले. पहातात तों महाराज यांच्या वडिलांशीं गोष्टी करीत आहेत. सारी हकीकत सांगितली. नंतर राजाभाऊ सेवेला तेथेंच राहिले. गुरुवरील निरतिशय प्रेमाचें प्रतीक दुसरें काय?

## सद्गुरु गांडा महाराजांच्या गोड आठवणी

साधु, योगीजनांनाच नव्हे तर मुनि, महामुनि, तपस्वी यांना बेजार करणारी ती वासना तिचा कितीहि कडक बंदोबस्त केला तरी मुंबईच्या बिलाडीप्रमाणें कोठून? केव्हां! कोणांत कशी प्रगटेल हें कोणासच सांगतां यावयाचें नाहीं. तेरा कोटी रामनामाचा जप करून ब्रह्मसाक्षात्कारी बनलेले राष्ट्रसंत समर्थ रामदासस्वामी यांना खीर खावयाची वासना झाली. वासनेचा कायमचा बीमोड करण्यासाठीं ते आकंठ खीर तर प्यायले पण वांती झाली तरी खीर प्यावयासही ते चुकले नाहींत. त्यामुळें त्यांना खिरीची इतकी शिसारी बसली कीं, खीर शब्द कानीं येतांच त्यांच्या अंगावर शिसारीनें शहारे येत. तसेच सद्गुरु गांडा महाराजांच्या बाबतींतही झालें. सद्गुरु गांडा महाराज यांनीं गुंज येथील श्री. विनायक-बुवा ब्रह्मचारी यांना एकदां सांगितलें कीं, बेसनाचे लाडू व मेथीचे मुटकळे खावयाची वासना झाली आहे. बेटी पुन्हां यावयास नको. तिचा पुरा बींमोडच झाला पाहिजे. नाहींतर ती पुढील मार्गांत महान् घोटाळा करील. वासनेचे अंकुरच जाळले पाहिजेत. महाराजांनीं या दोन वस्तूंचें अगदीं मनसोक्त सेवन केलें तें इतकें कीं, या वस्तू दिसतांच त्यांना वांति होऊं लागली. तरी खाणें सुरूच ठेविलें. त्यामुळें या वस्तूंची त्यांना इतकी शिसारी बसली कीं, जन्मांत पुन्हां या वस्तूंची आठवण झाली नाहीं.

## ६
## संत, महात्म्यांची तेजस् रूपें

संत महात्मे समाधिस्थ झालेले असले तरी ते अमर असतात. आपल्या तेजस् रूपानें ते प्रगटत असतात. दत्तप्रभूंनीं दिपवाळींत एकाच वेळीं आठ शिष्यांच्या घरीं भिक्षा घेतली. या घटनेंतही वरील तत्त्वच आहे. सद्गुरु अक्कलकोट स्वामींना समाधिस्थ होऊन दोन तीन तपें झालेलीं होतीं तरी शिष्यवर चोळाप्पा यांच्या घरीं येऊन सद्गुरूंनीं आपलीं पाऊलें पाटावर उमटविलीं. ही अलीकडची गोष्ट आहे. श्रीकृष्ण भगवानांनीं ज्यांच्या समवेत रासलीला केली ते मुन्हेरचे ( जि. नाशिक ) महान् संत उद्धव महाराज यांना समाधिस्थ होऊन दोन तीन तपें झालीं तरी त्यांच्या त्या समाधींतून सिंहस्थांत आजही गंगा प्रगटत असते. नागपूर जिल्ह्यांत काटोल येथील राममंदिरांत महान् संत होऊन गेले त्यांना समाधिस्थ होऊन बराच काळ झाला. तरी त्यांच्या बंदिस्त समाधींतून ठराविक दिवशीं दिवा जळत असतांना आजही बघावयास सांपडतो. संत महात्मे कंठस्थ उदान वायूंतून तेजस् रूपानें प्रगटतात. महात्मे जेव्हां तेजस्रूपें घेतात तेव्हां मानवाप्रमाणें त्यांना पडछाया नसते. सद्गुरु गांडा महाराजांना समाधिस्थ होऊन छत्तीस वर्षांचा काळ लोटला तरी त्यांचें अस्तित्व गुंज येथें असतें हें दर्शविणाऱ्या कितीतरी घटना घडत आहेत, व पुढेंहि घडतीलच. एकानें सद्गुरु गांडा महाराजांना नमस्कार करून नवस केला कीं, देवा, मला मुलगा होऊं दे. तुझ्या चरणावर ठेवीन. व पांच रुपयांची शेरणी वाहीन. ईशकृपेनें मुलगा झाला. पण तो गृहस्थ नवस फेडावयास विसरला. इतकेंच नव्हे तर परत गुंज संस्थानांत आलाच नाहीं.

मुलगा मोठा झाला. तीन वर्षांचा झाला. एकाएकीं मुलाची दृष्टि गेली. पांच वर्षांचा होईपर्यंत आईबापांनीं मुलाच्या दृष्टीसाठीं शब्दशः

पाण्यासारखा पैसा खर्च केला. पण व्यर्थ. कांहींच फायदा झाला नाहीं, सारेच पूर्ण निराश झाले. कोणी सद्गुरु गांडा महाराजांचें गुंज स्थान जागृत स्थळ आहे तेथें जाऊन पहा, झाला तर फायदाच होईल असें त्यांना सांगतांच त्या गृहस्थाला आपण पुत्र प्राप्तीसाठीं केलेल्या नवसाची आठवण आली. केलेली चूक लक्षांत आली. ते सारे मुलासह गुंज येथें आले. अपराधाची क्षमा मागितली. देवापुढें नाक घासलें. पांच रुपयां-ऐवजी दहा रुपयांची शेरणी वाटली, यथाशक्ति अन्नदानहि केलें. आश्चर्य ! ईशकृपेनें त्या पांच वर्षांच्या मुलाला दिसूं लागलें. गुंज स्थान जागृत आहे अशी साऱ्यासाऱ्यांची खात्री खाली. योगानंद माऊलीची अजब लीला दुसरें काय ? अंधश्रद्धेचा प्रश्नच नाहीं. असें कितीतरी, कैकांना कैक अनुभव आलेले आहेत. येत आहेत व पुढें येतीलही.

७

सुकम गांवची गोष्ट. दत्तसंस्थान गुंज यांनीं चिंचेचें एक सुकलेलें झाड लिलावांत विकत घेतलें होतें. पण तीं लांकडें कार्य बाहुल्यामुळें गुंजेस आणलीं गेलीं नव्हतीं. एकानें त्या झाडापैकीं एक लाठीसारखा मोठा सोट काढून घरीं नेला. म्हणून त्याची बायको रागावली. दत्तसंस्थानाचें लांकूड घरीं कां आणलें म्हणून तिनें नवऱ्याला ठपका दिला. नवऱ्यानें ही गोष्ट मनावर तितकीशी घेतली नाहीं, पण रात्रीं स्वप्नांत एका योग्यानें फाडकन् गालांत लगावली. व योगी म्हणाला, लांकूड कां आणलेस ? दुसऱ्या दिवशीं गाल बराच सुजला. घाबरला. गुंजेस आला. नाक घासलें. शेरणी वाटली, गाल बरा झाला.

## समसमां संयोग कीं जाहला

दोन ब्रह्मनिष्ठांचा, दोन गुरुबंधूंचा सहवास परस्परांस किती सुखद व चिरस्मरणीय झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. सद्गुरु गांडा महाराजांची तब्येत बरीच बिघडलेली होती. जलोदरानें उठाव केलेला

होता. हातापायांना डोळ्यांत भरेल इतकी सूज आलेली होती हालचाल करावयास पंचाईत. म्हणून नारेश्वराहून पूज्य श्री रंगावधूत महाराज गुरु-बंधूंच्या भेटीसाठीं गुंज येथें आलेले होते. सद्गुरु गांडा महाराज केवळ अस्थिपंजर बनले होते ते मैसूर चित्र झांकावयास कीं काय ! सुजेनें सर्वांग व्यापलें होतें. एका तरटावर सद्गुरु पहुडलेले होते. शेंकडों शिष्य त्यांच्या सेवेला गुंज येथें आलेले होते. बिचारें आपापल्या परीं सेवा करीत होते. सेवा करतांनाहि डोकें चालवावयाचें असतें या गोष्टींचा त्यांना सोयीस्कर विसर पडलेला होता. डोकेंच नव्हतें तर तें काय चालणार? सद्गुरु गांडा महाराज तरटावर पहुडलेले दृश्य नारेश्वरचे ब्रह्मचारी पूज्य श्री रंगावधूत यांना बघवेना त्यांनीं साळीचा मऊ चारा आणला. पोत्यांत घालून शिवला त्याची गादी बनविली, शिवली. त्या नरम गादीवर सद्गुरु गांडा महाराज निजूं लागल्यामुळें जमीन त्यांना आतां रुतेना. डोळे भरून ब्रह्मचाऱ्याकडे कृपादृष्टीनें पाहिलें व हें काम ब्रह्मचाऱ्याचेंच असणार. इतरांना डोकेंच नाहीं. सांगकाम्यांना स्वतःचें डोकें नसतेंच. खरी सेवा तीच, जी स्वतःची बुद्धि चालवून गुरूच्या अपेक्षा न सांगतां पुरी करूं शकते. हें आत्मीयतेशिवाय साधत नसते.

२

आत्मीयता, कुशाग्रबुद्धि व अपेक्षित गरजा बिनचूक हेरणें या त्रयीवर सेवा आधारलेली असते. त्याशिवाय खरी सेवा होऊंच शकत नाहीं. प्रसन्नता ठेवण्यांतच सेवेचें खरें चातुर्य असतें. आजाऱ्याच्या शुश्रूषेवर आजाराचा चढउतार बराच अवलंबून असतो याची सामान्यांना कल्पना नसते. सद्गुरु गांडा महाराज, आजार बळावल्यामुळें अन्नपाणी घेईनात. पोटांत भूक मावत नव्हती. भक्तगणांकडून आलेल्या फळांचा ढीग कोपऱ्यांत पडलेला होता. सारे भक्तगण तो ढीग रोज बघत होते. श्रद्धाळू भक्त रोज नवीं नवीं फळें आस्थेनें, आदरानें आणीत होते.

पूज्य श्री रंगावधूत महाराजांनीं त्यांतील कांहीं फळें- ( मोसंबी ) घेतलीं, त्यांचा रस काढला. स्वच्छ फडक्यानें गाळिला व एका ग्लासांत भरून तो सद्‌गुरूंना द्या म्हणून स्थानिक भक्तांना अजीजीनें त्यांनीं सांगितलें. पण ते तिकडे लक्ष देईनात. मोठा मायेचा पुतळा दिसतोस? असा उलट ठपका दिला. आपल्या सेवेचा अग्रहक्क हा लुबाडतो आहे अशा तोऱ्यांत पूज्य श्रींना अप्रत्यक्ष हिणवीत. धार्मिक संस्थानांत नवीन आलेला, पण त्यांच्या सेवेंत लुडबुड करणारा नवा सेवेकरी त्यांना डोळ्यांतील खड्याप्रमाणें रुतत असतो हा नित्याचा अनुभव सर्व परिचित असतो. आपल्या गल्लींत नवीन आलेला कुत्रा गल्लींतील कुत्र्यांना खपत नसतो तर मानवाला तरी कसें खपणार? तो स्वभाव आहे. ईर्षामाऊलीचे ते चाळे आहेत. या नाहीं त्या इसमाकडून ब्रह्मचारी रंगावधूत महाराजांनीं तो रसानें भरलेला पेला सद्‌गुरु गांडा महाराजापर्यंत पोहोंचविला. समाधान वाटलें. भूकेवर विरजण पडलें. सद्‌गुरु स्मित हास्यानें म्हणाले, हे त्या ब्रह्मचाऱ्याचें काम असेल. इतरांचें डोकें चालणार नाहीं. फळांचा रस सद्‌गुरुच्या पोटांत जाऊं लागला.

३

सद्‌गुरु गांडा महाराजांच्या अंगावरील सूज फारच वाढली, इतकीं कीं थोडा वेळपर्यंत बसायचीहि पंचाईत पडूं लागली. जीवाचे फार हाल होत होते, तेव्हां पूज्य श्री रंगावधूत महाराज सद्‌गुरु गांडा महाराजांना म्हणाले, योगीराज! आपण सारे जाणत असून इतक्या हाल अपेष्टा कां सोसतां? शरिराच्या भोगावर इतके विसंबून कसे चालेल? पद्मासन घालून बसले कीं, बेटी इतकी सूज राहील कशाला? पांढरा, लाल, पुनर्नवा, गोखरू यांचा रस पोटांत भरपूर गेला तर त्या रसाच्या घोर माऱ्यापुढें बिचाऱ्या सूजेला पळावेंच लागेल. अशा रीतीनें देहाचे होणारे हाल वांचविणें ही आपल्या ताब्यांतील गोष्ट आहे. देहभोग आपापलें कार्य निस्तरतील. तो

आपला विषय नाहीं. सूज इतकी होती कीं बसणेंहि जमेना. संत्रयीनें सद्गुरु गांडा महाराज पद्मासन, बद्धपद्मासन घालून थोडावेळ बसूं लागले. पण रोगाचा जोर बेसुमार वाढलेला होता. सागराच्या भरतीचें पाणी कोण अडविणार ? अंतकाळचीच सूज होती ती !!!

४

पूज्य श्री रंगावधूत महाराजांनीं श्री गुरुमूर्ति चरित्राची छापील प्रत सद्गुरु गांडा महाराजांना दाखवितांच त्यांना अत्यानंद झाला. गुरुसेवेचें सार्थक झालें, असें वाटून सुखासमाधानाचा श्वास सोडला. आत्मतृप्त झाल्याचा आनंद चर्येवर चमकूं लागला. भडोच येथें कल्याणजींना या ग्रंथाचा सप्ताह ऐकविला हें ऐकतांच सद्गुरूंच्या आनंदास भरती आली. कल्याणजींची गोड मूर्ति सद्गुरूंच्या डोळ्यांपुढें दिसूं लागली. खरा अनन्यसेवक, भगिनी यमुनाबाईंनीं घेतलेल्या कष्टांना अन्यत्र तोड नाहीं, असे सहजोद्गार निघाले.

५

## तें अर्धमहोदय पर्व

मोठा भाग्याचा क्षण असतो तो. प्रदीर्घ कालानंतर तो येत असतो. पुण्यप्राप्तीची ती महान् पर्वणी असते. तें पवित्र गोदातीर सप्ततीर्थ गोदावरी मातेला भेटावयास येत असतात अशी भाविकांची श्रद्धा असते. अति श्रद्धाळू तो मराठवाडा. सद्गुरु गांडा महाराजांचेवर साऱ्यांचेंच नितांत प्रेम. सद्गुरु गांडा महाराजांची ती हसरी, गोजिरी, गोडमूर्ति आतां आपणास अंतरणार. मराठवाड्यांतील आपल्या आठदहा वर्षांच्या अल्पकाळांत मराठवाड्याचें अलोट प्रेम संपादिलें. ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. दत्तप्रभूंच्या लीलांचा तो आविष्कार होता. गुरुमाऊली हा गोड निनाद सर्वत्र दुमदुमत होता. माऊलीच्या सहवासांत आईचा विसर पडायचा. अशी गोड वागणूक सद्गुरु गांडा महाराजांची होती. या अमावास्येला

सद्गुरु गांडा महाराज आपणांस कायमचें अंतरणार अशी दाट अफवा सर्वत्र पसरलेली होती. याच अमावास्येला तो अर्ध महोदय पर्वकाळ होता. त्यामुळें चारी दिशांकडून जनसंमर्दांचे लोंढेच्या लोंढे गुंज क्षेत्रीं सारखे लोटत होतें. लोक किती आले याची गणतीच करवेना. येणाऱ्या भाविकांची रीघ थांबेना. भाविक आत्मे अन्नदान घडावें म्हणून पंक्तीवर पंक्ति उठवीत होते. सेवेकरी, वाढपी, पाणी भरणारे, दळणारे यांच्यांत जोम व नव-चैतन्य उफाळून उत्साह ओसंडत होता. सद्गुरु गांडा महाराज अंथरुणावर खिळलेले होते. तरी गुरुदेवावरील दुर्दम्य भक्ति त्यांच्या डोळ्यांत तरारत होती. गुरुदेवा ! या साऱ्या तुझ्या लीला आहेत असा आंतला आवाज निघत होता. अवधूतचिंतन श्रीगुरुदेव दत्त या गर्जनांनीं आकाश पाताळ एक झालें होतें. आनंद स्वैर संचार करीत होता.

* * *

# किरण सतरावा

## सद्गुरु गांडा महाराजांच्या परावाणींतून निघालेला तो आशीर्वाद

ब्रह्मनिष्ठ ब्रह्मचारी पूज्य श्री रंगावधूत महाराज सद्गुरु गांडा महाराज यांच्या सतत सान्निध्यांत असत. त्यांची अविरत सेवावृत्ति सद्गुरूंचें हृदय हंसवीत असे. या दोन गुरुबंधूंचा गाढ प्रेमा होता. या व्यक्ति दोन दिसत इतकेंच. गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति समाधिस्थ होऊन बराचसा काळ लोटलेला होता तरी प्रत्येकाच्या हृदयाकाशांत गुरुदेव कायमचे ठाण मांडून बसलेले होते. म्हणूनच गुरुदेवांच्या आज्ञेशिवाय एक पाऊलहि पुढें टाकावयास ते तयार नसत. एके दिवशीं सद्गुरु गांडा महाराज मोठ्या लहरींत होते. लाखों लोक वाळवंटांत प्रसाद घेत होते. सद्गुरु गांडा महाराजांनीं पूज्य श्री रंगावधूतांना जवळ बोलाविलें व बोलूं लागले. ब्रह्मचारी! बघितलंस ना! गुरुदेवाच्या वेळीं अशाच पंक्तीवर पंक्ति उठावयाच्या. आपण नेहमीं पहात होतों. ब्रह्मचारी! तूं मोठा भाग्यवान आहेस. आत्यंतिक त्यागी आहेस. महान् तपस्वी आहेस. तुझ्या भाग्यांत असल्या लाखों लोकांच्या कैक पंक्ति बघण्याचा योग आहे. माझा आशीर्वाद आहे. आमच्यांत तूंच फक्त अशा कैक पंक्ति पाहूं शकशील. महान् भाग्यवान व्यक्ति आहेस तूं. बोलण्याचा शीण सद्गुरूंना जाणवला. थकवा आला. वाचा थांबली. ब्रह्मचाऱ्यांना कृपादृष्टीनें न्याहाळिलें तेव्हां चर्येवर हास्य चमकत होतें. दोन ब्रह्मनिष्ठांचें सुंदर मीलन होतें तें.

## गुरुतत्त्वाचा आदेश

अन्नदानाची लयलूट चाललेली होती. सद्गुरु अंतरणार ही अंतर्वेदना

प्रत्येकास जाळीत होती. विरही मन विकल होत होतें. दर्शनातूर लोकांची ये जा सारखी चालूच होती. पूज्य श्री रंगावधूतांना दत्तप्रभूंनीं आदेश दिला कीं, तूं येथें कां थांबवतोस मुंबईंत तुझा भाऊ अत्यवस्थ आहे. तेथें प्रथम जा. आदेशानुसार सद्गुरु गांडा महाराजांचा सहवास सोडून मुंबईस जावयास निघाले. अंतसमयीं सद्गुरु गांडा महाराजांची भेट अंतरली.

## कालाय तस्मै नमः

काळ कोणाची कदर करीत नसतो. मूल जन्माला येतांच तो त्याच्या मागावर असतो. काळाच्या उदरांत संत, महात्मे गडप झाले. राजे, महाराजे, सिंहासनें यांचीहि तीच गति झाली. जे आहेत तेहि त्याच्या उदरांत गडप होणार व जे यापुढें येतील त्यांच्याहि नशिबीं तेंच येणार. काळमात्र अमरपट्टा घेऊन आलासें वाटतें. निरंतर घडामोडी हा काळाचा उद्योगच. बेट्याला थकवा येत नाहीं कीं, त्याला विश्रांतीची जरुरी वाटत नाहीं. हें असें तो कां करतो ? जुन्याला नेऊन नव्याला नटविणें हें त्याचें कार्य अव्याहत व अबाधितच रहाणार. सारीं कार्यें करून–प्लेगानें मेला, कॅन्सरनें गेला, क्षयानें नेलें अशी निमित्तें पुढें करून नामानिराळा राहण्याची अजब कला काळाचीच, कालाय तस्मै नमः ।

काल माहात्म्य मोठें अघटित आहे. कोठें ? केव्हां ? काय करील ? याचा नियमच नाहीं. एका काळचें पांच गांवांचें स्मशान आज प्रति गाणगापूर बनलें आहे. तेंच दत्तभक्तिकेंद्र पूज्य श्री ब्रह्मचारी रंगावधूत यांचें नारेश्वर धाम त्यांचे गुरुबंधु गांडा महाराज यांचेंहि तेंच. कोठें गुजराथ ? कोठें मराठवाडा ? स्वप्नांतहि कल्पना नव्हती कीं, गुजराथी पोर गुंज येथील उजाड, ओसाड, जागेंतील नागफणींचीं बनेंच्या बनें तोडून त्या जागेवर नरसोबाच्या वाडीसारखें मोठें दत्तभक्तिकेंद्र बनवून सारा मराठवाडा दत्तभक्तींत गुंगवील. संन्यासाश्रम घेतलेला. ना संग्रहवृत्ति, ना लोभ, ना

आशा, ना जातीचे पातीचे, ना आपली गुजराथी भाषा त्या मराठवाड्यांत इतक्या अफाट भांडवलावर आपल्या अचाट गुरुभक्तीनें व तपानें या शिवोपासकानें खरंच प्रति कैलास बनविलें आहे. अपरिचित भाग, अपरिचित भाषा यांची पर्वा न करतां ध्येयनिष्ठानें सारा सारा मराठवाडा आपला केला हो. व तोहि सात वर्षांच्या कालावधींत ! हें आश्चर्य नव्हे काय ? पूज्य श्री रंगावधूत दक्षिणी असून कार्य सारा गुजराथ दत्तभक्तींत लावण्याचें तसेंच श्री. गांडा महाराज गुजराथी असून कार्य साऱ्या मराठवाड्यांत दत्तधून जागवावयाचें या साऱ्या दत्तप्रभूच्याच लीला. कोणाच्या तरी माध्यमांतून शांति-निधान दत्त अज्ञानतिमिर घालवावयाचें कार्य अव्याहतपणें चालूच ठेवीत असतात.

बिचारा एकटा काळ काय करणार ? काळ व वेळ यांची सांगड घातली गेली तरच घटना घडत असतात. काळ व वेळ सर्वस्वीं श्रीदत्त भगवानांच्या तंत्रानें चालणारीं असतात. इतकी जनता आकार्षिली जातें, भावभक्तीनें आपलीं मस्तकें झुकविते, संतांची कृपा मिळावी म्हणून हपापलेली असते का ? त्या माध्यमामुळें ? बिचारी बॅटरी काय करणार ? बॅटरीच्या मसाल्याच्या श्रेष्ठतेवर प्रकाशाची भव्यता व दिव्यता अवलंबित असते. श्रीदत्तप्रभूच्या दिव्यतेचा व भव्यतेचा तो परिणाम आहे, आविष्कार आहे.

सद्गुरु गांडामहाराज तेच योगानंद सरस्वति यांचे देहावसान होऊन आज छत्तीस वर्षें झालीं. तें उंबराचें फूल आठ दहा वर्षें चमकलें. तें दिव्यफूल लोपून आज तीन तपें झालीं तरी ! तरी काय ? वाचक ! एकदां त्या गोदातीरीं गुंज क्षेत्रांत फाल्गुन वद्य १०-१२ ला जाऊन पहा. महात्मे आपल्यांतून गेले असले तरी त्यांचेवरील अढळ निष्ठेची प्रचीति प्रगटविणारें तें भक्तहृदय लाखोंनीं गुंज येथें एकत्रित झालेले असें भव्य दृश्य बघतांच बघणाऱ्याचें हृदय विशाल होऊन, गेलेली व्यक्ति किती अजब

तेजाची होती याची कल्पना येते. महागाई इतकी! पैशाची टंचाई अशी! हल्लींच्या काळांत सुखानें जगणें, मुष्किल झालेले अशी भीषणता काळ दाखवित असतांही भक्त हृदयांनीं मूठमूठ धान्याची सद्गुरुंना वाहिलेली श्रद्धांजली एकत्र जमून तिच्यांतूनच गोदेच्या वाळवंटांत एकाच वेळीं मराठवाड्यांतील लाखों भक्त हृदयें महात्म्याचा प्रसाद घ्यावयास बसतात तें दृश्य बघतांच परमात्म्याच्या विराटरूपाचें दर्शन घडते त्यामुळें कोणाचेंही हृदय हेलावतें.

## कालाय तस्मै नमः

एखाद्या व्यक्तीचे तत्त्वाचे, वेळेचे, स्थळाचे, उन्नति अवनतीचें, भाग्याचे, दैवाचे फांसे उलट सुलट फिरविण्याचें कार्यहि त्या महाशय काळाचेंच. सारेच काळाधीन असतात. कोणाचा उत्कर्ष किती काळ ठेवावयाचा हेंहि कार्य काळच ठरविणार! सद्गुरु केडगांवचे नारायण महाराज साकोरीचे उपासनी बाबा, अमळनेरचे सखाराम महाराज, मुल्हेरचें उद्धव महाराज, या व्यक्ति आपल्या भाग्यरवीनें तळपत असतां त्यांच्या स्थानांत श्रद्धेनें भाविकांची ही तोबा गर्दी उडत असे. व्यक्ति दृष्टिआड होतांच भाविकांची रीघही ओसरली. पण शिर्डीचे सद्गुरु साईबाबा यांच्या गमनानंतर शिर्डीस्थानाला प्रति वैकुंठाचें स्वरूप आलें होतें. पण अमृत-तुल्य त्या उंबरांतल्या किड्यांनींच थैमान घातल्यामुळें अमृततुल्य त्या औदुंबर फळांतील मधुरस ओसरला. कांहीं संत ओटो दिलबहार या सेंटसारखे असतात. त्या सेंटचा स्वतःपेक्षां आजूबाजूच्या सर्व वातावरणांतच त्याचा वास अधिक दरवळत असतो. दत्तसंस्थान गुंज येथील गोष्टही अशीच आहे. सद्गुरु गांडा महाराज यांनीं समाधिस्थ होण्यापूर्वी संस्थान कसें चालवावयाचें याची आंखणी अति शिस्तबद्ध करून ठेविली. सद्गुरु गांडा महाराज गुरुदेव यांच्या तालमींत तयार झाल्यामुळें शिस्तीचे भोक्ते स्वभावानें कडक, व व्यवहारांत कांटेतोल असें त्यांचें एका शब्दांत वर्णन

करतां येईल. या अवाढव्य संस्थेचे संचालक त्यागी प्रातः स्मरणीय सद्गुरूंचे बंधुराज श्री. रघुजीकाका सोनगडकर असून त्यांच्या अनुमतीनें साऱ्या गोष्टी होत असतात. कशाचीहि म्हणजे मानाचीहि अपेक्षा न करतां केवळ सेवावृत्तीनें उत्सवाच्या वेळेला पदरचे दोन-तीनशें रुपये खर्च करण्यांतच त्यांना व त्यांच्या दोन सुपुत्रांना जीवनानंद मिळत असतो. ट्रस्टी असले तरी ते सारे सद्गुरूंचे शिष्य असल्यामुळें ट्रस्टीपेक्षां जिव्हाळाच त्यांना अधिक सेवारत करीत असतो. संस्थानचे सर्वाधिकारी, चुकलों, महान् सेवेकरी सद्गुरु चिंतामणी महाराज सारीं सूत्रें बिनचूक हलवीत असतात. आशुतोष शंकराची पूजा अभिषेक, सेवा केल्यानंतर करुणात्रिपदीवर अधिक भर द्यावयाचा. सर्वस्वीं सर्वस्व असलेल्या सद्गुरु गांडा महाराजांच्या आदेशाप्रमाणें प्रत्येक पाऊल टाकावयाचें हा त्यांचा बाणा असून त्यांचा प्रत्येक क्षण मोलाचा असतो.

## सेलू येथील गोष्ट, सद्गुरु चिंतामणी महाराज

सद्गुरु गांडा महाराज समाधिस्थ होण्यापूर्वी एकच वर्ष बाळ चिंतामणी, महाराजांच्या संपर्कात आले. महाराज,' मी पास होईन का? सद्गुरूंनीं झट् उत्तर दिलें नापास हिरमुसले न होतां मला वकील व्हावयाचे आहे असे सहजोद्गार त्यांचें निघाले. दोनच वाक्यांत बाळाच्या गतपुण्य संचयानें उठाव केला. तें तेजस्वी, गुटगुटीत श्यामवर्णाचें व उत्साही बालक पहातांच ही व्यक्ति कृपापात्र आहे अशी श्री सद्गुरु गांडा महाराज यांची खात्री झाली. आतां या देहाचा भरंवसा नाहीं. गुरुदेवांची परंपरा चालविण्यास लागणारे अवसान या चिमुकल्या बाळाच्या नेत्रांत तळपत आहे असें त्यांच्या मनानें ठरविलें. म्हणूनच कोणाकडून तरी विभूतीची छोटीशी पिशवी मागविली. बाळाच्या हातांत विभूति देतां देतां हंसतमुखानें ते म्हणाले, बाळ तूं मोठा वकील होशील. पैशांच्या झगड्यासाठीं कज्जे-दलालांच्या कोर्टांत नव्हे, तर देवाच्या दरबारांत तुझी वकिली चालेल.

असें म्हणून ती योगतपाची विभूति त्या गोंडस बालकाच्या हातावर टाकिली व बजाविलें नीट जपून ठेव. बालक तरतरीत असल्यामुळें ती विभूति लगेच तोंडांत टाकून म्हणाले, महाराज, आपण दिलेली विभूति अशा ठिकाणीं ठेविली कीं तिला आतां कोणी हात लावणार नाहीं. मी ती खाल्ली, आतां कोण घेणार ? या उत्तरानें सद्गुरु प्रसन्न झाले. चाक्षुषी दीक्षेनें पाहिलें. चाक्षुषी दीक्षा म्हणजे कूर्मदृष्टि असते ती. कांसवीण आपल्या पिलांकडे बघतें मात्र. पण तिकडे पिलांना दुग्धपान केल्या इतकी शांति मिळून तीं पिलें आपल्या मस्तींत मस्त बनतात. कोळशावर विस्तवाची ठिणगी पडतांच कोळसा धगधगूं लागतो. योग्यांची कृपा होतांच साधकाचें आत्मतेज जागृत होऊन एक सुप्त अलौकिक तेज त्यांत संचारत असते हें पूर्वीं आलेंच आहे. त्याला स्वतःच्या तपतेजाची जोड मिळतांच अशा व्यक्ति परमात्मतत्त्वाच्या अनुसार कांहीं विशिष्ट कार्यें अलौकिकतेच्या पातळींवर करावयास समर्थ ठरत असतात. चिमुटभर कां होईना साखर टाकून कधीं पदार्थ कडू झाला आहे काय ? योग्यांची कृपा योग्यांचे बोल, योग्यांचा प्रसाद, योग्य तें अनुकूल वातावरण मिळतांच आपला प्रभाव दाखविणारच. सद्गुरु गांडा महाराज लवकरच समाधिस्थ झाले. त्यामुळें बाळ चिंतामणी देहानें महाराजांना परत पाहूं शकले नाहींत. पण आत्मीयतेनें सद्गुरु त्यांचें जवळ असतात. चिठ्या टाकून सद्गुरु त्यांतून जो आदेश देतील तो ते पाळीत असतात.

## सद्‌गुरु चिंतामणी महाराज बनले

सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज समाधिस्थ झाल्यावर महाराजांच्या प्रवासांत सहवासांत निरंतर असणारे पुजारी श्री. बापूदेव दडके महान् पुजारी म्हणून दत्तसंस्थानाचा कारभार त्यांजकडेस सोपविण्यांत आला. ते महाराज बनले. ट्रस्टीच्या सल्ल्यानुसार ते संस्थान चालवीत पण आठ दहा वर्षांच्या काळांतच त्या निष्ठुर काळानें त्यांना आमच्यांतून ओढून

नेंलें. संस्थानांत त्या काळांत कांहीं इमारतींचीं कामें चालत. पोटापुरतें शिक्षण झाल्यावर श्री. चिंतामणी इकडेतिकडे दुपारची वेळ धकवावयास कांहीं उद्योगधंदे करीत पण त्यांचे तिकडे लक्षच लागेना. परत गुंजेंतच आश्रमाच्या सेवेला येत. संस्थानाच्या सेवेशिवाय त्यांना इतरत्र चैनच पडत नसे. सद्गुरु योगानंद सरस्वति महाराज यांच्या त्या चिमूटभर विभूतीचा तर हा परिणाम नसेल? शेंकडों गाई एकत्र बांधलेल्या असल्या तरी वासरूं आपल्याच आईचें स्तनपान करणार? मातेशिवाय अन्य गाईकडे जातच नसतें. मजूर म्हणून डोक्यावर विटा वाहिल्या. मुकदम म्हणून गाजले. पोटासाठीं म्हणून ते राबत नसत. संस्थानाकडील मनाची ओढच तेथेंच कष्टतर कामें करावयास भाग पाडी. त्यांचे खाण्या-पिण्यांत लक्ष नव्हतें. आजही नाहीं. ते पंक्तींत जेवावयास बसण्याचें टाळीत. एका कोपऱ्यांत बसून दोन घांस खाण्यांतच त्यांना आनंद वाटायचा. मुकदमाचे कामाबद्दल त्यांना आठ रुपये पगार व दुपारचे जेवण ठरविलें गेलें होतें. पगार घेतला नाहीं. घेईन एकदम आतां नको. यावरून ते मजुरी, कष्ट पैशासाठीं करीत नसत. त्यांना पैशांचा हव्यासही नव्हता. अशी त्यांची वृत्ति होती.

## एखाद्याचें नशीब

देहाकडे न पाहतां दत्तसंस्थानांत श्री. चिंतामणी यांनीं केलेलें कष्ट कोणाच्याहि डोळ्यांत भरण्यासारखे होते, व अविस्मरणीय आहेत. निरपेक्षपणें केलेली सेवा कधींच फुकट जात नसते. ती जगदीशाच्या बँकेंत जमा होत असते. कै. बापूदेव दडके यांच्या निधनानंतर कोण? असा प्रश्न निघाला तेव्हां श्री. श्रीरामशेट व श्री. रघुजीकाका यांच्या शब्दानें ट्रस्टींनीं श्री चिंतामणी यांच्या ताब्यांत दत्तसंस्थानाचा कारभार सोपविला असें म्हणण्यापेक्षां निरपेक्ष सेवेनें ती माळ त्यांच्या गळयांत पडली असें म्हणणेंच सत्याला धरून होणार आहे.



श्री. सद्गुरु चिंतामणि महाराज,
संस्थान मुंज

## सद्गुरु चिंतामणी महाराज यांची डोळ्यांत भरणारी (कामगिरी) संस्थानची सेवा

गेल्या दोन तपापासून सद्गुरु चिंतामणी महाराज यांच्या ताब्यांत दत्त-संस्थान येथील सारीं सूत्रें आहेत. नित्य नैमित्तिक कर्मे नित्य चालूंच असतात. झोपेचें व त्यांचें वांकडें असल्यामुळें ते आपलें आन्हिक (शिवार्चन) रात्रीं दोन तीन वाजेपर्यंत करीत असतात. अनुसंधान व करुणात्रिपदी यावर त्यांचा मोठा भर असला तरी या वीस बावीस वर्षांत त्यांनीं संस्थानाचा व्याप बराच वाढविलेला आहे. सद्गुरु गांडा महाराज असतांना संस्थानाला एक नंबर (शेत) धर्मादाय मिळविले होते. श्री. श्रीरामशेटजींना सद्गुरु चिंतामणी यांनीं आग्रहानें व आत्मविश्वासानें सांगितलें कीं काका, हा शेतीचा एक नंबर विकून टाका. तो विकला नाहीं तर शेवटपर्यंत हा एकच नंबर राहील. विकला तर त्याऐवजीं मी संस्थानाला शेतीचे दहा नंबर नंतर आणून देईन. ते दहा नंबर मिळवून देईपर्यंत मी अन्नपाणी घेणार नाहीं. सद्गुरु चिंतामणी महाराजांचें असें निग्रहाचें निश्चयाचें भाषण ऐकून श्रीरामशेटजींनीं असलेल्या नंबराची विक्री केली. व सद्गुरु चिंतामणी यांच्या तपानें प्रयत्नानें, जनतेवरील प्रेमानें आज गुंज संस्थानाची **पांचशें एकर जमीन** आहे. एखाद्या धार्मिक संस्थानास इतकी जमीन अवघ्या पंधरा वीस वर्षांत मिळविण्यांत सद्गुरुयोगानंद महाराजांची दिव्यशक्ति त्यांच्या मागें आहे यांत शंकाच नाहीं. सद्गुरु चिंतामणी महाराजांची ही कर्तबगारी कांहीं लहानसहान नाहीं.

## गोदावरी मातेचा भव्य घाट

सद्गुरु योगानंद सरस्वति यांच्या प्रेरणेनुसार पाऊल टाकावयाचे, त्यांची आज्ञा वेदप्रमाण, माझें हें देहयंत्र चालविणारी, गुरुमाऊली गांडा महाराजच कुशल कारागीर आहेत. मी स्वतंत्रपणे कांहींच करूं शकत नाहीं हेंच सूत्र, हेंच ब्रीदवाक्य, त्यांच्या साऱ्या जीवनांत दिसून येईल.

## गोदावरीचा भव्य घाट

तो गोदावरी मातेचा घाट. किती सुंदर दृश्य आहे तें. जणूं काय तो गोदामातेचा सुंदर अलंकारच शोभतो आहे. घाटाला सदतीस पायऱ्या असून घाटाची लांबी एकशें अठ्ठावीस फूट आहे. रुंदी दोनशेंपस्तीस फूट आहे. हा घाट बांधावयास शेंकडों मजूर पांच सहा वर्षें राबत होते. एका टप्प्याला सरासरी अकराशें रुपये खर्च आला. शके १८६५ च्या सुमारास काम झालें. सेलूचे श्रीमंत गोकुळशेट यांचे या कामीं चांगलेंच लक्ष होतें.

घाट प्रत्यक्ष पाहिला म्हणजे त्याच्या भव्यतेची कल्पना येते. त्या काळीं हा भव्य घाट सत्तर हजार रुपयांत बांधला गेला. भव्य घाटाला अफाट खर्च लागणारच ना! सरकारची मदत, भाविकांनीं दिलेली मूठभर मदत, ना जवळ पैसा! हा घाट कां बांधला? व इतके पैसे कोठून कसे आले? हे प्रश्न नजरेसमोर येतातच. घाट बांधतांना सरकारी परवानगी नव्हती. दत्ताच्या प्रेरणेनें बांधकाम एकदम सुरू केलें गेलें. या साऱ्या गोष्टी अगदीं निर्विघ्नपणें पार पडल्या.

## दत्ततत्त्व

परमतत्त्वांशीं निगडित असणारें दत्ततत्व ही एक परमशक्ति आहे. ती प्रेरणा देते त्याच वेळीं तें कार्य पार पाडण्यास शक्ति ही ज्याला प्रेरणा दिली त्याजला दत्ततत्वाकडून दिली जाते. त्यामुळें दत्ततत्त्वाशीं परमनिष्ठ असणाऱ्याला कार्य पार पडणारच असा दांडगा आत्मविश्वास असतो. ना फिकीर. ना काळजी. परमतत्त्व लाखों भाविकांना प्रेरणा देऊन आपल्या अनंत हातानें सिद्धांचें संकल्प पुरे करून घेत असतें. पराकोटीची साधन, शुचिता आत्मरंगी रंगलेलें मन, अचळ अढळ अशी गुरुनिष्ठा असणाऱ्यांना परमतत्त्वाचे आदेश येत असतात. गोदावरीला घाट बांध ही गुरुमाऊलीची आज्ञा शिरसावंद्य मानून सद्‌गुरु चिंतामणि महाराजांनीं सरकारी अनुज्ञा न घेतां कामास सुरवात केली. खिसा खालीं आहे ही जाणीव असतांनाही,

कार्य पार पाडण्याची जबाबदारी आज्ञा देणाऱ्यावर, आपण फक्त निमित्तमात्र अशी दांडगी श्रद्धा असल्यामुळेंच त्यांनीं कामास सुरवात केली. जिल्ह्याचे कलेक्टर मुसलमान होते. त्या भागांत आल्यावर घाटाचें काम चालू होतें, तेथें आले. परवानगी घेतली कां ? हो. सरकारदरबारची नव्हे, तर दत्ताच्या फोटोकडे हात दाखवून या सरकारच्या सरकारची.अधिकारी खिलाडू वृत्तीचे होते हें त्यांना पटलें. सरकारच्या पैशांची मदत न घेतां लोकांच्या कल्याणासाठीं काम होतें आहे काय वाईट, त्यांनीं अनुमति व संमति दर्शविली इतकेंच नव्हे तर कार्य उत्कृष्ट व्हावें म्हणून मी मोठा इंजिनिअर पाठवितों. तो योग्य त्या सूचना देऊन तुमच्या सत्कार्यांत साहाय्यकारीच होईल. इतके पैसे कोठून आणणार ? खर्च कां थोडा होणार आहे ? या कलेक्टरांच्या प्रश्नावर सद्गुरु चिंतामणि महाराजांनीं आमचें मोठें सरकार देवाधिदेव कोणालाहि प्रेरणा देऊन या सहकार्यास सढळ हातानें मदत करावयाची बुद्धि देतात. त्यामुळें आम्हांला कोणाकडे याचना करावयाची पाळी येतच नाहीं. त्याचें काम तो करून घेतो आम्ही फक्त मुकादम. या बिनतोड उत्तरानें कलेक्टर साहेब बेहद्द खूष झाले–दत्तानें त्यांनाहि प्रेरणा दिली व त्यांचेकडून सहजोद्गार काढावयास लावले. तुमच्या या सत्कार्यास मी खाजगी दोन वाधिण सिमेंट त्वरित पाठवितो, तसें त्यांनीं पाठविलेंहि. बुद्धि फिरवून सत्कार्यांत गुंतविण्याचें कार्य दत्त तत्त्व करीत असते. व अनंतहातानें साहाय्यभूत होऊन योग्यांची ऊर्मि पार पाडावयाची जबाबदारी आपल्या शिरावर घेत असतें. दत्तप्रभूची माया, दत्तप्रभूची लीला, वर्णावी तितकी थोडीच आहे. अशा प्रकारें आपल्या दोन तपांच्या भूमिकेंत सद्गुरु चिंतामणि महाराज यांनीं गोदावरीचा घाट बांधवून सामान्यांना आश्चर्याचा धक्का दिला.

## कमलजा घाट कमलजा डोह–घाट

सद्गुरु योगानंद सरस्वति स्वामि यांना ज्या खोल अशा कमलजा डोहांत

जल समाधि दिली आहे तेथें ध्वजा फडकत आहेच. सद्‌गुरु गांडा महाराजांचें तें अमर विश्रांति स्थान आहे. दरसाल सप्ताहाचे वेळीं तेथें दत्तनाम संकीर्तनांत, भजनीमंडळीसह पालखी जात असते. सात आठ वर्षांपूर्वी त्या कमलजा डोहावर घाट बांधला गेला.

कमलजा घाट–सुमारें दीडशें फूट लांब व एकेचाळीस फूट रुंद असा घाट बांधला गेला. तेथेंहि सुमारें सात आठ हजार रुपये खर्च केला गेला. स्नानसंध्या करण्यास तो घाट उत्तमच आहे.

दर गुरुवारीं गुंज येथें श्रीदत्त मंदिराचें आवारांत पालखी फिरत असते तो सुखसोहळा पहाण्यासारखा आहे. ती पालखी पाहून क्षणभर गाणगापूरची आठवण आल्यावांचून रहात नाहीं. भूतपिशाचें जातात असा अनुभव येतो. गुंज येथें सप्ताहाच्या वेळेला यात्रा भरत असते तेव्हां तर सारा मराठवाडा उलटतो तेव्हां साऱ्या मराठवाड्याचें दर्शन साहाजिकच घडतें. भंडारा–त्याच वेळीं भंडारा होत असतो सारा खर्च भक्तवृंद करतो सारे लोक प्रसाद घ्यावयास मातागोदावरीच्या वाळवंटांत बसतात. एकाच वेळीं लाखों लोक प्रसाद घेतात, त्यांना वाटप करणारे दोनशें तीनशें स्वयंसेवक हंसत खेळत मोठ्या हुरूपानें हुषारीनें झटपट वाढतात तेव्हां त्यांचे चर्येवरील हास्य, ती तरतरी, ती सेवावृत्ति हा सारा देखावा मोठा हृदयंगम असतो व गोदातीरी भगवंताचें विराट स्वरूप दर्शन घडतें.

## चांदजचे शंकरराव कुलकर्णी

सद्‌गुरु योगानंद सरस्वति महाराज यांनीं चांदजच्या शंकरराव कुलकर्णी यांना गुरुउपदेश दिलेला होता. एकदोन वेळां सद्‌गुरुंचा त्यांचेकडेस बरेच दिवस मुक्काम होता. ते परमभक्त होते. चांदजच्या कपरा नदींत मेलेले मासे जिवंत केले गेले होते. साऱ्या कुटुंबियांची सद्‌गुरुंवर अढळ श्रद्धा होती. हें सारें भक्त कुटुंब शके १८५६ त गुंज येथें गेले.

सद्गुरु योगानंदांना पुडी केली होती. पण पुढील कांहीं महिन्यांनंतर सद्गुरुंनीं इहलोकची यात्रा संपविली.

प्रणतवत्सल गुरुमाऊली सदेह आतां नसली तरी भक्तांच्या पाठीशीं सदैव असते. महान् संकटांत शंकरराव सांपडले. साऱ्या पठाणांचा त्याच्यावर डोळा होता. त्या काळीं रोहिले लोकांची सावकारी धिंगाणा घालीत होती. एक रुपयाला रोज एक आणा व्याज असा त्या सावकारीचा खाक्या होता. दहा रुपये मुद्दलावर, मुद्दल कायम ठेवून दरमहा सरासरी वीस रुपये व्याज चाटणारी, रक्तशोधक ती जळू होती. पठाणाशीं कांहीं बिघडलें. श्री. शंकरराव यांच्या रागानें दहावीस रोहिले त्यांनीं मातींत कायमचे लोळविले होते. रोहिले श्री. शंकररावावर डंख धरून होतें. शंकरराव हातीं सांपडेना. गाणगापुरास दत्तसेवेला लागले. गुंज दत्तांनीं संस्थानांतच सेवा करावी असें स्वप्नांत सांगितलें. परत गाणगापुरास गेले. परत तेंच स्वप्न पडलें. गुंजेस राहूं लागले. सारें अरिष्ट टळलें. सेवेनें कर्मभोग पुरा झाला. आज चांदेजचे शंकरराव कुलकर्णी भरलेल्या भरलेल्या कुटुंबांत भाग्यानें नातवा—पंतवंडांसह आपल्या घरीं ईशसेवेंत कालक्रमणा करीत असतात.

* * *

# किरण अठरावा

## योगी तपस्व्यांची ऊर्मि

योगी, महात्म्यांची ऊर्मि म्हणजे परमतत्त्वाच्या मंगल वातावरणांत पसरलेल्या लाटा होत. त्या लाटा भाविक, सात्त्विक हृदयावर आदळतांच अनंत हात, अनंत डोकीं, प्रेरणेनुसार आपोआप कामास लागूं लागतात. व योग्यांच्या मनांतील ऊर्मीच्या अपेक्षेपेक्षां अनपेक्षितपणें कितीतरी सुंदर काम वठवितात असें आजपर्यंत अनंत सिद्धांना अनुभवास आलेलें आहे. श्रीमत् परिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वति योगीराज यांच्या निर्याण कालापूर्वीं गरुडेश्वरीं दत्तमंदिर व्हावें अशी मनांत ऊर्मि झाली. दत्ता! हा देह आतां कांहींहि काम करावयास असमर्थ आहे माझ्या ऊर्मींची काळजी तुला. आश्चर्य! रेवातीरीं गरुडेश्वरीं तें दत्ताचें मंदिर आपल्या ऐश्वर्यानें डुलत आहे. प्रतिगाणगापूर बनलें आहे. गुजराथचें तें महान् दत्त, भक्ति केंद्र बनलें आहे. गुरुभक्तपरायण इंदूरच्या महाराणीसाहेबांनीं मंदिरालगत रेवामातेकडे जाण्यासाठीं सुंदर पण भव्य घाट बांधला आहे. आपल्या गुरुदेवाचा पांढऱ्या पाषाणाचा नयन मनोहर असा सुंदर पुतळा नारेश्वरचे संत पूज्य श्री रंगावधूत महाराज यांनीं अलिकडे गरुडेश्वरीं बसविला आहे.

सद्गुरु गांडा महाराजांनीं मानवत येथें दत्तमूर्ति स्थापना केली व मानवत हें दत्तभक्ति केंद्र त्यांच्या हयातींत बनविलें होतें. आतां आपला शेवटचा क्षण जवळ आलेला आहे. गुंज येथें दत्तसंस्थान व्हावयास हवें. त्यांची ऊर्मी भक्तगणांच्या कानीं जातांच भव्य व टोलेजंग दत्तमंदिर बांधलें गेलें. भडोचचे श्री. कल्याणजी, सद्गुरु गांडा महाराजांच्या वडील बहिणीचे यजमान, शब्दशः ज्या दांपत्यानें सद्गुरु गांडा महाराजांच्या

सेवेंत आपलें जीवन व्यतीत केलें. त्यांच्या चिरंजीवांनीं आकर्षक, फारच सुंदर अशी दत्तमूर्ति त्या मंदिरांत बसवायास पाठविली. सद्गुरु गांडा महाराज यांनाच आपलें सर्वस्व मानणारे सद्गुरु चिंतामणि महाराज यांनीं त्या दत्तमंदिरालगतच गोदावरीमातेला भव्य व विशाल घाट बांधला. गुरुदेव व सद्गुरु गांडा महाराज यांच्या ऊर्मींतील साम्य भक्तगणांनीं प्रत्यक्षांत आणिलें.

## परमतत्त्वाची ऊर्मि [ गुप्त आदेश ]

दत्तसंस्थान गुंज येथील दत्तमंदिराचें वर्णन वाचण्यापेक्षां दत्तमूर्तीच्या स्थापनेपूर्वीं तेथें अजब व चमत्कारपूर्ण घटना घडली ती बरीच चित्तवेधक आहे. तींत नियतीचा साक्षात्कार आहे. परमतत्त्वाचा सुप्त आदेश आहे. गुंज येथील दत्तमंदिराचें काम जोरांत चालू होतें. बरेचसे मजूर कामावर होते. आजचे सद्गुरु चिंतामणि महाराज मजुरांवर आत्यंतिक आस्थेनें डोळ्यांत तेल घालून देखरेखीचें मुकदमाचें काम करीत होते श्री श्रीराम-शेट तोतला यांचें मार्गदर्शन असावयाचें. श्री चिंतामणि महाराज मजुरांना पैसे दर बाजारास चुकवीत. कोठून ? कसें ? हें त्या वेळीं प्रश्नचिन्ह होतें ? आजही तें कोडें उलगडलेलें नाहीं. गुरुतत्त्वावरील अचळ, अढळ श्रद्धेचा तो आविष्कार आहे. आत्मश्रद्धा इतकी दांडगी बनते कीं, योगीवर्यांनीं सोपविलेली कामागिरी त्यांचे ते पार पाडून घेणारच. गतपुण्यसंचनानें त्यांनीं मला निमित्तमात्र केलें आहे असा त्यांच्या मनाचा पक्का निर्धार असतोच असतो.

## परभणीचे शेटजी श्रीराम तोतला

श्रीरामशेट यांचें विस्मरण गुंज संस्थानास होणें कठीण आहे. ते संस्थानाच्या सेवेंत इतके एकरूप झाले होते कीं, त्यांची सेवा कोणाच्याहि डोळ्यांत भरावी. मराठवाड्यांत दत्तध्वजा फडफडून मोठ्या ऐश्वर्यानें डुलणारें गुंज क्षेत्रांतील दत्तमंदिर बांधतांना प्रामुख्यानें दोन व्यक्ति झटकन

डोळ्यांपुढें येतात. त्या वेळीं गुंजच्या सेवेंतच ज्यांना आपलें जीवनसर्वस्व वाटावें असें श्री. चिंतामणि मुकदम आजचे सद्गुरु ।चिंतामणि महाराज यांचे परिश्रम व श्रीरामशेटजी यांची देखरेख ही यांची सेवा अतुलनीय आहे. गुंजसंस्थानासाठीं या उभयतांनीं आपला सारा जिव्हाळा ओतला होता. श्रीरामशेट हे सद्गुरु योगी श्री योगानंद सरस्वति यांचे विश्वासपात्र होते. आपण आतां फार दिवसांचे सोबती नाहीं अशी सद्गुरु योगानंदांची खात्री झाली होती. मोरेगांवाहून त्वरित गुंज येथें जा. वेळ जवळ आली आहे असा साक्षात्कार परमहंस परिव्राजकार्य गुरुदेव वासुदेवानंद सरस्वति यांनीं त्यांना दिलेला होता. सद्गुरु योगानंदांनीं या पुण्यभूमीवर दत्तमंदिर उभारावें अशी मनिषा श्री श्रीरामशेट व इतर भक्तगण यांना कळवितांच आपली मनिषा सत्यसृष्टींत येईलच असें अभिवचन दिलें. सद्गुरुंना तितकेंच समाधान वाटलें. सद्गुरु योगानंद महाराजांनीं आपलें अवतार कार्य संपविलें. दत्तमंदिर बांधावयाची योजना आंखली गेली. श्रीरामशेट यांनीं पुढाकार घेतला. शारीरिक मेहनत व मजुरावर देखरेख करणें इत्यादि गोष्टी आजचे सद्गुरु चिंतामणि महाराज जिवेंभावें करीत. मजुरांना पैसे तेच पुरवीत. सद्गुरु योगानंदांची माया अजब होती. पैसा कोठून कसा येई हें फक्त ती योगशक्तीच जाणे. डौलदार व भव्य दत्तमंदिर बांधलें गेलें. बराच खर्च त्या काळीं आला होता. भव्यता, उंची, मजबूत बांधकाम त्यावरील कारागिरांचें कौशल्य पाहून सामान्य जीव क्षणभर मुग्धच होतो. योगेशांची योगलीलाच ती. एकाच वेळीं हजार व्यक्ति तरी बसूं शकतील इतकें तें भव्य आहे. आजूबाजूस स्वयंपाकगृह, भोजनगृह, सेवेकऱ्यासाठीं व भक्तासाठीं वसतिगृह अशा अनेक ओरड्या आहेत व मोठी धर्मशाळाहि आहे.

## परमतत्त्वाचा साक्षात्कार

दत्तमंदिराचें काम पुरें होत आलें. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याचा दिवस मुक्रर झाला. सद्गुरु योगानंदांनीं नेमलेलें ट्रस्टी प्राणप्रतिष्ठेचे वेळीं कोणी काय काम जबाबदारीनें पार पाडावयाचे यासाठीं मानवत येथें एकत्र जमले होते. कामें सोपविलीं गेलीं. ज्या संगमवरी दगडाच्या एकमुखी दत्तमूर्तीची स्थापना करावयाची होती ती मूर्ति ट्रस्टी बघूं लागले. श्री. रामशेट यांनीं ती मूर्ति बघतांच नाक फेंदारलें. त्यांच्या मनाला ती मूर्ति पटली नाहीं. त्याचवेळीं गुंज येथें मंदिराच्या सभामंडपाचें छत खालीं कोसळलें. हें घडलें कसें? कारण समजेना. हें वृत्त गडी पाठवून ट्रस्टींना त्वरित कळविण्यांत आलें. साऱ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला. ज्या क्षणीं श्रीराम शेटजींनीं मूर्तीबद्दल नापसंती दाखविली होती त्याच क्षणीं इकडे छत खालीं कोसळलें होतें. परमतत्त्वानें ही मूर्ति नको असा साक्षात्कार या घटनेनें दिला. सद्गुरु योगानंदांची इच्छा नसावी म्हणूनच असें घडलें ही खूण साऱ्यांना मनोमनीं पटली. ट्रस्टी लगेच गुंज येथें आले. छताची मांडणी जास्त मजूर लावून ताबडतोब करण्यांत आली. ठरविलेल्या दिवशींच श्री दत्तमूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली गेली. सद्गुरु योगानंद महाराज यांचे भाचे यांनीं तीनमुखी दत्ताची सुंदर, रेखीव व उंच दत्तमूर्ति भडोचहून पाठविली होती. योगमायेनेंच एकमुखी दत्त-मूर्तीऐवजी तीनमुखी दत्तमूर्ति आली. आपली मनिषा श्रीराम शेटजींच्या द्वारें योगशक्तीनें सद्गुरु योगानंदांनीं कळविली असें भाविक मनें बोलतात.

श्रीरामशेट सद्गुरु योगानंदाच्या सेवेंत इतकें कां रमत? हें ऐकण्या-सारखें आहे. सद्गुरुंना श्रीरामशेट आपल्या घरीं नेत. जीवें भावें सेवा करीत. व्यापार धंदा वाढला. ऐश्वर्य वाढलें याचें कारण केवळ सद्गुरुंची कृपाच असें ते मोकळ्या मनानें इतरांपाशीं बोलूनही दाखवीत. सद्गुरु

योगानंद महाराजांनीं त्यांना एक अजब चमत्कार दाखविला त्या वेळेपासून तर ते सद्गुरुसेवेंत लोण्यासारखे विरघळत असत.

**श्रीराम शेटजींनीं सद्गुरु योगानंदाची पाहिलेली अजब माया**

सगळेच दिवस सारखे नसतात. कालचक्र फिरतच असतें दैव अनुकूल प्रतिकूल होत असतें. कित्येक ग्रहमान बदलत असतें. असेंहि म्हणतात, तर कित्येक हे सारे नियतीचे खेळ असतात असें मत प्रदर्शित करतात. श्रीरामशेट अशाच एका फेऱ्यांत सांपडले. कारागृहवास अटळ होता. मुंबईच्या पेढीचें श्रीरामशेट यांना लाख रुपयांचें देणें निघालें. मुंबईकर पेढी मालकाला त्याची जाणीवही नव्हती. पण उडणाऱ्या माशांच्या जातीचें विघ्नसंतोषी कांहीं लोक असतात. अशा व्यक्तींनीं मुंबईकर शेटजींना या येण्यासाठीं जागृत केलें. त्यांना योग्य ते पुरावे दाखविले. खात्री करून दिली. पैशाचा लोभ कोणाला सुटला आहे? मुंबईकर शेटजींनीं दोन वकील लावून हें सारें काम त्यांच्यावरच सोपविलें. पैसा काय करूं शकत नाहीं? कोर्टांत फिर्याद गेली. कोर्टानें पैशासाठीं पकडवारंटाचा हुकूम बजाविला. कैदीवारंट होतें तें. दिसतील तेथून कैद करून आणा असा सक्त हुकूम होता. त्यामुळें रेल्वेनें फिरणें, बाहेर फिरणें इत्यादि गोष्टी शेटजी टाळूं लागले. एकदां सहज कोठल्या तरी स्टेशनावर असतांना हेच ते श्रीरामशेट असें दाखविण्यासहि कांहीं व्यक्ति चुकल्या नाहींत. जितने तारे गगनमे इतने शत्रू होय। पर सद्गुरुकी कृपा तो बाल न बिंगा होय॥ या संत तुळशीदासाच्या वचनाची सत्यता पटविणारी वेळ आलेली होती. सद्गुरु कृपा काय करूं शकत नाहीं? योगायोगानें श्रीरामशेट पकडले गेले. कोर्टाच्या कोठडींत उभे होते. हातकड्या त्यांच्यासाठीं तेथें तयारच होत्या. साऱ्यांची खात्री झाली कीं, शेटजींची कैद अटळ आहे. इतक्यांत सद्गुरु योगानंदांनीं लीला केली. तीनदां पुकार होऊनही वादीचा वकील हजर नव्हता. श्रीरामशेट जज्जाकडे पहात होते.

पण आश्चर्य ! श्रीरामशेट यांना जज्जाऐवजीं त्या खुर्चीवर सद्‌गुरु योगानंदच दिसायचे, हसायचे, हातानें आशीर्वाद देऊन धीर द्यावयाचे. असें दर्शन खात्री होण्यासाठीं दोन तीन वेळां घडविलें. प्रभूमाया अजब असते. वादी हजर नसल्यामुळें जज्जांनीं एकतर्फी निकाल देऊन दावा खोटा ठरविला. श्रीरामशेट निर्दोष सुटले. त्यांच्या पाठीमागील कैदेचा ससेमिरा पार नाहींसा झाला. इतका अजब चमत्कार सद्‌गुरुंनीं दाखविल्यावर श्रीरामशेट सद्गुरुपुढें लोण्यासारखे कां विरघळणार नाहींत ? त्यांचें सर्वस्व सद्‌गुरु योगानंदच बनले तर काय नवल ? म्हणून संस्थानास शेटजींनीं स्वतःला वाहून घेतलें होतें.

## सद्‌गुरु राया ! माझ्यासाठीं तूं किती कष्ट घेलतेस रे !

श्रीरामशेट निर्दोष सुटले. विरोधकांच्या तोंडावर खेटरें पडलीं. वृत्ति आंत बाहेर ठेवणाऱ्यांचीं तोंडें काळीं पडलीं. सद्‌गुरु योगानंदाचें अजब योगसामर्थ्य दुनियेच्या नजरेस आलें. पण इकडे श्रीरामशेट घरांत दारे बंद करून मोठमोठ्यानें रडूं लागले. दोनचार तास झाले तरी त्यांच्या रडण्याला खंड नव्हता. पुष्कळांनीं पुष्कळपरी समजाविलें तरी रडणें थांबेना. शेटजी स्फुंदत स्फुंदत बोलूं लागले. माझा अपमान झाला, छीःथू झाली म्हणून मी रडतों आहे असें तुम्हास वाटते काय ? कंठ सद्‌गद झाला. ईश्वरी माया आठवली. मला कीर्तीचें वाटत नाहीं. फक्त एकाच गोष्टीचें फार फार वाईट वाटतें. ज्यानें घरदार सोडलें, संसार सोडला, संन्यास घेतला. सर्वस्वीं धर्मासाठीं वाहून घेतले, जे योगिराज होते त्या समर्थ गुरुमाऊलींनीं, सद्‌गुरु योगानंद महाराजांनीं माझ्यासाठीं, केवळ माझ्यासाठीं, मुसलमानी बादशहाच्या खुर्चीवर बसावें ? ही गोष्ट मनाला वारंवार खटकते म्हणून मला रडूं कोसळलें. गुरुमाऊली, तुझे उपकार कोठें ? व कसे फेडूं ?

## चैतन्यशक्ति

चैतन्यघन प्रभूची चित्शक्ति सर्वव्याप्त आहे. ईश्वर कोठें नाहीं. योगीयांची ऊर्मि उसळतांच ती सर्वव्याप्त होत असते. सद्गुरु योगानंद महाराजांना देहाचा भरंवसा राहिला नव्हता. आपल्या श्रीराम तोतला या सद्भक्ताला निर्गमनापूर्वी एकदा भेटावें अशी त्यांना इच्छा झाली. लगेच तार वजा पत्र पाठविलें. भेटावयास ताबडतोब निघून या. तिकडे श्रीरामशेट तुळजापुरास जावयास निघाले होते. गाड्या तयार होत्या. पत्र मिळतांच तिकडे जावयाचा बेत रहित केला. गुंजला जावें लागणार, महाराजांचा अंत:काळ आहे. महाराजांची आज्ञा झाली तर खर्चाची बाजू येणार. त्यांची आज्ञा मोडतां येणार नाहीं. त्या दृष्टीनें आपली पूर्वींसारखी स्थिति राहिली नाहीं. असे विचार त्यांच्या बुद्धीस चाटून गेले. गेलें तर पाहिजे म्हणून शेटजी गुंजेस यावयास निघाले. वाटेंत रस्ता चुकले. तेथें कोणीतरी वृद्ध घोंगडी घेऊन आला. त्यानें योग्य तो रस्ता दाखविला. शेटजी गुंजेस आले. सद्गुरु योगानंदांना साष्टांग नमस्कार घातला. महाराजां-पुढें एक रुपया ठेविला. कांहीं काळ दोघेहि स्वस्थ बसले. इतक्यांत सद्गुरु योगानंद म्हणाले, श्रीराम ! हा रुपया प्रथम उचल. खर्चाची बाजू आहे असे विचार मनांत यावयास नको. मनांतील जाणलें. घरीं केलेले विचार महाराजांना कसें समजलें ? आश्चर्य वाटलें. रस्ता चुकला होता. गुर्वाज्ञा म्हणून रुपया खिशांत ठेविला. नंतर इतर गोष्टी झाल्या. दत्तमंदिराची सदिच्छा सांगितली. सद्गुरुचें त्यांच्यावर अति प्रेम होतें. शेटजींचीहि सद्गुरुवर अढळ श्रद्धा होती.

## गुरुनिष्ठा

पूर्णा येथें श्रीरामशेट यांची मोठी पेढी होती. भक्त श्रीरामशेट गुंज येथें सद्गुरु योगानंद यांच्या चिठ्ठीवरून संत सहवासांत आलेले होते. पूर्णा येथील पेढीला, घराला आग लागली हें वृत्त सांगावयास एक

नोकर तांतडीनें गुंज येथें आला. त्यावर शेटजी म्हणाले, माझी गुरुमाऊली श्रेष्ठ, कां घराला आग लागली हें श्रेष्ठ? मी माझें माऊलीचें चरण सोडणार नाहीं. तूं आल्या पावलीं परत जा. पूर्णेला ती आग तीन दिवस सारखी जळत होती. पण त्याबद्दल एकही ऊर्मी शेटजींच्या मनांत आली नाहीं. गुरुमाऊली योगानंद यांनीं आपल्या शिष्यांच्या मनाची बैठक किती उच्च दर्जाची करून घेतली होती याची वरील विधानावरून वाचकांना कल्पना येईल.

स्वतःच्या वर्तनानें, निस्सीम गुरुभक्तीनें मराठवाड्यावर सद्गुरु योगानंद सरस्वति यांची फार जोराची पकड होती. म्हणून दत्तसंस्थान गुंज हें जागृतस्थान आजही कैकांना पावत आहे.

महाराष्ट्रांत शक्तिपातदीक्षेचे अध्वर्यु पुण्याचे संत सद्गुरु गुळवणी महाराज, गुंज संस्थानचे सद्गुरु चिंतामणि महाराज, नारेश्वरचे संत ब्रह्मनिष्ठ पूज्य श्री रंगावधूत महाराज या त्रयदत्तांच्या कृपेनेंच हा ग्रंथ पुरा झाला अशी लेखकाची श्रद्धा आहे. दत्तसंस्थान गुंज यांनीं प्रकाशनाची मोठी जबाबदारी आपणावर घेतली म्हणूनच ही चरितामृताची अल्पशी कृति आज जनताजनार्दनाच्या सेवेस येत आहे.

* * *

॥ श्री गुरुदेवदत्त ॥



## ॥ श्री योगानन्दपञ्चकम् ॥

यो वै भूमा तत्सुखं त्वेति गीतं
गेयातीतं ध्यानगम्यं मुनीन्द्रम् ।
भक्तैकार्थं ह्यात्तमानुष्यमूर्तिं
योगानन्दं तं यतीन्द्रं नतोऽस्मि ॥ १ ॥

एकोऽहं बह्विति प्रोच्य भूतं
नानारूपं स्वप्नलीलोपकल्पम् ।
आद्यावन्ते निर्विशेषं विशेषं
योगानन्दं तं यतीन्द्रं नतोऽस्मि ॥ २ ॥

छन्दोगीतं यत्सदेवाग्र आसी–
न्मायागर्भं बद्धमाया विमाया ।
लोकातीतं लोकरूपं विलोकं
योगानन्दं तं यतीन्द्रं नतोऽस्मि ॥ ३ ॥